मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास

इ. स. १८०० – २०००

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध.



– संशोधक –
चारुशिला उत्तम शशिकला लोखंडे
P.R.No.:02114002277
– मार्गदर्शक –
डॉ. भास्कर दाजी धाटावकर
इतिहास विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

ऑक्टोबर २०१८

CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled **मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास इ. स. १८०० – २०००** which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph.D.) in **History Department** of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by Smt. **Lokhande Charusheela Uttam Shashikala** under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in the thesis has not formed the basis for the award of any degree or similar title of this or any other University or examining body upon him/her.

Sd/-

Signature of the Research Guide

Place :

Date :

ऋणनिर्देश

'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ', पुणे मधील पीएच. डी. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून हा संशोधनाचा प्रबंध लिहिलेला आहे. **''मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास इ. स. १८०० – २००० ''** हा माझा संशोधन विषय असून हा शोध प्रबंध पूर्ण करताना मला अनेक संस्था, मार्गदर्शक व्यक्ती आणि मित्र परिवार यांचे सहकार्य लाभले.

संशोधन विषयाची निश्चिती, स्वरुप, व्याप्ती इ. सर्वच बाबतीत अनभिज्ञ असल्यामुळे योग्य ती माहिती माझे **मार्गदर्शक डॉ. भास्कर दाजी धाटावकर** यांनी अत्यंत व्यवस्थित समजावून सांगितली व हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन करून मौलिक सूचनाही दिल्या. त्यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे मी हा प्रबंध पूर्ण केला. म्हणून मी त्यांची मनःपूर्वक ऋणी आहे. आणि त्यांच्या ऋणातच राहून माझे पुढील संशोधन कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

इतिहास विभाग प्रमुख **डॉ. नलिनी वाघमारे मॅडम, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**, पुणे यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले.

संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक संदर्भग्रंथ एलिफिन्स्टन कॉलेज पुराभिलेखागार, मुंबई, कोवासजी फ्रामजी इन्स्टिट्यूट, के. आर. कामा ओरिएंटल इन्स्टिट्यूट, मुंबई, जे. बी. पेटीट इन्स्टिट्यूट, मुंबई, भाऊ दाजी लाड म्युझियम, भायखळा, नेहरू लायब्ररी, कलीना व नेपेन्सी रोड येथील वृध्द पारशी रहिवाशांसोबत भेट, तसेच **एम.पी. बिल्लीमौर्या** यांनीही संशोधन कार्यात मदत केली.

त्याचप्रमाणे संशोधन कार्यात माझ्या खांद्याला खांदा देऊन मदत करणारे **अलीअसगर बुटवाला** यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी वेळोवेळी विविध पुस्तकांबाबत मार्गदर्शन करून गुजराती, उर्दू आणि इंग्रजी पुस्तकातील मजकुरांचे अगदी जलद व शास्त्रशुध्दरितीने भाषांतर करून जलदगतीने संशोधन कार्याला हातभार लावून वेळोवेळी सहकार्य केले. त्याचप्रमाणे फोटोग्राफी व थोड्याफार चर्चात्मक मुलाखती ज्या गुजराती भाषेत होत्या त्या पुन्हा मराठीत मांडून संशोधन कार्य खऱ्या अर्थाने आकर्षक बनविण्यात त्यांचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी आहे.

ज्यांनी माझ्या जीवनात संस्कारांचे धडे गिरविले ते म्हणजे माझी आई सौ. शशिकला उत्तम लोखंडे आणि वडील श्री. उत्तम वामनराव लोखंडे यांचे माझ्या संशोधन कार्यात आशीर्वाद लाभले. तसेच कु. विनोदिनी उत्तम लोखंडे यांनीही वेळोवेळी विविध सूचनांमार्फत उत्साह वाढविला.

कल्याण व मुंबई येथील मित्र परिवारानेही संशोधन कार्यात माहिती गोळा करण्यासाठी मदत केली.

पीएच. डी. पदवीकरिता तयार केलेला शोध प्रबंध **सौ. वैशाली कदम, सौ. कुलकर्णी मॅडम**, पुणे यांनी अथक परिश्रम करून योग्य वेळेत टंकलिखित करून दिला. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. त्याच बरोबर सौ. भाग्यश्री लोणी यांनी या प्रबंधाचे मुद्रित शोधनाचे काम केलेले आहे. त्यांचेही मनःपूर्वक आभार मानते.

अशा प्रकारे सर्वांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने मी हा शोध प्रबंध पूर्ण करू शकले. म्हणून मी पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानून ऋण व्यक्त करते.

(चारूशिला उत्तम शशिकला लोखंडे)

अनुक्रमणिका

अनु. क्रमांक	तपशील	पान क्रमांक
१.	प्रस्तावना	१ – २६
२.	सामाजिक जीवन	२७ – ६७
३.	आर्थिक जीवन	६८ – १००
४.	धार्मिक जीवन	१०१ – १७१
५.	राजकीय जीवन	१७२ – २०९
६.	समारोप	२१० – २१५
७.	संदर्भ सूची	२१६ – २२४
८.	परिशिष्ठ अ व ब	२२५ – २३०

प्रकरण – १ले

प्रस्तावना

'मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास इ. स. १८०० – २०००' हा माझ्या प्रबंधाचा विषय आहे. या प्रबंधात पारशी समाज आणि त्यांचे हिंदुस्थानातील वास्तव्य यांचा सामाजिक, आर्थिक,धार्मिक आणि काहीसे राजकीय वळणे असलेला इतिहास आहे.

पारशी समाज हा हिंदुस्थानात केव्हा आला? कोणत्या कालखंडात आला? तसेच हा समाज इतर समाजाशी व ह्या मातीतील संस्कृतीशी कसे एकरुप होऊन गेला? समाजात वावरताना त्यांनी स्वत:ची ओळख कशी निर्माण केली? ओळख निर्माण करता करता त्यांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागला? त्याचप्रमाणे त्यांनी सर्व क्षेत्रात केलेली स्वतःची नेत्रदीपक प्रगती व ही प्रगती साध्य करण्याकरिता त्यांचे उल्लेखनीय योगदान, त्यातून स्वत:बरोबरच त्यांनी इतरांना केलेली मदत, शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांच्या समाजात शिक्षणाचे महत्त्व पटवून कसे सिद्ध केले? तसेच त्यांच्या पूर्वजांनी सुरू केलेली धार्मिक प्रथा जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी कोणते कार्य केले? इतर धर्मातील लोकांनी पारशी समाजावर वेळोवेळी त्यांच्या धर्माचे पालन करण्याकरिता दबाव टाकला, परंतु असे असूनही पारशांनी त्यांच्या धर्माचा आदर राखला, कारण, ते ह्या मातृभूमीत आपला देश सोडून निर्वासित म्हणून आले होते. आपल्या धर्माचे पारशी समुदायाने अत्यंत काटेकोरपणे पालन केले व हे करीत असताना त्यांनी त्यांच्या धर्मात कोणालाही येण्याची कधीही अनुमती दिली नाही व दुसऱ्या धर्मासाठी अडचणही निर्माण केली नाही. त्यांनी स्वत:ला नेहमीच सर्वांपासून अलिप्त ठेवून आपल्या धर्माचे पालन केले. हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती आणि इस्लाम ह्या मुख्य प्रवाहात पारशी संस्कृती ही वेगळी आहे.

पारशी समाजाने भारताला त्यांची कर्मभूमी बनविली. ही भूमी एक अशी भूमी होती की, तिने पारशांचे फक्त संगोपनच केले नाही, तर ह्याच भूमीवर त्यांच्या प्राचीन धर्माचा प्रसार करण्याची परवानगीही दिली. अत्यल्प असूनही जागतिकदृष्टया स्वतःचे स्थान निर्माण करुन पारशी समाजाने शैक्षणिक, उद्योग, व्यापार, वैद्यकीय इ. क्षेत्रांचा व इतर समाजाचा आदर राखून स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले.

पारशी हे नावाप्रमाणेच पर्शियन इराणी वंशाचे. 'पारशी' ह्या शब्दाचा अर्थ पार्स किंवा फार्स असा होतो. फार्स म्हणजे प्राचीन व पार्स म्हणजे दक्षिण इराणांतील ग्रीक पर्सपोलिस ह्या ठिकाणचे. पारसिझम किंवा झोराष्ट्रीनिझम् याची सुरूवात झरतृष्ट्रने तीन हजार पाचशे वर्षांपूर्वी केली असावी. झोराष्ट्रीयन धर्मावर लोकांचा विश्वास इतका वाढला की, पारशी समुदायाने त्याला एक काल्पनिक व्यक्ती मानले. अलेक्झांडर व अरब मुसलमान यांनी पर्शियावर हल्ला करुन झोराष्ट्रीयन पौराणिक शास्त्राचा नाश केला त्यामुळे आज त्या शास्त्राचे अस्तित्व राहिले नाही.[१] परंतु गुश्ताप राजा सत्तेवर असतांना झरतृष्ट्रने धर्माची स्थापना केली व या धर्माचे अनुकरण करणारे लोक म्हणजे पारशी होय झरतुष्ट्राने 'अवेस्ता नावाचा ग्रंथ लिहिला व हा पारशांचा पवित्र धर्मग्रंथ म्हणून ओळखला जातो या ग्रंथात झरतुष्ट्राने असे भाकित केले की इराणवर तीन वेळा हल्ला होइल त्या वेळी तेथे जो राजा सत्तेवर असेल याच्या राज्यात झोराष्ट्रीनिझम् या धर्माला अत्यंत हाल अपेष्ठा सहन कराव्या लागतील. झरतुष्ट्राने केलेले हे भाकित खरे ठरले सर्व प्रथम सुरुवात अलेक्झांडरने केली त्याने इराणवर हल्ला करून सर्वांना गुलाम बनवून तीनशे वर्षे राज्य केले. त्यानंतर अर्दशीरने झोराष्ट्रीनिझम् धर्माचे पुनर्वसन केले

दुसरी घटना अशी घडली की अर्दशीरने अर्दवीराफला ज्ञान प्राप्त करण्यासाठी पाठविले यावेळी सर्वत्र दुर्दैवी घटना घडू लागल्या त्यावेळी शापूरने येऊन सर्व कायापालट करून धर्माचे पुनःसंचयन केले हे संचयन यझ्देरजाद शेरीयार याच्या राज्यरोहणापर्यंत तसेच राहिले. पुढे यझ्देरजाद सत्तेवर असतांना इराणमधील झोराष्ट्रीनिझम् संपुष्टात आला.

परदेशी लोकांनीही इराणवर हल्ला करून इराणला विनाशाच्या उंबरठ्यावर नेले व तेथील जनतेला आपले गुलाम बनविले. जे पुरोहित व त्यांचे अनुयायी 'अवेस्ता' ह्या ग्रंथाला मानणारे होते ते आपली मालमत्ता व मातृभूमी इराण तशीच सोडून कोईस्तानच्या डोंगरामध्ये दडून बसले. तेथे ते शंभर वर्षे राहिले असावेत. एका धार्मिक पुरोहिताने सल्ला दिल्यानंतर सर्वजण कोईस्तान सोडून हॉरमूझ येथे गेले, तेथे ते पंधरा वर्षे राहिले असावेत. पंधरा वर्षांच्या वास्तव्यानंतर एका विद्वान दस्तुराने ज्योतिषशास्त्राच्या साहाय्याने असे सुचविले की, एकाचवेळी सर्वांनी हे ठिकाण सोडून जावे अन्यथा धर्माचे ज्ञान निरूपयोगी होऊन जाईल

परिणामी, दस्तुरने त्यांना भारतात जाण्याचा सल्ला दिला.[२] अशाप्रकारे त्यांच्या धर्माच्या रक्षणाकरिता नवीन धर्माचा उदय झाला तो धर्म म्हणजे झोराष्ट्रीनिझम् म्हणजे पारशी होय.

या धर्मातील लोकांनी स्वत:बरोबर स्त्रिया व मुले घेतली आणि जहाजामार्गे भारतात आले. येथे आल्यानंतर सर्वप्रथम ते दीव येथे उतरले तेथे ते एकोणीस वर्षे राहिले असावेत. पुढील काळात पुरोहितांनी पुन्हा ज्योतिषशास्त्रांच्या साहाय्याने सर्वांना असे सांगितले कि, त्यांचे नशीब येथे नसून दुसऱ्या ठिकाणी आहे व त्यांच्या शोधार्थ आपल्याला जायला हवे.[३]

यावेळी पारशी समाज हा गुजरातमधील संजान येथे स्थायिक झाला. ह्याकाळात संजान हे पोर्तुगिजांसाठी अत्यंत महत्त्वाचे शहर होते. त्यावेळी तेथे जादीराणा उर्फ जाधवराणा ह्या राजाची सत्ता होती. त्यांच्या संजान येथील आगमनाची योग्य तारीख ''पारसी प्रकाश'' मध्ये ७१७ अशी आहे. जादीराणा हा योग्य व निर्णयक्षम राजा होता. राजाच्या ह्या गुणवत्तेमुळे पारशी लोक जे धार्मिक छळाला कंटाळून पळून संजानला आले होते त्यांना असे वाटले की, आपण ह्या राजाच्या राज्यात आसरा घेतला पाहिजे.[४]

जादीराणा व ह्या निर्वासित बनून आलेल्या पारशी लोकांची सुरूवातीची मनोरंजक भेट ही प्रसिद्ध आहे. ज्या वेळी पारशी लोक राजाकडे तेथील भूमीत आसरा मागण्यासाठी गेले होते तेव्हा जादीराणाने एक दुधाने काठोकाठ भरलेले भांडे मागविले व इशाऱ्याने असे सुचविले की, त्याचे राज्य प्रजेने आधीच संपूर्ण भरलेले आहे म्हणून निर्वासित जनतेला तो जागा देऊ शकणार नाही. राजाच्या ह्या प्रतिक्रियेमुळे एका पारशी पुरोहिताने त्या दुधाच्या भांड्यात चिमूटभर साखर घेतली व असे दर्शविले की, ज्याप्रकारे ह्या साखरेमुळे दूध भांड्यातून भरून वाहिले नाही, त्याप्रकारे आम्हीसुद्धा ह्या प्रजेतील लोकांबरोबर गोडवा निर्माण करुन राहू. पुरोहिताच्या ह्या उत्तरामुळे दरबारातील सर्व लोक प्रसन्न झाले. परंतु, राजाला त्यांच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती म्हणून त्याने पारशांना त्यांच्या धार्मिक चालीरीती स्पष्ट करायला सांगितल्या. पारशांच्या स्पष्टीकरणाने राजा समाधानी झाला व त्याने पारशांच्या आश्रयस्थानाची विनंती स्वीकारली. अशा प्रकारे पारशी समाजाने संजानमध्ये आपले बस्तान बसविले व भारतात आपल्या वसाहती स्थापन केल्या.[५]

पारशांच्या संजान येथील आगमनानंतर आहुर मझदाला दिलेल्या वचनाप्रमाणे त्यांनी आतिश बेहरामची स्थापना संजानमध्ये केली. 'किस्सा–ए–संजान' मध्ये दिल्याप्रमाणे त्यांनी एका पुरोहिताला खोरासन येथे पवित्र अग्नीच्या स्थापनेसाठी लागणाऱ्या धार्मिक विधीची साधनसामग्री आणण्याकरिता आणि त्या विधी पार पाडण्यासाठी त्यांच्या समाजातील धार्मिकवृत्तीच्या पुरोहितांना आमंत्रित करण्याकरिता संजानमधून एका पुरोहिताला पाठविले. 'किस्सा–ए–संजान' व्यतिरिक्त पारशांचे आगमन संजानमध्ये कसे झाले याचे कोणतेही पुरावे मिळत नाही, त्यांच्या संजानमधील वास्तव्याची माहिती ही अत्यल्प असल्यामुळे तो कालावधी आजही गुढावस्थेत आहे. [६]

याप्रमाणे जादीराणाची परवानगी घेऊन व त्यांच्या मदतीने पारशांनी आतिश बेहरामची स्थापना संजानमध्ये केली. अशा प्रकारे सुमारे तीनशे वर्षांच्या आसपास पारशी समुदाय संजान खेरीज इतरत्रही विखुरला. त्यातील काही नवसारी, भरोच, कॅम्बे, वारियाव व गुजरातच्या इतरत्र भागात स्थायिक झाले. जेथे–जेथे ते स्थाइक झाले तेथे–तेथे त्यांनी स्वत:ची भरभराट केलेली दिसून येते.

महमूदशहा खिलजी सत्तेवर असताना संजानमध्ये एक हिंदू राजा राज्य करीत आहे असे समजले म्हणून त्याने 'अल्फ खान' नावाच्या आपल्या वजिराला बोलावून सांगितले की , सैन्य घेऊन जा व संजान ताब्यात घ्या. अशा प्रकारे तीस हजार घोडेस्वार बरोबर घेऊन अल्फ खान हा आपल्यावर चाल करून येत आहे असे संजानमधील राजाला समजल्यावर त्याने त्याच्या राज्यातील सर्व जनतेला बोलावून असे आवाहन केले की, ''आमच्या पूर्वजांनी तुम्हाला खूप मदत केली व आता परतफेड म्हणून तुम्ही आम्हाला लढण्यासाठी साहाय्य करा.'' त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या पारशांमधील एक वृद्ध म्हणाला की, ''आम्ही आमच्या रक्तातील शेवटच्या थेंबापर्यंत लढू व तुम्हांला सहाय्य करू.'' कारण हे आमच्या संस्कृतीमध्येच आहे. ही लढाई सतत तीन दिवस चालू होती, शेवटी अल्फ खानने आपली हार मानून लूटलेली सर्व संपत्ती पारशांच्या हाती देऊन तो रिकाम्या हाताने निघून गेला. [७]

पारशी समाजाचे वास्तव्य असताना ते फारसे कोणाच्याही नजरेत आले नाहीत. परंतु या दोन घटनांमुळे हा समाज सर्वांसमोर आला. त्या घटना म्हणजे –

१) पारशांची महमूदशहा खिलजी विरुध्द लढाई.

२) दस्तुर मेहरजी वाच्छा याला सम्राट अकबराकडून 'मेहरजी राणा' ही मिळालेली पदवी होय. कारण दस्तुरने समाजात त्यांच्या ज्ञानामुळे स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली, त्याचप्रमाणे त्याला सर्व धार्मिक बाबींचे विशेष ज्ञान होते. या दोन घटनांव्यतिरिक्त पारशी हे विशेष कोणा समोर आले नाहीत.[८]

सोळाव्या शतकात पारशी समाज हा एक संपन्न समुदाय म्हणून नावारूपास आला. ज्याप्रमाणे ते निर्वासित बनून संजानमध्ये स्थाइक झाले तसे ते न राहता त्यांचा एका संपन्न समुदायात बदल झाला होता. त्यांची भरभराट विशेषतः शेती, सुतारकाम, विणकाम, जहाजबांधणी, सागरी व्यापार त्याचप्रमाणे ताडीचे उत्पादक ह्यात झाली. तसेच अकबराच्या कारकिर्दीत त्यांनी इराणी गालिचे विणकरांना हिंदुस्थानात येण्यासाठी प्रेरित केले. असे म्हटले जाते की, ''नवसारीतील प्रत्येक पारशी घरात एकतरी यंत्रमाग असे'' व त्यावर ते रेशमी आणि सुती कापडाचे 'गाज व बस्ता' विणत असत, ज्याचा उपयोग साडी व धोतरामध्ये होत होता. हे कापड नंतर युरोपात पोर्तुगीज, डच आणि इंग्रजी व्यापारांमार्फत १६ ते १८ व्या शतकापर्यंत निर्यात होऊ लागले.[९] एडवर्ड टेरी इ.स. १६१५ मध्ये हिंदुस्थानात आला असता त्याने लिहिले की , ''पारशी समुदाय जेथे राहतो तेथे तो आपल्या जमातीशी अत्यंत काटेकोरपणे एकनिष्ठ व कामात कष्टाळू असतो.''[१०] ज्याप्रमाणे सोळाव्या शतकात नवसारीच्या पारशांचे वर्चस्व होते त्याप्रमाणे पुढील शतकात सुरत येथील पारशांची भरभराट झाली. सुरत येथील बंदर हे भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वात मोठे औद्योगिक केंद्र बनले होते, युरोप व आफ्रिकेतील वस्तू, चीनमधून उत्तम प्रकारचे रेशीम, मलक्कातून चहा तसेच ऱ्हूबाब ह्या प्रकारच्या झाडाचे देठ जकार्ता येथून आयात होत होते. [११]

जशा पारशांच्या वसाहती सुरतमध्ये वाढू लागल्या तसतसे त्यांचे कौशल्यही वाढू लागले. सुरतमध्ये तीन जोशी, भाऊ प्रसिद्ध होते. कारण त्यांनी 'तानचोई' ह्या रेशीम विणण्याच्या कलेची ओळख करून दिली. ज्या पारशांनी आंतरदेशीय बंदराकरिता योगदान दिले त्यांचा सुरतमध्ये प्रभाव कायम राहिला. पारशी अत्यंत जलद गतीने एका अशा पदावर पोहोचले की, त्यांच्याजवळ समृद्ध व्यापारी, तसेच इतर समुदयातील लोकांबरोबर नातेसंबंध अशा दुहेरी

गोष्टी होत्या. म्हणून त्यांनी स्वतःला अत्यंत वेगवानगतीने एका प्रतिष्ठित पदावर पोहचविले. युरोपियन लोक हे पारशांव्या संपर्कात होते. पारशांच्या स्थानिक राजकारणातील सहभागामुळे ते युरोपियन व्यापांऱ्यांकरिता विश्वसनीय ठरले. त्याचप्रमाणे सुरतमधील नवाबाच्या माध्यमांतून पारशी मोघलांच्याही संपर्कात होते अशा प्रकारे त्यांचे एक मोठे जाळे निर्माण झाले.

काही कालावधीत पारशी हे शेती क्षेत्रावरून एक प्रभावी मध्यस्त बनले. सुरत येथील रूस्तम माणेक शेठ हे त्या वेळचे एक प्रभावशाली आणि व्यापारीदृष्ट्या सक्षम अशी व्यक्ती होती. पोर्तुगीज, डच, इंग्रज यांच्या व्यापारी केंद्रात रूस्तम माणेक शेठ हे मध्यस्त म्हणून काम पाहत होते. त्या वेळचे सर्वात प्रसिद्ध मध्यस्त म्हणून ओळखले जात.[१२] यावेळी सुरत हे भरभराटीला आले महत्त्वपूर्ण शहर होते. ह्या भरभराटीचा प्रभाव सामर्थ्यशाली मराठा सत्तेवरही पडला. त्यावेळचे मराठी सत्तेचे प्रमुख छ. शिवाजी महाराज यांनी सुरतेवर स्वारी करण्याचे ठरविले. महाराजांच्या मते ह्या स्वारीमुळे ब्रिटीश व पोर्तुगिजांच्या व्यापारी केंद्रावर वाईट परिणाम होईल ह्या विचाराने महाराजांनी सुरतवर दोन वेळा स्वारी केली. ह्या आक्रमणानंतर केलेल्या स्वारीच्या सामानात पारशांना अकबराने बक्षीस म्हणून जी शंभर एकर जमीन शांततेचे प्रतीक असणारे स्तंभ बनविण्यासाठी भेट दिली होती त्यात ह्या संदर्भातील सर्व कागदपत्रेसुद्धा होती. म्हणून पुढील काळात पारशांजवळ जमिनीसंबंधात कोणतेही पुरावे राहिले नाहीत. नंतर त्याचवेळी अहमदनगरचा प्रशासक हा सुरतमधील सरकारी कामकाज पाहत होता व त्याने पारशांना सर्व कागदपत्रांची पूर्तता करून दिली. अशा प्रकारे त्या जमिनीचे कागदपत्र पारशांनी पुन्हा प्राप्त केले. [१३]

अठराव्या शतकात पारशी समाजाने अनेक नवीन घडामोडी पाहिल्या. कारण, ब्रिटिशांच्या आगमनामुळे पारशांना पाश्चिमात्त्यीकरणाची ओळख झाली व ब्रिटिशांच्या राज्यप्रणालीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आमूलाग्र बदलही झाला. ह्या बदलामुळे त्यांचे ब्रिटिशांबरोबर संबंध वाढू लागले, याचा परिणाम म्हणजे पारशांनी पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करून पाश्चात्य आडनावेही धारण केली परिणामी त्यांची प्रगती झाली. इ.स. १७८० मध्ये एक अत्यंत प्रभावशाली पारशांचा समुह मद्रास येथे स्थायिक झाला. त्यांनी तेथे इ.स. १७९० मध्ये एका दोख्माची स्थापना केली परंतु त्याचा कधीही वापर केला नाही, कारण दोख्मा बांधल्यावर

जो पहिला मृत्यू झाला तो एका लहान वयाच्या मुलाचा होता त्यामुळे त्यांनी अंधश्रद्धेला घाबरून त्या दोख्माचा कधीही वापर केला नाही.[१४] याचवेळी मराठा व पिंढारी जमातीच्या सततच्या भांडणामुळे पारशांनी त्यांच्या इराणशहा नावाच्या पवित्र अग्नीला रातोरात नवसारीतून सुरत येथे नेले. पारशांमध्ये दोन गट होते ते म्हणजे संजानमधील 'संजाना' व नवसारीतील 'भगारीया'. ह्या गटांमध्ये जो पवित्र अग्नी सुरत येथे नेण्यात आला होता त्यावरून वादविवाद होत होते. याचा परिणाम असा झाला की, संजानमधील संजाना हे आपला हा पवित्र अग्नी घेऊन पुन्हा संजानमधील 'पार' नदीच्या दक्षिणेला जेथे त्यांचे मुळ स्थान होते तेथे घेऊन गेले. [१५]

एकोणिसाव्या शतकात जमशेटजी जीजीभॉय यांनी पारशांसाठी एक नवीन स्थान तयार केले. जे व्यापारी ह्या काळापर्यंत समाजातील सीमांच्या मर्यादेमध्ये राहिले होते नंतर त्यांचा कायापालट असा झाला की, ते ब्रिटीशांसोबत कामे करु लागले. याचा परिणाम असा झाला की, पारशांच्या राहणीमानात युरोपियनांप्रमाणे बदल झाला. त्यांनी आपल्या समाजाकरिता पायाभूत सुविधा बनविण्यास सुरूवात केली. जसे, अग्नीमंदिर, शांततेचे प्रतीक असणारे स्तंभ, महाविद्यालये, रूग्णालये इ. मुळे पारशांची समृद्धी वाढू लागली. यामुळे त्यांच्या समुदायात आपापसात वादविवाद वाढू लागले. परिणामी असे झाले की, समुदायातील श्रीमंत व मातब्बर लोकांना पुरोहित वर्ग हा जुन्या विचारसरणीचा वाटू लागला, त्यांनी इतर समुदायातील लोकांबरोबर व्यापारी संबंध ठेवून स्वतःची भरभराट केली.[१६]

दहाव्या शतकात जेव्हा सर्वप्रथम पारशी संजान येथे आले होते तेव्हा त्यांनी आपल्या चरितार्थाची सुरूवात शेतीतून केली होती. परंतु ७०० वर्षापर्यंतचे कोणतेही ऐतिहासिक पुरावे स्पष्ट नाहीत. पण त्यानंतर १८५० पर्यंत अर्ध्या पारशी समुदायाने स्वत:चे शहरीकरण घडवून आणले होते. झपाटयाने झालेल्या व्यावसायिकीकरणामुळे पारशांनी आपला कायापालट करून घेतला. [१७]

पारशांनी आपल्या धार्मिक चौकटीत राहून आर्थिक भरभराट केली. पारशांचे धार्मिक, सामाजिक जीवन, धार्मिक कर्तव्ये, सामाजिक जबाबदारी हे सर्व एकमेकांशी जोडलेले आहे.

त्यांच्या धार्मिक श्रद्धांबाबत झरतुष्ट्राने अवेस्तात सांगितल्याप्रमाणे त्यांच्या परंपरा, चालीरिती ह्या आजही जतन करून ठेवल्या आहेत.

उदाहरणार्थ, पारशामधील 'विवाह' हा एक करार नसून तो धार्मिक विधी आहे. पारशांचा विवाहसोहळा हा फक्त दिखावा नसतो तर प्रत्येक पारशी सामाजिक व धार्मिक हुकमानुसार कुटुंब, समुदाय, देश, मानवता ह्या सर्व गोष्टींचे पालन करतो. त्याचप्रमाणे कश्ती आणि सदरे ह्या दोन वस्तू त्यांच्या महत्त्वाच्या असून ते कोठेही असले तरी त्यांना त्या दोन्ही वस्तू वापरणे बंधनकारक असते. ह्या गोष्टी त्यांच्या योगसाधनेसाठी व त्यांच्या प्रगतीसाठीही महत्त्वाच्या असतात. ते एका विशिष्ट पद्धतीने बनविले जातात. त्याचप्रमाणे, विशिष्ट रीतीने घातले व काढले जाते.

पारशी समाजात मृत व्यक्तींसाठी त्यांच्या स्मरणार्थ धार्मिक समारंभ करणे आवश्यक असते. ज्या पुरोहितांचा जन्म पुरोहितांच्याच कुटुंबात म्हणजे Athornan families मध्ये झाला असेल तेच ह्या विधीसाठी लागणाऱ्या सर्व सामानांचा वापर करू शकतात.

प्रत्येक पारशाला पवित्र अग्नि जो वेगवेगळ्याप्रकारे एकत्र करून तयार केला आहे त्याची प्रार्थना करणे आवश्यक आहे, ही सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांना आत्मिक शक्ती प्रोत्साहन देते, परंतु ह्या सर्वांचे पालन करताना त्यांना काही नियम अवलंबिवावे लागतात. तसेच 'दोख्मा' व 'पवित्र अग्नी' ह्या पारशांकरिता अतिशय महत्त्वाच्या आहेत. म्हणून पारशांव्यतिरिक्त कोणालाही आत प्रवेश करण्याची परवानगी नसते. दोख्मा आणि अग्नीमंदिर ह्यांच्या काही पवित्र लोकोत्तर घटनांमुळे ते पारशांसंबधित आहे, म्हणून बाहेरील समाजातील कोणतीही व्यक्ती त्यांच्या ह्या सर्व गोष्टी समजू शकत नाही. पवित्र अग्नी स्थापन केलेल्या ठिकाणी फक्त त्यांच्याच वृद्ध पुरोहिताला जो त्यांच्या समाजातील उच्च वर्गाचा ज्ञानी असेल त्यांनाच तेथे जाण्याची परवानगी आहे.

त्यांच्या जश्ने बेडियाड व नीरांग देन तसेच काही मोठमोठे समारंभ त्यांच्या विशेष ठिकाणी साजरे केले जातात आणि तेथे पारशांचे कोणतेही सर्वसामान्य पुरोहितसुद्धा जाऊ शकत नाही तर फक्त उच्च वर्णीयातील ज्ञानी पुरोहितच समारंभात उपस्थित राहू शकतात.

पारशांचे पारशी असण्यामागे महत्त्वाचे मुख्य कारण म्हणजे तो पारशी समाजातील कुटुंबातच जन्माला आलेला असावा. तसेच मूल दत्तक घेणे व धर्मपरिवर्तन करणे ह्या सर्व गोष्टींना पारशी समुदायात स्थान नाही. कारण जो पारशी लोकांचा नैसर्गिक स्वभाव आहे. तो कोणत्याही दत्तक घेतलेल्या मुलात किंवा धर्मपरिवर्तन केलेल्या पारशांच्या स्वभावात कधीही येऊ शकत नाही. त्यांच्या मते अशा दत्तक किंवा धर्मपरिवर्तन केलेल्या व्यक्तींचा स्वीकार जर केला तर त्यांची सर्व धार्मिक रचनाच बदलून जाईल आणि ह्याच कारणांमुळे पारशी त्यांच्या समुदायात दुसऱ्या समाजातील लोक कधीही स्वीकारत नाहीत.

सोळाव्या शतकातील इराणी म्हणजेच पारशी लोकांच्या खानपानाच्या सवयींवर मध्यपूर्व आशियातील लोकांचा प्रभाव होता. नवनवीन समाजातील लोकांच्या संपर्कात येऊन त्यांनी पुढील काळात नवीन खानपानाच्या पद्धती आत्मसात केल्या व नवीन पदार्थांचा समावेश केला. जसे – कबाब, डोलमेह व दहीमिश्रित मांस अशा काही महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या खानपानात समाविष्ट झाल्या. परंतु यझ्देच्या काळातील त्यांच्या खानपानाच्या सवयी बदलल्या नाहीत.

त्यांच्या खानपान पद्धतीप्रमाणेच त्यांचे सण–उत्सवही मनोरंजक आहेत. ते सर्व झोराष्ट्रियन कालगणनेनुसार चालतात. ह्या कालगणनेनुसार पारशांचे तीन प्रमुख प्रकार पडतात ते म्हणजे शहेनशाही, कदामी आणि फस्ली हे होत. त्यांची पूर्वीची जी कालगणना होती ती जुन्या अवेस्तातील पुराव्याप्रमाणे ऋतुंशी संबंधित होती. परंतु पुढे नवीन 'अवेस्ता' आणि 'ससानियन' काळात अशी प्रथा होती की, प्रत्येक एकशेवीस वर्षानंतर एक महिना त्यात समाविष्ट करण्यात यावा परंतु ह्या प्रथेचे वरिल तिघांपैकी कोणीही पालन करीत नाही. ह्या कालगणनेतील शहेनशाही आणि कदामी कालगणना ही लिप वर्षाप्रमाणे चालत नाही. त्यामुळे ग्रीगोरियन कालगणनेप्रमाणे हे दिवस वेळेच्या पुढे जातात. परंतु फस्ली हे ग्रीगोरियन कालगणनेनुसार चालते म्हणून ते ऋतूंशी एकनिष्ठ असते.

पारशी आपल्या धर्मात कितीही गुंतले असले तरी त्यांनी जवळजवळ सर्वच क्षेत्रात आपला प्रभाव पाडला. जसे व्यवसाय, राजकारण, कला, क्रीडा, मनोरंजन. तसेच त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांनी भारतात पहिली राजकीय पार्टी निर्माण केली. त्याचप्रमाणे शेअरबाजार, लोखंड आणि स्टिल कारखाना, सार्वजनिक रुग्णालये, विद्यापीठ, वृत्तपत्रे,

छापखाना आणि सिनेमा. इ. तसेच काही पारशांनी ब्रिटिश कलोनिअल रुल्सच्या काळापासून भारतात स्वातंत्र्य मिळून देण्यासाठी संघर्ष केला. त्यापैकी काही महत्त्वाचे नामवंत पारशी म्हणजे दादाभाई नवरोजी, भिकाजी कामा, फिरोजशहा मेहता इ.[१८]

सामाजिक राजकारणाशिवाय काही पारशांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. सामाजिक राजकारणाव्यतिरिक्त पारशांची स्वतंत्र पंचायतही आहे. ही पंचायत त्यांच्या धार्मिक सीमेच्या आत राहून समुदायात शिस्त ठेवण्यासाठी कायदे बनविते त्यांना धार्मिक व सामाजिक बाबींचे मार्गदर्शन करणारे कोणीही नव्हते म्हणून स्वत:ची पंचायत त्यांनी निर्माण केली.[१९] ''पंचायत म्हणजे एकूण पाच व्यक्तींची परिषद होय.'' ह्या पंचायतीत एकूण १३ सभासद असतात त्यांना समुदायात कोणतेही नियम करण्याचे व त्याचे पालन करवून घेण्याचे संपूर्ण अधिकार होते.

मुंबईतील पारसी पंचायतीत 'गुब्रेस' होता, पंचायतीतील परिषदेमध्ये जे तेरा सभासद होते त्यांना 'गुब्रेस' म्हटले जाते. ह्या तेरा व्यक्तिंची निवड पारशी समुदायातील लोकांद्वारेच होत असे. पुढील काळात सरकारने त्यांना स्वीकारले, परंतु नंतर मात्र ह्या पंचायतीतील परिषदेचे कार्य हे वंशपरंपरेने चालू राहिले.

मारिया ग्रॅहेम, जेम्स फोब्स आणि मिलबर्न यांनी पारशांच्या लेखातील पुराव्यातून असे स्पष्ट केले की, पारशांची भरभराट ही पुढे उत्तरोत्तर वाढतच होती. त्यांच्या समाजातील प्रमुख व्यक्तींनी समाजात पाश्चिमात्यीकरण घडवून आणून समाजाला एक नवीन स्थान प्रदान केले. पाश्चिमात्य संस्कृतीच्या स्वीकारामुळे त्यांच्या समाजातील स्त्रियांना भारतातील दुसऱ्या कोणत्याही समाजातील स्त्रियांपेक्षा सर्वांत जास्त स्वातंत्र्य व आदर दिला जातो.

सोळाव्या शतकांपासून पारशांनी भरभराटीस सुरूवात केली. ह्याकाळात नवसारी येथील पारशांनी भरभराट केली. त्याचप्रमाणे सतरावे शतक हे सुरत येथील पारशांच्या भरभराटीचे होते. अठराव्या शतकात त्यांनी पोर्तुगीज, डच आणि ब्रिटिशांबरोबर संबंध प्रस्थापित करून पाश्चिमात्यीकरणाचा स्वीकार केला व एकोणिसाव्या शतकात मुंबईतील पारशांनी मुंबईचा कायापालट केला.

- **विषयाची निवड –**

संशोधन प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे विषय निवडणे. संशोधकाला कोणत्या विषयाचे संशोधन करायचे हे निश्चित करावे लागते. आपल्या अभ्यासाचे क्षेत्र आणि संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयाची वैशिष्ट्ये संशोधनात रूपांतर करावे लागते. जेव्हा संशोधक विषय निवडतो तेव्हा विषयाची निवड हीच संशोधकाला एक आव्हान असते. संशोधनाचा विषय मांडताना संशोधन विषयाच्या कोणत्या पैलूंना महत्व द्यायचे हे निश्चित करावे लागते. तसेच संशोधनाची दिशाही निश्चित करावी लागते. संशोधन मांडणी करणे म्हणजे निवडलेल्या विषयाची संशोधनक्षम मांडणी करणे होय.

सदर संशोधन हे 'मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास' अशी संशोधन विषयाची निवड करीत आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे –**

१) पारशी समाजातील सामाजिक ,आर्थिक ,धार्मिक ,राजकिय, शैक्षणिक ,स्थिती जाणून घेणे.

२) पारशी समाजाचे मुंबईतील योगदान जाणून घेणे.

३) पारशी समाजाची कमी होत चाललेली लोकसंख्या जाणून घेणे.

- **संशोधनाची व्याप्ती–**

कोणतेही संशोधन हे विशिष्ट अनुभवाद्वारे समग्र विषयाचे सामान्यिकरण करीत असते. त्यामुळे संशोधक , संशोधन विषय, कालखंड या विषयीच्या मर्यादा संशोधनावर पडत असतात. सत्यान्वेषण हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. म्हणून संशोधकाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहासाचा अभ्यास करताना अनेक मर्यादा पडतात.

१) पारशी समाजाचा सामाजिक इतिहास हा विषय फक्त मुंबईपुरता मर्यादित आहे.

२) या विषयाचा ऐतिहासिक पुरावा आढळून येत नाही.

३) या संशोधनाचे स्वरूप विश्लेषणात्मक नसून ते केवळ वर्णनात्मक आहे.

- **संशोधनाचे महत्व–**

१) या संशोधनामुळे पारशी हे पर्शियन किंवा इराणी वंशाचे आहेत हे सिद्ध होईल.

२) इतिहासलेखनात या संशोधनामुळे भर पडेल.

३) पारशी समाजाच्या सामाजिक इतिहासामुळे नाविन्यपूर्ण अनेक गोष्टी समोर येण्यास मदत होईल.

- **संशोधनाची गृहितकृत्ये –**

१. पारशी समाजाने उद्योगधंदे व व्यापारातून संपत्ती जमवून समाजपयोगी अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले.

२. पारशी समाज अत्यल्प होत चालला आहे.

३. पारशी समाजाची शैक्षणिक व आरोग्य सेवाबाबत कामगिरी उल्लेखनीय आहे.

४. 'इराण' सोडून हिंदुस्थानात येण्यापूर्वीची तसेच आल्यानंतरची परिस्थिती.

५. निर्वासित म्हणून हिंदुस्थानात आल्यावर स्वतःचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी केलेला संघर्ष.

६. संजान येथील निर्वासित समुदयातून, मुंबईतील यशस्वी समाजापर्यंत केलेला बदल.

७. 'बॉम्बे बंदराला' मुंबई शहर बनविण्यात पारशी समाजाचा महत्त्वपूर्ण वाटा.

८. त्यांच्या कमी होत चाललेल्या लोकसंख्येमुळे सरकारने 'जिओ पारशी' ही योजना कार्यान्वित केली.

९. पारशी समाजाचे धार्मिक जीवन व सामाजिक जीवन हे एकमेकांशी जोडलेले असून हेच त्यांच्या यशाचे माध्यम आहे.

१०. समाजोपयोगी कार्य करताना त्यांनी कोणीही दुखावले जाणार नाही, याचीही दक्षता घेतली.

११. पारशी समाजाने त्यांचे रिती–रिवाज व धार्मिक बाबी सांभाळून दुसऱ्या धर्माचा आदर राखून आपली सर्व कर्तेव्ये व जबाबदाऱ्या यांची उत्तम सांगड घालून त्या यशस्वीपणे पार पाडल्या.

१२. समाजाने स्त्रियांचा नेहमीच सन्मान करून त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीकडे लक्ष दिले.

१३. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय कारकिर्दीत त्यांनी 'स्त्री'यांना मानाचे व सन्मानाचे वेळोवेळी स्थान देऊन त्यांना गौरविले.

१४. त्यांची शैक्षणिक व आरोग्य सेवा इ. बाबतीत कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे.

१५. पारशी समाजात स्त्री–पुरुष समानता असल्याने विवाहाचे वाढते वय आणि जननदरावर होणारा परिणाम दिसून येतो.

- **संशोधन कार्यपध्दती –**

१. ऐतिहासिक विश्लेषण पध्दत

२. निरीक्षण पध्दत

३. वर्णनात्मक पध्दत

- **तथ्य संकलन–**

प्रस्तुत संशोधनासाठी या अभ्यासविषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

- **प्राथमिक साधने–**

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, ठाणे, प्रत्यक्ष चर्चात्मक माहिती, धार्मिक पुस्तके (Holy Books), पत्रे, रिपोर्ट्स, साप्ताहिक, मॅगझिन्स, रोजनिशी (Journal) इत्यादी.

मुंबई पुराभिलेखागार कार्यालयातून मिळालेली माहिती, आर्थिक व संस्थांचे रेकॉर्डस्, वार्षिक अहवाल व हस्तलिखिते यांचा आढावा घेतला आहे. विविध छायाचित्रे, नकाशे

इत्यादींचा वापर केला आहे. चर्चा व भेटीतून माहिती मिळविणे, वर्तमानपत्रे, लेख याद्वारे माहिती मिळवली.

- **दुय्यम साधने–**

अप्रकाशित साधने, पुस्तके , अहवाल, लेख, विविध संदर्भ पुस्तके, विश्वकोष व संस्कृतीकोष खंड, इ.

- **साहित्याचे पुनर्विलोकन–**

मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास हा माझ्या प्रबंधाचा विषय आहे. ह्या विषयाच्या निवडीमागे मुंबई स्थित आणि देशभरात गेली अनेक वर्षे गुण्यागोविंदाने या देशातील संस्कृतीचाच एक भाग म्हणून राहणाऱ्या समाजाचा सखोल अभ्यास करून त्यांच्या विविध पैलूंचे दर्शन एक सामाजिक इतिहास म्हणून प्रकाशात आणणे हा ह्या प्रबंधाचा मुख्य हेतु होता.

संशोधन आराखड्यात सर्वप्रथम ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या कार्यानुसार सुरुवात केली. महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागार विभागाला सर्वप्रथम भेटी दिल्या. त्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक स्वरुपाची माहिती जसे, ऐतिहासिक दस्तऐजवांमधून कागदपत्रांचा अभ्यास करून त्यातून माझ्या विषयाची माहिती संकलित करून घेतली. तसेच सेन्सस (जनगणने)चा ही आढावा घेतला. मुंबई फोर्ट वाचनालय येथूनही संदर्भाचा तपशील घेतला. त्याचप्रमाणे एशियाटिक लायब्ररी मुंबई येथून माहिती व कात्रणे घेतली. तसेच जवाहरलाल नेहरू लायब्ररी मुंबई येथून समाजशास्त्र विभागातून माहिती संकलित केली.

याखेरीज गॅझेटिअर ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी Vol. - XIII भाग – I, गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर Vol- I, त्याचप्रमाणे पटेल पारशी प्रकाश Vol- I, इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली Vol- 48 1970, Vol - 35, 1970-77 साप्ताहिक, तसेच काही जर्नल, पत्रे, लेख, अहवाल प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, इ. चा अभ्यास करण्यात आला.

एडुलजे एच. ई. यांच्या 'किस्सा–ई–संजान' ह्या पुस्तकातून इराणमधील परिस्थितीची अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. यात तीन घटनांचा उल्लेख प्रामुख्याने आहे ते म्हणजे इराणपर गुश्ताप राजाच्या सत्तेच्यावेळी तीन वेळा हल्ला होऊन झोराष्ट्रिनिझम धर्माला अत्यंत

हाल अपेष्ट सहन कराव्या लागतील. त्याप्रमाणे अलेक्झांडरचे इराणवर आक्रमण. दुसऱ्या घटनेत अर्दशीर राजाने पुन्हा झोराष्ट्रिनिझम धर्माचे पुर्नवसन केल्यानंतर त्याने अर्दवीराफ या आपल्या शिष्याला ज्ञानप्राप्तीसाठी पाठविले. परंतु त्याचवेळी सर्वत्र दुर्देवी घटना घडून शापूर राजाने येऊन कायापालट केला व धर्माचे पुनः संचयन केले पण यझ्देरजाद सत्तेवर येऊन इराणमधील झोराष्ट्रिनिझम संपुष्टात आला. तिसऱ्या महत्त्वपूर्ण घटनेत परदेशांचा इराणवर हल्ला व त्यांनी तेथील जनतेला गुलाम बनवून इराणला विनाशाच्या उंबरठ्यावर नेले. जे पुरोहित व त्यांचे अनुयायची 'अवेस्ता' ग्रंथाला मानणारे होते ते मातृभुमी इराण सोडून कोईस्थानचे डोंगर व इतरत्र गेले. एका विद्वान दस्तुराने दिलेल्या ज्योतिषशास्त्राच्या सल्ल्यानुसार सर्वजण धर्मसंरक्षणाकरिता भारतात आले.

गोदरेज फिरोझा जे आणि मिस्त्री फिरोझा पुंथकि यांच्या 'ए झोराष्ट्रियन टेपेस्ट्री आर्ट, रिलीजन, धर्म आणि कल्चर' यांच्या पुस्तकातून ते सर्वप्रथम भारतातील दिव येथे उतरले. परंतु पुन्हा पुरोहितांनी ज्योतिषशास्त्राच्या सहाय्याने तेथून त्यांच्या प्रगतीसाठी दुसरीकडे जाण्यास सांगितले. यावेळी हा समाज गुजरातमधील संजान येथे स्थायिक झाला असता तेथे सत्तेवर असलेला 'जादिराणा' ऊर्फ जाधव राणाने ह्या धार्मिक छळाला कंटाळून भारतात निर्वासित बनून आलेल्या पारशी समाजाला त्याचे राज्य कसे भांड्यातील दुधाप्रमाणे काठोकाठ भरलेले आहे व आता तुमच्यासाठी जागा नाही असे सांगून काही शर्ती व अटी त्यांच्यासमोर ठेवल्या. परंतु ह्या सर्वांची समर्पक उत्तरे जादीराणाला मिळाली अत्यंत चाणाक्ष व हुशार अशा ह्या समाजाला संजानमध्ये आपल्या वसाहती स्थापन करण्याची परवानगी मिळाली.

एल.एच. मिल्स यांच्या 'वेंदिदाद' सॅक्रेड बुक्स ऑफ ईस्ट यांच्या माहितीतून अन्नावर प्रत्येक मनुष्याचा हक्क असून अन्नाचा आस्वाद घेण्याची वृत्ती पारशी समाजात खोलवर रुजली आहे हे कळते.

दोसाभाई फ्रामजी काराका याच्या 'हिस्ट्री ऑफ द पारसीज' ह्या पुस्तकात त्यांच्या खानपान पध्दती ह्या ऋतुमान व हवामानाशी संबंधित असल्यामुळे थंडीमध्ये शरीरात ऊब निर्माण करणारे शाकाहारी व मांसाहारी पदार्थ, सुकामेव्याचे पदार्थ, तसेच 'ससानियन' ह्या त्यांच्या पूर्वजांकडून आलेले 'अबहिसा' म्हणजे 'जेली' सारखे पदार्थ, इराण मधील विविध फळे

व सुकामेव्यांचे पुडीयुक्त पदार्थाचा समावेश, त्याचप्रमाणे पारशांनी काळानुरुप युरोपियनांच्या खानपान पध्दतींप्रमाणे स्वतःच्या खानपान केलेले विविध बदल विशेष उल्लेखनीय आहे.

जहाँगीर आर. पी. मोदि यांनी जमशेटजी जिजिभॉय यांच्या विषयी लिहिताना असे म्हटले की, सर्वप्रथम सामुदायिक समारंभात आईस्क्रीमचा वापर त्यांनी केला असे 'द फर्स्ट इंडियन नाईट ऑफ बॅरानेट १७८३–१८५९' या पुस्तकात वर्णन केले.

तसेच सोनी तारापोरवाला यांच्या 'द झोराष्ट्रीयन ऑफ इंडिया' ह्या पुस्तकातील लेखात पारशी समाजाने शिक्षणाचे महत्त्व जाणून आपली शैक्षणिक कारकिर्द समृध्द करून समाजाचा आर्थिकदृष्टया विकास केला. त्यासाठी धर्मगुरुंचे कार्य अतिशय महत्त्वाचे असून त्यांच्या मुळेच झरतुष्ट्री शिकवण टिकून रहिली. पुढील काळात मदरसेतून शिक्षण घेण्याची परंपरा सुरू होऊन त्यांना धार्मिक प्रार्थना, धार्मिक विधी व धार्मिक इतिहास शिकविला जातो.

के.बी. वकिल यांच्या 'दे नेचर्स ऑफ पोव्हरटी अमंग पारसीज' ह्या पुस्तकात पाश्चात्तिकरणाच्या प्रभावामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळा, कॉलेजातून प्रवेश घेऊन त्यांचा शैक्षणिक दर्जा कसा उंचावला, पारशी स्त्रियांमधील साक्षरता, तसेच पारशी समाजातील गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या संस्था व धर्मादाय संस्था इ. ची महत्त्वपूर्ण माहिती.

जेम्स डग्लस यांच्या 'बॉम्बे आणि वेस्टर्न इंडिया' मुंबईत स्थायिक झाल्यानंतर त्यांच्या राहणीमानातील बदल, त्यांच्या समाजाची भक्कम बांधणी करून मुंबईला महत्त्वाचे केंद्र बनवून सर्वच क्षेत्रात प्रभाव पाडून इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी पर्सिव्हल स्पेअर यांच्या 'ए स्टडी ऑफ द सोशल लाईफ ऑफ इंग्लिश इन ऐटीन्थ सेन्चुरी' मध्ये इंग्लिश व्यापाऱ्यांपेक्षा जहाज बांधणारे पारशी हे मुंबईचे निर्मिते असा उल्लेख आहे.

एम. जे बोनगार्ड लेविन यांच्या ग्लोबल डिक्टरी ऑफ बॉम्बे यातील संदर्भानुसार पारशी समाजात दानधर्म करणे ही पूर्वीपासूनची परंपरा. त्यांच्या दानधर्मात धार्मिक आणि सामाजिक संस्थांची संरचना, समाजाकरिता राहण्याची व्यवस्था आणि आपत्तीकाळात आर्थिक मदतीचा समावेश दिसून येतो.

जी. एम. बोनगार्ड लेवीन सेथना रुस्तमजी यांच्या बुक ऑफ इन्स्टिट्युशन ऑन झेराष्ट्रीयन रिलीजन, स्टडीज इन एन्शंट इंडिया ॲन्ड कल्चर एशिया, यात अहुर मझदाला सर्व शक्तीमान असून त्याचे वर्णन तेजस्वी केलेले असून स्वयंभू म्हटले आहे. त्याचप्रमाणे मझदाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्यासाठी त्याने निर्माण केलेल्या सृष्टीचे संशोधन करून असे निष्कर्ष काढले की, मझदा हे बुध्दीमत्तेचे प्रतिक असल्यामुळे तो सर्वव्यापी, सर्वेश आहे.

'ए हिस्ट्री ऑफ झेराष्ट्रानिझम' या पुस्तकात धार्मिकबाबी मांडताना अरबांच्या विजयानंतर बरीच धार्मिक पुस्तके नष्ट झाली. तसेच 'पहलवी' भाषा बोलण्यावरील निर्बंध. यातूनही जे थोडे फार शिल्लक रहिले ते पारशी समाजाचे जमविण्याचा प्रयत्न करून धार्मिक विषयांवर पुस्तके लिहिण्यास सुरुवात केली.

श्वार्टस् मार्टिन यांच्या 'दे रिलीजन ऑफ अकेनियन इराण' ह्या पुस्तकात त्यांच्या धार्मिक प्रार्थना, प्रार्थनेत अग्नीचे महत्त्व, अहुर मझदाच्या अग्नी समोर आपल्या शुध्दीकरणासाठी प्रार्थना करतात.

'द पारसीज्' Vol. III ट्रान्सलेटेड फ्रॉम द फ्रेंच ह्या पुस्तकात इराणी मुळ प्रथेनुसार त्यांचे विवाह, वाङ्:निश्चय सोहळा, 'अदर्नी' म्हणजे वधुपित्याकडून विशिष्ट रक्कम दिली जात असे, ज्याला (हुंडा) म्हणतात. तसेच झरतुष्ट्री धर्मात स्त्रियांचे महत्त्व इ. चा उल्लेख आहे.

कुल्के ईकहार्ड, 'द पारसीज इन इंडिया' ह्या पुस्तकात आज पारशी पूर्वीसारखे राजाकारणात खूप जास्त सक्रिय नसले तरीही त्यांचे हिंदुस्थानातील राजकारणातील योगदान महत्त्वपूर्ण आहे.

पासरीचा अशू यांच्या 'द पॉलिटिकल थॉटस् ऑफ दादाभाई नौरोजी या पुस्तकात गुजराती भाषेतील 'रास्त गोफ्तर' साप्ताहिक तसेच मुंबई विधान परिषदेचे सदस्य त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान वर्णिले आहे.

धाटावकर भास्कर दाजी यांच्या 'शोध निबंध संग्रह' या पुस्तकातून नौरोजींना त्यांच्या केलेल्या कार्याबद्दल 'ग्रॅन्ड ओल्ड मॅन ऑफ इंडिया' या नावाने संबोधले गेले. 'Poverty of an

Unbritish Rule in India' या पुस्तकात भारतातील संपत्ती ब्रिटनमध्ये कशी जाते, संपूर्ण आशियातील ते पहिले व्यक्ती ज्यांची निवड 'ब्रिटिश मेंबर ऑफ पार्लमेंट' मध्ये झाली.

सिंग दिवेंदर, फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांच्या 'एम.सी.सोल्डरींग विथ डिग्नीटी' यांच्या पुस्तकात जमशेटजी माणेकशॉ यांचे दुसरे महायुध्द त्याचप्रमाणे भारत, पाक आणि १९६२च्या चीन युध्दातील त्यांच्या सहभागाचे वर्णन तसेच ब्रिटिश भारतीय लष्कर व दुसरे महायुध्दांतील संक्षिप्त वर्णन तसेच त्यांचा निवृत्ती नंतरच्या प्रवासातील अविस्मरणीय कामगिरीचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

आवश्यकतेनुसार इतर दुय्यम साधनेही अभ्यासली. व काही दुर्मिळ छायाचित्रांचाही वापर करून घेतला. तसेच प्राथमिक साधने, समकालीन प्रत्यक्षदर्शी साधने वापरून त्याला संबंधित समकालीन व्यक्तींच्या दृष्टीकोनाची जोड मिळाली. यासाठी समाजातील काही वरिष्ठांना भेटी दिल्या. ह्या भेटीमध्ये मेहरनोश फिरोझशहा बिल्लीमोर्या, जदीर सोराबजी कसाद, फरहाद फ्रामजी एलाविया, खुर्शेद जहाँगीर इ. व्यक्तींशी चिकित्सकपणे चर्चा करून ही माहिती लिहिण्यात आली.

अशाप्रकारे प्रबंधाचा विषय निश्चित झाल्यापासून विषयाच्या स्वरुपाने इतिहासाची अस्सल साधने, संदर्भ साधने, वृत्तपत्रे, जर्नल्स, व्यक्तींशी व अभ्यासकांना भेटी देऊन चर्चात्मक पध्दतीने माहिती मिळविली. अशा प्रकारे माझ्या प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. भास्कर दाजी धाटावकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रबंध सादर करण्यात आला.

प्रकरण योजना–

प्रस्तुत अभ्यासासाठी एकूण सहा प्रकरणात विभागणी केलेली आहे. अभ्यासातील मुख्य प्रकरण व त्या अंतर्गत केलेल्या संशोधनाचा थोड्क्यात आढावा खालीलप्रमाणे आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन आराखडा सांगितलेला आहे. त्यात संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके ,संशोधन मर्यादा, संशोधनाचे महत्व, तथ्य संकलन संदर्भीय संशोधन साहित्याचे, पुनर्विलोकन, प्रकरण नियोजन या टप्प्याची विस्तृत मांड्णी केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये सामाजिक जीवन असून त्यामध्ये

अ) **कुटुंबव्यवस्था** – वैदिक धर्माप्रमाणे झरथृष्ट्री धर्मात विवाहाला प्राधान्य आहे. विवाह करून योग्य प्रकारे संसार करणे हे मनुष्याचे मुख्य जीवन कर्तव्य होय, असे पारशी समाज मानतो. त्यामुळे संन्यासाश्रम व ब्रह्मचर्या श्रमाचा ह्या धर्माने निषेध केला आहे.

ब) **आहार** – पारसी लोक आहारात हा प्रामुख्याने भात व नारळाची आमटी, तसेच बटाटा आणि इतर भाज्यांचा वापर क रतात. त्याचप्रमाणे क ोशिंबीरीचाही आहारात वापर प्रामुख्याने आढळतो. धानसाक हा पारशांच्या जेवणातील आवड्ता व महत्वाचा पदार्थ होय. शाकाहार व मांसाहार अशा दोन्ही पदार्थांचा वापर के ला जातो

क) **शिक्षणव्यवस्था** – भारतीय शिक्षण पध्दतीत इंग्रजी भाषेचा समावेश क रण्यात पारशी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.पाश्चात्त्य शिक्षणाचा भारतीय मनावर जबरदस्त प्रभाव पड्ला. आणि यातूनच राजाराम मोहन रॉय सारखे सुधारक बंगालमध्ये निर्माण झाले. तर एलफि न्स्टन कॉलेजमधून अनेक पारशी नामवंत, पदवीधर झाले. उदा. दादाभाई नौरोजी पुढील काळात याच नामांकित व्यक्तींनी समाजात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले दिसते. उदा. ‘‘द पेटिट हायस्कूल फ ॉर गर्ल्स, द जमशेदजी जीजी भॉय फ ॉर गर्ल्स, द कावसजी जहांगीर स्कूल फ ॉर गर्ल्स’’ इ. मुलींच्या शिक्षणासाठी स्थापन केल्या.

त्याचप्रमाणे गुजरातच्या खेड्यापाड्यात राहणाऱ्या अनेक तरूणांच्या शिक्षणाची जबाबदारीची जाणीव मुंबईतील अनेक पारशांना होऊ न त्यांनी गुजरात भागातील अनेक शाळांना आर्थिक साहाय्यही देऊ न गुजराती भाषेच्या अभ्यासाला चालनाही दिली. तसेच दादाभाई नौरोजी ज्ञानप्रसारासाठी ज्ञानप्रसारक मंडळाची चालनाही केली. तसेच १८५७ साली पारशी मुली ज्या शाळेत जात त्या शाळा पारसी गर्ल्स असोसिएशन या संघटनेने चालवायला घेतल्या व त्या नुसार अलेक्झांड्रा गर्ल्स नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिट्यूशन सुरू केली.

अशाप्रकारे पारशी समाजाने दादाभाई नौरोजी, फि रोजशहा मेहता, दिनशा वाच्छा इ. शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणारे व्यक्ती भारतीय समाजाला देऊन शैक्षणिक कारर्कीद समृध्द बनविली.

ड) विवाह पध्दती – पारशी लोक जवळच्याच नात्यातील स्त्री–पुरू षाचा विवाह हा अधिक प्रशस्त मानतात. इराणमधील झरथुष्ट्री धर्माच्या लोकात वयात आल्यानंतर लग्ने होत असत. पण भारतातल्या पारशी लोकांमध्ये बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. नंतर मात्र ही प्रथा बंद होऊ न प्रौढपणीच विवाहाला प्राधान्य देण्यात आले. स्त्री–पुरू ष या दोघांनाही पुनर्विवाह मान्य आहे.

ई) सण – उत्सव – पारशी लोक सण उत्सव तीन प्रकारानी करत असत. ऋतुमानानुसार, इतिहासातल्या विशिष्ट घटनांशी संबंधित, पूर्वजांच्या स्मरणार्थ साजरे करत असत.

खेडेगावातील पारशी हे हिंदूंच्या देवांना व मुसलमानांच्या पीरांना नवस बोलतात. त्याचप्रमाणे होळीला नैवेद्य दाखविणे, देवीला कोंबडे, बकरे इ. चे बळी देणे, मारू तीला तेल घालणे इ. गोष्टीही ते करतात.

इ) मर्तिकप्रथा – पारशी लोक हे अग्नी, जल व पृथ्वी यांना पवित्र आणि मृतदेहाला अत्यंत अपवित्र मानतात. आणि म्हणूनच ते मृतदेहाचे दहन करीत नाहीत कारण त्या प्रेतामुळे अग्नी, जल व पृथ्वी ही अपवित्र होऊ नये अशी इच्छा असते आणि म्हणूनच प्रेत दगडावर उघडे ठेवून ते गिधाडांच्या भक्षस्थानी पडावे अशी ते व्यवस्था करतात.

पारशांच्या स्मशानाला दाखमा असे म्हणतात. अंत्यसंस्कारासाठी गोल मनोरे बांधलेले असतात. मनोऱ्याच्या मध्यावर प्रेते ठेवण्यासाठी कोनाडे किंवा खाचा केलेल्या असतात. त्यांच्या तळाशी जाळी असून खाली खोल विहीरी असतात. त्यात वाळू असते. मृतांची हाडे व इतर अवशेष त्या जाळीतून जाली पडतात व विहीरीतल्या वाळूत मिसळून जातात. अशाप्रकारे मनोरे बांधण्याचे काम हे अत्यंत विधीपूर्वक केले जाते. त्यावेळी पूजा व प्रार्थना देखील केली जाते.

तिसऱ्या प्रकरणात आर्थिक जीवनाविषयी सांगितले आहे. दोनशे तीनशे वर्ष पारशी लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. परंतु त्यानंतर ते निरनिराळ्या शहरात जाऊन व्यापार करु लागले. सुरतला गेल्यावर त्यांची भरभराट सुरु झाली. डच, पोर्तुगीज व विशेषत: इंग्रज यांच्याशी संबंध आल्यामुळे पारशांच्या व्यापारात भरभराट सुरु झाली. उदा. ब्रह्मदेश, चीन, मलाया, मक्का, मॉरिशस इ. ठिकाणी पारशी आपला माल पाठवू लागले त्याचप्रमाणे विणकाम, मातीकाम, सुतारकाम इ. व्यवसायासाठी ते आपले कौशल्य दाखवू लागले. पारशी समाजातील काही लोकांनी जहाजे बांधण्याचा प्रचंड उद्योगही सुरु केला. बरेच पारशी हे देसाई व चौधरी म्हणून सरकारी अधिकारी ही झाले. तसेच इंग्रजांना सागवानाचे लाकूड, कपडे, गाड्याघोडे, बैल मेणे, दारु इ. पुरविण्याची कंत्राटेसुध्दा पारसी लोक घेत. पुढे इंग्रजीशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाल्यामुळे पारशांना शिक्षणाचे महत्व पटले व शिक्षणक्षेत्रातही त्यांची प्रगती दिसून येते. १९व्या शतकात ब्रिटीश राजवट सुरु झाल्यानंतर कित्येक पारशी घराणी हे उद्योग, शिक्षण, राजकारण इ. क्षेत्रात उदयाला आली.

भारताचा औद्योगिक विकास याचकाळात सुरु झाला व त्याचे श्रेय हे पारशी उद्योगपतींना दिले जाते. त्यांनी अपार परिश्रम करुन अलोट–संपत्ती मिळविली व भरपूर दानधर्मही केले. उदा. ससून, कामा, जहांगीर, टाटा, वाडीया, पेटीट इ. कित्येक घराणी या दृष्टीने प्रख्यात ठरली. त्याचप्रमाणे छोट्या प्रमाणावर पतपेढ्या सुरु करणे आणि दुकाने चालविणे हे व्यवसायही सर्व प्रथम पारशांनीच सुरु केले.

हिंदुस्थानात आल्यापासून पारशांनी अनेक उपयुक्त कामे केली. त्यांच्या समाजात दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, जमशेदजी टाटा यासारखे थोर पुरुष झाल्यामुळे त्यांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली. त्याचप्रमाणे त्यांची प्रवृत्ती ही व्यापार धंद्याकडे असल्यामुळे

त्यांच्यात प्रामाणिकपणा ही दिसून येतो तसेच उद्योगधंदे व व्यापारातून संपत्ती जमवून इतर समाजोपयोगी अनेक कार्येही त्यांनी केलेली आढळतात.

चौथ्या प्रकरणात धार्मिक जीवनाविषयी माहिती सांगितली आहे. भारतातले पारशी हे इराणमधील झरतुष्ट्री धर्म मानतात. त्यात अहूर मझ्द या एकाच परमेश्वराची आराधना करण्याचा आणि अग्नीला त्यांचे प्रतिक मानून त्यांची पूजा करण्याचा उपदेश आहे. परंतु, त्याव्यतिरिक्त सूर्य, चंद्र, जल, वायू, पर्वत, तारका व दिवंगत सत्पुरुष यांची ही उपासना पारशी लोक करतात.

अवेस्ता हा त्यांचा धर्मग्रंथ होय. त्यातील बरेचसे विचार हे वेदांतील विचारांशी मिळतेजुळते आहेत. वैदिक धर्माप्रमाणेच पारशांच्या धर्मात यज्ञ, होमहवन यांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक पारशी वसाहतीत एक अग्नीमंदीर असतेच त्याला अग्यारी, आतश बेहराम इ. नावांनी संबोधले जाते. उपासतापास, व्रतवैकल्ये इ.ना या धर्मात स्थान नाही. अवेस्ता या ग्रंथाचे भाषांतर सर्वप्रथम पहलवीत झाले. व पुढील काळात पहलवी या भाषेत अनेक स्वतंत्र धार्मिक गंथांची निर्मिती झाली.

पारशांच्या पुरोहिताला मोबेद असे म्हणतात. गृहस्थांच्या घरी मंत्र म्हणणे, अग्यारी, अरदन, आतश बेहेराम यातील सर्व संस्कार विधी करणे तसेच नवजोत, विवाह इ. विर्धीमध्ये धार्मिक मार्गदर्शन करणे, मृतांचे सर्व संस्कार करणे इ. त्याचे कार्य होय. त्याचे कार्यक्षेत्र हे मर्यादित असते. अशा अनेक मोबेदातील कमी अधिकाराच्या व्यक्तींना 'एखद' असे म्हणतात. एखद होण्यासाठी संस्कार करुन घ्यावा लागत असे. यस्न, वीरपरद, पाचगाह, पाचन्यामिश व काही यष्ट यांचे त्याला प्रथम अध्ययन करावे लागते, त्यानंतर त्याला बरेचसे प्रायश्चित घ्यावे लागते. शरीर व मन शुध्द व्हावे हा त्यातील मुख्य हेतू असतो.

अशाप्रकारे नाबार हा संस्कार पूर्ण झाल्यानंतर त्याला एखद ही पदवी मिळते आणि नवजोत व विवाह हे संस्कार चालविण्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु, जर त्यानंतर त्याला मोबेद व्हायचे असेल तर मार्तब हा विधी करावा लागतो. यात बरेच श्रम झाल्यानंतर सकाळी यस्नमंत्र म्हणायचे, त्याच दिवशी स्त्रोष देवतेप्रीत्यर्थ यस्न म्हणायचा व मध्यरात्री वेदिदाद

म्हणायचा असा तो विधी असतो हा विधी झाल्यानंतर त्याला मोबद ही पदवी मिळते, व इतर सर्व संस्कार करण्याचाही अधिकार प्राप्त होतो.

पाचव्या प्रकरणात राजकीय जीवनाविषयीची माहिती दिली आहे. इराणमधून भारतात आलेल्या पारशी समाजाजवळ त्यांचे धर्मग्रंथ वगैरे काहीही नव्हते. म्हणून समाजाचे नियमन करण्यासाठी त्यांनी स्थानिक जातपंचायत पध्दती स्वीकारली. यात गावातील प्रतिष्ठित, वयस्क व सज्जन व्यक्तींची समिती बनवून तिच्याद्वारे ते सर्व प्रश्न सोड्वू लागले. पंचायतीचे काम हे लोकशाही पध्दतीने चालत असे.

पंचायतीच्या प्रमुखाला दावर अशी संज्ञा आहे. दातो–वार म्हणजेच न्यायदाता या शब्दावरुन हे नाव आले असावे. दावराला पूर्वी बरेच अधिकार होते. पण ब्रिटीशसत्ता सुरु झाल्यानंतर ते हळूहळू कमी झाले. पंचायतीने केलेले नियम हे सर्व समाजाला बंधनकारक असे. उदा. तंटे मिटविणे, न्यायनिवाडा करणे इ.

१७७८ साली पंचायती तर्फे मुंबईच्या गव्हर्नरांकडे एक अर्ज सादर करण्यात आला त्या अनुषंगाने पारशी चालीरिती व रुढी विरुध्द जर कोणी गैरवर्तन केले तर त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार देण्याचा यावा. त्याचप्रमाणे १८३० साली पंचायतीने अकबार पध्दती बंद केली.(अकबार पध्दती म्हणजे,पंचनिवडून देण्याची पध्दत)सभासदांच्या मृत्यूनंतर पंचायतीचे सभासदत्व त्यांच्या मुलाकडे वारसाहक्काने येऊ लागली. परंतु त्यांचे गंभीर परिणाम होऊ लागले.

१८५५ ला 'पारशी लॉ असोसिएशन' ची स्थापना झाली. व त्या अनुषंगाने कमिशनने सरकारला अहवाल सादर केला व या अहवालानुसार गव्हर्नर जनरलर्सनी पुढील दोन कायदे केले.

१) १८६५ चा 'द पारशी मॅरेज ॲण्ड डायव्होर्स ॲक्ट', क्रमांक १५

२) १९८६ चा 'द पारशी सेक्शन ॲक्ट' क्रमांक १५ या कायद्यान्वये दोन लग्ने करणे हा गुन्हा मानण्यात आला.

वरील प्रकरणात पारशी समाजाचे थोड्क्यात प्रास्ताविक करून मुंबईतील ऐतिहासिक आढाव्याचे विवेचन केले.

सहाव्या प्रकरणामध्ये 'मुंबईतील पारशी समाजाचा सामाजिक इतिहास' यामध्ये संशोधकाने प्राप्त केलेल्या विषयासंदर्भातील निष्कर्ष उद्दिष्टानुसार प्रकरणात मांडलेले आहे.

संदर्भग्रंथ

1) Maharashtra State Gazetters Vol.1. Page no. 648.

2) Eduljee H.E., Kisseh - I - Sanjan K.R. Cama Oriental Institute 136, Bombay Samachar Marg, Fort, Bombay - 400023, (1991), Page No. 48.

3) Browne, " Literary History of Persia", London, 1904

4) Vakil K.B., "The Nature of Poverty Among Parsis." 1935, Page No. 2.

5) Blog - 'Jadi Rana' – Wikipedia.

6A) Godrej Pheroza J. And Mistree Firoza Punthakey, A Zoroastrian Tapestry, Art, Religian And Culture (Mapin – Publishing) Page 414.

6B) Eduljee H. E., Kisseh - I - Sanjan, K.R. Cama Oriental Institute 136, Bombay Samachar Marg, Fort, Bombay - 411023, (1991), Page No. 50.

7) Eduljee H.E., Kisseh - I - Sanjan K.R. Cama Oriental Institute 136, Bombay Samachar Marg, Fort, Bombay - 411023, (1991), Page No. 2,54, 55.

8) Vakil K.B., "The Nature of Poverty Among Parsis." 1035, Page No. 2.

9) Godrej Pheroza J, And Mistree Firoza Punthakey, "A Zorastrian Tapestry Art; Religion And Culture", Mapin Publishing Page No. 420.

10) Edward Terry, A Voyage To East India, 336 - 338 Quoted, In Paymster, Early History of the Parsees, in India] Page 38, Also See Firby European Travellers Page No. 97-98.

11) John Corriea - Afouso, Intrepid Itinerant, Bombay 1940, Page No, 48 – 49.

12) Pandurang S.S. Pissurlencar, Agents Parses du Diplomancia Portuguesa, Chap-II, Page no.4, Relevant Lines were translated by J. Remedios.

13) Modi Rustom Maneck And "The Persian Qisseh" Page No. 202, 203 Eduljee-H.E., Kisseh – I Sanjan, K.R-Cama Oriental Institute A 136, Bombay - 400023, (1991) Page No- 96,97.

14) Seervai And Patel, Gujarat Parsi Bombay- Page No. 13.

15) Eduljee H.E., Kisseh- I -sanjan, K.R.Cama Oriental Insititute, A 136, Bombay-400 023, (1991) Page No.96, 97.

16) Desai, " History Of The Bombay Parsi Punchayet." Page No- 10.

17) Godrej Pheroza J- And Mistree Firoza punthakey- "A Zoroastrian Tapestry, Artt, Religion And Culture", Mapin Publishing - Page No- 435.

18) http:// www.avesta.org/zcal.html

19) Blog - List Of Parsis, Wikipedia.

प्रकरण – २ रे

सामाजिक जीवन

पारशी समाजाने भारतात येऊन उत्कृष्ट कामगिरी केली. असे कोणतेच काम नसेल ज्यात त्यांचे योगदान नाही, कोणत्याही क्षेत्राचे नाव घेतले तर असे दिसून येते की, त्यात एक तरी पारशी वर्गणीदार असेल. उदा. सशस्त्र सेना, उद्योग, विज्ञान, खेळ, राजकारण व त्यांची परोपकारी वृत्ती इत्यादी

ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सर्वप्रथम निवडून आलेले भारतीय सदस्य म्हणजे डॉ. दादाभाई नौरोजी व फिरोजशहा मेहता हे होय. त्यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली, याशिवाय ते मुंबई महामंडळाचे सदस्यही बनले. त्याचप्रमाणे मॅडम भिकाजी कामा ह्या पहिल्या पारशी भारतीय स्त्री, ज्यांनी क्रांतिकारकपणे जर्मनीत १९०७ मध्ये भारतीय झेंडा फडकविला.

ज्याप्रमाणे, वाडिया हे मास्टर बिल्डर बनले. त्याप्रमाणे टाटांनीही भारतात पहिला स्टील कारखाना व जलविद्युत प्रकल्प उभारला. पारशी समाजात असे काही नामवंत, कुटुंबे आहेत. ज्यांनी अपार धन, उद्योगांमधून कमविले व ते धन पुन्हा समाजातील गरजू लोकांच्या सेवेसाठी सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून दान केले. जसे – सर दोराबजी टाटा ट्रस्टने भारताला, त्यांचे पहिले 'इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' बेंगलोर मध्ये पहिले कर्करोग रुग्णालय मुंबई, पहिले इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, पहिले इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेन्टल रिसर्च, आणि कलेच्या अभ्यासासाठी पहिले राष्ट्रीय केंद्र स्थापन केले.

ब्रिटिश सरकारने 'बॅरोनेटसी' व नाइट (Knight) च्या सरदारांचे पद किंवा दर्जा तीन पारशी व्यक्तींना बहाल केला. ते म्हणजे

१) सर जमशेटजी जिजीभॉय,

२) सर दिनशॉ पेटिट आणि

३) सर कावसजी जहाँगिर

हा एक असा खिताब होता जो संपूर्ण भारताच्या इतिहासात आजपर्यंत सर्वश्रेष्ठ ठरतो. त्याचप्रमाणे डॉ. के. एन. बहादूरजी हे पहिले भारतीय होते. ज्यांनी एम.डी. ची परीक्षा लंडन येथून उत्तीर्ण केली आणि त्यांचे मुंबईच्या इतिहासातील योगदान महत्त्वाचे आहे. तसेच डॉ. रुस्तमजाल वकील हे आंतरराष्ट्रीय रोजनिशीत (Journal) ''द फादर ऑफ इंडियन कारडिओलाजीस्ट'' म्हणून ओळखले जातात. सॅम माणेकशॉ हे भारतातील, पहिले आणि एकमेव 'फिल्ड मार्शल' बनले व अँडमिरल जल करशेटजी हे भारतीय नौदलातील प्रमुख होते. एअर मार्शल मीनू इंजिनिअर हे भारतीय हवाई दलातील इतिहासाचे उच्च दर्जाचे (Decorated) एअर मार्शल म्हणून ओळखले जात. भारतातील पहिले अणुशक्ती केंद्र हे डॉ. होमी भाभा या पारशी वैज्ञानिकांच्या नावाने आहे, तसेच झुबीन मेहता हे पाश्चिमात्त्य शास्त्रीय संगीतातील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व होते.

पारशी समाजातील ह्या नामवंत व्यक्तींची यादी अत्यंत मोठी असून, या यादीतील नामवंत व्यक्तींनी एवढी मोठी कामगिरी कशी केली? तर त्यांचे धार्मिक तत्त्वज्ञान, त्यांची उद्योगातील विविधता व कठीण श्रम ह्यात ह्या प्रश्नांचे उत्तर मिळते.

वैदिक धर्माप्रमाणेच झरतुष्ट्री धर्मात विवाहाला प्राधान्य आहे. संन्यास व ब्रह्मचर्य यांचा पारशी धर्माने निषेध केला आहे. लग्न करून योग्यप्रकारे संसार करणे हे मनुष्याचे मुख्य जीवन कर्तव्य होय असे पारशी धर्म मानतो.

पारशी लोक आहारात प्रामुख्याने भात व नारळाची आमटी, बटाटा व इतर भाज्यांचाही वापर करतात. धानसाक हा त्यांच्या जेवणातील आवडता व महत्त्वाचा पदार्थ होय. प्रामुख्याने अंडी व मांस याचा वापर मुख्यत्वे जेवणात केला जातो. शाकाहार व मांसाहार अशा दोन्ही पद्धती त्यांच्या जेवणात आढळतात. भारतीय शिक्षण पद्धतीत इंग्रजी भाषेचा समावेश करण्यात पारशी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. सन १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्या काळात विद्यापीठातून मुलींना शिक्षणाची परवानगी नव्हती. पुढे सन १८६९ साली रुस्तम नावाच्या पारशी 'पोस्टमनने' स्वत:च्या मुलीकरिता मुंबई विद्यापीठात प्रवेशाकरिता एक अर्ज सादर केला व अशा प्रकारे १८६९ मध्ये मुंबई विद्यापीठात मुलीचा प्रवेश झाला व ही पहिली विद्यापीठातील मुलगी पारशी होती. त्याचप्रमाणे त्यावेळी मनोरंजनात्मक कलाकृती व

नाटकांमधून मुली नसल्यामुळे मुलांनाच स्त्री–भूमिका सादर करावी लागत होती. परंतु, विद्यापीठातील मुलींच्या प्रवेशानंतर पहिल्यांदा पारशी मुलींनी स्त्री भूमिकांमधून कामे करायला सुरुवात केली. पुढील काळात पारशी समाजाने दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशॉ वाच्छा इ. शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या व्यक्ती भारतीय समाजाला देऊन आपली शैक्षणिक कारकीर्द समृद्ध बनविली.

पारशी लोक जवळच्याच नात्यातील स्त्री–पुरुषांचा विवाह हा अधिक प्रशस्त मानतात. इराणमधील झरतुष्ट्री धर्मातील लोकांमध्ये वयात आल्यानंतर विवाह होत असे. पण भारतातील पारशी लोकांमध्ये बालविवाह प्रथा अस्तित्वात होती. नंतर मात्र ही प्रथा बंद होऊन प्रौढपणीच विवाहांना प्राधान्य देण्यात आले.

पारशी समाजातील लोकांचे सण हे तीन प्रकारचे आहेत ते म्हणजे –

१) त्यांचे काही सण हे ऋतूमानाप्रमाणे साजरे होतात.

२) काही सण हे त्यांच्या इतिहासातल्या विशिष्ट घटनांशी संबंधित असतात.

३) तसेच काही सण हे पूर्वजांच्या स्मरणार्थ साजरे केले जातात.

पारशी लोक अग्नी, जल व पृथ्वी यांना पवित्र मानतात आणि मृतदेहाला अत्यंत अपवित्र. म्हणूनच ते मृतदेहाचे दहनही करीत नाहीत. तो जमिनीतही पुरत नाही किंवा पाण्यात सुद्धा बुडवित नाहीत. कारण त्यामुळे अग्नी, जल व पृथ्वी अपवित्र होऊ नये अशी त्यांची इच्छा असते. म्हणूनच प्रेत दगडावर उघडे ठेवून ते गिधाडाच्या भक्ष्यस्थानी पडावे अशी व्यवस्था करतात.

क) कुटुंबव्यवस्था –

वैदिक धर्माप्रमाणे झरथृष्ट्री धर्मात विवाहाला प्राधान्य आहे. विवाह करून योग्य प्रकारे संसार करणे हे मनुष्याचे मुख्य जीवन कर्तव्य होय, असे पारशी समाज मानतो. त्यामुळे संन्यासाश्रम व ब्रह्मचर्याश्रमाचा ह्या धर्माने निषेध केला आहे.

पारशी लोक जवळच्याच नात्यातील स्त्री–पुरूषांचा विवाह हा अधिक प्रशस्त मानतात. इराणमधील झरथृष्ट्री धर्मात वयात आल्यानंतर विवाह होत असत. परंतु बहुतांश पारशी

समाजात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. पुढे ही प्रथा बंद पडून प्रौढपणीच विवाहाला प्राधान्य देण्यात आले. स्त्री–पुरूष ह्या दोघांचाही पुनर्विवाह ह्या समाजाला मान्य आहे. यातून असे स्पष्ट होते की, 'पारशी समाजात स्त्री व पुरूष दोघांनाही सारखेच स्थान आहे'. परंतु, असे असले तरीही काही कारणांमुळे पारशी समाज हा लुप्त होताना दिसतो.

पारशी समाज हा आपल्या समाजाचा एक अविभाज्य घटक असला तरी, अजूनही संख्येने अत्यल्प असून येत्या काही वर्षात ते आपल्या भूमीवरून पुर्णपणे नाहीसे होण्याची शक्यता आहे. याची कारणे म्हणजे त्यांच्या मृत्यूदराच्या तुलनेत असलेला अल्प जन्मदर, स्त्रीयांमधील जनन क्षमतेचे अल्प प्रमाण, स्थलांतर आणि या सर्वांचा त्यांच्या महत्त्वाच्या प्राथमिकता ठरविण्याशी असलेला अंर्तसंबंध होय.

पारशी लोकांची कुटुंबाच्या तुलनेत करिअरला महत्त्व देण्याची दृढ मनोरचना असते. तसेच त्यांची समृद्ध आणि धनाढ्य जीवन जगण्याची मनीषा असल्यामुळे त्या काळात ते शक्यतो समाजातील इतर व्यक्तींशी मिसळण्याचे टाळत असतात. त्यांच्याकरिता शिक्षण घेणे आणि श्रीमंत होणे हे स्वत:चे कुटुंब व मूल असण्यापेक्षाही कितीतरी अधिक महत्त्वाचे असते. पारशी समाजावर एक दृष्टिक्षेप टाकल्यावर असे लक्षात येते की, त्यांना इतके श्रीमंत बनायचे असते की, ते आत्मसंतुष्ट राहू शकतात आणि चैनीचे जीवन जगू शकतात. याच एकमेव कारणाकरिता पारशी स्त्रिया उशिरा, म्हणजे काहीवेळा वयाच्या पस्तीशी ते चाळीशीत लग्न करतात. या वयात गर्भधारणेच्या संदर्भात त्यांना काही अडचणी येतात. आणि जर यातूनही पारशांनी आपलं मूल जन्माला घालण्याचा विचार केला तर ते फक्त एकच मूल होऊ देणं पसंत करतात.[१] कारण त्यांना त्यांच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या या अधिक महत्त्वाच्या वाटतात. परंतु असे असले तरी ''या सर्व गोष्टींचा शेवट पारशी समाजाची लोकसंख्या क्षीण होण्याकडे होतो.'' असे डॉ. शेरनाझ कामा, परझोर फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालिकेचे मत आहे.[२]

वयोवृद्ध पारशी व्यक्ती ह्या घरात सुद्धा उशिरापर्यंत त्यांच्या प्रकृतीची काळजी न घेता काम करताना दिसतात. त्यामुळे पारशी हे अंतर्मुख प्रवृत्तीचे आहेत असे न म्हणता ते कामसू स्वभावाचे असल्यामुळे, त्यांचे कार्य महत्त्व देऊन करतात असे म्हणणे योग्य ठरेल.

बरेचसे पारशी मुंबईत स्थायिक झालेले असून, त्यांनी एकाच ठिकाणी एकत्र राहण्याकरिता पारशी बाग बांधली. परंतु त्यांचा एकत्र राहण्यासाठी त्यांना पारशी कुटुंबात लग्न करण्यासाठी काहीच उपयोग झाला नाही. कारण त्यांचे पालक त्यांच्या मुलांना संपत्ती आणि ऐहिक वस्तूंनी समृद्ध जीवन मिळावे म्हणून उशिरा लग्न करण्याविषयी सुचवितात व असे केल्यामुळे त्यांच्या सामाजिक, शारीरिक पैलूंवर दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांच्या मुलींना विवाहाकरिता त्यांच्याच समाजातील मुलगे मिळणे कठिण होऊन जाते. यामुळे पारशी नसलेल्या व्यक्तींशी ह्या स्त्रिया लग्न करतात व यामुळे त्यांचे होणारे मूल हे अधिकृतरित्या पारशी जमातीचे नसल्यामुळे त्यांच्या लोकसंख्येत घट होण्याचे हे ही एक महत्त्वाचे कारण आहे असे पारझोर फाऊंडेशनच्या संचालक मंडळावरील आवा खुल्लार (Ava Khullar) म्हणतात. परंतु, पारशी समाज हा आपल्या समाजाचा एक अविभाज्य भाग असल्यामुळे आपल्याला त्यांच्या घटणाऱ्या लोकसंख्येवर भर देणं अत्यावश्यक आहे, ज्यामुळे ते त्यांचे अस्तित्व सुरक्षित करू शकतील. या गोष्टीवर लक्ष केंद्रित करून सरकारने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. तसेच बॉम्बे पंचायत आणि युनेस्कोने देखील पारशी समाजाची लोकसंख्या वाचविण्यासाठी पारझोर प्रोजेक्टची सुरुवात केली. व दुसऱ्या बाजूला मिनिस्ट्री ऑफ मायनॉरिटी अफेअर्सने सन २०१३–२०१४ मध्ये 'जियो पारशी' (Jiyo Parsi) या सरकारी योजनेचा शुभारंभ केला. या योजने अंतर्गत पारशी समाजाच्या वृद्धीसाठी सरकारतर्फे आर्थिक मदत, वैद्यकीय मदत इत्यादींचा अंतर्भाव असून या योजनेचा भर हा पारशी समाजापर्यंत पोहोचवून त्यांना त्यांच्या लोकसंख्येत वृद्धी करण्याकरिता जागरूक करण्यावर आहे. या योजनेचे दोन महत्त्वाचे भाग असून त्यातील पहिल्या भागात : प्रजोत्पादनासाठी प्रोत्साहन आणि वैद्यकीय मदत पुरविणे यावर भर दिला. ह्या प्रोत्साहनांतर्गत कुटुंब नियोजनावर आणि मुलांना त्यांच्या योग्य वयात जोडीदार निवडून वेळेवर लग्न करण्यासाठी राजी करण्यावर भर देण्यात आला आहे.

तसेच दुसऱ्या भागात : स्त्रियांच्या आरोग्यावर भर देण्यात आला असून त्यांच्या वांझपणावर वैद्यकीय उपाययोजना करण्यासाठी आर्थिक मदत पुरविणे, जोडप्यांमधील प्रजोत्पादनातल्या वैद्यकीय समस्या निदर्शनाला आल्यावर त्या जोडप्यांचे समायोजन (Counselling) करणे इत्यादींवर भर दिलेला आहे.[३] त्याचप्रमाणे बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सरकारतर्फे या योजनांवर दहा करोड रुपये गुंतविण्यात आले आहे. तसेच 'जियो

पारशी' व इतर योजनांतर्गत पुस्तके, लेख, समुपदेशन इ.तून भारतीय आणि पारशी संस्कृतीचा परिचय करून देण्यासाठी प्रयत्न करणे, त्यांच्या लोकसंख्येच्या आकडेवारीवर एक व्यापक दृष्टिक्षेप टाकणे इ. गोष्टींचाही समावेश होतो. गेल्या दहा वर्षात जवळपास ६८० पारशी जोडप्यांनी याचा लाभ घेतला. आजच्या तारखेला या योजनेतून २३० मुलांचा जन्म झालेला आहे. याचाच अर्थ या गोष्टीचा उपयोग होत असून, यातून पारशांच्या परिस्थितीत आमूलाग्र सुधारणा होत आहेत. यामुळेच पारशी समाजासाठी चांगल्या भविष्याची आशा ठेवू शकतो.[४]

ख) आहार

पारशी समाज ७१७ मध्ये गुजरात येथे स्थायिक झाला, तेव्हा तेथील हिंदू राजा 'जादी राणा' उर्फ 'जाधव राणा' याने पारशांना काही अटींचे पालन केल्यावर तेथे राहायला दिले जाईल असा करार केला. त्यानुसार पारशांनी सर्व अटींचे पालन केले व ते तेथे राहिले. या समाजाने काळाप्रमाणे वेळोवेळी बदल केले. परंतु हे बदल करीत असताना त्यांनी आपल्या पारंपरिक रीतिरीवाजांना सोडले नाही. ब्रिटिश, डच आणि युरोपियनांबरोबर राहून पारशी समाजाने त्यांचेही रीतिरीवाज स्वीकारण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की, पारशांनी त्यांच्या खानपानाच्या सवयीही स्वीकारल्या. यावर प्रकाश टाकताना दादाभाई नौरोजींनी एका चर्चासत्रात म्हटले की, ''सर्व पारशी लोक जेवताना काटे–सुऱ्यांचा वापर करतात.'' परंतु या संदर्भात भारतीय इतिहासकार एम.एम. मर्झबान यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले की, ''सर्वच पारशी असे करीत नाहीत, तर बरेचसे पारशी कुटुंबे ही जमिनीवर 'सफ्रा' अंथरून ताटातील अन्न हाताने जेवतात.'' हे करीत असताना त्यांना बहुधा त्यांच्या प्राचीन परंपरेला महत्त्व द्यायचे असावे.

ज्या वेळी नवरोजी आणि मर्झबान यांनी पारशांच्या खानपानाच्या सवयींबद्दलची मतं नोंदविली होती तोपर्यंत पारशांना भारतात येऊन हजार वर्षांपेक्षाही जास्त काळ लोटला होता. पारशी समाजाने हिंदू, मुस्लीम, पोर्तुगीज, डच, फ्रेंच व ब्रिटिशांच्याही खानपान पद्धतींचा स्वीकार केला. हिंदू व मुस्लीम या दोन्ही समाजाबरोबर राहत असताना त्यांच्या भावना दुखविण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. त्याकरिता त्यांनी गोमांस व डुकरांच्या मांसापासून स्वत:ला दूर ठेवले. अशी नोंद एडवर्ड टेरीने केली आहे. हे लोक अतिशय सहिष्णू

असल्यामुळे कोणत्याही धर्मियांच्या धार्मिक भावना अजिबात दुखवल्या जाऊ नये म्हणून अतिशय काळजी घेत असत.

पारशी आपल्या आहारात मांस व मद्य प्राशन करीत, त्यांच्या स्वत:च्या धर्माने खानपानाचे कुठलेही नियम लादले नाही. हिंदू धर्माप्रमाणेच पारशी समाजाने ही दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व ओळखले. त्यांच्या धर्मग्रंथामध्ये अशी नोंद आहे की, 'जगातील ऐहिक पदार्थांमध्ये पशूपासून मिळणारी उत्पादने ही सर्वोत्तम आहेत.' त्याचप्रमाणे मे आणि जून महिन्यात वसंत ऋतूच्या मध्यावर जेव्हा सूर्य वृषभ राशीत असतो, तेव्हा काढण्यात आलेले लोणी हा सर्वात योग्य आहार मानण्यात आला आहे, याची तुलना पारशी स्वर्गातील महत्त्वपूर्ण अन्नाशी करतात.[५]

पारशांचे आरोग्याचे आणि स्वच्छतेचे नियम हे जवळपास हिंदूशी मिळतेजुळते आहे. याबाबत एडवर्ड टेरीने असे नोंदविले की, ''पारशी लोक हे स्वतंत्र वेगळ्या ताटात जेवतात व प्रत्येक जण पाणी पिण्यासाठी वेगळा पेला वापरतात, असे करण्यामागे स्वत:ची शुद्धता व स्वच्छता राखली जावी हा हेतू असतो.'' पारशांच्या वेंदीदाद (Vendidad) मध्ये असे म्हटले आहे की, उपवास केल्यामुळे कोणताच चांगला हेतू साध्य होत नाही.[६] तर ज्या व्यक्तीने काहीच खाल्ले नाही त्याला कुठलेही पवित्र काम करण्याची ना शक्ती राहते, ना मुलांना जन्म देण्याची क्षमता राहते. पारशांच्या मते अन्नावर प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे, यावरून अन्नाचा आस्वाद घेण्याची वृत्ती पारशी समाजात खोलवर रूजली आहे.

पारशी लोक त्यांच्या 'ससानियन' पूर्वजांकडून 'अहबिसा' म्हणजे 'जेली' या महत्त्वाच्या पदार्थाचा वापर स्टार्च जेलीच्या स्वरूपात आजही करतात. मेंढीच्या मांसापासून बनविलेल्या खारिया–नी–जेली या पदार्थात ते स्टार्च जेलीचा वापर करतात, या जेलीचा स्वाद संत्र्याच्या रसाच्या आणि ब्रॅन्डीच्या वापराने वाढविला जातो व थंडीच्या ऋतूत घट्ट क्रिम (मलाई) सोबत हा पदार्थ खाल्ला जातो. या पदार्थामुळे शरीरात ऊब आणि शक्ती निर्माण होते असे ते मानतात.

पारशी, त्यांच्या आहारात बदाम, आक्रोड आणि पिस्त्यासारख्या सुक्यामेव्यांचा प्रामुख्याने वापर करतात. आपली निरनिराळी व्यंजने घट्ट करण्यासाठी तसेच गोड–तिखट

पदार्थांची चव वाढविण्यासाठी ते सुक्यामेव्यांचा वापर करतात. हगान–नु–पुडींग (Hagan-Nu-Pudding) हे मूळ इराणचे वेलदोडा, शेंगदाणे टाकून केलेले लज्जतदार पुडींग आहे. परशांच्या पर्शिअन पूर्वजांना रस, मध, मिठाया, पेस्ट्रीज, केक्स व आईस्क्रिम अतिशय आवडत असत. या सर्व पदार्थातील स्वाद वाढविण्यासाठी ते जरदाळू, डाळिंब आणि लिंबाच्या रसापासून बनविण्यात आलेल्या आंबट–गोड चटण्यांचा वापर करीत असत.

पारशी समाजाने काळानुरूप युरोपियनांच्या खानपान पद्धतीतील जे काही सर्वोत्तम होते ते सर्व स्वत:च्या जेवणाच्या आवडीनिवडीशी जुळविले. जसे, पोर्तुगिजांच्या बटाटे, टोमॅटोचा वापर त्यांनी आपल्या जेवणात केला. तसेच तळलेले, फेटलेले किंवा उकडलेल्या अंड्यांची त्यांना पूर्वीपासूनच आवड होती. शिजविलेल्या भाज्या सजविण्यासाठी टॉपिंग्ज म्हणून अंड्याचा वापर करीत. तसेच जेवणात टमाटा–पर–इडा म्हणजेच मसालेदार टोमॅटोच्या कापावरील अंडी व भिंडा–पर–इडा म्हणजे भेंडीवरील अंडी. या पदार्थांचा पारशी लोक पूरक अन्न म्हणून वापर करीत असत. तसेच पारशांनी कटलेट सारख्या खास युरोपियन पदार्थांतसुद्धा स्वत:ला अनुकूल असे बदल करून त्याची लज्जत साखर, हिरव्या मिरच्या आणि तांदळाच्या पिठाने घट्ट केलेल्या व्हिनेगरचा वापर करून वाढविली. पारशांच्या विवाह समारंभात आणि नवजोतच्या वेळी माशांचा सॉस हा महत्त्वपूर्ण मानला जातो. याप्रसंगी केळीच्या पानावर अन्न वाढण्याची परंपरा आहे. पात्रा–नी–मच्छीं हा पदार्थ म्हणजे काटेविरहित माशांचे चविष्ट, मसालेदार, हिरव्या कोथिंबिरीच्या आणि नारळाच्या चटणीत घोळलेले व चौकोनी केळीच्या पानात गुंडाळून वाफविलेले मच्छीचे तुकडे देखील समारंभाच्या वेळी लज्जत वाढवितात. त्याचप्रमाणे पारशांच्या सणासुदीच्या वेळी साखरेचा पाक व व्हिनेगरमध्ये सुकामेवा, गाजराचे तुकडे टाकून घोळलेले लोणचे म्हणजे गज्जर–भारवान–नु–आचार हा हमखास केला जाणारा एक पदार्थ आहे.

दोसाभाई कारकांच्या लिखाणातून पारशी समाजाची अनेक शतकांची जेवणाची त्यांची आवड कळून येते.[७] पुढील काळात पारशांनी मुंबईत वास्तव्य केले असले तरीही गुजरातशी आपले संबंध कायम राखले. त्यांचे हे संबंध मुख्यत: धार्मिक व खानपानाशी वैशिष्टपूर्णरीत्या संबंधित होते, त्यांच्या आहारात गुजरातमधील हिंदू पदार्थांचाही प्रभाव दिसतो. जसे सुरती पापडीतल्या कोवळ्या बिया उंबरियोत वापरतात तसेच भरपूर भाज्या व मसाल्यांचा वापर करून उंदियोसारखा पदार्थ पारशांचा आवडता आहे. उदवाडा शहरातील माशांचे, पारशी विशेष

चाहते होते. तेथील त्यांचे मत्स्यप्रेम हे प्रकर्षाने दिसून येते. उदा. सेंधिया म्हणजे नदीतील मोठे झिंगे, सालीमासा, तळलेले पापलेट आणि लज्जतदार बोंड्मासा, मुलेट मासा इ. गुजरातमधील 'बलसार' आणि बिलिमोरिया हे जिल्हे मोठ्या माशांच्या खारावलेल्या गाभोळ्यांसाठी व पावसाळ्यात नदीत सापडणाऱ्या छोट्या माशांसाठी प्रसिद्ध आहेत. या माशांच्या मसालेदार आमटीला हेवटी–नु–पाटिओ असे म्हणतात. हा एक स्वादिष्ट पदार्थ आहे. तारापूरमधील तारापुरी पातिओ हे बॉम्बे डक म्हणजे बोंबील पासून बनविला जाणारा लोणच्यासारखा किंवा सुक्या रस्स्यासारखा आंबट–तिखट पदार्थ आहे. 'बॉम्बे डक' हा हिंदी महासागरात सापडणारा 'ईल' माशासारखा एक मासा असून पारशांच्या जेवणात याचे महत्त्व आहे. फक्त मसालेदार अन्न नाही तर पारशी सुरती बतासा, खारी आणि नानकटाई हे पदार्थसुद्धा आवडीने खातात. सन १८०३ मध्ये, 'केरसी साहेर'च्या बेकरीने पारशी बिस्किटे प्रथम प्रसिद्ध केली. धानसाक हा प्रत्येक पारशी घरांमधून दर रविवारी व विशेषप्रसंगी डाळीपासून बनविण्यात येणारा पारंपरिक मसालेदार पदार्थ आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर (चाहरोम) म्हणजे चौथ्या दिवशी हा पदार्थ कोंबडीच्या किंवा कोकराच्या मांसाबरोबर बनविला जातो. त्यासाठी चार प्रकारच्या डाळी, लाल भोपळा, मेथीची भाजी, बटाटा इ. चिरून त्यांना धानसाकसाठी बनविण्यात आलेल्या मसाल्यांमध्ये शिजवून साखरेच्या भाताबरोबर खाल्ला जातो. त्याचप्रमाणे गुलाबाचा अर्क व दूध, लोणी घालून बनविलेला पर्शियन फालुदा हा पारशांचा आवडता पदार्थ. तसेच धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेले ठिकाण 'नवसारी' येथे पारशी लोणचे अणि व्हिनेगर प्रसिद्ध आहे. येथील (Fudge) म्हणजे गोड हलवा, लेवटी मासा हे त्यांचे विशेष आवडते पदार्थ आहेत. हे सर्व पदार्थ हंगामानुसार जवळपास रोजच्या रोज गुजरातमधून मुंबई येथे मागविण्यात येतात व येथे ' खाबाल स्टोअर्स ' आणि ' रतन टाटा इन्स्टिट्यूट ' सारख्या पारशांच्या प्रसिद्ध पुरवठा केंद्रामध्ये ते साठविण्यात येतात.

मुंबईत स्थायिक झाल्यानंतर पारशांनी झरतुष्टाला मानणाऱ्या इराण्यांकडून मुंबईत छोटी छोटी उपहारगृहे किंवा कॅफेज हे 'ईराणी कॅफेज' व 'ईराणी चाय खानाज' या नावाने प्रसिद्ध आहेत. फिल कटलेट्स्, खीमा–पाव, ब्रून पाव, धानसाक अणि वेगवेगळ्या प्रकारच्या बिस्किटांसाठी ब्रिटानिया, कयानी व बस्तानी कॅफेची नावे प्रसिद्ध आहेत.[८] 'द अडेलफी' नावाचे पहिले हॉटेल हे पारशी वल्लभाचार्य म्हणजे (Caterer Pan Excellence) म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या 'पालनजी' या पारशी गृहस्थाच्या मालकीचे होते. हे सज्जन व सढळ हाताने मदत करणारे म्हणून ओळखले जात. त्यांनी क्लेअर रोडवर हॉटेल 'द अडेलफी' ला जोडूनच एक उपाहारगृह सुरू केले व बराक लेनच्या आणखी एका पारशी बेकरीतील मिठाया आणि केक या उपाहारगृहात येणाऱ्यांना दिले जात असत. तसेच मिलटरी स्टोअर लेनवर एक बेकरी होती त्या बेकरीत केवळ मध्यमवर्गीय पारशीच जात असत. या बेकरीत करकरी नावाचे एक बिस्किट तयार होत असे ते पारशी लोकांमध्ये विशेष लोकप्रिय होते. हे मधे पोकळ असलेले बिस्किट दोन प्रकारच्या किसमिसचे तुकडे टाकून तयार केलेले एक खुसखुशीत बिस्किट होते. 'हनी रीङ्स' हा खाण्याचा एक महत्त्वाचा पारशांचा आवडता पदार्थ. या हनी रिङ्सला 'गुलाब गंडेरी' ही म्हटले जात. पारशी फेरिवाल्याकडे ही गुलाब गंडेरी विकण्यासाठी असे. गुलाब गंडेरी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून गुलाबाच्या स्वादाची 'उसाची खाडं' होती. गरीब–श्रीमतं असे दोघेही, सारख्याच आवडीने या 'हनी रिङ्सचा' आस्वाद घेत. सन १९३५ मध्ये मुंबईत ह्यूडरर्स जहाजावरुन अमेरिकेतून बर्फ आणण्यात आला व त्याचवेळी फोर्ट मधील एक दोन फेरिवाल्यांनी फ्लॉरेन्स किंवा नेपल्सच्या रहिवाशांकडून आईस्क्रिम बनविण्याची कला आत्मसात केली. 'मोरनाझ' हे नाव आईस्क्रिमच्या संदर्भात महत्त्वाचे मानले जाते. या आईस्क्रिम व्यवसायांची मालकी कित्येक वर्ष पारशांकडेच होती. चार–आठ आण्याला मिळणारी ही कुल्फी सधन पारशी व्यक्तींसाठी एक चैनीचा पदार्थ होता. सर जमशेटजी जिजीभॉय यांनी सर्वप्रथम सामुदायिक स्वागत समारंभात आईस्क्रिमचा वापर केला.[९]

१६व्या शतकातील इराणी म्हणजे पारशी लोकांच्या खानपानाच्या सवयी या मध्यपूर्व आशियातील लोकांप्रमाणे होत्या. परंतु पुढील काळात नवीन लोकांच्या संपर्कात आल्यावर पारशांनी त्यांच्या खानपान पद्धती स्वीकारल्या.

ग)शिक्षण व्यवस्था

पारशी समाजाने शिक्षणाचे महत्त्व जाणून घेतले व आपली शैक्षणिक कारकीर्द समृद्ध करून समाजाचा, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विकास केला. झरतुष्ट्राची शिकवण जोपर्यंत लिखित स्वरूपात नव्हती तोपर्यंत धर्मगुरूंमार्फत अतिशय निष्ठेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक पद्धतीने पोहचविली जात असे. धर्मगुरूंच्या या परंपरेमुळेच झरतुष्ट्राची ही

शिकवण टिकून राहिली आणि याचे कारण म्हणजे पारशी समाजातील लोकांची असलेली अपार श्रद्धा होय. पारशी समाजाकडून धर्मगुरू पदासाठी अधिक अपेक्षा असते. झरतुष्ट्राचा धर्म अधिक चांगल्या प्रकारे समजावून घेण्यासाठी पारशी धर्मगुरूंच्या मुलांना अवेस्तातील 'पहेलवी', संस्कृत, इंग्रजी आणि इतर भाषा येण्याकरिता सर जमशेदजी जिजीभॉय यांनी पहिल्या झरतुष्ट्री मदरसेची स्थापना केली. त्याचप्रमाणे १९१८ मध्ये ''दादर अथॉर्नन'' बोर्डींग या मदरसेची स्थापना केली. पुढे विसाव्या शतकात मदरसेमधून शिक्षण घेण्याची परंपरा सुरूच राहिली. या धार्मिक पाठशाळेला पारशी लोक मदरसा असे म्हणतात व हिंदू लोक 'गुरूकुल' म्हणतात. मुंबईमध्ये पारशांचे दोन मदरसे आहेत. एक दादर व दुसरा अंधेरी येथे. या मदरसांमधून विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध पद्धतीने सर्व धार्मिकविधी पार पाडून कठोर प्रशिक्षण दिले जाते. मदरसेत त्यांना प्रार्थना, धार्मिकविधी, धार्मिक इतिहास शिकविला जातो. जो विद्यार्थी नबार म्हणजे धर्मगुरु बनणार असतो त्याला खोर्दे अवेस्ता (Khorde Avesta) व 'इजास्नि प्रार्थना' शिकाव्या लागतात. या इजास्निची सर्व ७२ प्रकरणे आणि विस्पराद (Visparad) म्हणजे देवाच्या खूप साऱ्या यझदास (Yazads) ज्याची २३ प्रकरणे आहेत ते सर्व तोंडपाठ करावी लागतात. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांची बाहेरच्या धर्मगुरूकडून परीक्षा घेतली जाते व त्या कठीण परीक्षेत पास झाल्यानंतर त्यांना 'नबार' किंवा 'मारताब' ही पदवी मिळते. नबार ही पदवी मिळालेल्या विद्यार्थ्याला 'इरवाद' असेही म्हणतात. त्याचा अर्थ 'मास्टर' असा आहे. या मदरसांमधून अभ्यास करताना विद्यार्थ्यांना इराणचा धार्मिक इतिहास शिकणे महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे त्यांना एस.एस.सी. बोर्डाप्रमाणे शाळेचा नेहमीचा अभ्यासक्रमही पूर्ण करावा लागतो. मदरसेतील रुस्तमजीच्या (धार्मिक शाळेच्या प्राचार्याच्या) मते, एखाद्या विद्यार्थ्याचे जर धर्मगुरू बनण्याचे प्रशिक्षण सुरू असेल तर त्यांना मदरसेतील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते. मदरसांमधून स्नातक झालेली मुले 'मोबेडी' (Mobedi) म्हणजे धर्मगुरुंचे काम किंवा विविध क्षेत्रात नोकऱ्याही करतात.[१०]

१९३५ मध्ये के. बी. वकील यांनी काही पारशी विद्यार्थ्यांचे संशोधन केले होते. त्यांना असे आढळले की ६०१ कुटुंबात ८४१ विद्यार्थी होते. ज्यापैकी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील पाचव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वसाधारणपणे १२२ इतकी होती, गुजराथी माध्यमाच्या शाळेतील पाचव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास ४९७

इतकी होती. त्याचप्रमाणे १८ ते ३४ वयोगटातील इंग्रजी माध्यमाच्या चौथी ते सातवी पर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९४ होती आणि २२ मुले अशी होती ज्यांचे वय ५ ते ८ च्या दरम्यान होते. ज्यांची नुकतीच सुरुवात झाली होती व १०६ मुली होत्या, ज्यांचे वय १३ वर्षांपेक्षा अधिक होते परंतु त्यांनी कधीही शाळेत प्रवेश केला नाही.

पारशी समाजातील विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाचा विचार करता असे दिसते की, त्यातील १२० विद्यार्थ्यांनीच उच्च शिक्षणाचा लाभ घेतला होता तो पुढीलप्रमाणे –

१) १६ ते ११ वयोगटातील २७ विद्यार्थी हे आर्ट्सच्या पहिल्या वर्गात होते.

२) १७ ते २१ वयोगटातील ३५ विद्यार्थी इंटर आटर्सच्या वर्गात होते.

३) १८ ते २३ वयोगटतील ४५ विद्यार्थी हे इंटर सायन्सच्या वर्गात होते.

४) २० ते २४ वयोगटातील उरलेली १३ विद्यार्थी बी.ए.च्या वर्गात शिकत होती.[११]

वरील १२० विद्यार्थ्यांपैकी ४७ विद्यार्थिनी होत्या. पारशी समाजात शैक्षणिक जागृती जलद गतीने व्हावी यासाठी महाविद्यालये व शाळांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतही केली. त्यानुसार पुढील वयोगटातील विद्यार्थ्यांनी फी साठी अर्ज केले.

- **शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक मदतीसाठी अर्ज –**

संशोधनातील १९९० केसेस मधून २४५ घरे अशी होती ज्यांनी पारशी संस्थेत शैक्षणिक मदतीसाठी अर्ज केला, त्यातील १२८ विद्यार्थ्यांनी शाळेची फी मागितली. त्यातील ११७ विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी मदत मागितली. ३ ते १० वर्षे वयोगटातील ७० विद्यार्थ्यांनी तसेच १० ते १६ वयोगटातील १०५ व १६ वर्षांवरील ८१ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक मदतीसाठी संस्थेकडे अर्ज केले.

- **महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मदतीसाठी अर्ज –**

महाविद्यालयातील ११७ विद्यार्थ्यानी ज्यांचा वयोगट २० ते ३५ होता, त्यांनी अर्ज केले, त्यातील ६२ विद्यार्थी १६ ते २० वयोगटातील, ४५ विद्यार्थी २० ते २२ वयोगटातील आणि २१ वर्षाचे १८ विद्यार्थी होते. त्यातील साधारण दहा विद्यार्थ्यांनी इंटर सायन्ससाठी, ८

विद्यार्थ्यांनी आटर्सच्या पहिल्या वर्षासाठी व नर्सिंगच्या शिक्षणासाठी फी साठी मदतीचा अर्ज केला होता.

- **पारशी समाजातील मुलांमधील निरक्षरतेचे प्रमाण पुढीलप्रमाणे –**

१९३१ च्या जनगणना अहवालानुसार प्रौढांपेक्षा १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण बरेच जास्त दिसून येते. अहवालातील आकडेवारीनुसार मुंबई शहरातील ५ पैकी २ मुले निरक्षर होती. तसेच १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ६३% इतके असून २० वर्षे किंवा त्याहून जास्त वयाच्या व्यक्तींमधील साक्षरतेचे प्रमाण हे ८६.९% पेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे प्रादेशिक भाषेतील चौथ्या व पाचव्या इयत्तेतील तसेच पहिल्या, दुसऱ्या इयत्तेतील पारशी मुलांच्या उपस्थितीचा विचार करता असे निदर्शनास आले की, काही पालक आपल्या मुला–मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलू शकत नसल्यामुळे त्यांना शाळेतून काढून कामाला पाठवित. परंतु काही मुलांमध्ये असेही आढळले की, त्यांना शिक्षणाबद्दल फारशी रुची नव्हती. पारशी समाजातील विद्यार्थ्यांमधील शिक्षणाच्या या अनास्थेवर उपाय म्हणून विद्यार्थ्यांच्या प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणानंतर त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे तांत्रिक किंवा व्यावसायिक शिक्षणावर भर दिलेला आढळतो. तसेच शैक्षणिक चमक नसलेल्या विद्यार्थ्यांनी पारशी हुनर जसे – सुतारकाम, ब्रश तयार करणे, फर्निचरला पॉलिश करणे, पत्र्याचे डबे तयार करणे, शिवणकाम इ. सारखे कारागिरीतील कौशल्य हस्तगत केले व यासाठी 'पारशी चॅरिटी ऑर्गनायझेशन सोसायटी' ही संस्था कार्यरत होती. ही संस्था शिकावू विद्यार्थ्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे काम देऊन दिवसभरात त्याने केलेल्या कामाचा मेहनतानाही देत असे.

- **पारशी स्त्रियांमधील साक्षरता –**

पारशी समाज शिक्षणाबाबत जागरूक होता. हळूहळू समाजाने शिक्षणात काळानुरूप बदल केले. जसे – गुजराती माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या पारशी स्त्रिया पुढील काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयातून प्रवेश घेऊन आपली शैक्षणिक कारकीर्द उंचावू लागल्या. त्यातूनच त्यांनी वैज्ञानिक, डॉक्टर, इंजिनिअर, वकील इ. विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करून समाजात आपले स्थान बळकट केले. परंतु असे असले तरीही

शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या या समाजातील स्त्रियांनाही शिक्षणापासून वंचित राहावे लागले होते. पण पारशांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून मुलींच्या शिक्षणाला सुरुवात केली. वकील यांच्या केसेसच्या अभ्यासाअंती असे दिसते की, मुलींचे शिक्षणातील प्रमाण बरेच अल्प होते व ज्या काही थोड्याफार मुली शिकत होत्या त्या प्राथमिक किंवा माध्यमिक पर्यंतच शिकत. तसेच उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यामध्येही मुलींची संख्या कमी होती, कारण बऱ्याच मुलींना त्यांचे पालक १३ व्या वर्षांनंतर शाळेत जायला मनाई करीत, त्याऐवजी पालक त्यांना ''सर रतन टाटा इंडस्ट्रियल होम फॉर पारशी फिमेल्स'' मध्ये स्वयंपाक करणे, भाज्या चिरणे, शिवणकाम करणे, नक्षीकाम, लॉंड्री इ. सारख्या कला शिकण्यास पाठवित. असे असले तरीही पारशी स्त्रियांनी चरितार्थासाठी घराबाहेर जाऊ नये असाही आग्रह असे. परंतु, पुढील काळात उच्च शिक्षणामुळे स्त्रिया प्रशासकीय क्षेत्र, पत्रकारिता, फोटोग्राफी इ. क्षेत्रात आपले योगदान देऊ लागले. आज पारशी स्त्रियांनी आपली शैक्षणिक कारकीर्द समृद्ध बनविली.[१२]

पारशी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुंबईतील काही महत्त्वाच्या संस्थांनी महत्त्वाची कामगिरी करून विविध योजना राबविल्या. त्या म्हणजे मुंबईतील एकूण २० शैक्षणिक धर्मादाय संस्थांपैकी काही संस्था अशा होत्या ज्या प्रति माणशी एक रुपया किंवा दोन रुपये एवढीच फी आकारत असत. परंतु यातही काही अशा संस्था होत्या, ज्यांनी एकही पैसा आकारला नाही. या संस्था मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी स्थित आहेत त्या पुढीलप्रमाणे –

१) सर जमशेदजी जीजीभॉय पारशी बेनेलोव्हेन्ट

२) द बेंगाली स्कूल फॉर गर्ल्स (फोर्ट)

३) द सेठ एफ. एन. पटेल स्कूल (खेतवाडी)

४) द सर कावासजी जे. रेडीमनी स्कूल (खेतवाडी)

५) द सेठ जीजीभॉय दादाभॉय स्कूल (ग्रँट रोड)

६) द यंग लेडीज ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (ग्रँट रोड)

७) द एम. एम सेठ गर्ल्स स्कूल (ग्रँट रोड)

८) द बेहरामजी जीजीभॉय चॅरिटेबल इन्स्टिट्यूट (चर्नी रोड)

९) सेठ एम. एम. कामा स्कूल फॉर गर्ल्स (चिकाकवाडी)

१०) द पारशी मॉंटेसरी स्कूल (चिकलवाडी)

११) बाई रतनबाई पान्डी स्कूल फॉर गर्ल्स (ताडदेव)

१२) बाई हिराबाई टाटाज क्लासेस (गांवदेवी)

१३) द सेठ रुस्तमजी जीजीभॉय स्कूल फॉर बॉईज (धोबीतलाव)

१४) सर जमशेटजी जीजीभॉय स्कूल फॉर गर्ल्स (धोबीतलाव)

१५) द गमाडिआ स्कूल फॉर गर्ल्स (फोर्ट)

१६) द जमशेदजी जीजीभॉय स्कूल फॉर गर्ल्स (परेल)

१७) द सेठ नुसेरवानजी वाडिया स्कूल (दादर)

१८) बाई नवाजबाई मुल्ला स्कूल (दादर)

१९) द सर जमशेदजी नुसरवानजी पेटीट ऑर्फनेज फॉर बॉईज (परेल)

२०) बाई आवाबाई एफ. पेटीट ऑर्फिनेज फॉर गर्ल्स (बांद्रा)[१३]

वरील धर्मादायी संस्थांमधून जे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून दिले आहे, त्याचा पारशी समाजातील कोणीही अर्जदार लाभ घेऊ शकतात.

''शिक्षणाला एक निश्चित उद्दिष्ट किंवा दिशा असून समाजाची प्रगती साधताना सुसंगती साधणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते. ज्यांच्या क्षमता सर्वसामान्य आहेत त्यांना व्यावसायिक किंवा औद्योगिक शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहन देणे, ज्यामुळे त्या शिक्षणाचा उपयोग त्यांच्या चरितार्थासाठी होऊ शकेल'' असे पारशांचे विचार आहेत.

घ) विवाह पद्धती

पारशी धर्मात विवाहाला अतिशय मानाचे स्थान असून, विवाह या धर्मात पवित्र संस्कार मानला जातो. पारशी व्यक्तींच्या आयुष्यात विवाहाचा दिवस ही एक अतिशय महत्त्वपूर्ण घटना मानली जाते आणि विवाह करणे हे जरुरी कर्तव्य मानण्यात येते. पारशी लोकांना असा विश्वास आहे की, ईश्वराने झरतुष्ट्राला संदेश दिला की, ''विवाह हा फक्त एक नीतिमान कायदा नसून ती एक बांधीलकी सुद्धा आहे. अविवाहित पुरुषांपेक्षा विवाहित पुरुषांकडे जास्त सन्माननीय नजरेतून बघण्यात येते. तसेच एखाद्या स्त्रीनेही मुद्दाम अविवाहित राहणे हे तिने केलेले सर्वात

भयानक कृत्य मानले जाते. कारण जर तिने कायमचे अविवाहित राहणे पसंत केले तर तिला तिच्या सत्कृत्यांची चांगली फळं मिळणार नाहीत असे या धर्मात मानण्यात आले आहे.

पूर्वी या समाजात बालपणीच विवाह केले जात. यावरून असे दिसते की, पारशी समाजात बालविवाह प्रथा अस्तित्वात होती. परंतु या समाजात शिक्षणाचे महत्त्व वाढल्यामुळे ही प्रथा बंद होऊन त्यांचे विवाहाचे वय वाढले. पारशांची शैक्षणिक प्रगती एवढी उंचावली की, हळूहळू त्यांचे विवाहाचे वय तिशी किंवा पस्तीशीच्या पुढे वाढले व याचा परिणाम त्यांच्या जननदरावर झाला. पारशांच्या विवाहाच्या पद्धती अतिशय उल्लेखनीय आहेत. त्यांचे विवाह समाजातच होणे आवश्यक असते, समाजबाह्य विवाह यांना मान्य नाही. विवाह करतेवेळी कुटुंबातूनच वर–वधूची निवड करण्यात येते. कौटुंबिक विवाह म्हणजे (सख्खा भाऊ सोडून) हे अधिक प्रशस्त मानतात.[१४] वर–वधूची एकमेकांबद्दल पसंती झाल्यानंतर प्रत्यक्षात विवाह समारंभाला सुरूवात होते, ती पुढीलप्रमाणे –

- **विवाहापूर्वीच्या विधी –**

१) **साखरपुडा** : साखरपुड्याच्या कार्यक्रमाची सुरुवात वराच्या कुटुंबातून एक लाल रंगाची साडी म्हणजे (Adravadu) दागिने व इतर वस्तू वधूला देऊन केली जाते. वधूसुद्धा तिच्या कुटुंबाबरोबर वराच्या घरी कपडे, इतर भेट घेऊन जाते. वराच्या घरी वर–वधूना एका रांगोळी काढलेल्या लाकडी फळीवर उभे केले जाते. यावेळी वधूची आई वराच्या कपाळावर टिळा लावते व माळा, हार त्याच्या गळ्यात घालून हातात एक नारळ देते. त्यानंतर नियोजित वर–वधू एकमेकांच्या अंगठ्यांची (Ring) अदलाबदल करतात.

२) **मंडव सारो (Mandav Saro)** :

विवाहाच्या चार दिवस आधी हा विधी पार पाडला जातो. त्यावेळी आंब्याच्या झाडाचे छोटे रोपटे एका कुंडीमध्ये लावून ते घरात ठेवले जाते. त्यानंतर हळद व कुंकवाचे मिश्रण तयार करून भिंतीवर एक चौकोन बनविला जातो व त्यात एक बेरजेचे म्हणजे (Cross) चिन्ह काढले जाते. त्यानंतर एका ताटात नारळ, दही, साखर, आक्रोड, खारीक व एका छोट्या कागदाच्या पुडीत लाल, हिरवे मोती, नाणी इ. सर्व ठेवून ते ताट सजविले जाते. नंतर ही सर्व सामग्री व दूध, पाणी आणि १ रु.५० पैशाचे नाणे या सर्व वस्तू जेथे कुंडीत आंब्याचे रोपटे लावले होते ते

तेथून काढून त्या जागेवर ठेवतात व एक नारळ घेऊन तो त्या कुंडीभोवती सात वेळा गोल फिरविला जातो आणि जमिनीवर किंवा भिंतीवर फोडला जातो. त्या वेळी तेथे उपस्थित असलेले दोन्ही कुटुंबातील लोक विवाह निर्विघ्न व शांतपणे पार पाडला जावा अशी कामना करतात.

३) नाहा (Naha) :

विवाहाच्या संध्याकाळी वर–वधू धार्मिक स्नान म्हणजे (नाहा) करतात. त्या वेळी ते एका अग्निमंदिरातील विहिरीतून पवित्र पाणी घेऊन त्याने स्नान करतात. 'निरांग' म्हणजे बैलाचे मूत्र, डाळिंबाचे पान हे थोडे चावून थुंकण्यात येते. यावेळी दस्तूर नहाणीघराच्या बाहेर उभा राहून त्यांना मार्गदर्शन करतो. निरांग हे शरीराला शुद्ध करण्यासाठी असते. तसेच डाळिंबाचे पान हे ज्ञानाचे प्रतीक असते. ह्या सर्व विधी झाल्यावर वर–वधू लग्नाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी सज्ज होतात.

४) विवाहातील पोषाख :

पारशी वर हा एक पारंपरिक पांढरा ओव्हरकोट म्हणजे 'डुगली', पांढऱ्या रंगाची सुती पँट व डोक्यावर पगडी किंवा फेटा जो खास ह्या विवाह सोहळ्यासाठी तयार करण्यात आलेला असतो ते परिधान करतो. त्याचप्रमाणे पारशी वधूही सोने किंवा चांदीचे नक्षीकाम केलेली पांढऱ्या रंगाची साडी नेसते व ती स्वतःचे अर्धे डोके झाकून घेते. पांढरा रंग हा झोराष्ट्रिनिझममध्ये शुद्धतेचे प्रतीक मानले जाते. यावेळी वधूचे सर्व दागिने वराकडून आलेले असतात.

पारशी स्त्रिया विवाह समारंभात साडी परिधान करतात. ही साडी गुजराथी शैलीची परंतु, त्यात जर साडीचा पदर थोडा लांब काढला तर त्याला 'पारशी शैली' असे म्हणतात. त्याचप्रमाणे अतिशय कौशल्यपणे विणकाम केलेली रेशमी साडी म्हणजे 'गारा' जी चिनी ट्रेडच्या काळापासून प्रसिद्ध असून, ती पारशी महिलांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे.

५) अचू–मिचू रिवाज (Achu-Michu) :

हा रिवाज वर–वधूच्या शारीरिक व आत्मिक शुद्धीकरणासाठी केला जातो. त्या विधीमध्ये दोन्ही कुटुंबातील स्त्रिया दोन चांदीचे ताट घेतात. यातील पहिल्या ताटाला अचू–मिचू असे म्हणतात. पहिल्या ताटात म्हणजे अचू–मिचूमध्ये पुढीलप्रकारे वस्तू ठेवल्या जातात.

- अंडी : हे प्रजोत्पादनाचे प्रतीक होय.
- नारळ : हे आत्मिक व शारीरिक शुद्धतेचे प्रतिक होय.
- विड्याचे पान व सुपारी : हे शक्ती व सामर्थ्यांचे प्रतीक होय.
- बदाम : हे सद्‌गुण व प्रामाणिकपणाचे प्रतीक मानले जाते.
- सुके खजूर : हे लवचिकतेचे प्रतीक होय.
- साखरेचे बिस्किट : हे गोडव्याचे प्रतीक आहे.
- तांदूळ : हे भरभराटीचे प्रतीक होय.
- गुलाबाच्या पाकळ्या : हे आनंदाचे प्रतीक होय.
- पाण्याचा ग्लास : हे शुद्धता, पावित्र्यतेचे प्रतीक होय.

तसेच चांदीच्या दुसऱ्या ताटात पुढीलप्रमाणे वस्तू असतात –

- चांदीचा सुळका (Cone) : हे एका अशा गोडव्याचे प्रतीक आहे ज्यातून चांगल्या आत्मा बाहेर निघतात.
- नारळ : हे आत्मिक व शारीरिक शुद्धतेचे प्रतीक होय.
- तांदळाचे वा गव्हाचे दाणे : हे भरभराटीचे प्रतीक होय.
- लाल कुंकू : पवित्रतेचे प्रतीक होय.
- साखर : हे गोडव्याचे प्रतीक होय.
- हिरवी पाने : पौष्टीकतेचे प्रतीक होय.
- डाळिंब : हे चांगल्या वर्तणुकीचे प्रतीक होय.
- पिस्ता : हे खंबीरपणाचे प्रतीक होय.
- चांदी व सोन्याचे नाणे : हे समृद्धीचे प्रतीक होय.
- फुलांचे हार : हे आनंदाचे, हर्ष उल्हासाचे प्रतीक होय.

त्यानंतर वधूची आई कार्यक्रमाची सुरुवात करते. वधूची आई अचू–मिचू ताटातील अंडी उजव्या हातात घेऊन वराच्या डोक्यावर घड्याळाच्या दिशेने सात वेळा फिरविते. (ही एक नजर उतरविण्याची क्रिया असून त्यासाठी अंडे हे शुभ मानले जाते.) आणि वराच्या उजव्या पायाजवळ ठेवलेल्या दगडावर फोडते. यानंतर वराची आई तिच्या उजव्या हातात एक विड्याचे पान, सुपारी, वाळलेला खजूर, बदाम, साखर घेते व वराच्या डोक्यावर घड्याळ्याच्या दिशेने सात वेळा पुन्हा फिरविते. (हा सुद्धा नजर उतरविण्याचा प्रकार) नंतर एक नारळसुद्धा वराच्या डोक्यावर फिरविला जातो व त्याच्या उजव्या पायाजवळ ठेवलेल्या दगडावर फोडला जातो. त्यानंतर थोडे तांदूळ व गुलाबाच्या पाकळ्यांवर ताटातच पाणी शिंपडले जाते व ते ताटही वराच्या डोक्यावर फिरविले जाते. ह्या मिश्रणाला वराच्या दोन्ही पायाजवळ टाकले जाते, नंतर मूठभर तांदूळ घेऊन त्याचा नवऱ्या मुलावर वर्षाव केला जातो. हे आशिर्वादाचे प्रतीक आहे. पुन्हा वराला पुष्पहार अर्पण करून, त्याच्या हातात एक नारळ देऊन, कुंकवाचा उभा टिळा वराच्या कपाळावर लावतात, त्यानंतर वर सर्वप्रथम आपला उजवा पाय पुढे करून स्टेजवर (मंचावर) चढतो आणि आपल्या वधूची प्रतिक्षा करतो. वधूसुद्धा हेच रीतिरिवाज पार पाडते. जे आधी वराने पाळले आहे. अशाप्रकारे सर्व प्राथमिक व धार्मिक विधी पार पाडल्यानंतर वधू स्टेजवर येऊन वराच्या विरुद्ध दिशेने बसते.

- **प्रत्यक्ष विवाह सोहळा –**

वर–वधू स्टेजवर एकमेकांच्या विरुद्ध बसल्यावर त्यांच्यामध्ये एक पांढरा कपडा पकडण्यात येतो, ज्यामुळे ते एकमेकांना बघू शकत नाहीत. नंतर वधूच्या कुटुंबातील सदस्य दोन पांढऱ्या रंगांचे धागे घेऊन त्यांना एकात – एक गुंफून त्याचे एक बंडल बनवितात. हा बंडल ते Priest म्हणजे याजकाच्या हातात देतात. याजक वर–वधूचा उजवा हात कापडाखाली पकडून त्या धाग्याने सात वेळा हाताला गुंडाळतो व बांधतो, कुटुंबातील काही विवाहित सदस्य हे धागे धरतात आणि उजव्या बाजूने सात वेळा फिरवितात, कुटुंबातील सदस्यांकडून फिरविण्याची क्रिया सुरू असताना स्टेजवर (मंचावर) याजक मंत्रोच्चार व प्रार्थना करतो. यानंतर वधू–वरांवर तांदूळ टाकले जातात व दोघांमधील पांढरा कपडा काढला जातो. या विधीनंतर वर–वधू पूर्वेकडे तोंड करून बसतात आणि याजक त्यांना तीन वेळा पर्शियन भाषेत विचारतो, ''की तुमची ह्या पुरुष किंवा स्त्री बरोबर विवाह करण्याची इच्छा आहे का?'' यावर

वर–वधू उत्तर देतात ''पसान्डे कारडम'' म्हणजे होकार देतात. यानंतर (Priest) म्हणजे याजक आशीर्वाद देतो व वर–वधू अंगठ्यांची अदलाबदल करतात. याजकाने त्यांना जोडपी घोषित केल्यानंतर ते एकमेकांचे चुंबन घेतात.

विवाहानंतरचे समारंभ –

वरीलप्रमाणे विधीपूर्वक विवाहसोहळा पार पाडल्यानंतर या विवाहाला कायदेशीर करण्यात येते. यासाठी विवाह निबंधक म्हणजे (Registrar of Marriage) कार्यालयातून एका प्रतिनिधीला विवाहासाठी अतिथी म्हणून आमंत्रित केले जाते. हे वधू–वर विवाह नोंदणी कागदपत्रांवर सही करतात व त्यावर कार्यालयातील अतिथी म्हणून आलेला प्रतिनिधी स्टँप म्हणजे अधिकृत चिन्हाचा ठप्पा मारतो. या विधीनंतर हे नवविवाहित जोडपे अग्नीमंदिरात प्रार्थनेसाठी व देवाच्या आशीर्वादासाठी जातात. तेथून लगेचच विवाहाच्या मेजवानीसाठी प्रस्थान करतात.

पारशांना विवाहाच्या मेजवानीबाबत अत्यंत उत्सुकता असते. विवाहात मेजवानीत कोणकोणते पदार्थ असावेत हा निर्णय संपूर्ण कुटुंब मिळून घेतो. विवाहातील मेजवानीचा मुख्य पदार्थ म्हणजे ''सास नी–मच्छी'' म्हणजे रस्यात तयार केलेले मांस. सर्वात महत्त्वाचा व आवडीचा पदार्थ म्हणजे ''पातरा–नी–मच्छी'' म्हणजे केळीच्या पानात वाफविलेली मच्छी होय. पारशी विवाहात मच्छी आणि अंड्यांच्या पदार्थांचा भरपूर वापर केला जातो. ह्या मेजवानीचा आस्वाद पारशी उंची मद्यासोबत घेतात. उंची मद्य पिऊन समारंभ साजरा करणे हे पारशीपणाचे प्रतीक मानले जाते.

मेजवानीचा आस्वाद घेतल्यानंतर वर व वधू घरांसाठी स्वतंत्रपणे पेटलेले चांदीचे दिवे हातात घेऊन निघतात. सर्वप्रथम वर घरी पोहोचतो अणि त्याच्या हातातील पेटलेला चांदीचा दीवा काळजीपूर्वक शयनकक्षेतील एका जागेवर ठेवतो. यावेळी वधू तिच्या काकू किंवा इतर महिला नातेवाइकांसोबत घरी येते आणि ती देखील तिचा पेटलेला दिवा काळजीपूर्वक शयनकक्षामध्ये तिच्या पतीच्या दिव्याच्या बाजूला ठेवते. याप्रमाणे अतिशय विधीपूर्वक व कायदेशीररीत्या हा विवाहसोहळा संपन्न होतो.[१५]

बाकी सर्व समाजाप्रमाणे पारशांच्या विवाहातही भरपूर हर्षोल्हासाचे, मौजमजेचे व आनंदाचे वातावरण असते. पूर्वी विवाहसोहळ्यात आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू बँडपथक होते. यात प्रामुख्याने 'प्लम्प किंवा जॉलिगुंडी' सिरवाई आणि त्यांचा ऑर्केस्ट्रा त्याचप्रमाणे 'मेरी नेली आणि तिचा बँड' यांचा कार्यक्रम असे, व मुलांकरिता सर्वात आनंदाच्या दोन जागा होत्या, एक म्हणजे बॅन्ड पथकाच्या आस्वाद घेण्यासाठी सर्वात पुढे बसण्यासाठी त्यांची लगबग आणि दुसरे म्हणजे गेटजवळील फुगेवाल्याकडून फुगे घेण्यासाठी त्यांच्या पालकांकडे हट्ट करणे. परंतु आज त्यांच्या बँडची जागा भांगडा रॅप व पॉप गाण्यांनी घेतली आहे, तरीही मुलांचे त्यावेळचे फुग्याचे प्रेम आजही कायम आहे.[१६] म्हणून पारशी विवाहसोहळा हा त्यांचे धार्मिक विधी, खाण्यापिण्याबाबतची त्यांची आवड व उत्सव साजरा करण्याची इच्छा असूनही ते आपले संस्कार व संस्कृती न विसरता साजरे करतात.

च) पारशी समाजातील सण–उत्सव

पारशांचे सण–उत्सव मनोरंजक असतात. ते सर्व झोराष्ट्रियन कालगणनेनुसार येतात. या कालगणनेनुसार पारशांचे तीन प्रमुख प्रकार पडतात. ते म्हणजे शहेनशाही, कदामी व फसली हे होय. त्यांची पूर्वीची जी कालगणना होती ती जुन्या अवेस्तातील पुराव्याप्रमाणे ऋतूंशी संबंधित होती. परंतु पुढे नवीन अवेस्ता आणि ससानियन काळात अशी प्रथा होती की, प्रत्येक एकशेवीस वर्षांनंतर एक महिना त्यात समाविष्ट करण्यात यावा. परंतु या प्रथेचे तिघांपैकी कोणीही पालन करीत नाही. कारण या कालगणनेतील शहेनशाही आणि कदामी कालगणना ही लिपवर्षाप्रमाणे नाही. त्यामुळे ग्रेगोरियन कालगणनेनुसार हे दिवस वेळेच्या पुढे जातात. परंतु फसली हे ग्रेगोरियन कालगणनेनुसार चालते म्हणून ते ऋतुंशी एकनिष्ठ असते.[१७]

१) ऋतूमानाप्रमाणे येणारे सण :

पारशांचे संपूर्ण वर्षभरात बारा प्रमुख सण असतात. त्यांतील सहा सण हे ऋतुंनुसार साजरे केले जातात आणि पुढील सहा सण हे 'अहुरा मझदा'च्या निर्मितीनुसार साजरे करतात. यात ऋतूनुसार येणारे जे सण आहेत. त्यांना 'गहमर्बास' असे म्हणतात आणि बाकी सहा सणांना 'अमेशास्पेन्टास' म्हणतात.

२) नव दिवस मेजवानी :

पारशी कालगणनेनुसार पंधरा दिवस मेजवान्या असतात. या पंधरा दिवसातील अकरा दिवस हे यझदाला समर्पित असतात आणि बाकी चार दिवस 'अहुर, मझदाला'. यावेळी एक खास 'यस्न' किंवा 'जश्नं' यझदाला सम्मानित करण्यासाठी आयोजित केला जातो.

३) इतर पवित्र दिवस :

नवरोज म्हणजे नवीन वर्षाचा दिवस. फसली किंवा बस्तानी विभागाच्या झोराष्ट्रियन कालगणनेनुसार प्रत्येक वर्षी वसंत ऋतूत हा सण साजरा केला जातो. त्याचप्रमाणे शहेनशाही व कदामी कालगणना मानणारे पारशी हे लिपवर्ष मानत नाहीत. त्यांच्या कालगणनेनुसार नवरोज हा सण साजरा करण्यात जवळजवळ दोनशे दिवसांचे अंतर येते, तसेच शहेनशाही व कदामी कालगणनाही फक्त भारतातच पाळली जाते. यामुळे त्यांचे नवीन वर्ष दोनशे दिवसानंतर येते व त्याला ते 'जमशेदी नवरोज' असे म्हणतात. हे नवीन वर्ष जुलै किंवा ऑगस्ट मध्ये 'पतेती' या सणापासून सुरू होते.[१८]

४) पारशांचे काही महत्त्वाचे सण :

- मेडयेझोरेम – मध्य वसंत ऋतूतील मेजवानी
- मेडयोशाहेम – मध्य उन्हाळ्यातील मेजवानी
- पतिशाहेम – धान्य कापून घरी आणल्यावर मेजवानी
- मेडयरेम – वर्षाचे मध्यान्ह म्हणजे थंडीच्या ऋतूतील मेजवानी
- हमस्पथमेदयन – सर्व आत्म्यांना समर्पित करण्यासाठी मेजवानी
- नवरोज – नवीन वर्ष
- जश्ने – तिरागन
- जश्ने – सादे [१९]

याप्रमाणे पारशांचे सण–उत्सव संपूर्ण वर्षभर नैसर्गिक, आत्मिक व कालगणनेतील विविध पद्धतीनुसार चालू असतात.

छ) मर्तिकप्रथा

पारशी समाज आजही त्यांचे अंत्यविधी 'अवेस्ता' ह्या त्यांच्या धर्मग्रंथात सांगितल्यानुसार वेंदिदाद (Vendidad) मधील प्रकरणे वाचून करतात. काही शतके उलटल्यानंतरही सध्याच्या अंतविधीच्या पद्धती ह्या आजही त्यांच्या धार्मिक ग्रंथांना अनुसरून आहेत. या धार्मिक विधींमध्ये कुठल्याही स्वरूपांची भेसळ होऊ नये यासाठी घेण्यात आलेली प्रतिबंध काळजी, मृतात्म्यांच्या उपस्थितीत करण्यात येणारे समारंभ, तसेच दफनविधीतील वेगळेपणा हा ज्यांनी पर्शियातून [२०] व भारतातून[२१] प्रवास केलेला आहे अशांना प्रभावित करतो. ब्रदर जॉडॅनस म्हणतो की, ''या देशात असे निसर्गपुजक लोक आहेत जे त्यांच्या मृतांना दफन करीत नाहीत, तर त्यांच्या मृत शरीरांना गिधाडांसारख्या पक्षांनी खावे म्हणून त्यांना उंच टेकड्यांवर उघड्यावर ठेवतात. याबाबत फादर ओडोरिक ऑफ पोर्डेनॉन ठाण्याच्या पारशी रहिवाशांबाबत नोंद करताना म्हणतात की, ''इथे मृत शरीरांना पुरण्याची पद्धत नसून त्यांना उच्च दर्जाच्या तापमानात उघड्यावर टाकून देण्याची पद्धत आहे.''

'एडवर्ड टेरी' या अठराव्या शतकातील प्रवाशानेसुद्धा प्रेतांना उघड्यावर टाकण्याच्या या पद्धतीचा उल्लेख केलेला आहे, तो म्हणतो की, ''यहुदी नसलेल्या काही लोकांमध्ये असे काही लोक आहेत जी प्रेतांना पुरतही नाहीत व जाळतही नाही आणि अशांना पारशी म्हटले जाते.''

पारशी त्यांच्या राहत्या ठिकाणांपासून आणि रहदारीच्या मुख्य रस्त्यांपासून दूर एखाद्या मैदानाभोवती उंच दगडी कुंपण घालून तेथे त्यांच्या मृत नातेवाइकांच्या प्रेतांना चादरींमध्ये गुंडाळून मांसभक्ष्यी पक्ष्यांच्या म्हणजे गिधाडांच्या पोटात जाण्याकरीता ठेवतात. त्याचप्रमाणे लॉर्ड मान्डेलस्लो पारशांच्या ह्या अंत्यविधींच्याबाबत असे म्हणतो की, 'अंत्यविधी समारंभाचे दोन भाग आहेत. त्यापैकी पहिल्या भागात – मृतात्म्यांच्या पार्थिव अवशेषांची विल्हेवाट लावण्यात येते, तर दुसऱ्या भागात त्यांच्या आत्म्यांना सद्‌गती मिळण्यासाठी प्रार्थना करण्यात येते.[२२] एखाद्या पारशी व्यक्तीचा जेव्हा मृत्यू होतो, तेव्हा एक साधा पण विस्तृत अंत्यविधी समारंभ करण्यात येतो. तसेच जेव्हा एखादी पारशी स्त्री किंवा पुरुष मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजत असते तेव्हा त्याच्या डोक्याजवळ पश्चातापाच्या प्रार्थनेचे म्हणजे (Prayer of

repentence) चे पठण कले जाते व मृताच्या तोंडात हाओमा म्हणजे जल घातले जाते, आणि कुत्र्याला मृत शरीराचे दर्शन करविण्यात येते. नंतर शववाहक मृत शरीर हे 'टॉवर ऑफ सायलेन्सकडे' घेऊन जातात त्याला 'दोखमा'' असे म्हणतात. हे मृत शरीर ज्या लोखंडी तिरडीवर ठेवतात त्याला 'गेहान' असे म्हणतात. अंत्यविधीमधील बराचसा भाग हा माणूस, पृथ्वी, अग्नी आणि जल यांना दूषित होण्यापासून वाचविण्याकरिता करण्यात येणाऱ्या विधींचा बनलेला आहे. पारशी समाजात जे काही मृत आहे ते सर्व अपवित्र मानण्यात आले असून त्याला पृथ्वी, अग्नी, जल शुद्ध करू शकत नसल्यामुळे ह्या मृत शरीराला 'टॉवर ऑफ सायलेन्समध्ये' गिधाडांसमोर खाण्याकरिता ठेवण्यात येते.[२३]

ज्या कुटुंबात मृत्यू झाला आहे त्या घरात अन्न शिजविणे निषिद्ध मानले जाते. यावेळी मृतांचे नातेवाईक आणि मित्र शोक सागरात बुडालेल्या मृतांच्या कुटुंबासाठी जेवण तयार करून त्यांच्या घरी पाठवितात. यावेळी मृताचे नातेवाईक तीन दिवस भाज्या व मासे खाण्यावर संयम ठेवतात. तसेच मृताचे जवळचे मित्रही असाच संयम पाळतात.

पारशी समाजात आणखी एक प्रथा आहे ती म्हणजे धर्मगुरु किंवा त्याच्या अनुपस्थितीत जमातीचा प्रमुख हा याविधीकरीता जमा झालेल्या समुदायासमोर प्रस्ताव मांडतो की त्यांच्या अन्नदात्यांच्या स्मरणार्थ पुढील सर्व सार्वजनिक समारंभामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात यावा व याला सर्वजण मूक संमती देतात.

उदाहरणार्थ सर जमशेदजी जिजीभॉय यांच्या नावाची पारशी समाजांचा अन्नदाता म्हणून भारताच्या सर्व अग्यारींमधून आठवण काढली जाते. ही प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. ज्यांचा मृत्यू यश्नचा (त्यांचा एक सण) मसुदा तयार करण्यापूर्वीच झाला असेल त्यांचे या समाजाच्या समारंभामध्ये असे नाव घेतले यांरखा मोठा संमान नाही.

ज) पोषाख

भारतातल्या पारशांच्या आगमानावेळी त्यांचे स्वागत करणाऱ्या जादी राणा म्हणजेच जाधव राणा या संजान येथील राजाला खुश करण्यासाठी पारशी समाजातील लोकांनी त्यांच्या राष्ट्रीय पोषाखात काही बदल केले. त्यानुसार गुजराथी लोकांच्या पोषाखात आणि पारशी

पुरुषांच्या अंगरख्यात, त्यांच्या पगडीत तसेच स्त्रियांच्या साडीतील साम्य आपल्या लक्षात येते.[२४]

याबाबत आपले मत मांडताना १८ व्या शतकातील ॲनक्वेटील डुपेरॉन असे म्हणतात की, सुद्रेह आणि कश्ती हा पारशी समाजाचा वैशिष्ट्यपूर्ण पोषाख आहे.

सन १८५२ मध्ये ब्रिग्ज नावाच्या पारशी प्रवाशाने त्याकाळात जो पोषाख परिधान करत असत त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे.:– पारशांचा पोषाख हा त्यांच्यासाठी एक वैशिष्ट्यपूर्ण पोषाख आहे, त्यांच्या शरीराभोवती गुंडाळलेला पवित्र दोरा व सदरा हा धार्मिक विचारांचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा अंगरखा हा गुडघ्यापर्यंत आलेला एक सुती लांब झगा असतो व गळ्याजवळ तो 'बो' ने आणि कमरेजवळ कमरपट्ट्याने बांधलेला असतो. परंतु या अंगरख्याचे हात मात्र नैसर्गिक लांबीपेक्षा दुप्पट असतात. तसेच त्यांचा पायजमा हा सैल चुन्यांचा असून, एका मोकळ्या छिद्रातून एक नाडी कमरेभोवती गोवलेली असते जिचा आधार पायजम्याला असतो. हा पायजमा, रेशमी कपड्यापासून बनविलेला असते. परंतु हे खास श्रीमंत वर्गासाठी ज्यांना रेशीम वापरणे परवडते त्यांच्यासाठीच असते. त्याचप्रमाणे गडद चॉकलेटी किंवा मरून रंगाची पगडी जिच्यावर वेलबुट्टीचे नक्षीकाम किंवा अधिक कोरिवकाम केलेली नक्षी असते, ही एक पोकळ, गोलाकार पगडी असून तिला ''गाभा'' असे म्हणतात. बाहेरगावी जाताना किंवा घरातल्या घरातही वापरता येते. फक्त जेवताना ती वापरली जात नाही, तर जेवताना डोक्यालगत बसणारी आतली गोलाकार टोपी घातली जाते. त्याचप्रमाणे वरिष्ठ व्यक्तींच्या किंवा एखाद्या मित्रांच्या उपस्थितीत डोक्यावर टोपी न घालता समोर येणे हे अशिष्टाचाराचे वर्तन मानले जाते. परंतु आज ही शिष्टाचाराची प्रथा नष्ट होत चालली आहे. तसेच पारशी मुले वयाच्या सोळाव्या वर्षांपर्यंत त्यांच्या एका किंवा दोन्ही कानात रिंग घालतात, पण आज मात्र ही प्रथा कालबाह्य झाली आहे.

पारशी समाजातील मुलगा आजही सात वर्षांचा होईपर्यंत म्हणजे जोपर्यंत तो सुद्रेह आणि कुश्ती घालण्याच्या योग्यतेचा होत नाही तोपर्यंत एक सुती फ्लॉनेल (Flanel) किंवा रेशमापासून बनविलला लांब अंगरखा घालतो. त्याला झबला म्हणतात. या झबल्यामुळे त्याचे मानेपासून ते पायाच्या गुडघ्यापर्यंत संपूर्ण अंग झाकले जाते. त्याचप्रमाणे श्रीमंत वर्गामध्ये चुन्या

असलेले झबले, डोक्यावर छोटी टोपी व पायात हलके बूट घातले जातात. पारशी समाजात लहान मुले व मुलींना बहुतेक करून सारखेच कपडे घालण्यात येतात.[२५]

पारशांच्या नवजोत समारंभानंतर चांगल्या प्रकारच्या मलमलीपासून तयार करण्यात आलेला लांब अंगरखा वापरायला सुरुवात केली जाते. त्याला सुद्रेह असे म्हणतात व त्यावर कुश्ती नावाचा पवित्र कमरपट्टा बांधतात. सुद्रेह हा अर्ध्या बाह्यांचा सफेद सदरा असतो, त्याच्या खाली पूर्वी रुंद सिल्कची विजार घातली जात असे. पुरुष बाहेर जाताना बहुदा अंगरखा घालत. अंगरखा म्हणजे त्याच्यावर कंबरपट्टा नसलेले एक लांब वस्त्र, ह्याच्या बाह्या लांब व मनगटाजवळ थोड्या फुगीर असत. ही बाहेर जायच्या वेळी घालण्याच्या ड्रेसची जुनी पद्धत होती. परंतु आजही लहान गावातून आणि शहरातूनही पद्धत प्रचलित आहे.

मुंबईतील पुरुष आज इंग्लिश पद्धतीचा कोट किंवा ओव्हर कोट घालतात. तसेच डोक्यावर घट्ट बसणाऱ्या टोपीवर डार्क चॉकलेटी पगडी बांधतात. लांब पांढऱ्या रंगाचा सुती कोट हे त्यांचे पूर्ण वस्त्र आहे. (हा जुन्या काळातल्या क्रिनोलाइनची (crinoline) आठवण करून देतो. त्याला 'जामा' असे म्हणतात. तसेच कंबरेभोवती मोठा पांढरा मलमलचा पट्टा त्यावर गुंडाळलेला असतो. त्याला 'पिछोरी' असे म्हणतात. हा पोषाख लग्न समारंभावेळी आणि अंत्यविधीवेळी परिधान कला जातो.

पारशांच्या पंथापैकी शहेनशाही पंथाचे लोक 'जामा' घालतात व कदामी पंथाचे लोक 'काबा' वापरतात. त्यावर एक रेशमी जाकेट घातले जाते. त्याला 'साहाया' (Sahaya) असे म्हणतात. आज एखाद्या महत्त्वाच्या समारंभावेळी बरेचशे पारशी मंडळी डोक्यावर पारशी पद्धतीची टोपी व बाकी संपूर्ण कपडे हे युरोपियन पद्धतीचे घालतात. काळानुरूप यांच्या टोप्यांच्या पद्धतीही बदलल्या. जसे – पूर्वी हे पगडी घालत किंवा आधुनिक पद्धतीचा फेटा बांधत. कारण पगडी ही गैरसोयीची होती, त्यामुळे ते फेटा बांधत असे म्हणता येईल, तसेच ते जेव्हा प्रवासात असत तेव्हा फेटाही बाजूला ठेवून युरोपियन पद्धतीची हॅट वापरत.[२६] धार्मिक परंपरा पाळणारे धर्मगुरु हे नेहमीच पांढरे वस्त्र वापरत, धार्मिक कृत्य करताना चामड्याचे बूट न वापरता लाकडी खडावा वापरत. शहेनशाही व कदामी या दोन्ही पंथाच्या धर्मगुरुंचे धार्मिक समारंभाच्या वेळी परिधान करण्याचे कपडे सारखेच असतात. कदमी धर्मगुरू त्यांच्या पहिल्या

सर्वोच्च धर्मगुरूंप्रमाणे म्हणजे 'मुल्ला फेरूज' प्रमाणे एक लांब, रेशमी अंगरखा धारण करतात. तसेच शहेनशाही व कदामी धर्मगुरूंची टोपी पांढऱ्या रंगाची असे.

पारशी समाजातील स्त्रिया देखील पुरूषांप्रमाणे सुद्रेह (Sudreh) व कुश्ती घालतात. त्यांची साडी सहावारी असून शक्यतो ती रेशमी असते व त्यावर भरतकाम केलेले असते. त्यांच्या राष्ट्रीय समारंभाच्या वेळी ह्या स्त्रिया जरीच्या आणि काठाच्या साड्या वापरतात. परंतु नेसण्याची पद्धत थोडी वेगळी असते. साडी स्त्रीच्या अंगाला गुंडाळल्यावर तिची एक बाजू डोक्यावरून उजव्या खांद्यावर आकर्षक पद्धतीने घेतली जाते.[२७]

राजकीय समारंभात घालण्यात येणाऱ्या पारशी स्त्रीच्या कपड्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे – मादाम (Madame) म्हणजे लंडनमध्ये प्रकाशित होणारे फॅशनवरचे मॅगेझिन यात जून १९०३ च्या ६व्या अंकात म्हटल्याप्रमाणे – बंकिंगहॅम पॅलेसच्या राजदरबारात काही गाऊन्स म्हणजे (झगा) लेडी जहाँगीर कोवासजी जहाँगीर (Lady Jehangir Cowasiji Jehangir) यांनी पांढऱ्या रंगाची पारदर्शी भारतीय रेशमाची अतिशय कलात्मकरित्या सोन्यात भरतकाम केलेली एक सुंदर भारतीय साडी परिधान केली होती.[२८]

यातून असे दिसून येते की, पारशांकरिता पांढरा रंग अतिशय पवित्र आहे. आधुनिक पद्धतींचा अवलंब करूनही पारशांची पारंपरिकता आजही कायम आहे.

झ) भारतातील मुंबई विभागातील पारशांचे अलौकिक सामाजिक कार्य

पारशी जेव्हा इराणमधून संजान येथे आले तेव्हा स्वत: बरोबर पवित्र अग्नी घेऊन आले, जी साधीसुधी अग्नी नसून ती वेगवेगळ्या १६ रीतीने प्रज्वलित झालेली होती ती पुढीलप्रमाणे :

१) अंत्यविधीची आग

२) गुराख्यांची शेकोटी

३) सोनाराची आगटी

४) कुंभाराची भट्टी

५) आकाशातील विजेच्या कडकडाटामुळे निर्माण होणारी आग इ.

अशाप्रकारे आणखी ११ माध्यमातून १६ आगींच्या मिश्रणाने तयार झालेली आग. या अग्नीची स्थापना संजान येथे जादी राणा उर्फ जाधव राणा या राजाच्या अनुमतीने केली.

त्यानंतर या अग्निला पहिल्यांदा उदंवाडा येथे पहिले अग्निमंदिर बनवून स्थापन केले. पुढे आणखी ७ 'अतिश बेहराम' बनवून तेथेही या अग्नींची स्थापना केली.

- **भारतातील प्रमुख आतिश बेहराम (अग्निमंदिर)**

प्रत्येक पारशी व्यक्तीला 'पवित्र अग्नी' जो वेगवेगळ्या प्रकारे एकत्र करून तयार केला आहे. त्याची प्रार्थना करणे महत्वाचे आहे. पारशी जेव्हा इराणमधून संजान येथे आले, तेंव्हा स्वत:बरोबर पवित्र अग्नी घेऊन आले. ही साधी सुधी अग्नी नसून ती वेगवेगळ्या रितीने प्रज्वलित झाली. या सोळा अग्नीच्या मिश्रणाने तयार झालेल्या अग्नीची स्थापना संजान येथे जादी राणा उर्फ जाधव राणांच्या अनुमतीने केली. त्यानंतर याच अग्नीला सर्वप्रथम उंदवाडा येथे पाहिले अग्निमंदिर बनवून स्थापन केले. १७८३ मध्ये मुंबईतील पहिले आतश बेहराम हे दादाभाइ नुसेरवानजी पाडीसेठ यांनी दिलेल्या देणगीतून बांधले. आतश बेहराम मध्ये अग्नी सतत पेटता ठेवला जातो. हा प्रकाश ईश्वरी अस्तित्वाची सतत आठवण करून देतो. म्हणून पारशी अग्नीसमोर आपल्या शुद्धीकरणासाठी प्रार्थना करतात.

१) उदवाडा अथोरनन अंजुमन आतिश बेहराम : उदवाडा
२) अंजुमन आतश बेहराम : नवसारी
३) मोदी आतश बेहराम : सुरत
४) वकिल कदामी आतिश बेहराम : सुरत
५) दादीसेठ कदामी आतिश बेहराम : मुंबई
६) वाडियाजी आतिश बेहराम : मुंबई
७) बनाजी कदामी आतिश बेहराम : मुंबई
८) अंजुमन आतिश बेहराम : मुंबई

- **मुंबई येथील अग्यारी :**

प्रार्थना व धार्मिक कर्मकाडांसंबंधीत सर्व गोष्टीसाठी अग्यारींची भूमीका महत्वाची आहे. ते एक पवित्र स्थान आहे. पारशी समाजात त्याचे विषेश महत्व आहे. येथे पारशीशिवाय इतर धर्मियांना प्रवेश नाही. झोराष्ट्रियनसाठी उपासनेची जागा १७०९ मध्ये बनली.

१) पटेल – अंधेरी

२) सालसेत – अंधेरी (पूर्व)

३) एम. एफ. कामा अथोरनन इन्स्टिट्यूट, अंधेरी

४) टाटा – बान्द्रा

५) पुंथकी – बान्द्रा

६) सहेर – ब्रीच कँडी

७) सी. व्ही. बानाजी अडारीयन – चर्नी रोड

८) मेवावाला – भायखळा

९) अलबेस बाग दाडगाह – चर्नीरोड

१०) वाच्छा गांधी – चौपाटी

११) पेटीट फसली – चर्चगेट

१२) जीजीभॉय दादाभॉय – कुलाबा

१३) पनडाई (Panday) सॅनेटोरिअम दाडगाह – कुलाबा

१४) रूस्तम फारमन – दादर

१५) नारियलवाला – दादर

१६) करनी अग्यारी – कुलाबा

१७) अमरिया / सोडावॉटरवाला – धोबीतलाव

१८) इन्दावाला / ए.के. वाडिया – धोबीतलाव

१९) भिवंडीवाला – धोबीतलाव

२०) एच. बी. वाडिया – धोबीतलाव

२१) दडगा – धोबीतलाव

२२) लंगडन – फोर्ट

२३) गोदावरा – फोर्ट

२४) एम. एन. सेठ – फोर्ट

२५) पी. डी. वाच्छा – फोर्ट

२६) दादीसेठ – फोर्ट

२७) बनाजी लिमजी – फोर्ट

२८) जोकि – गोदरेज बाग

२९) सोनईजी – ग्वॉलियार टॅन्क

३०) मिठाईवाला – ग्रँट रोड

३१) असलाजी – ग्रँट रोड

३२) कामा बाग – ग्रँट रोड

३३) ॲशबर्नर – ग्रँट रोड

३४) बेहराम बाग – जोगेश्वरी

३५) रबाजी – ग्रँट रोड

३६) मालकोम बाग – जोगेश्वरी

३७) भिवंडीवाला – कल्याण

३८) वडाला – लालबाग

३९) सोनावाला – माहिम

४०) एफ. एन. पटेल – माझगाव

४१) बाटलीवाला अंजुमन – माझगाव

४२) कुप्पावाला – ताडदेव

४३) बाटलीवाला – ताडदेव

४४) बॉयशेदानापटेल – ताडदेव

४५) सेथना – ताडदेव

४६) पटेल अग्यारी – ठाणे

४७) उमरीगर – उरण

४८) सचिनवाला (दडगा) – वसई

४९) टूटी – वाळकेश्वर

- **मुंबईतील पारशांच्या संस्था** (Associations)

पारशी समाजाने आपले अनेक उद्योगधंदे व व्यापारातून संपत्ती जमवून समाजोपयोगी अनेक कार्ये केलेली आढळतात. हे कार्य करीत असतांना कोणत्याही धर्मियांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नये म्हणून ते अतिशय काळजी घेत. काही संस्थांनी प्रत्येक विद्यार्थ्यांमागे प्रती मानसी एक किंवा दोन रुपये एवढीच फी आकारली परंतू अशा संस्था आहेत कि ज्यांनी काहीही फी आकारली नाही. समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुंबईतील खालिल काही महत्वाच्या संस्थानी विविध योजना राबविल्या.

1) The Bandra Parsee Association
2) Captain Colony Welfare Association and Welfare League
3) The Cusrow Baug united sports and welfare league
4) The Dadar Matunga Parsi - Zorastian Association
5) Khareghat Colony Welfare Association
6) Khareghat Colony Youth Association (KCYA)
7) Liaison Committee
8) Malcolm Baug Zoroastrian Association
9) N. N. Wadia Welfare League
10) PAC (Parsi Amelioration Committee)
11) Parsee Engineers and Architects Lenion
12) Sir Ratan Tata Institute
13) The Parsi Girls Schools Association
14) Rustom Baug Association
15) World Zarathuashti Chamber of Commerce
16) Young Rathestars
17) Young Collegiats Zoroastrian Association
18) Youths own Union

- **Clubs / Gymkhanas**

खाण्यापिण्याचे उत्तम शौकीन असणारे पारसी आपल्या उत्तम आरोग्याबद्दलही तितकेच जागृत होते. उत्तम आरोग्यासाठी फिटनेस ही महत्त्वाचे हे गणित पारशी जाणून होते. म्हणूनच मन आणि शरीर यांच्या उत्तम समन्वयातूनच विविध जिमखाने उभारण्यात आले.

1) Sir D. M. Petit and J. N. Petit Gymnastic Institution

2) Dadar Parsee Colony Gymkhana
3) Elphinstone Cricket Club
4) The Navroze Baug Play Center
5) Sir Ness Wadia Club
6) Parsee Gymkhana
7) Ripon Club

- **Convalescent Homes / Infirmaries 'Senior Citizen Homes'**

पारशी लोकांची कुटूंबाच्या तुलनेत करियरला महत्त्व देण्याची तसेच समृद्ध जीवन जगण्याची मनीषा असल्यामुळे उत्तम शिक्षण व नोकरी व्यवसायासाठी त्यांची मुले शक्यतो परदेशी किंवा दुसऱ्या शहरात जातात. परिणामी वृद्ध आई–वडिल, नातेवाईकांच्या संगोपनासाठी शहरात ठिकठिकाणी पारसी ट्रस्ट व फंड निधी, सेवाभाई संस्थांनी, धनाढ्य पारशी लोकांनी देणग्या देऊन सिनियर सिटिझन होम्स ही संकल्पना साकार होऊन त्याद्वारे वृद्ध पारशी व्यक्तींची अगदी उत्तम व योग्य ती काळजी घेण्यात येत असे. त्यासाठी खालील सेवाभावी अनाथाश्रमांची निर्मिती करण्यात आली.

1) The Bandra Parsi Convalescent Home
2) Dr. Dossibai and J. R. D. Home for the Aged
3) F. S. Parukh Dharamshala
4) Pallonji Shapoorji Home for Senior Citizens of The B. D. Petit Parsee General Hospital
5) Bai Shirinbai Cama Convalescent Home for Poor Parsi Men and Boys

- **Dharmshalas / Sanatorium**

दानधर्म करणे ही पूर्वीपासून चालत आलेली पारशांची परंपरा होय. यात अनाथाश्रम, शाळा, महाविद्यालये, गोरगरिब व्यक्ती, वैद्यकिय इ. सारख्या विविध संस्थांना नामांकित व्यावसायिकांनी वेळोवेळी मदत केली.

1) Merwanji Framji Panday Parsi Dharamshala

- **Foundations**

पारशी समाजातील व्यक्तशिरपणा, चांगुलपणा, सत्त्य, प्रामाणिकपणा, दानशूरपणा इ. तून धार्मिक, सामाजिक, राजकिय कार्याबरोबरच वेगवेगळ्या संस्थेमार्फत देणग्या व आर्थिक मदतीतून धर्मदाय संस्थेमार्फत (Foundations) ची स्थापना केली.

1) F.K.S. Foundation
2) Frohar Foundation
3) N. K. Dhabhar Cancer Foundation
4) Sir J. J. Foundation
5) Parsi Resource Group
6) Pinaz Xerxes Master Foundation
7) Pirojsha Godrej Foundation
8) R. D. Sethna Foundation
9) World Alliance of Parsi Irani Zarthostis (WAPIZ)
10) World Zorthushti Cultural Foundation
11) Zorastrian Children's Foundation
12) Zoroastrian Trust Funds of India
13) Foundation for Development of Udvada.

- **Funds / Trusts**

पारशी समाजात दानधर्म करणे ही पूर्वीपासून चालत आलेली परंपरा होती. त्यांच्या ह्या दान धर्मात धार्मिक आणि सामाजिक संरचना, समाजाकरिता राहण्याची व्यवस्था आणि आपत्तीच्या काळात आर्थिक मदतीचा समावेश दिसून येतो. तसेच शैक्षणिक व आरोग्यसेवा विषयकही मदत दिसून येते.

1) A.S.F. Patel Charities
2) Athraran Educational Trust (AET)
3) Bai Dhunmai and Cowasji Dadabhoy Sanatorium Trust
4) Bai Motlibai Wadia Bajrojar Trust
5) Bai Motlibai Wadia Charitable Funds
6) Bai Motlibai Wadia Udwada Atashbehram Trust
7) Dasturji Jamshedji Sorabji Kookadaru Memorial Agiary Trust
8) Dinbai and Pirojsha Sarkari Charitable Trust

9) Framroze Dossabhoy Mehta Charitable Trust
10) Garib Zarthostiona Rehethan Fund
11) Late Ervad Hormusji Pestonji Anita and Mrs. Dinamai Hormusji Anita Trust
12) Jam-e-Jamshed Charity Funds
13) Sir Jamsetjee Jeejeebhoy Charity fund
14) Mancherji Joshi Memorial Education Fund
15) Mancherji e. Joshi Memorial Trust
16) The Maneckji Nowroji Sett Charities / The Maneckji Naoroji sett Polytechnic Institute / Jalbhoy Ardeshir sett Charities
17) N. M. Wadia Charities
18) N. M. Petit Charity Fund
19) Neville Chinoy Memorial Fund
20) The Parsi Dhandha Rojgar Fund
21) Sir D. M. Petit 1st Bart Charity Trust
22) Persian Zoroastrian Amelioration Fund
23) Prayer Hall Services and Maintenance Trust
24) R. D. Sethna Scholarship Fund
25) The R. H. Patuck Industrial Institute
26) WZO Trust Funds
27) WZO Trust for women and children
28) The Zoroastrian Building Fund

- **Hospitals / Dispensaries**

अर्थकारण, समाजकारण, राजकारण, शैक्षणिक प्रवाह, व्यवसायिकता इ. बरोबरच मानवता, प्रेम, बंधू–भाव, वात्सल्याच्या भावनेतून पारशी समाजाने ठिकठिकाणी इस्पितळे निर्माण केले.

1) The B. D. Petit Parsee General Hospital
2) Bombay Native Dispensary
3) Bai Jerbai Wadia Hospital for children
4) Nowrosjee Wadia Maternity Hospital
5) The Bombay Society for the Prevention of Cruelty to Animals Including The Bai Sakarbai Dinshaw Petit Hospital for Animals
6) Lady Hirabai C. Jehangir Health Unit

7) Masina Hospital

8) Parsi Ambulance Division

- **Hostels**

समाजातील शैक्षणिक व आरोग्य सेवाविषयक कारकिर्द पार पाडतना त्यांच्या असे लक्षात कि, जे मुंबई बाहेरून शिक्षणासाठी विद्यार्थी व उत्तम आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी जे लोक येतात त्यांच्या राहण्या–खाण्यापिण्याची अबाळ होत आहे. त्यासाठी त्यांनी मुंबई मध्ये खालिल हॉस्टेलची उभारणी करून त्यांना कधी मोफत तर कधी कमी दरात सेवा उपलब्ध करून दिल्या.

1) Dr. Freany Cama's Home for Young Parsi Women

2) P. D. Patel Student's Hostel

3) M. N. Sett Parsi Boy's Hostel

4) Bai Soonabai and Seth Behramji H. Sorabji Parsi Boy's Hostel

5) Bai Shirinbai Dinshaw Mody Hostel for Parsi Girls

- **Museums**

पारशी समाजाची अभ्यासूवृत्ती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मार्गाने घेतलेली उत्तुंग झेप, उद्योगशिलता, व्यवसायिकतेच्या मार्गाने केलेली प्रगती इ. सर्व वाटचाली बरोबरच त्यांच्या कडील उत्तमोत्तम वस्तुंची देखभाल व साठा, त्यावरील निस्सीम प्रेम यातूनच संग्रहालय ही संकल्पना नावारूपास आली. खालीदिलेल्या संग्रहालयाबरोबरच त्याचा फायदा विद्यार्थ्यांना, संशोधकांना, पुढील पिढीला व्हावा हा उद्देश ठेवून त्याचे संवर्धन व जतनही पारशी समाजाने केले.

1) F. D. Alpaiwalla Museaums

- **Orphanages**

नागरी अस्मिता व मानवप्रेम हे पारशी समाजाचे मुख्य सूत्र आहे. पारशांच्या सामाजिक जाणिवेतून आणि मानव कल्याण्याच्या भावनेतून त्यांच्या समाजातीय धनाढ्य पारशांनी Orphanages म्हणजेच (अनाथाश्रमांना) देणग्या दिल्या व तेथे राहण्याची उत्तम खाण्या–पिण्याची व्यवस्था केली.

1) Bai A. F. Petit Parsi Girls orphanage

- **Parsi News Papers and Magazines**

जवळजवळ दोन शतकांपासून पारशी समुदायासंबंधी विविध मुद्यांवर विचारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी व प्रकाश टाकण्यासाठी ह्या समाजाने स्वतःचे वर्तमानपत्र आणि मासिके सुरू केली. यात दादाभाई नौरोजीसारख्या नामांकित व्यवसायिकांपासून सर्व वर्तमानपत्र व मॅग्झीन्सचे कार्य महत्त्वाचे आहे.

1) The Bombay Samachar Pvt. Ltd.
2) B. P. P. Review
3) FED Newsletter
4) Jam -E-Jamshed
5) Mahila Weekly
6) The Parsi Times
7) Parsiana

- **Public Halls / Baugs**

बरेचसे पारशी मुंबईत स्थाईक झालेले असून त्यांनी एकाच ठिकाणी एकत्र राहण्यासाठी पारशी बाग व पब्लिक हॉल्स बांधले. येथे काही कौटुंबिक कार्यक्रम म्हणजेच विवाह रिसेप्शन, वाढदिवस इ. होत असे.

1) Allbless Baug, Charni Road
2) Cama Baug, Grant Road
3) Dadar Parsee Colony Gymkhana Grounds, Dadar
4) Elphinstone Cricket Club, Fort
5) Malcolm Hall, Jogeshwari
6) Mancherji Bahmanji Seth (Sethna) Agiary Hall, Tardeo
7) Ripon Club, Fort
8) Salsette Community Hall, Andheri
9) Seth D. N. Dadysett Atash Behram (Fanaswadi), Thakurdwar
10) Seth Hormusji Dudabhoy Saher Agiary, Colaba
11) Mancherji Joshi Memorial Hall, Dadar
12) Sohrab Palamkote Hall, Dadar

- **Religious Societies**

पारशी समाजात दानधर्म करणे ही पूर्वीपासून चालत आलेली परंपरा होती. त्यांच्या ह्या दानधर्मात धार्मिक आणि सामाजिक संस्थांची संरचना, समाजाकरिता राहण्याची व्यवस्था आणि आपत्तीकाळात आर्थिक मदतीचा समावेश दिसून येतो. त्यासाठी त्यांनी पैशांची विभागणी केलेली दिसून येते.

1) Athornan Mandal
2) The Bombay Zoroastrain Jashan Committee
3) Dadar Jashan Trust
4) Rahnumae Mazdauyasnan Snan Sabha
5) Society for the Promotion of zoroastrian Religious knowledge and Education.
6) The Zoroastrain Radish Society
7) Zoroastrian Studies (ZS)

- **School**

भारतीय शिक्षणपद्धतीत इंग्रजी भाषेचा समावेश करण्यात पारशी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. पाश्चात्य शिक्षणाचा भारतीय मनावर जबरदस्त प्रभाव पडला. याचवेळी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधून अनेक पारशी नामवंत पदवीधर झाले. पुढील काळात याच नामांकित व्यक्तिंनी समाजात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. उदा. द पेटिट हायस्कूल फॉर गर्ल्स, द जमशेदजी जीजी भॉय फॉर गर्ल्स , द कावसजी जहांगीर स्कूल फॉर गर्ल्स इ. मुलींच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन केल्या. कारण, पारशी समाजाने स्त्रियांचा नेहमीच सन्मान करून त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दिकडे लक्ष दिले. त्याचप्रमाणे गुजरातच्या खेड्यापाड्यात राहणाऱ्या अनेक तरूणांच्या शिक्षणाची जबाबदारी मुंबईतील अनेक पारशांना झाली व त्यांनी गुजरात मधील अनेक शाळांना आर्थिक सहाय्य देऊन गुजराती भाषेच्या अभ्यासाला चालना दिली.

1) Activity High School
2) The Alexandra Girls English Institution
3) Bai Avabai Framji Petit Girls High School
4) Bai B. S. Bengallee Girls High School
5) Bharda New High School and Junior college
6) The B.J.P.C. Institution
7) Sir Cowasji Jehangir High School

8) Cumballa Hill High School
9) Dadar Arthornan Institution
10) M. F. Cama Athornan Institute
11) The Dadar Parsee youths Assembly High School
12) Dunne's Institution
13) Bai M. N. Gamadia Girls High School
14) Girton High School
15) Sir Jamsetjee Jejeebhoy Parsee Benelovent Institution
16) Lady Engineer High School
17) Maneckji Cooper Education Trust School
18) Bai R. F. D. Panday Girl's School
19) The J. B. Petit High School for Girls
20) The J. B. Vachha High School for parsi Girls and the cowasjee Jehangir Primary and Infant School.
21) Bai Jaiji Katrak classes for Ladies.
22) Ranina Day Nursery.
23) Seth Rustomjee Jamsetjee Jejeebhoy Gujarati School Fund.
24) Bai Ratanbai F. Pavri high School.

- Data collected from, Marzban J. Giara, “All India Directory of Parsi Institutions.”, IInd Edition, Aug. 2015, Published by- N. M. Wadia Charities, Fort, Mumbai- 400001

संदर्भग्रंथ

1. Maharashtra State Gazetteers Vol. I
2. Site - dailypioneer.com
   Article - "The Parsi Way of Life" Reporter and Explorer - Reanshi Vikram, Date - Sunday, 16th Aug. 2015, Pg. No. 1
3. See Ref. : 2, Pg. 3
4. Bailey, H.W.Ed. Arberry. J. “The Legacy of Persia”, Oxford, 1956
5. E. W. West, The Dadistan -i- Dinik, Sacred Books of the East, Vol. XVIII 1882, XXXI 14, Pg. 66-67
6. L. H. Mills, Vendidad, Sacred Books of the East, Vol. IV, Part I, Chap. III, Pg.33
7. Dosabhai Framji Karaka, History of the Parsis, Vol. I, London, 1884, Pg. 125-127
8. D. Wacha, Recollections and Reminiscences, Shells from the Sands of Bombay, Bombay 1920.
9. Jehangir R. P. Mody, Jamsetjee, - Jejeebhoy - The First Indian Knight and Baronet (1783-1859), Bombay 1959, Pg. 76
10. Sooni Taraporevala, The Zoroastrian of India, Parsis - A Photographic Journey, Good Books, 19 Kala Niketan 47, C. B. Desai Road, Mumbai 400 026, India, Letter Procesed and Printed in Hong Kong by Dai Nippon, Pg. 26, 28, 29, 34, 36, 38
11. K. B. Vakil, "The Natures of Poverty Among Parsis", 1935, Chp. II, Pg. 33
12. See Ref. : 11, Pg. 39-40
13. A Report to the Trustees of Sir Ratan Tata Trust on Problems Affecting the Parsi Community, S.F. Markham, Dec. 1932
14. See Ref. : 11, Pg. 36, 37
15. Maharashtra State Gazetteers, Vol. I
16. www.seasonsindia.com/marriage/care _parsi_sea.htm#Top

17. Sooni Taraporevala, The Zoroastrians of India, “Parsis - A Photographic Journey,” Good Books, 19, Kala Niketan 47 C. B. Desai Road, Mumbai 400 026, India, Letter Processed and Printted in Hong Kong by Dai Nippon, Pg. 220.

18. Godrej Pheroza, J and Mistree Firoza Punthakey, A Zoroastrian Tapestry Art, Religion and Cultre, Mapin Publishing, Pg. 509, 510, 511, 512

19. Blog - Zoroastrian Festivals, Wikipedia

20. http://www.avesta-org/zcal/html

21. PIETRO DELLAVALLE, VOYAGES ETC., FRENCH TRANSL, VOL. II, Pg. 107 - THEVENOT, SUITE DU VOYAGE AU - LEVANI, Pg. 212 - FIGUEROA - Lambassade de don Gracias Desilva Figueroa en Perse, Transl. Wicquefort, Pg. 178, CHINON - Relation etc. pg. 465, TRAVENIER Voyage etc. Vol I, Pg. 438, CHARDIN, Voyages en Perse et autres lieux, Vol. III, Pg. 131 - SANSON Voyage ou Relation de Ietat Present du Royaune de Perse, etc. Pg. 261, CORNETILLE, LE. BRUYN Voyages, etc. Vol. II, pg. 389, As Soc. of Gtr. Britain and IRL, Vol. VII, Pg. 352, 1846 - H .PETERMANN-Reisen im Orient Vol. II, Ch XII, Pg. 205 - E.G.BROWNE, A year among the Persians - Pg. 88, 89, 471, 472

22. Inter alia - FRIAR JORDANUS, The Wonders of the East, Transi from the Latin Original as Published in Paris in 1889, in the "Recueil de Voyages et. memoires" etc. by Col. Henry Yule, Pg. 21, ODORIC, DE PORDFNONE, Voyages etc. Published and Annotated by Mr. H. Cordier, Pg. 82 - TERRY in PURCHAS A relation of a Voyage to Eastern, Indian,Chp. IV, Pg. 1479, H. Lord Discovery of the Banians and the Persees etc., Chp. I, Pg. 571 MANDEL SLO Voyages, etc. Transi wicquefort Pg. 184 - 185

23. Journal of the Anthrop Society of Bombay, Vol. II, Nio. 7, Pg. 405 - 411, Z.A. Vol. II, Pg. 581-591

24. Maharashtra State Gazetteers - Vol. I, Pg. 649

25. Anquetil Duperron; Zend Avesta, I, Part I, Pg. 529

26. Briggs Parsis : Or Morden Zoroastrians, Pg. 17, M.M.M.

27. The Parsis, Vol. II, Chap. IV, Pg. 289, 290

28. Anquetil Duperron's book, the descripton of Mussalmen and Hindus of the 18th Century; Zend Avesta, Disc. Prel. Pg. CCCLX et.seq

29. Lord Haris, a former Governer of Bombay, Says in the Journal of the Society of Arts, (1901), Pg. 571

30. Data Added by me as extra information

प्रकरण – ३रे

आर्थिक जीवन

क) पारशी आणि मुंबईचा उदय

मुंबईत स्थायिक झाल्यानंतर पारशांनी त्यांच्या राहणीमानात, परिस्थितीत मूलभूत बदल केले व त्यांच्या समाजाची भक्कम बांधणी केली आणि मुंबई हे पारशी समाजाचे महत्त्वाचे केंद्र बनले, जेथून ह्या समाजाने सर्वच क्षेत्रात आपला प्रभाव पाडला.

१६६१ मध्ये मुंबई ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. सन १६६८ मध्ये मुंबईतील 'इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी' ला राजकीय वटहुकुमानुसार प्रतिवर्षी त्यातील १० पौंड स्टर्लिंगना लीझवर दिले जात असे. सन १६८७ मध्ये कंपनीने तिचे मुख्यालय सुरत मधून मुंबई येथे स्थापन केले[१] या संधीचा लाभ घेणारे पहिले मुंबईतील व्यापारी रहिवासी म्हणजेच पारशी होय. पुढील काळात खूरशेदजी पोचानी पांडे यांनी ह्या शहरातील तटबंदी बांधल्या. यावेळी दोराबजी नानाभाई हे शहरातील स्थलांतरीत व्यक्तींकडून पर माणसी कर गोळा करीत असत. सन १६९२ मध्ये त्यांचा मुलगा कोवासजी रुस्तमजी पटेल याने मुंबई बंदराच्या व्यापारावर नियंत्रण ठेवले आणि मुंबईच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलून पारशी समाजाची सेवा केली.

सन १७२० मध्ये जमशेदजी भीमजीभॉय पटेल यांनी मुंबईत पहिल्यांदा दुकान टाकून ब्रिटिश आणि देशी दारू विकायला सुरुवात केली. सुरुवातीला आलेल्या पारशांनी मुंबईत जमीन विकत घेऊन भाड्याने दिली व दुकाने थाटून माफक स्वरूपात व्यापार सुरु केला.[२] या विषयीचे आपले मत व्यक्त करताना 'पर्सिव्हल स्पेअर' म्हणतो की, 'इंग्लिश व्यापाऱ्यांपेक्षा पारशी जहाज बांधणारे हे खऱ्या अर्थाने मुंबईचे निर्माते आहेत.'[३] मार्च १७३६ मध्ये लोवजी नुसेरवानजी वाडिया आणि इतर सुतार सुरत मधून मुंबई सरकारच्या निमंत्रणावरुन येथे आले. सन १७४० मध्ये लोवजी वाडिया हे इंग्रजांकरिता जहाजबांधणीचे काम करणारे प्रमुख व्यक्ती म्हणून ओळखले जात होते. पुढे १८८४ पर्यंत त्यांच्या वारसांकडे हे काम आले.[४] एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला मुंबईत पारशी लोकांच्या जहाजबांधणी करणाऱ्या सहा फर्म्स होत्या व सर्व गोदींवर त्यांचे वर्चस्व होते. या जहाजबांधणी करणाऱ्या पारशांनी

जहाजबांधणीत नवीन डिझाइन्स आणि अनेक व्यावसायिक बदल केले. ज्यात सन १८३९ मध्ये अर्देसीर वाडिया यांनी इंग्लंडमधून ब्रिटिशांच्या आश्रयात जे शिक्षण घेतले त्याचाही समावेश होता. इंग्रजांनी दिलेल्या आर्थिक आश्रयामुळे जहाजबांधणीच्या क्षेत्रात तसेच कामगार संघटनेच्या स्वरूपात मुंबईत जहाज बांधणीचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. यापैकी चार जहाजे दोन हजार टनापेक्षा जास्त होती आणि जहाजे प्रत्येकी हजार टनांची होती. त्या काळातील जहाजबांधणी ही सर्वात आधुनिक संस्था होती.[५]

MORAL SUPPORT OF EARLY COMMUNITY

सुरुवातीच्या काळात समाजाचा नैतिक आधार

पारशांकरिता मुंबई हे एक व्यापारी केंद्र म्हणून उदयास आले. सुरत येथून मुंबईत स्थायिक झाल्यानंतर त्यांची आर्थिक भरभराट झाली, त्यामुळे त्यांनी धार्मिक कामांकरिता त्या पैशांची विभागणी केली. जसे सन १६७३ मध्ये हिरजी वाच्छा मोदी यांनी महान अग्नी मंदीर बांधले.[६] १६६९–७० मोदी यांनी सरकारकडून मलबार हिलमध्ये पहिला दाख्मा उभारण्याची परवानगी मिळविली ज्याचे बांधकाम सन १६७० मध्ये पूर्ण करण्यात आले.[७] तसेच १७०९ मध्ये बनाजी लिमजी यांनी मुंबईत अग्यारी बांधली. सन १७८३ मध्ये मुंबईतील पहिले आतश बेहराम हे दादीभाई नुसेरवानजी पाडीसेठ यांनी दिलेल्या देणगीतून बांधण्यात आले.

पारशी समाजात दानधर्म करणे ही पूर्वीपासून चालत आलेली परंपरा होती. त्यांच्या दानधर्मात धार्मिक आणि सामाजिक संस्थांची संरचना, समाजाकरिता राहण्याची व्यवस्था आणि आपत्तीच्या काळात आर्थिक मदतीचा समावेश दिसून येतो.[८]

पारशांच्या गुजरातमधून मुंबईकडे झालेल्या स्थलांतरातून त्यांना अनेक आर्थिक संधी उपलब्ध झाल्या व अशा प्रकारे पारशांची सामाजिक व शहरी संस्कृती निर्माण झाली.[९]

Parsis, China, Seas, And Opium

ख) पारशी–चीन व्यापारिक संबंध –

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुंबई हे भारताच्या पश्चिमकिनाऱ्यावरील जहाजबांधणी आणि व्यापार उद्योगासाठी एक मुख्य केंद्र बनले होते. मुंबई हे पर्शियन आखातात

मलबारचा किनारा, कोरोमांडेल, बंगाल आणि चीनबरोबरच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे एक मध्यवर्ती केंद्र होते. मुंबई हे भारतीयांकरिता म्हणजे ज्यांना १८३० पर्यंत युरोपियनांशी सरळ व्यापार करण्याची परवानगी नाकारण्यात आली होती त्यांच्याकरिता व्यक्तिगत व्यापाराचे केंद्र बनले. पारशी व्यापाऱ्यांचा चीनबरोबरचा व्यापार हा या व्यक्तिगत व्यापाराचा एक भाग बनला होता. ज्यामुळे आशियातल्या जागतिकीकरणात एका नव्या अध्यायाला सुरुवात झाली होती. पुढील काळात पारशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभाग घेतला आणि भारत व चीन दरम्यान जहाजांद्वारे मालाची ने–आण सुरु केली. पारशांच्या चीनबरोबरच्या या व्यापारातून त्यांच्याकडे अमाप संपत्ती जमा झाली. यात मुख्यत: कापूस, साग आणि अफु च्या भारताकडून चीनला केलेल्या निर्यातीचा तसेच चीनीमातीची भांडी, रेशीम आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, चहा भारतात आयात केला जात असे. हा काळ १८व्या शतकाच्या मध्यापासून ते १९ व्या शतकाच्या पूवार्धापर्यंतचा होता.[१०]

पारशांचा अफु च्या व्यापारातला सहभाग हा वसाहतवादाचा पाया मजबूत करण्यासाठी युरोपियन नसलेल्यांकडून देण्यात आलेला सहभाग मानण्यात येतो. ज्यामुळे आशियातील पश्चिमेकडच्या राजधानीचा उदय झाला. त्यामुळे भारत आणि ब्रिटनच्या आर्थिक विकासाच्या घोडदौडीला गती मिळाली. त्याचबरोबर पारशांच्या ड्रग्ज म्हणजे अमली पदार्थाच्या गुंतवणुकीचा परिणाम म्हणजे त्यांना वैयक्तिक आणि समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी नवीन आर्थिक संधी शोधण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.[११]

चीनबरोबरच्या व्यापाराने पारशांना छोट्या विक्रेत्यांमुळे व व्यापाऱ्यांमुळे मोठ्या व्यापारांमधले प्रमुख बनविले आणि त्यातून नामवंत पारशी कुटुंबे नावारूपास आली. चीनबरोबर असलेल्या ह्या व्यापारी संबंधामुळे पारशी समाज हा पहिल्यांदा इराण व भारताबाहेर व्यापारासाठी गेला. सन १८३० पर्यंत पारशी कॅन्टन, अमॉय व शांघाय येथे पोहोचले होते.[१२] सन १७५६ मध्ये हिरजी जिवानजी आणि त्यांचे भाऊ मानेकजी हे व्यापारासाठी चीनला जाणारे पहिले पारशी असल्याचे मानले जाते. त्यांनी कॅन्टॉन येथे एक फर्म सुरु केली. त्यावेळी परदेशी लोकांकरिता कॅन्टन हे एकमेव बंदर म्हणून प्रसिद्ध होते.[१३]

जिवानजी ह्या पारशी व्यापाऱ्याचा चीन बरोबरचा व्यापार इतका यशस्वी झाला की, त्यांच्या कुटुंबाने स्वत:चे आडनाव 'रेडीमनी' असे धारण केले. त्यांनी त्यांची व्यापारातून मिळविलेली संपत्ती पारशी समाजात आणि इतर भारतीय समाजाकरिता दानधर्मात खर्च केली.[१४] त्याचप्रमाणे, पेस्तनजी कोवासजी सेथना यांनी सन १७९४ मध्ये 'कोवासजी पालनजी ॲन्ड कंपनी' स्थापन केली, ही कंपनी कॅन्टॉन मधील पहिल्या फर्म्सपैकी एक महत्त्वाची फर्म होती.[१५] दोराबजी रुस्तमजी पटेल यांनी बर्मा आणि मलाया या शहरांबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित केले.[१६] बनाजी यांनी चीन व बर्माबरोबर व्यापारिक संबध प्रस्थापित केले. ते सिल्क म्हणजेच रेशीम व अफुचे व्यापारी होते. सन १६९० मध्ये बनाजी लिमजी जे काही काळ इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीला होते, त्यांनी संपत्ती जमवून आपल्या कंपनीचा राजीनामा दिला आणि ईस्ट इंडिया कंपनीबरोबर स्वत:चा व्यापार विकसित केला.[१७]

Parsi Culture And The China Trade
पारशी संस्कृती आणि चीनशी व्यापार

चीनच्या व्यापारातील गुंतवणुकीचा पारशांच्या संस्कृतीवर बराच प्रभाव पडला होता. पारशांनी विकसित केलेले वेगळ्या प्रकारचे कापड म्हणजे पारशी संस्कृतीवर असलेल्या पूर्व आशियाचा प्रभाव होय.

कापड उद्योगाच्या इतिहासात भारत–चीन व्यापारातून 'तानचोई' आणि 'गारो' ची निर्मिती झाली. पारशांनी आपल्या वस्त्रामध्ये 'तानचोई' व 'गारो' चा स्वीकार करून आपल्या गरजेनुसार त्यात बदल केले. 'तानचोई' ही संज्ञा पारशी विणकरांनी चिनी लोकांकडून स्वीकारलेल्या तंत्राकरिता आणि विणलेल्या कापडाकरिता वापरली जाते.[१८] पश्चिम भारतातील व सुरतमधील पारशी विणकरांनी चिनी सॅटीन, सुती कापड आणि भरतकाम तसेच त्यांच्या कारागिरीच्या तंत्रज्ञानाचा वापर पारशी फॅशन्समध्ये करून घेतला. 'तानचोई' ही तिच्या श्रमपूर्वक केलेल्या नक्षीकामासाठी आणि उभ्या–आडव्या धाग्यातून निर्माण करण्यात आलेल्या नक्षीदार रचनेकरिता विशेषत्वाने लक्षात राहते. सळीदार विणलेला (पदर) किंवा आडव्या जाळींची समोर येणारी कर्णाकृती साडीची किनार ही विशेषत्वाने उठावदार असून शक्यतो ती दुहेरी विणीत असते, ज्यात दोन रंग कापडाच्या दोन बाजूंसाठी आलटूनपालटून वापरण्यात

आलेले असतात.[१९] 'तानचोई' चा संबंध मुख्यत: पारशी साडीशी येतो. हेच तंत्रज्ञान पारशी 'विजार' आणि 'झबल्या' ला देखील वापरतात. पारशांच्या व्यक्तिमत्वात जुन्या प्रकारच्या जोडीलाच ह्या नवीन प्रकाराने चांगलीच भर पडलेली आहे.[२०]

त्याचप्रमाणे 'गारो' ही भरतकाम केलेली साडी होती. गारोचे भरतकाम आणि साडीच्याच लांबीची उभी जरीची बॉर्डर म्हणजे किनार हे तिचे वैशिष्ट्य होते. पुढे 'गारो' ही संज्ञा गडद रंगाच्या भरतकाम केलेल्या रेशमी साडीसाठी वापरली जाऊ लागली. पारशी गारोचे भरतकाम हे भारतीय पद्धतीवरील चीनी प्रभावाचा उत्कृष्ट नमुना होता. पारशी विणकरांनी गारोची वैशिष्ट्ये ही पारशी स्त्रियांच्या गरजेला अनुरूप होतील अशी करून घेतली आणि त्या संपूर्ण कपड्यावर रेशमी धाग्याने भरतकाम आणि जरीकाम केले, पारशी विणकरांनी त्यात गाठीची शिवण किंवा 'रवारवो' ची फ्रेंच गाठीची आणि सोनेरी व चंदेरी तारा ज्यांना 'जरी' किंवा 'झरी' म्हटले जाते त्याची भर घातली. 'काम खाबाब' किंवा 'किनखाब' म्हणजे (गोल्डन ड्रीम) हे जरीच्या कापडासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जात. यात जरीच्या धाग्याचा भरपूर वापर केला जात असे, पुढे हे कापड पारशातील उच्च राहणीमानाचे चिन्ह बनले. ह्या साडीकरिता चीनी लोकांच्या जांभळ्या रंगाच्या जोडीला त्यात लाल, बर्गंडी, नेव्ही ब्ल्यू, काळ्या आणि पांढऱ्या रंगाची भर देखील घालण्यात आली.[२१] चीनी लोकांचा गारो वरचा प्रभाव हा त्यांच्या नक्षीकामातून आणि कपड्यांवर लावण्यात येणाऱ्या शोभादायक आकृत्यांमधून दिसून येतो. यांकरिता मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या फुलांचा, पक्ष्यांचा, प्राण्यांचा आणि आकाशातील आकृत्यांचा वापर केला जात असे.

उदा. ड्रॅगन्स, युनिकॉन्स, फिनिक्स आणि मिश्र प्रकारचे प्राणी इत्यादीतून चीनी लोकांची नैसर्गिक आणि अतिभौतिक जगाची आवड दिसून येते.

गारो साडीवर जे भरतकाम केलेले दिसते त्यातून चीनी जीवनातली एखादी कथा सांगितली जाते. उदा. चीना–चीनी (Cheena- Cheeni) ह्या गारो साडीवरील भरतकाम म्हणजे पारशी गारोचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, जिच्याद्वारे पारशी विणकामाची आणि शिवणकामाची वैशिष्ट्ये ठळकपणे लक्षात येतात.[२२] पारशी भरतकामात सॅटीन व व्हेलव्हेटच्या ज्यांना 'कोर्स' (kors) म्हणतात आणि जे साडीला जोडलेले असतात अशा काठाचा समावेश असतो. परंतु

विसाव्या शतकात गारो साडीवरील कलाकुसर आणि तिचे उत्पादन हळूहळू कमी होत गेले. परंतु 'कोर्स' बनविणे आणि 'पारशी काठ' तयार करणे हा तानचोई व गारो प्रक्रियेत निष्ठावान कारागिरी करिता राहिलेला वारसा अजूनही कालोघात टिकून आहे असे म्हणता येईल.

The Parsis of Surat in the Eighteenth Century

ग) १८ व्या शतकातील सुरतमधील पारशी –

अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमध्ये पारशी समाज हा पश्चिम भारतातला एक महत्त्वाचा व्यापारी समाज आहे. सध्याच्या काळातला इराण म्हणजे पर्शियातून आलेले आणि गुजरातच्या वेगवेगळ्या भागात स्थायिक पारशी हे व्यापार आणि उत्पादनाच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये सहभागी झालेले होते. तसेच अर्थकारणात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

उदा. व्यापार करणारे व्यापारी, दलाल, सावकार, युरोपियनांना आणि आशियातील व्यापाऱ्यांना वस्तू पुरविणारे छोटे दुकानदार व छोटे व्यापारी, विणकर, जहाजबांधणी उद्योग आणि कारागीर म्हणून पारशी समाजाने गुजरातच्या अर्थकारणात आणि हिंदी महासागरात मोठा सहभाग दिला. अठराव्या शतकातील समुद्री व्यापारात त्यांची लक्षणीय कामगिरी विशेषत: महत्त्वाचे व्यापारी आणि जहाजमालक म्हणून दिसून येते. तसेच असे म्हणू शकतो की त्या काळात त्यांच्या व्यापाराचे जाळे हे हिंदी महासागराच्या पलीकडेही पसरलेले होते. पारशी लोक पूर्व आफ्रिका, लाल समुद्र आणि पर्शियाच्या आखातात स्थायिक झाले.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत गुजराथी भाषा बोलणाऱ्या पारशी व्यापाराचे जाळे हे ब्रिटनपर्यंत पोहोचलेले होते. त्यांनी इतर भारतीय व्यापाऱ्यांबरोबर तसेच युरोपियन व्यापाऱ्यांबरोबर चांगले व्यावसायिक संबंध प्रस्थापित केले होते. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश इंडियात पारशांनी ब्रिटिश साम्राज्य विस्तारात भागीदाराची भूमिका निभाविली. एकोणिसाव्या व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुंबईला ब्रिटिश वसाहतीचे महत्वाचे शहर बनविण्यात पारशांनी व्यापारात यश मिळवून मोठ्या प्रमाणात सहभाग दिला.

Parsis In Indian Ocean Maritime Trade

घ) पारशांचा हिंदी महासागरातील व्यापारात सहभाग –

सुरत हे पारशी समाजाच्या वसाहतीचे मुख्य ठाणे होते तसेच ते पश्चिम भारतातील पारशी जमातीचे मुख्य व्यापारी केंद्रही होते. सतराव्या शतकाच्या सुरुवातीपासून सुरत हे मोठ्या प्रमाणावर पारशी व्यापाऱ्यांसाठी आणि कारागिरांसाठी तेथील भरभराटीला आलेल्या समुद्री व्यापारासाठी आणि व्यावसायिक संधीसाठी नेहमीच आकर्षणाचे केंद्र होते. पारशी समुद्री व्यापारात गुंतलेले होते. त्यांना ईस्ट इंडिया कंपनींना दलाल, कॉन्ट्रॅक्टर्स आणि पुरवठा करणारे म्हणून काम करण्याच्या खूप संधी मिळत होत्या. पारशांनी व्यापाऱ्यात गुजराथी बनियांशी यशस्वीपणे स्पर्धा केली आणि सुरतमधल्या व्यापार–उद्योगातल्या मध्यस्थ म्हणून असलेल्या त्यांच्या स्थानाला आव्हान दिले.[२३]

Spreading The Risk – A Key To Success
पारशी समाजाची धोका उचलण्याची तयारी हे त्यांच्या यशाचे गमक

पारशी समाजाच्या व्यावसायिक बाबींमधला मुख्य भाग म्हणजे सुरत मधील युरोपियन कंपन्यांबरोबर त्यांचे घनिष्ठ संबंध. पारशांचे मुंबईतील ब्रिटिशांबरोबरच्या भागीदारीपूर्वी पश्चिम भारतातल्या युरोपियन व्यापारी लोकांशी घनिष्ठ संबंध होते. पारशी समाजातील मोठे व्यापारी हे डच आणि इंग्लिश कंपन्यांसाठी दलाल म्हणून, तसेच व्यापारी मालाचे पुरवठादार म्हणून काम करीत. रुस्तम मानेकजी सेठ सारखे व्यापारी सुरतमध्ये इतके प्रभावशाली होते की, त्यांनी पारेख सारख्या गुजराथी व्यापारी बनिया कुटुंबाला ज्यांची सतराव्या शतकाच्या मध्यापासून इंग्लिश कंपन्यांबरोबर दलालीच्या व्यवसायात एकाधिकारशाही होती त्यांना यशस्वीपणे आव्हान दिले.[२४] व्यापाराच्या क्षेत्रातील दुसरे मोठे नाव म्हणजे मानचेरजी खुरशेदजी. हे देखील सेठ कुटुंबातील होते. त्यांच्या मालकीची बरीच समुद्री जहाजे होती. त्यांनी जवळपास तीस वर्षे डच कंपन्यांसाठी दलाल म्हणून काम केले. सुरतमधील डच व्यापारी जो माल निर्यात करीत त्यांचे ते एकहाती खरेदीदार होते. ते कपडा उद्योगातील पुरवठादारांशी कंपनीचा वार्षिक करार सुखकर करून देत. मानचेरजी यांचा व्यापार हा लाल समुद्रापासून ते दक्षिण चिनी समुद्रापर्यंत

पसरलेला होता. तसेच त्यांची जहाजे अनेक भारतीय बंदरांकडे, जसे सियाम, मलाक्का आणि पूर्वेकडील बाटाव्हिआ, बसरा, मोखा आणि पश्चिमेकडे जेद्दाला जात होती.[२५]

Diversification of Parsi Business

च) पारशी उद्योगधंद्याची वैविध्यपूर्णता –

चीनबरोबर व्यापार करून पारशांना बराच फायदा झाला. त्यातून पारशी समाजाचा नफा झाला, पण त्याहीपेक्षा त्यांना ब्रिटिशांबरोबर आर्थिक व सामाजिक राजकारणात सहकार्य करण्याचे प्रोत्साहन मिळाले ज्याचा परिणाम भारताच्या आर्थिक विकासात झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावरील पारशींचा उद्योग हा त्यांच्या आधीच्या पिढ्यांच्या उद्योग–धंद्यातील यशावर आधारलेला होता. व्यापार उद्योगातून निर्माण झालेली संपत्ती ज्यांतून पुढे बँकांचा, विम्याचा, कापूस उद्योग आणि त्यापासून कापडउद्योगाच्या विकासात पारशी व्यापाऱ्यांची सत्ता होती. सन १८३६ मध्ये 'बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स' ची सुरुवात झाली, त्यातील २५ सदस्यांपैकी १० सदस्य हे पारशी होते. वाडिया, दादिसेठ, बनाजी, पेटीट आणि रेडीमनी इत्यादींचा मुंबईच्या आर्थिक इतिहासात सहभाग महत्त्वाचा मानला जातो.[२६]

मुंबईच्या सुती कापडगिरण्यांचा उद्योग हा बँकांच्या उदयाचा आणि बदललेल्या व्यापारी पद्धतीचा परिणाम म्हणून सुरु झालेला एक मोठा उद्योग होता. सुती कापडगिरणी उद्योग हा पश्चिम भारतातला एक आघाडीचा उद्योग होता, जो काही ठरावीक उच्चभ्रूंच्या ताब्यात असलेला उद्योग म्हणून पुढे आला. विसाव्या शतकापर्यंत ९५ गिरण्यांपैकी ३४ गिरण्या पारशांच्या मालकीच्या होत्या.[२७] सन १८५४ मध्ये पारशी आणि भारतीय वित्तपुरवठा दरांच्या मदतीने कोवासजी नानाभॉय दावर यांनी पहिली वाफेवर चालणारी कापडगिरणी मुंबईत ताडदेवला उभारली. कापडउद्योगाशी जोडण्यात आलेल्या पेटीट आणि टाटा ही कुटुंबे सर्वात मोठी पारशी कुटुंबे मानली जात होती. सन १८६० च्या सुरवातीच्या काळात दिनशा मानेकजी पेटीटच्या मालकीच्या जवळपास अर्धा डझन कापडगिरण्या होत्या. सन १८७५ पर्यंत ते मुंबईतील श्रीमंत आणि धनवान पारशी बनले होते.[२८]

अर्ध्या शतकाहूनही अधिक काळाकरिता पारशी हे कापड उद्योगाच्या प्रगतीचे आद्यप्रवर्तक मानले जातात. सन १८७९ मध्ये एन.एन.वाडिया, पेटीट मिलचे व्यवस्थापन पाहात होते. त्यांनी 'बॉम्बे डाईंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड' ह्या कंपनीची स्थापना केली आणि कापडाच्या ताग्याला व कापडाला रंग देण्याच्या प्रक्रियेत नवनिर्मिती आणली. या प्रक्रियेत अठराव्या शतकापासून युरोपियनांबरोबरच्या सहकार्याने पारशांनी सुरु केलेल्या व्यापारापासून विसाव्या शतकात उदयाला आलेल्या पारशी समाजाच्या स्वतंत्र औद्योगिक साम्राज्याच्या उदयापर्यंतचा भाग येतो, ज्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्याच्या बरोबरच जोडीला स्वतंत्रता बहाल केली.

Parsis and The china Trade

पारशी आणि चिनी व्यापार

भारत आणि चीन यांच्यातील कल्पनांची, वस्तूंची आणि तंत्रज्ञानांची देवाणघेवाण सहस्त्रकांपासूनची आहे.[२९] पारशी समाज हा पश्चिम किनारपट्टीवरील एक महत्त्वाचा समाज असून, त्यांनी सुरुवातीच्या काळापासून युरोपियन व्यापाऱ्यांबरोबर अगदी घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले होते. पारशांनी मुंबईच्या वाढत्या व्यापारात अत्यंत महत्त्वाचा वाटा उचलला त्यामुळे ते चीनबरोबरच्या व्यापारात ओढले जाणे हे साहजिकच होते.[३०]

चिनी व्यापारात इतर बऱ्याच व्यावसायिक जमाती गुंतलेल्या असल्या तरी, पारशांची ह्या क्षेत्रातील भूमिका ही इतर गटांपेक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. सामान्यपणे, भारतीय व्यापाऱ्यांची चीनला माल पोहोचविण्याची प्रक्रिया समुद्राच्या कडेपर्यंतच मर्यादित होती. मालवाहू जहाजाची वाहतूक कॅन्टानला करणे आणि त्यांना तेथे रिकामे करणे हे मोठ्या प्रमाणात अमेरिकन आणि युरोपियन (मुख्यत्वे ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या) आणि जहाज मालकांच्या हातात होते व त्यातील बरेच व्यापारी हे पारशी होते. त्यांनी भारतातून कॅन्टानला व्यापारासाठी गेलेल्या पण पाश्चिमात्य नसलेल्या व्यापाऱ्यांचा एक मोठा गट तयार केला होता, त्यात फारच थोडे हिंदू, गुजराती आणि सिंधी तसेच काही बोहरा मुस्लीम होते. ह्या सर्वांचाच व्यापारानिमित्ताने चीनमध्ये नियमितपणे प्रवास होत असे. त्याचप्रमाणे ह्या व्यापारातही पारशांचा महत्त्वाचा सहभाग असून कॅन्टानमध्ये त्यांची संख्या सर्वाधिक होती. याप्रमाणे एकोणिसाव्या

शतकातील पारशी व्यापार–उद्योगांच्या क्षेत्रातील महत्वाचे खेळाडू होते. ज्यांच्या व्यापार उद्योगाने भारत–चीन संबंधांवर राज्य केले. हेच कारण आहे की आज पारशी समाज हा उपमहाद्वीपातील एकमेव समुदाय आहे की, ज्यांनी अजूनही चीनबरोबरील व्यापाराच्या सामुदायिक आठवणी जपून ठेवल्या आहेत. भरतकाम केलेल्या रेशमी गारो साडीवरील जोडकाम, नक्षीकाम व आकृत्यांमधून ह्या सर्व गोष्टी आजही त्यांच्या स्मरणात आहेत.[३१]

पारशांचा चीनशी असलेला व्यापारी संबंध हा त्यांच्या समाजाकरिता अत्यंत महत्वाचा ठरतो. पारशी समाज प्रामुख्याने त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून असलेल्या त्यांच्या चीनबरोबरील संबंधांमुळे आधुनिक भारताला आकार देण्यात आपला महत्त्वाचा सहभाग देऊ शकले. चिनी व्यापारामुळे पारशांना अनेक संधी उपलब्ध झाल्या. चीन आणि भारता दरम्यान वारंवार प्रवास केल्यामुळे पारशी समाजाचा मोठ्या प्रमाणावर नवनवीन कल्पनांशी, संस्थांशी आणि प्रथांशी संबंध आला. ह्याचे उदाहरण म्हणजे पारशी थिएटर होय. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पारशी कलाकारांच्या गटाने आग्नेय आशियामध्ये नवीन आणि मोठ्या प्रमाणावर परिणामकारक असा नाटकीय प्रकार तयार केला होता.[३२]

पारशी कल्पकतेचा आणि व्यापाराचा जेंव्हा चिनी व्यापारातून मिळणाऱ्या पैशाशी संयोग झाला तेंव्हा या शक्तिशाली संयोगाने व्यापारी वर्गाला समाजात नामवंत बनविले. पारशी उद्योग धंद्यांपासून ते कलेपर्यंतच्या वेगवेगळ्या क्षेत्रातले ते नवीन उपक्रमशील नेते बनले. ह्या समाजाचे प्रमाण जरी कमी असले तरी त्या प्रमाणाच्या मानाने त्यांचा प्रभाव बराच मोठा होता. मग ते राजकीय क्षेत्र असो किंवा उद्योगक्षेत्र, विज्ञानक्षेत्र बऱ्याच संस्था आणि प्रथांतून आधुनिक भारताची ओळख होते. ह्याच्या मुळाशी पारशी समाजाने घेतलेला पुढाकार आहे.

उदा. बॉलीवूड फिल्म इंडस्ट्रिची मुळे शोधली तर एकोणिसाव्या शतकातील पारशी थिएटर पर्यंत जावे लागेल.[३३] याप्रमाणे भारतात क्रिकेटला लोकप्रिय करण्यातही पारशी समाजाचा महत्वपूर्ण वाटा आहे. यातून असे दिसते की चिनी व्यापार हा सांस्कृतिकदृष्टया इतका फायदेशीर होता की, यातून कुठल्याही कथनात्मक वाड्.मयाची जसे, कादंबरी, नाटके किंवा कथांची निर्मिती झाली नाही. याचा परिणाम असा झाला की चीनबरोबरचा हा व्यापार आज आधुनिक जगात धूसर बनला आहे.

A Time of change In Parsis After China Trade

छ) चिनी व्यापारानंतर पारशांचा बदलता काळ –

मुंबईत सन १८६० मध्ये रुपयाचे मूल्य भयंकर घसरल्यामुळे त्या वेळच्या अनेक व्यापारी कंपन्यांवर अतिशय गंभीर परिणाम होऊन त्या दिवाळखोर झाल्या. यांपैकी काही कंपन्यांना पुन्हा तारून नेण्यासाठी मोठ्या रकमेच्या पैशांची अतिशय तातडीने देवाण–घेवाण करण्यात आली. बऱ्याचवेळा अशी पैश्यांची देवाणघेवाण ही जमाती अंतर्गतच करण्यात आली होती. अशाप्रकारे आर्थिक रक्कम देणाऱ्यांमध्ये दिनशॉ माणेकजी पेटीट यांचे नाव प्रामुख्याने घेता येईल.[३४]

ज्या अतिशय थोड्या कंपन्यांचा गट जो ह्या शेअरमार्केटच्या कोसळण्यातून वाचला होता, त्यांनी व्यापार उद्योगांत आधीच गुंतवणूक करून व्यापाराला दिवाळखोरीपासून वाचविण्याची खबरदारी घेतली होती. दिनशॉ पेटीट यांनी अशा प्रकारे गुंतवणूक केली होती. १८६५ नंतर अशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होऊ लागली.[३५]

सन १८५४ मध्ये कोवासजी नानाभाई दावर यांची पहिली सूत गिरणी ही शेअरबाजार कोसळण्याच्या दहा वर्षे पूर्वीपासूनच सुरु झाली होती. ह्या सूत गिरणीने शेअर बाजार कोसळल्यानंतर जवळपास दशकभरानंतर मुंबई ह्या व्यापारी शहराचे उत्पादक शहरात रुपांतर होतांना पाहिले. पेटीट यांनी अधिकाधिक सूतगिरण्या स्थापन करण्यात पुढाकार घेतला. दिनशॉ पेटीट यांच्या एजंटने म्हणजे दलालाने, नोवरोसजी नुसरवानजी वाडिया (१८४९–९९) यांनी सन १८७५ मध्ये 'बॉम्बे डाईंग कंपनी'ची सुरुवात केली. तसेच १८३९–१९०१ मध्ये जमशेदजी एन. टाटा यांनी स्वतःला चीन व आफ्रिकेच्या व्यापारातून मुक्त करून अलेक्झांड्रा मिल्समध्ये गुंतविले. त्यानंतर त्यांनी (१८७४–१८७७) या काळात लक्ष घातले. परंतु, जमशेटजींना हे सर्व करण्यापूर्वीच पोलादनिर्मितीच्या व्यापारातील उज्जवल भविष्यामध्ये रस निर्माण झाला होता. सन १९१४ मध्ये भारतात ९५ सूतगिरण्या होत्या, ज्यापैकी ३४ सूतगिरण्या ह्या पारशी उद्योगपतींनी सुरू केल्या होत्या.[३६]

शेअर बाजार कोसळल्यानंतरच्या काळातल्या ब्रिटिश साम्राज्यातल्या मुंबईचे वर्णन करतांना असे दिसून येते की , त्या वेळी उद्योगधंद्यांना आणि फायनान्सला फार महत्त्व प्राप्त झाले होते. सन १८४० आणि सन १८५० मध्ये पारशी समाजाने अनेक बँका आणि कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची म्हणजे (लोन सोसायटी) स्थापना केली होती. सन १८४० मध्ये सरकार आणि भारतातील युरोपियन रहिवाशांचे शेअर्स सोडले तर, पारशांकडे मुंबई बँकेचे सर्वांत जास्त शेअर्स होते. १८४७ च्या आर्थिक मंदीच्या काही काळापूर्वी दादाभाई पेस्तनजी वाडिया यांच्याकडे वेस्टर्न इंडिया बँकेचे सर्वांत जास्त शेअर्स होते, सन १८५३ मध्ये मर्कन्टाईल बँक, कोवासजी दावर यांनी १८४५ मध्ये कमर्शिअल बँक, १८६१ मध्ये ब्रोकर्स लोन डिस्काउन्ट ॲन्ड बँकिंग कंपनी सुरु केली. पुढील काळात विसाजी मेहेरजी आणि पेस्तनजी मेहेरजी या दोन भावांनी काही संस्थाना कर्जाऊ रकमा दिल्या. सन १८६६ च्या शेअरबाजार कोसळण्यामुळे यांतील बऱ्याचशा कंपन्या बुडाल्या होत्या. आर्थिक बाजारपेठ म्हणून उदयाला आलेल्या मुंबईच्या विकासात इतर अनेक समूहांबरोबर पारशी समाजाचाही मोठा वाटा आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पारशांच्या आधीच्या तुलनेत मोठ्या व्यापारातील सहभाग बराच कमी झाला. नवीन युगातील पारशी व्यापारावर टाटा, वाडिया आणि पेटीट या तीन कुटुंबांची सत्ता सुरु झाली. या गटात पुढे एक मुख्य व्यापारी गट सामील झाला तो म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील गोदरेज कुटुंब. दुसरीकडे पारशी मध्यमवर्गाच्या भविष्याच्या घडणीवर सखोल परिणाम झाला, जितका १८०० सालच्या मध्यावरच्या व्यापारी घडामोडीचा झाला होता.[३७] जागतिक महामंदीपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग होता. मुंबईतील पारशी हे त्यांच्या वृत्तीमुळे व दृष्टिकोनामुळे भारतीय व्यापारी गटांमधील सर्वात जास्त वैश्विक आणि सर्वधर्मसमावेशक व्यापारी होते. कारण, जवळपास २००वर्षे ते भारताच्या वैश्विकीकरणाशी संबंधीत कराराचे आघाडीचे संरक्षक होते. परंतु, १९५० नंतर ह्या परिस्थितीत नाटकीयरीत्या परिवर्तन झाले. कारण, त्यानंतरच्या काळात अर्थकारण कमालीचे बंदिस्त करण्यात येऊन नियंत्रित झाले, याचा परिणाम व्यापारावर होऊन व्यापार घटला आणि परकीय गुंतवणूक मर्यादित प्रमाणात होऊ लागली.

पारशांच्या भूतकाळावर, वर्तमानकाळावर, व्यापारावर, संस्कृतीवर, स्वप्रतिमेवर, इतिहासकारांच्या प्रतिमेवर किंवा त्यांच्या व्यक्तिमत्वावर एक नजर टाकली असता असे दिसून येते की, सध्याच्या काळातल्या पारशांचा इतिहास आणि त्याची मांडणी करण्यासाठी वरील गोष्टींचा उपयोग होणार. पारशी व्यापाराने जरी जगातून माघार घेतलेली असली तरी पारशी व्यक्तींची बुद्धिमत्ता, निर्मितिक्षमता वैश्विक झाल्याचे दिसते.

पारशांमध्ये असलेली सर्वसमावेशकता आणि पाश्चिमात्य विज्ञानातला त्यांचा रस हा केवळ संकुचित अशा स्वार्थी वृत्तीतून निर्माण झालेला नव्हता तर, तो सर्व पारशी जमातीवर एकोणिसाव्या शतकात झालेल्या जागतिकीकरणाचा एक वैशिष्ट्यपूर्ण परिणाम होता. तसेच हा समाज मोठ्या प्रमाणात मुंबईतच स्थायिक झाल्यामुळे जागतिकीकरणाच्या परिणामांची तीव्रता अधिक जाणवली. यापैकी काही पारशी हे इंग्रजी शिक्षण घेतलेले होते त्यांचा युरोपियन भाषांशी आणि साहित्याशी परिचय झाला, अशा पारशांनी पाश्चात्तीकरण स्वीकारले. त्यांनी व्यापार उद्योगातल्या त्यांच्या गुंतवणुकीचे पुनरावलोकन केले. यात जमशेटजी टाटा यांचे नाव घेतले जाते. टाटा हे एक युगप्रवर्तक व्यक्तिमत्व होते. जमशेटजी टाटा आणि त्यांच्या समकालीनांच्या दृष्टीने ज्ञान ही उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे.

विसाव्या शतकातील पारशी समाजाकडे बघितल्यावर असे दिसून येते की, त्या काळात पारशी समाजाने व्यापार उद्योगातून जरी माघार घेतली असली तरी स्वत:च्या उत्कर्षासाठी ज्ञानाचा पुरेपूर व यशस्वीरीत्या उपयोग करून घेतला. भारतीय समाजातल्या भाषिक गटांमध्ये पारशी समाजाने सर्वसमावेशक बहिर्मुख आणि उच्चशिक्षित समाज म्हणून विसाव्या शतकात प्रवेश केला. नागरी अस्मिता आणि मानवप्रेम हे पारशी समाजाच्या कार्याचे मुख्य सूत्र असून मुंबईच्या सांस्कृतिक, बौद्धिक आणि वैज्ञानिक सुधारणेच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे.[३८]

Parsi Contribution To The Making of Bombay City

ज) मुंबईच्या भरभराटीत पारशांचे योगदान

पारशी समाजातील महत्वाचे व मान्यताप्राप्त व्यापारी ही एकोणिसाव्या शतकातील मुंबईतील अशी माणसे होती की ज्यांची कल्पनाशक्ती पर्यटन, समुद्री व्यापार तसेच परकीय व्यक्ती व त्यांच्या संस्कृतीबरोबर संबंध प्रस्थापित करण्याच्या विचाराने भारावून गेले होते. परकीयांबरोबरच्या ह्या देवाणघेवाणीतून विज्ञान, साहित्य आणि नागरी प्रगतीबाबत अधिक सजग बनले. ज्यामुळे ते कल्पकतेने त्यांच्या समाजाच्या आणि शहराच्या सद्य:स्थितीत सुधारणा करण्याकरिता उद्युक्त झाले. नागरी अस्मिता व मानवप्रेम हे पारशी समाजाचे मुख्य सूत्र आहे. ज्यांचा मुंबईच्या सांस्कृतिक, बौद्धिक आणि वैज्ञानिक सुधारणेच्या घडणीत महत्त्वाचा वाटा आहे.

पारशांच्या सामाजिक जाणिवेतून आणि मानव कल्याणाच्या भावनेतून त्यांच्या समाजातल्या धनाढ्य पारशांनी, ज्यांनी चीनबरोबरच्या व्यापारातून भरपूर धन कमविले, अनेक नागरी संस्थांची स्थापना केली आणि त्यांच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना उदारहस्ते देणग्या दिल्या. तसेच त्यांच्या आर्थिक बळाच्या आधारे अनेक शैक्षणिक संस्थांना, रुग्णालयांना, वाचनालयांना, संशोधनाला, धातू उद्योगांना, शेती संशोधनाला चालना मिळाली आणि वाहतुकीच्या व्यवस्थेत सुधारणा होऊन बाहेरच्या जगाशी जोडलेल्या संबंधांमुळे पारशी अधिक समृद्ध बनले. ज्यामुळे त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली.

आंतरराष्ट्रीय अर्थकारण विस्तृत करणाऱ्या भारतीय व्यक्तींमध्ये सर्वांत आधी नाव घेता येईल ते मुंबईच्या जमशेटजी जिजीभॉय यांचे. सन १७९९ आणि १८०७ या काळादरम्यान त्यांनी पाच वेळा चीनला भेट दिली. त्यांनी सुरुवातीला जेव्हा स्वत:चा व्यापार सुरु केला तेव्हा 'स्थिर बुद्धीचे' आणि 'प्रामाणिक व्यापारी' म्हणून मान्यता मिळविली. १८०७ नंतर त्यांनी मुंबईतूनच व्यापार नियंत्रित केला. कोलंबो, पेनांग, सिंगापूर, सयाम, सुमात्रा, चीन आणि इंग्लंड बरोबर मोठ्या प्रमाणात व्यापार केला. यात प्रामुख्याने कापूस व अफु यांचे विशेष व्यापारीसंबंध होते. सन १८१४ मध्ये जिजीभॉय यांनी 'द गुड सक्सेस' नावाचे पहिले जहाज खरेदी केले. त्या काळात त्यांचे उत्पन्न इतके वाढले होते की , त्यांनी 'द शार्लेट' आणि 'द अर्ल ऑफ

बालकारास' हे दोन मोठे जहाज विकत घेतले.[३९] त्यांना ह्या कामगिरीमुळे त्या वेळेसच्या सरकारकडून 'द मोस्ट एमिनंट ब्रिटीश सब्जेक्ट ऑफ इंडिया' या किताबाने सन्मानित करण्यात आले होते.[४०]

सन १७८६–१८५१ मध्ये जमशेटजी जिजीभॉय यांचे समकालीन फ्रामजी कोवासजी बनाजी यांना विज्ञान आणि वैज्ञानिक प्रयोगांच्या पुरस्काराने सन्मानित केले. बनाजी कुटुंबाने देखील चीन आणि दक्षिण–पूर्व आशियाशी व्यापार करून नाव कमाविले होते. सन १८३० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'बॉम्बे ॲग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी' चे फ्रामजी कोवासजी बनाजी हे कार्यक्षम सदस्य होते. त्यांना तीन प्रकारचे रेशीम तयार करण्यासाठी औरंगाबाद येथील संत्रे, निलगिरी, आणि बटाटे, बंगाल व सुरत येथून तांदूळ, ऊस, आले, चिनी हळद, मल्लाका येथील जाम, माझगांव येथील आंबे तसेच कारवारचे भुईमूग, अफु आणि अननस तयार करण्यासाठी बरीच बक्षिसे मिळविली होती.[४१] सन १८५१ साली फ्रामजी बनाजींचा मृत्यू झाला तेव्हा मुंबईत शोकसभेचे आयोजन केले त्या वेळी जमलेल्या त्यांच्या मित्रांनी व हितचिंतकांनी देशातल्या जनतेसाठी वैज्ञानिक ज्ञानाचे बाळकडू पाजण्यासाठी 'द फ्रामजी कोवासजी इन्स्टिट्यूट' या संस्थेची स्थापना करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला.[४२]

असे दिसून येते की जमशेटजी जिजीभॉय, फ्रामजी कोवासजी, अर्दासीर खुरसेदजी, वाडिया, कोवासजी दावर आणि दिनशॉ माणेकजी पेटीट हे पारशी समाजातील मान्यवर आहेत ज्यांनी मुंबई शहरावर आपला कायमचा ठसा उमटवला यांपैकी प्रत्येक जण त्यांनी केलेल्या विज्ञानातल्या, शिक्षणातील, आरोग्याच्या आणि मुंबई अंतर्गत व्यवस्थेच्या प्रगतीत महत्त्वाचा हातभार लावला.

झ) मुंबईतील पारशांच्या व्यावसायिक हालचाली

पारशांचे मुंबई शहराशी असलेले नाते अतिशय घनिष्ठ आहे. मुंबई शहर हे पारशी समाजाने संस्थात्मक आणि अंतर्गत विकासात दिलेल्या सहभागाचे तसेच शहराने स्वीकारलेल्या जीवनशैलीचे प्रमाण आहे.

१७व्या शतकात पारशी मुंबईत येण्यास सुरुवात झाली. ते किल्ल्याच्या तटबंदीचे काम करणारे मजूर होते. तसेच ते इतरही लहान कामे करीत होते, उदा.: दोर वळणारे कातरी

(टर्नर), सुतार आणि दुकानदार इ. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा सुरतपेक्षा मुंबईच्या बंदराला प्राधान्य देण्याच्या निर्णयामुळे मुंबईत एक गोदी बनविण्यात आली व तेथून मोठमोठी जहाजे तयार करून मालाची ने–आण सुरु झाली.

मुंबईतील नवीन गोदी विस्तृत होण्यासाठी कंपनीने सुरत जवळील सुवाली येथून एक जहाज बांधणारा सुतार म्हणजेच लावजी वाडिया यांना मुंबईत बोलावले. त्यांच्या आगमनाने बरेच पारशी मुंबईत स्थायिक होण्यासाठी प्रोत्साहित झाले. त्यांचे पहिले महत्त्वाचे काम म्हणजे 'टॉवर ऑफ सायलेन्स' आणि 'अग्निमंदीर' बनविणे हे होते. कारण मुंबईत पारशी रहिवाश्यांची संख्या वाढत होती.

पारशी कोणतीही परिस्थिती पटकन ओळखणारे असून, यशासाठी अत्यंत उतावीळ होते. त्यांच्याकरिता मुंबईत संधीची कवाडे उघडण्यात आली होती. पारशांनी पैशाला जीवनरेषा बनविले होते. त्यांच्या असे लक्षात आले की, सुरतसारखे मुंबईत मोघल अधिकाऱ्यांप्रमाणे सत्ता विरोधक नसून फक्त 'ईस्ट इंडिया कंपनी' चे व्यापारावर नियंत्रण होते.[४३] अशा प्रकारे मिळालेल्या संधीचा फायदा उचलून जेथे कंपनीचे आणि तिचे अधिकारी असत तेथे, पारशी व्यापारी जात आणि त्यांच्या प्रत्येक गरजा पुरविण्याकरिता तत्परता दाखवत.

मुंबईच्या गोद्या सर्व प्रकारच्या व्यापारांच्या केंद्रबिंदू बनल्या, आणि जेव्हा चीनबरोबरच्या व्यापाराला सुरुवात झाली तेंव्हा पारशी समाजाने तत्परतेने त्यात हात घातला. पारशांनी अफु आणि कापसाच्या व्यापारात जी प्रचंड संपत्ती कमावली ती पुन्हा शहराच्या विकासासाठी वापरली. मानव कल्याणात रस घेणाऱ्या पारशी व्यापाऱ्यांनी इस्पितळ, शाळा, आर्ट स्कूल्स, वैद्यकीय महाविद्यालये, भुयारी मार्ग, पाणी पिण्याच्या विहिरी, टॅन्क्स तसेच अनाथाश्रम बांधले. पारशांनी मुंबई शहराच्या अंतर्गत रचनेत मोठ्या प्रमाणावर हातभार लावला व मुंबई शहराला आपलेसे केले. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशाँ वाच्छा इत्यादींनी राजकीय स्वातंत्र्याचा, स्वयंचलित सरकारचा आणि आत्मनिर्भरतेचा पुरस्कार केला.[४४] मुंबई शहराला अचानक एक नवीन राजकीय अस्तित्व प्राप्त झाले आणि 'आधुनिक मुंबई' अस्तित्वात आली.

Of Chests Silks and Unfurled Sails

रेशमी कापडाचा जहाजाद्वारे व्यापार –

कॅन्टन हे बाहेरच्या जगाशी असलेल्या चिनी व्यापाराचे मध्यवर्ती केंद्र होते. चीनचा सम्राट हा परकीय प्रभावाबद्दल सावध असल्यामुळे त्याने चिन्यांचे परकिय प्रभावापासून रक्षण करण्याकरिता चिनी व्यापाऱ्यांना परकीयांशी व्यापार करता येईल यासाठी एक मार्ग काढला. व्यापार सुखकर होण्यासाठी त्यांनी पर्ल (Pearl) नदीकाठी 'फॉरेन कनेक्शन' एक जमिनीचा तुकडा अधोरेखित केला जेथे विविध देशातून आलेले व्यापारी, परकीय व्यापारी, दलाल राहून त्यांच्या कारखान्यात व्यापार करू शकत. त्या कारखान्याची मालकी कोहौंग्जच्या (Co-hongs) हातात होती. कोहौंग्ज म्हणजे, परकीय व्यापाऱ्यांबरोबर संबंध प्रस्थापित करण्याकरिता भव्य न्यायालयाने (Imperial Court) नियुक्त केलेले अधिकारी होय. ह्या व्यवस्थेत परकीय व्यापाऱ्यांच्या चीनबरोबरील व्यवहारांबद्दल कोहौंग्ज जबाबदार असत. परकीय व्यापाऱ्यांना व्यापारी हंगामाच्या काळात कारखान्यामध्ये राहण्याची परवानगी असे. परंतु हंगाम संपल्यानंतर त्यांना त्यांच्या मूळ बंदरावर जावे लागे. किंवा मकाउ येथे स्थलांतरीत व्हावे लागे.

वेगवेगळ्या कारखान्यांमध्ये राहणारे परदेशी व्यापारी हे इंग्लंड, फ्रान्स, भारत, पोर्तुगल, अमेरिका, डेन्मार्क आणि स्वीडन सारख्या देशामधून आलेले असत. अफु , नीळ, कापूस, बंदुकीची दारू म्हणून वापरण्यासाठी पोटॅशियम नायट्रेट आणि इतर अनेक प्रकारच्या वस्तू ते चीनमध्ये घेऊन येत व परततांना त्यांची जहाजे चहा व मोठ्या प्रमाणात चांदी घेऊन जात. ही चांदी रेशीम, चिनीमातीची भांडी व चिनी हस्तकलेच्या वस्तूंचा विक्रिची किंमत म्हणून मिळत असे.

अफुच्या व्यापारामुळे वसाहतींच्या अर्थकारणाला साहाय्य केले. तसेच चीनबरोबर व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना एक सामाजिक दर्जा व अगणित संपत्ती मिळवून दिली.[४५]

ट) काही मुंबईतील नामवंत पारशांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान –

पारशी आपल्या धर्मात कितीही गुंतले असले तरी त्यांनी जवळजवळ सर्वच क्षेत्रात आपला प्रभाव पाडला. जसे व्यवसाय, राजकारण, कला, क्रीडा, मनोरंजन त्याचप्रमाणे त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांनी भारतात पहिली राजकीय पार्टी निर्माण केली. तसेच शेअरबाजार,

लोखंड आणि स्टील कारखाना, सार्वजनिक रूग्णालये, विद्यापीठ, वृत्तपत्र छापखाना आणि सिनेमा इ. क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

सामाजिक राजकारणाशिवाय काही पारशांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. संबंधित माहितीतून हे स्पष्ट आहे की, पारशांनी सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून संपूर्ण देशात, समाजात आपला एक वेगळा असा ठसा उमटविला. त्यांनी ज्या–ज्या क्षेत्रात कामे केली तेथे त्यांना निश्चितच यश मिळाले.

१) **होमी क. भाभा** : होमी क भाभा हे ॲन. एफ रोथेनबर्गचे ह्युमॅनिटीज इंग्लिश विभागाचे प्रोफे सर होते तसेच महिंद्रा ह्युमॅनिटीजचे डायरेक्टर आणि राष्ट्रपतींचे ह्युमॅनिटीज विषयाचे मुख्य सल्लागार आणि हार्वर्ड विश्वविद्यालयाचे इंग्रजी या विषयाचे विभागप्रमुख होते. त्यांच्या कामातून त्यांनी वासाहतवादकालीन आणि वसाहतवादोत्तर काळाचा शोध घेऊन तसेच त्या काळच्या सांस्कृतिक बदलाचा आणि सर्वसमावेशकतेचा विचार केला.

२) **गुलाम ए. नादरी** : हे जॉर्जिया स्टेट युनिर्व्हसिटीत इतिहासाचे असिस्टंट प्रोफेसर होते. तसेच दक्षिण आशियातील इतिहास (१७ वे शतक ते १९ वे शतक) यावर त्यांचा गाढा अभ्यास होता. गुजरात आणि त्यांचे राजकीय अर्थकारण, सुरतचे समुद्रमार्गे व्यापार करणारे व्यापारी, पश्चिम भारतातील डचांचे अस्तित्व तसेच सुरतचे पारशी व्यापारी इ. विषयांवरील त्यांची प्रकाशने प्रकाशित झालेली आहेत. अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील गुजरातमधील पारशी समाजाचा व्यापार ह्यावरही त्यांचा अभ्यास होता.

३) **जेस पालसेठजी** : हे इतिहासाचे ग्वेल्फ (Guelph) विद्यापीठाचे प्रोफेसर होते. त्यांनी दक्षिण आशिया, ब्रिटिश वसाहतवाद आणि भारतातील पारशी जमातीच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. त्यांचे पारशी समाजाच्या जगाला असलेल्या ओळखीवर व अस्मितेवर, पारशी व्यापारांवर, अफुच्या व्यापारावर आणि त्यांच्या मानव कल्याणकारी स्वभावावर अनेक शोधनिबंध व पुस्तके प्रकाशित झाले आहेत.

४) **रशीद वाडिया** : यांचे एकोणिसाव्या शतकातल्या मुंबईच्या कापड गिरण्यांचा आर्थिक इतिहास ह्या विषयावर शोधनिबंध आणि लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांनी एकोणिसाव्या

शतकातील पारशी उद्योजकांवरही लेखन केले. रशीद वाड्या एक पारितोषिकप्राप्त व्यंगचित्रकार असून त्यांचे काम भारतात आणि भारताबाहेरही प्रकाशित झाले.

५) **फिरोज जे. वाडिया** : यांना भारतातले ब्रिटिश कलावंत या विषयाचे तज्ज्ञ मानण्यात येते. ते बी.ए. (ऑनर्स), बी.एड., एम.ए. (इंग्रजी साहित्य) आणि 'एशिएन्ट इंडियन कल्चर' ह्या विषयातून एम.ए. आहेत. 'रोहटगी' बरोबरची अनेक प्रकाशने त्यांच्या नावावर आहेत. तसेच 'इंडियन लाईफ ॲण्ड लॅण्डस्केप बाय वेस्टर्न आर्टिस्ट पेंटिंग ॲण्ड ड्रॉईंग फ्रॉम द व्हिक्टोरिया' आणि अल्बर्ट म्युझिअम '17th To The Early 20th Century' हे त्यांचे सर्वात अलीकडील पुस्तक होय. फिरोझा पुन्थकी मिस्त्री यांच्यासोबत त्यांनी 'A Zoroastrian Tapestry Art, Religion And Culture In 2002' ह्या पुस्तकाचे संपादन केले. तसेच आधुनिक भारतीय चित्रकलेचे ते तज्ज्ञ मानले जातात. त्यातून त्यांनी मुंबईत सन १९७१ मध्ये सिमरोझ आर्ट गॅलरीची स्थापना केली. तेव्हापासून त्यांना ब्रिटीश कारागिरांनी भारतीय माणसांच्या काढलेल्या प्रतिमांवरचे तज्ज्ञ म्हणूनही ओळखले जाते.

काही पारशांनी ब्रिटिश वसाहतवाद (कलोनीअल) रुल्सच्या काळापासून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यापैकी एक महत्त्वाचे नामवंत पारशी म्हणजे, **दादाभाई नौरोजी** होय. हे अर्थतज्ञ, राजकीय कार्यकर्ते तसेच युनायटेड किंगडम येथील 'हाउस ऑफ कॉमन्स' मध्ये निवड झालेले पहिले आशियायी होते. त्यांना भारतासाठी स्वातंत्र्याची सर्वांकरिता मागणी करणारी पहिली व्यक्ती म्हणून ओळखले जाते.

भारताचे पहिले प्राध्यापक

दादाभाईचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर मुंबई सचिवालयात त्यांना चांगली नोकरी मिळू शकली असती. परंतू दादाभाई एल्फिन्स्टन कॉलेजात गणित आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक झाले. ते भारताचे पहिले प्राध्यापक ठरले. जनतेने आणि सरकानेही मोठ्या उत्साहाने या नेमणुकीचे स्वागत केले. या सन्माननीय नेमणूकीबद्दल शिक्षणमंडळाचे त्या सर्वांनी मनापासून अभिनंदन केले. दादाभाईंनाही आपल्या आयुष्यातील ही घटना अभिमानास्पद वाटली. गणितातील प्राविण्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत वागण्याला आणि राजकीय निर्णयांना अचूकता आणि नेमकेपणा आला. चांगले काय, वाईट काय, चुकीचे आणि बरोबर हे बिनचूकपणे ओळखण्याचे कौशल्य त्यांना गणिताच्या अभ्यासामुळेच मिळाले.

- **स्त्रीशिक्षणाची मुहुर्तमेढ**

४ ऑगस्ट १८४९ हा दिवस स्टुडन्टस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटीचा संस्मरणीय दिवस ठरला आणि दादाभाई या संस्थेचे स्फूर्तिदाते होते. यास संस्मरणीय दिवशी पश्चिम हिंदुस्थानात विशेषतः मुंबई शहरात स्त्री शिक्षणाची प्रथमच मुहूर्तमेढ रोवली गेली. ते दिवस अज्ञान, अंधश्रद्धा, स्त्रियांची गुलामगिरी यांनी अंधारलेले होते. मुंबईचे त्या काळचे थोर पुरुष बाळशास्त्री जांभेकर आणि मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांनी बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना केली. जगन्नाथ शंकरशेठ त्या संस्थेचे मेंबर होते. त्यांनी आपल्या घराचा काही भाग शाळेसाठी मोफत दिला. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन अनेक सधन शिक्षणप्रेमी शिक्षणकार्यास मदत करण्यासाठी पुढे येऊ लागले. जसे, कामा कुटुंबातील चौघांनी हिंदू व पारशी शाळांसाठी आर्थिक व इतर सर्व प्रकारची मदत करण्याचे ठरविले. मुंबईचे उदार धनवान लोक शिक्षणाचे सुरू झालेले कार्य बंद पडू देणार नव्हते. या श्रीमंत लोकांच्या सहकार्यामुळे स्वयंसेवी शिक्षकांच्या मदतीस क्रमाक्रमाने पगारी शिक्षक नेमले जाऊ लागले. या शाळा योग्य तऱ्हेने चालतात हे पाहण्यासाठी शाळा तपासनीस नेमण्यात आले. फोर्टमधील शाळांचे सुपरवायझर स्वतः दादाभाई होते. या शैक्षणिक कार्याने मुंबईचे गव्हर्नर इतके प्रभावित झाले की, ते म्हणाले, हे मुंबई प्रांतात नवे युग सुरू झाले आहे. भविष्यकाळातील शैक्षणिक प्रगतीची मुळे या संस्थेत रुजली आहेत. ज्ञानप्रसारक मंडळ या संस्थेने ज्ञानप्रसाराच्या कार्यास या काळात जोरदार चालना दिली. या संस्थेच्या मराठी आणि गुजराथी शाखांनी प्रौढ शिक्षणाचा दूरवर प्रसार केला. दादाभाईनी मोठमोठ्या सभांमधून विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करून जनतेला जागृत केले. यामुळेच पुढे सामाजिक सुधारणांकडे लक्ष वेधणे त्यांना सोपे झाले आणि एकूण त्यांची जीवनपद्धतीच बदलली.

दादाभाईनी धार्मिक सुधारणांकडे लक्ष वळविले. प्रथम पारशी समाज सुधारून भारतीय स्त्रियांना अज्ञान अंधकारतून मुक्त करण्यास सुरुवात केली. पारशी समाजाने इराण देशातून पलायन केल्यानंतर हिंदू आणि मुसलमान समाजाबरोबर ते बाराशे वर्षे गुण्यागोविंदाने राहिले होते. या दिर्घकाळच्या सहवासामुळे हिंदू-मुसलमानांच्या बऱ्या वाईट रूढी, परंपरा, श्रद्धा पारश्यांच्याही दैनंदिन जीवनात आल्या आणि त्यांच्या सौराष्ट्रीयन पंथात त्या आपोआप आल्या. एल्फिन्स्टन शाळेत शिकलेल्या पारशी तरुणांनी सुधारणा सहज स्वीकारल्या, परंतु

बाकी अज्ञानी समाज बदलणे अवघड होते. अनेक पिढ्यांपासून चालत आलेल्या परंपरा सुधारणे महाकठीण काम होते.

१ ऑगस्ट १८५१ मध्ये राज्यदायन माज्यदायन ही सभा स्थापन झाली. फर्दुंनजी या उदारमतवादि नेत्याची या सभेच्या अध्यक्षस्थानी योजना झाली व दादाभाई या संस्थेचे सचिव झाले. समाजातील जुन्या टाकाऊ रूढी आणि परंपरा सोडण्यास समाजातील ज्येष्ठ मंडळी तयार नव्हती. त्यांना तोंड देण्याची जबाबदारी अध्यक्ष आणि सचिवांवरच आली. फर्दुंनजी निर्भय सामाजिक व राजकीय लोकप्रिय कार्यकर्ते होते. अखेरीस दादाभाईंनी चिकाटीने केलेल्या प्रयत्नांना यश येऊ लागले. जनतेला बरे–वाईट काही कळत नव्हते. लोकांना राजकीय समजच आली नव्हती. आपले सरकार म्हणजे काय हेही कळत नव्हते,भयानक दारिद्र्याने लोक गांजले होते. सर्वत्र अज्ञान, अंधकार होता. राजकीय हक्क आणि कर्तव्यापासून ते दूर होते. आपले सरकार बदलले पाहिजे ही जाणीव त्यांच्या कल्पनेपलीकडची होती. त्या काळात दादाभाईंचा निश्चय झाला की, हिंदूस्थानात चळवळ सूरू केली पाहिजे व आवाज उठविला पाहिजे.

- **इंग्लंडला प्रयाण**

कापसाचा परदेशी व्यापार करणारी कामा कंपनी भारतामध्ये अग्रगण्य होती. १८५५ मध्ये कामांना आपल्या व्यापारी कंपनीची शाखा लिव्हर–पूलमध्ये सुरू करावयाची होती. इंग्लंडमधील ती पहिलीच भारतीय व्यापारी कंपनी होती. दादाभाईंनी आपल्या कंपनीत भागीदार व्हावे असे वाट्त होते. सामाजिक आणि राजकीय कार्यात धडाडीने काम करणारा हुशार संघटक व कार्यकुशल भागीदार मिळावा अशी त्यांची अपेक्षा होती. या गणिताच्या प्राध्यापकाला व्यापारातला अनुभव नसला तरी त्यांना परिस्थितीचे आकलन असून दूरदृष्टी आहे, असे कामांना वाटत होते. प्रोफेसर दादाभाईंनी एल्फिन्स्टन कॉलेजातली प्रतिष्ठेची नोकरी सोडून इंग्लंडला जायचे ठरविले.

भारतीयांसाठी भारत ही दादाभाईंची घोषणा होती आणि या घोषणेला ब्रिटीश जनतेचा पाठिंबा मिळावा अशी दादाभाईंची इच्छा होती. त्याचबरोबर भारतातून इंग्लंडमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी किंवा बॅरिस्टरच्या अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथे आश्रय मिळावा, भारतीय विद्यार्थ्यांना स्पर्धा करता यावी यासाठी दादाभाईं प्रयत्नशील होते. भारतीय विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम रुजविण्यासाठी आपल्याला इंग्लंडमध्येच चळवळ करणे आवश्यक आहे हे

दादाभाईं ओळखून होते. कारण भारतात अशी चळवळ ब्रिटीश सरकार दडपून टाकेल अशी दादाभाईंना खात्री होती. आपल्या विचारांना पाठिंबा देणारे थोर इंग्रज विचारवंतांचेही आपल्याला येथे साह्य मिळू शकेल. म्हणून या व्यापारी कंपनीच्या माध्यमातून इंग्लंडला जाणे गरजेचे आहे. तसेच व्यापार, राजकारण असा दादाभाईंचा प्रगल्भ पितृत्व आले आणि ते भारतीय राष्ट्रवादाचे पहिले प्रवर्तक ठरले.

- **अनीतीच्या व्यापारास रामराम**

केवळ कामा कंपनीचे इंग्लंडमध्ये भरभराट होणे एवढेच दादाभाईंचे उद्दीष्ट नसून संपूर्ण भारताचाच व्यापारव्यवसाय तेथे भक्कम पायावर उभा करावा हे त्यांचे खरे राष्ट्र उद्दीष्ट होते आणि येथेच सहकाऱ्यांशी दादाभाईंचे मतभेद सुरू झाले. दादाभाईंनी स्वतः रात्रभर जागून स्वतः रिळातील सुताची लांबी मोजून पाहिली व ते १०० ऐवजी ८० फूटचे भरले याची त्यांना खात्री झाली. हे रीळ आपण नाकारले पाहिजेत यावरून कामा व त्यांच्यात वाद निर्माण झाले. हाच प्रकार पुन्हा पुन्हा घडू लागल्यावर मात्र दादाभाईंनी कंपनीशी केलेला भागीदारीचा करार संपुषटात आणण्याचे ठरविले.

इंग्लंडच्या मुक्कामात दादाभाईंचे मन आधुनिक विचारांनी प्रगल्भ झाले आणि मनाशी काही ध्येय बाळगून ते मायदेशी परतले. दादाभाईंचे मन इंग्लंडमधील लोकांची सामाजिक, राजकीय आणि संपन्न आर्थिक परिस्थिती आणि भारतीय लोकांची सामाजिक विषमता, राजकीय गुलामगिरी आणि आर्थिक दारिद्र्य यांचा विचार करतांना व्याकूळ होत असे. त्याचवेळी ब्रिटीश जनतेच्या न्यायप्रियतेने आणि सुसंस्कृत वागण्याने दादाभाई आशावादी झाले होते. त्यांची अशी खात्री झाली होती कि, हिंदुस्थानातील अन्यायकारी, जुलमी सरकारला इंग्लंडमधील लोक निश्चितपणे राज्यकारभार सुधारण्यास भाग पाडतील. भारतातील जुलमी प्रशासनाबद्दल केवळ हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये भारताबद्दल सहानुभूती असणाऱ्या मूठभर इंग्रज राजकारण्यांनी आवाज उठवुन भागणार नाही, ब्रिटनमधल्या आम जनतेची सहानुभूती मिळवावी लागेल.

- **नीतीपूर्ण उद्योग व व्यापाराची उभारणी**

१८५९ मध्ये दादाभाईंनी स्वतःच इंग्लंमध्ये 'दादाभाई नौरोजी आणि कंपनी' स्थापन करून स्वत:चा उद्योग सुरू केला. त्यांनी जगाला असे दाखवून दिले की, प्रामाणिकपणे

नीतिमत्तेने व्यवसाय करून देखील भरभराट होऊ शकते. खरा उद्योजक विवेकभ्रष्ट कधीच होत नाही. नीतिमान नागरिक म्हणून इंग्रज लोक त्यांच्याबद्दल आदर बाळगू लागले. त्यामुळेच ते क्लिलन इन्शुरन्स कंपनीचे संचालक झाले व १८६२ मध्ये औद्योगिक प्रदर्शनाचे विश्वस्त झाले. माउंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांच्या चिरंतन स्मरणार्थ आणि जगन्नाथ शंकरशेठ यांच्या नावे मुंबईत मोठा निधी उभारून प्राचार्य हार्कनेस यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला; तसेच एल्फिस्टन शिक्षण संस्थेसाठी संस्कृत पुस्तकाचे ग्रंथालय सुरू केले. इंग्लंडमधील पारशी लोकांसाठी निधी जमा केला. मुंबईतील पारशी मुलींच्या इंग्रजी शिक्षणासाठी सहायक निधी जमा केला. लिव्हरपूलमधील तत्त्वचिंतन आणि वाङ्मयीन कार्य करणाऱ्या संस्थांचे स्वतः सभासद झाले. अत्यंत आदरणीय व्यक्ती म्हणून दादाभाईंचा संपूर्ण इंग्लंडमध्ये दबदबा निर्माण झाला.

'मँचेस्टर कॉटन सप्लायर असोसिएशन'चे सभासद म्हनून दादाभाईंनी कापूस व्यापार करणाऱ्या संघटनांचा अभ्यास केला व इंग्लंडला कापसाचा पुरवठा करणाऱ्या व्यापारी संघटनेच्या सभेत अभ्यासपूर्ण प्रबंध वाचला. त्याचवेळी मुंबईचे व्यापारी आणि भांडवलदार यांच्या लक्षात आले की, लँकेशायरच्या व्यापराऱ्यांच्या कापडनिर्मिती व्यवसायाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्याशिवाय ते स्पर्धेत टिकाव धरू शकणार नाहीत. कच्च्या् मालाची खरेदी व पक्क्या मालाची विक्री यात नफा मिळविणे हे तर उद्योजकांचे कौशल्य आहे.

कापूस व्यवसायात नावाजलेल्यांमध्ये सॅम्युअल स्मिथ हे दादाभाईंच्या फर्मशी निगडित असलेले अत्यंत विश्वासू गृहस्थ होते. व्यवसायातून त्यांची कायमची गाढ मैत्री जमली. ते 'हाऊस ऑफ कॉमन्स'चे दीर्घकाळ सभासद असल्यामुळे स्वतःच्या राजकीय कार्यात ती मैत्री फार उपयुक्त ठरली.

- **इंग्लंडमधील चळवळ**

प्रोफेसरची उत्तम प्रकारची नोकरी सोडून कामा कंपनीच्या सहकार्याने इंग्लंडमध्ये व्यापार सुरू करण्यामागे दादाभाईंचे धोरण वेगळेच होते. आपल्या भारतीय देशबांधवांची आर्थिक आणि राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी तेथे काहीतरी करता येईल, अशी त्यांची धारणा होती. व्यापार हे आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी त्यांनी एक साधन मानले.

गव्हर्नर जनरल वेलस्लीच्या काळापासून भारतीयांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणे अवघड झाले होते. ब्रिटीश लोक व ब्रिटीश पार्लमेंट यांचे भारतीय राजकीय व्यवस्थेकडे लक्ष

वेधणे हे ध्येय दादाभाईंनी निश्चित केले होते. देशातील जनतेचे एकमेकांबद्दलचे गैरसमज दूर करता आले तर ते एकमेकांचे विरोधक बनण्याऐवजी कायमचे मित्र होऊ शकतील अशी दादाभाईंची भावना होती.

दादाभाईं इंग्लंडमध्ये स्थिर होत असतांनाच १८५७ साली प्रचंड वादळ निर्माण झाले. इंग्रजांच्या विरोधात हिंदी सैनिक, संस्थानिक व जहागीरदार असे युद्ध सुरू झाले. इंग्रजांच्या बाजूने लढणारेही हिंदी सैनिकच होते. त्यांची संख्या अडीच लाख असून फक्त ४५ हजार गोरे अधिकारी होते. दोन्ही बाजूने भयंकर रक्तपात झाला. दोन्ही बाजुचे हिंदी सैनिक लाखांच्या आसपास ठार झाले. युद्ध का सुरू झाले व त्याचा शेवट कसा झाला हे सर्वश्रुत आहे. पण त्यातील क्रौर्याने दादाभाईंचे हृदय पिळवटून गेले व हिंसेचे दुष्टचक्र थांबलेच पाहिजे, असे त्यांनी ठरविले. त्यावर अहिंसा हाच उपाय आहे असे त्यांना वाटले. युद्ध थांबल्यावर ब्रिटीश सरकाने कंपनी सरकारकडून सत्ता काढून महाराणीच्या आधिपत्याखाली ब्रिटीश पार्लमेंटकडे सोपविली. त्यावेळी महाराणी व्हिक्टोरियाने १८५८ साली जाहिरनामा प्रसिद्ध केला.

- **ईस्ट इंडिया असोसिएशन :**

ब्रिटीश वसाहतीतील प्रजेसंबंधी विशेष माहिती देण्यासाठी हे असोसिएशन एक चांगले व्यासपीठ मिळाले. असोसिएशनच्या बैठकीमध्ये दादाभाईं अभ्यासू आणि वजनदार व्यक्ती म्हणून ओळखले जाऊ लागले. १८६७ मध्ये त्यांनी ब्रिटीश इंडिया असोसिएशनच्या सभेत भारतासंबंधी इंग्लंडचे कर्तव्य हा प्रबंध वाचला. त्यात त्यांनी तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले ब्रिटीशांचे हिंदुस्थानवरील राज्य हिंदुस्थानसाठी आणि इंग्लंडसाठी फायद्याचे आहे काय? ते राज्य अधिक काळ टिकण्यासाठी काय उपाययोजना अंमलात आणल्या काय? ब्रिटीश राज्यामुळे हिंदुस्थानात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण झाली. त्याचबरोबर इंग्लंडही सामर्थ्यवान श्रीमंत राष्ट्र झाले. हिंदुस्थानातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे सतत चालु आहे, पण स्वतःच्याच देशात शासनव्यवस्थेत हिंदी लोकांना मात्र संधी दिली जात नव्हती.

दादाभाईं नौरोजी यांच्या 'पॉव्हर्टी ॲण्ड अनब्रिटीश रूल इन इंडिया' या पुस्तकात हिंदुस्थानच्या वाढत्या गरिबीला ब्रिटीश राज्यकर्तेच कारणीभूत आहेत असे लिहिले आहे. हिंदुस्थानचा वाढता व्यापार, सोन्याची वाढती आयात आणि जमिनीच्या वाढत्या किंमती यावरून हिंदुस्थानची आर्थिक भरभराट होत हाती. हिंदुस्थानची आर्थिक भरभराट ही तेथील

लोकांची मजुरी व पगार यावरून ठरविली पाहिजे, शिवाय रुपयांची कमी झालली किंमत, लोकांचे दिवसेंदिवस घसरणारे राहणीमान . दादाभाईंनी असे सिद्ध करून दाखवले की, ब्रिटीशांच्या राज्यात हिंदुस्थानची गरिबी सतत वाढते आहे. बहुसंख्य लोकांना उत्पन्नाचे काहीही साधन नाही. परिणामी हजारो लोक उपासमारीने,रोगराईने मरतात. प्राथमिक शिक्षण दिले जात नसल्यामुळे अज्ञान अंधकारात ते लोक चाचपडत असतात. दादाभाईंनी आपल्या पुस्तकात हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे. भारतीयांच्या सर्व दुःखांना ब्रिटीश राज्यकर्तेच जबाबदार आहेत हाच त्यांचा सिद्धांत आहे.

दादाभाईंनी भारत सरकार मंत्र्यांकडे नवा प्रश्न उपस्थित केला तो म्हणजे आय. सी. एस. सारख्या स्पर्धा परीक्षा भारतीयांसाठी खुल्या केल्या पाहिजे आणि त्या परीक्षा इंग्लंडप्रमाणेच भारतात घेतल्या पाहिजेत. सर हर्वर्ट स्पेन्सर यांनी तर इंग्लंडमध्ये स्पर्धा परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी असे सुचविले . अशा रितीने अनेक सभासदांनी वेगवेगळ्या सूचना केल्या.ा

ब्रिटीश लोकसभेने या सूचना मान्य कराव्यात म्हणून दादाभाईं अनेक खासदारांना भेटले. त्यापैकी हेन्री फॉसेट पार्लमेंटच्या संमतीसाठी सूचना मांडली की, लंडन, कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे एकाचवेळी आय. सी. एस. ची परीक्षा द्यावी. फॉसेटच्या ठरावला पाठिंबा देण्यासाठी दादाभाईंनी इंग्लंड इंडिया असोसिएशनच्या सभासदांचा पाठिंबा मिळवला.

दादाभाईंच्या मते हिंदी तरुणाला हिंदुस्थानात सनदी नोकरी नाकारणे म्हणजे इंग्लिश माणसाला इंग्लंडमध्ये सनदी नोकरी नाकारण्यासारखे आहे. सनदी नोकरीच्या निमित्ताने हिंदी माणूस आणि इंग्रज माणूस यांना एका पातळीवर आणण्याचा दादाभाईंचा हेतू होता.

- **दादाभाईं भारतीयांचा बुलंद आवाज**

१८७० मध्ये शेकडो कोटी रुपये हिंदुस्थानात रेल्वे–रस्ते बांधण्यासाठी सरकार खर्च करणार होते. सर ऑर्थर कॉटन यांनी सरकारला इशारा दिला की, रेल्वेसाठी होणारा कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यापेक्षा त्यांनी सुचविलेल्या जलसिंचनाच्या योजना सरकारने तातडीने हाती घेतल्या पाहिजे.

- **इंडिया नियतकालिकाचे संपादन**

दादाभाईं इंग्लंडमध्ये स्थिर झाल्यानंतर लंडनमध्ये ब्रिटीश असोसिएशनच्या बैठका होत. त्यात हिंदुस्थानच्या राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल चर्चा होत असे. ती माहिती इंग्लंडमधील आणि हिंदुस्थानातील जाणकार लोकांना कळावी म्हणून इंडिया नियतकालिक सुरू करण्यात आले. या काळात दादाभाईंना जॉन ब्राइट व हेन्री फॅसेट यांचे चांगले सहकार्य मिळाले. स्वतः दादाभाईंच इंडिया नियतकालिकाचे संपादक होते. त्यात हिंदुस्थानातील शेतीची दुरवस्था, आर्थिक दैन्य, बुडत चाललेले उद्योगधंदे, दुष्काळाची भीषणता आणि सरकारचे त्याकडे होणारे दुर्लक्ष याची माहिती दिली जाई. हिंदुस्थानातील इंग्रज सरकारचे जाचक कायदे, प्रशासनाचा अनाठाई होणारा खर्च याची सखोल माहिती त्यात असे. हे सर्व इंग्लंडमधील न्यायप्रिय व लोकशाहीवादी लोकांना लांच्छनास्पद आहे. अशी टीकाटिपणी संपादकियात केलेली असे. हे नियतकालिक इंग्लंडमधील लोकांना व हिंदुस्थानातील जाणकार लोकांना मोफत देण्यात येत असे.

इंडिया साप्ताहिकातील काही लेख, सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक आणि बंगालमधील वृत्तपत्रात पुन्हा प्रसिद्ध केले जात. इंडिया साप्ताहिकाच्या प्रचारामुळे इंग्लंडमधील लोक जागृत होऊन पार्लमेंटर दडपण आणून हिंदुस्थानसाठी सवलती मिळवित.

- **कृतज्ञतापूर्वक आभार**

सार्वजनिक बाबीसंबधी उपहासाने टीका करणारे दादाभाईं, सरकारी प्रशासन व्यवस्थेसंबंधी झोंबणारी टीका करणारे दादाभाई, सरकारी अधिकाऱ्यांची मग्रुरी आणि बेपर्वाई यासंबंधी टीका करतांना मात्र कडवटपणापासून दूर राहिले. त्यांची तीव्रतेने मनापासून काम करण्याची वृत्ती, पारदर्शक प्रामाणिकपणा, निःस्वार्थी वृत्ती, समजूतदारपणा आणि नम्रता यामुळे त्यांच्या भाषणांना विशेष झळाळी होती. यामुळे ब्रिटीश प्रशासनावर तीव्र टीका केली असली तरी दादाभाईंनी भारतातील ब्रिटीश समाजाकडून कौतुक संपादन केले होते. या कणखर देशभक्ताने आपली बुद्धी आणि वेळ अर्पण करून भारतीय जनतेला त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि इंग्लंडमधील लोकांना त्यांच्या कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणीव करून दिली.

- **जाचक कापूस भेसळ कायदा रद्द**

दादाभाईं सार्वजनिक जीवनामध्ये कृतिशील होते. दादाभाईंमुळे ब्रिटीश इंडियामधील लोकांच्या आशा आणि आकांक्षा पल्लवित झाल्या. त्याचप्रमाणे त्यांच्या राजकीय दौऱ्यामुळे हिंदुस्थानातील संस्थानिकांमध्येही जागृती निर्माण झाली. दादाभाईंचा प्रभाव देशभर पडला. आदराच्या भावनेने लोक भारावून गेले होते. त्यांचे सामर्थ्य, प्रामाणिकपणा आणि देशभक्तीच्या कळकळीने सरंजामदारांमध्ये जागृती निर्माण केली. त्यांच्या प्रचारामुळे सार्वभौमसत्ता आणि राजेरजवाडे यांच्यामध्ये सन्मानपूर्वक संबंध निर्माण झाले.

इंग्लंडमध्ये असोसिएशनच्या बैठकीत मुंबईतील कापूस भेसळ प्रकरणावर चर्चा करण्यासाठी हिंदुस्थानातील मोठमोठे व्यापारी एकत्र आले होते. कापसाची भेसळ होऊ नये म्हणून बॉम्बे कापूस भेसळ कायदा १८६९ याप्रमाणे कापसाची भेसळ करणाऱ्यास शिक्षेची तरतूद होती. त्यावेळच्या प्रबंधात दादाभाईंनी असा युक्तिवाद केला की, १८६९ च्या कापूस भेसळ कायद्याने कडक शिक्षेस पात्र असलेली अशी एकही घटना घडलेली नव्हती. बैठकीतील चर्चेतून अपेक्षित परिणाम झाला आणि व्यापाऱ्यांना जखडून टाकणारा कायदा मागे घेण्यात आला.

- **अनीतीचा व्यापार**

भारतमंत्री लॉर्ड हार्टिंग्टन यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारात दादाभाईंनी एका निवेदनपत्रकात हिंदुस्थानच्या स्थितीबद्दल असे लिहिले की, अफूच्या व्यापाराच्या घटनेमुळे ब्रिटीश सरकारची नैतिकता लयास गेली आहे. सुसंस्कृत आणि मानवतावादी ब्रिटीश राष्ट्र चीन मधील असंस्कृत सत्तेवर अफू घेण्याची बळजबरी करीत आहे. इंग्लंडमध्ये अफू औषधांमध्ये वापरण्यासाठी फक्त केमिस्टस् घेत. याउलट एका प्रचंड मानववंशाला व्यसनाधीन करून त्याचा नैतिक अधःपात करणारा अफूचा व्यापार इंग्लंडच्या डोक्यावरचे पाप असून हिंदुस्थानला शाप आहे; कारण हिंदुस्थानचा त्या व्यापारात सहभाग आहे. अफूचे उत्पादन हिंदुस्थानात होत असे. ब्रिटीश साम्राज्यातील हिंदुस्थानात सरकारला अफूची लागवड,उत्पादन आणि विक्री करणे याची मक्तेदारी होती. अफूचे प्रत्येक झुडूप वाढविण्यासाठी लायसेन्स लागत असे. लागवड करणाऱ्यास लागवडीसाठी सरकारकडून आर्थिक मदत मिळत असे आणि ते पीक निश्चित ठरवलेल्या किंमतीत विकत घेतले जाई. त्यापासून मादक पदार्थ चीनमधील व्यापारासाठी तयार करून

लिलाव पद्धतीने कलकत्याला विक्री करण्यात येत असे. त्या नफ्याने इंग्रज व्यापाऱ्यांचे खिसे भरले जात. या व्यापाराविरुद्ध इंग्लंडमध्ये लोकभावना बंड करून उठल्या. पण सरकारने आपली असमर्थता व्यक्त केली व अफूवरील अबकारी कर आणखी वाढविला .

- **सोसायटी फॉर द सप्रेशन ऑफ दि ऑपियम ट्रेड**

अफूच्या व्यापाराविरुद्ध मोहीम चालविणाऱ्यांना पार्लमेंटमध्ये मध्ये थोडेफार यश मिळाले. त्यावेळी पार्लमेंटमध्ये असा ठराव पास करण्यात आला की, ज्या पद्धतीने हिंदुस्थानात अफूचा महसूल वाढविण्यात आला होता, ती नैतिकदृष्ट्या अक्षम्य होती. सरकारने अफू झुडपांच्या लागवडीस लायसेन्स देणे थांबवावे आणि ब्रिटीश इंडियामध्ये अफूच्या विक्रीस बंदी असावी. फक्त औषधात अफू वापरण्यासाठी कायदेशीर परवानगी असावी. त्याचवेळी असेही ठरविण्यात आले होते की, हिंदुस्थान सरकारने ब्रिटीश हिंदुस्थानात व हिंदी संस्थानात तयार झालेल्या अफूच्या व्यापार होऊ नये यासाठी उपाययोजना करावी. प्रगती जरी समाधानकारक असली तरी दादाभाई मनातून नाराज होते, कारण हिंदुस्थानच्या खऱ्या तक्रारीकडे अफूविरोधी नेत्यांचे दुर्लक्ष झाले होते.

जून १८९२ मध्ये हाउस ऑफ कॉमन्समध्ये अफूचा प्रश्न पुन्हा उपस्थित करण्यात आला. तेव्हा खासदार दादाभाईंनी अतिशय कळकळीने आपले म्हणणे मांडले. अफूचा व्यापार हिंदुस्थानला आणि इंग्लंडलाही शाप आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

- **मद्य मुक्त हिंदुस्थान**

दादाभाईंना आपल्या हयातीतच हिंदुस्तान मद्यमुक्त करावयाचा होता. राजकारणातले त्यांचे मित्र व सहकारी डब्ल्यू. जी. केन कार्यकर्ते होते. १८८८ मध्ये त्यांनी हिंदुस्थानात अनेक शाखा असलेली दारूपान विरोधी संघटना ब्रिटनमध्ये स्थापन करावी. त्याप्रमाणे दि अँग्लो इंडियन टेम्परन्स असोसिएशन या संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. त्या संस्थेचे अध्यक्ष होते सॅम्युअल स्मिथ. संस्थेच्या सुरुवातीपासून दादाभाई अनेक सभासदांपैकी एक कृतिशील सभासद होते. नॅशनल टेम्परन्स असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन चे सहकार्य त्यांनी मिळवले होते. मद्यापासून मुक्त होण्याची उत्साहाची लाटच त्यावेळी हिंदुस्थानभर पसरली.

- **मद्यपानावरचा धक्कादायक खर्च**

टेम्परन्स असोसिएशनने हाउस ऑफ कॉमन्समध्ये एक ठराव आणला की, अबकारी प्रशासनात परिणामकारक सुधारणा कराव्यात. दारू पिणाऱ्यांचा नैतिक अधःपात होतो हे स्पष्टपणे दिसते. गुन्हे, गरिबी, रोग आणि मृत्यू ही त्यांची फळे आहेत. दारूमूळे झालले आर्थिक अरिष्ट इतक्या सहजपणे लक्षात येत नसे. १८९१ मधील दारू विरोधी चळवळीच्या एका सभेमध्ये दादाभाईंनी आकडेवारीसह ते दाखवून दिले. जसे ,इंग्लिश लोकांचा दारूचा वार्षिक खर्च १३ कोटी पौंड असे. याचा अर्थ असा की, एवढ्या पैशातून संपुर्ण इंग्लंडचा वर्षभर ब्रेड ७० लाख पौंड, बटर व चीज ३५ लाख पौंड, दूध ३० लाख पौंड एवढा पुरवठा होऊ शकेल किंवा तेवढ्याच रकमेपासून संपुर्ण इंग्लंडच्या सर्व लोकांना वर्षभर संपूर्ण घरभाडे ७० लाख पौंड इतके भरता येईल आणि वुलन, कॉटन आणि लिननचे कपडे ६० लाख पौंड किंमतीइतके पुरवता आले असते.

- **हिंदू बंधुभाव संघटना**

लंडनमधील टेंपरन्स असोसिएशनच्या वार्षिक मिटींगमध्ये पास केलेल्या ठरावाचा पाठपुरावा करण्यासाठी लंडनमधील हिंदी रहिवासी आणि विद्यार्थी यांनी वेस्ट मिन्स्टर हाउस हॉल मध्ये दारू न पिणाऱ्या हिंदी बांधवांची संघटना स्थापन केली. या संघटनेचा एक आशादायक आणि परिणामकारक मार्ग म्हणजे दारू पिण्याच्या व्यसनापासून उगवत्या पिढीला परावृत्त करणे आणि त्या व्यसनाचा नाश करणे. हिंदू बंधुभाव संघटनेचे उद्घाटन झाले आणि दादाभाई संघटनेचे अध्यक्ष निवडले गेले. [४६]

संदर्भग्रंथ सूची

1. James Dauglas, Bombay and Western India: A Series of Stray Papers. (Delhi : K.K. Book Distributor 1975)

2. Karaka, Vol. II P.P. 9-11, 18-38-40,53-65,70-77,253-62; B.B. Patell, The Parsee Patells of Bombay, their service to the British Government. (Bombay English & Gujarati Job Printing Press, 1876), P.P.5-7

3. Parcival Spear, the Nabobs: A study of the Social life of English in Eighteenth Century.

4. R.A. Wadia, the Scious of Lowjee Wadia. (Bombay: Krishnamurthy at the Godrej Memorial Printing Press, 1964), Page no.3, R.K Kochhar- " Shipbuilding at Bombay,' Current Since, 94 , Page no. 965-69

5. Divekar " Regional Economy', Page no. 350

6. Patell, Parsi Prakash Vol. I , Page no.17

7. Dougles, Page no. 31, Seervai & Patell, Page no. 252, David History of Bombay: University of Bombay, 1973, Page no. 136, John Fryer, in a letter written on 16-jan 1675, in R.B. Paymaster, Early History of the Parsees in India (Bombay 1954), Page no. 48 , 49

8. Seervai & Patell, Page no. 247-51(1998): M.J Giara, Global Directory of Zoroastrian Fire Temples (Bombay : Jenaz Printers, 2002), Page no. 1-60

9. Karaka, Vol.II, Page no. 5

10. Michael Greenberg, British Trade and the opening of china, 1800-42 (Cambridge: Cambridge University press Alan Le Pichon, China, Trade & Empire Jaradine, Mathesan & co. & the origins of British rule in Hong Kong, 1827-1843 (Oxford: Oxford University Press 2006).

11. Jesse S. Palsetia, " The Parsis & the opium Trade in china,' Contemporary Drug Problems, 35 (winter 2008), Page no. 647-78

12. Seervai & Patell, Page no. 254,

13. Karaka, Vol.II, Page no. 57

14. C.J.Jehangir, Life of Sir Cowasji – Jehengir, (Londeoseon: London Stereoscopic & Photographic Co. 1690), Page no. 9. W.H. Coates, The old country trade of the East Indies. (London: 1911) , Page no. 51

15. K.N. Vaid, The Overseas Indian Community in Hongkong, (Hong Kong centre of Asian studies, University of Hongkong, 1972), Page no. 53

16. Karaka, Vol.II, Page no. 49-55

17. See ref. No. 16, Page no.54-55

18. Jasleen Dhamija, "Regional Weaves of India,' in Handwoven Fabrics of India, edited by Jasleen Dhamija and Jyotindra Jain, Ahmedabad, Mapin publishing Pvt., Ltd., 1989, Page no.119-20

19. See ref. No. 18

20. A.B. Trivedi, " The Silk Weaving Industry of Surat ,' Journal of the University of Bombay, vol.X, part-IV, (1942) page no. 105-19, John Gray, Woven Cargoes ; Indian Textile in the East (London; Thames and Hudson, 1938) page no. 28-8, kalpana Desai, "The Tanchoi and Garo; Parsis Textiles and Embroidery, in a Zoroastrain Tapestry; Art, Religion and Culture edited by Pheroza j. Godrej and Firoza Punthakey Mistree. Ahmedabad Mapin Publishing Pvt. Ltd. 2002, Page no. 577-603

21. Anne E. Wardwell and C.Y.Wali- james, when silk was gold; Central Asian and Chinese Textiles New York, Metropolitan Museum of Art New York 1997; Agarwal, page no. 40,41,56-65, Lokika Varadaraja "Of silks and Embroidery"; Indo-portuguese Textiles; Vol-XXXV (3) , (1981-82), Page no. 89-96

22. Firoza Punthaky Mistree and Pheroza J. Godrej, " Style and Elegance; parsi Costumes in the 18th and 19th Centuries," In a Zoroastrain Tapestry Art, Religion and culture. Edited by pheroza J. Godrej & Firoza punthakey Mistree, Ahmedabad, Mapin Publishing Pvt. Ltd. 2002, Page no. 614

23. Jesse S.Palsetia , The Parsis Of India; Preservation of Identity in Bombay City, Brill, Leiden, 2001 Page no. 11-55, Pissurlerkar, Portuguese records in Rustomji Manochji, The Parsi Broker of; Surat Nova Goa 1933 Stephen M. Edwards, The Rise of

Bombay; A retrospect, Bombay 1902, David L. White ,' Parsis in the Commercial World of Western India, 1700-1750. " The Indian Economic & Social History Review, Vol. 24, No.II, 1987, Page no. 183-203

24. Ghulam A. Nadri, " Maritime- Merchants of Surat, A Long Term Perspective.' Journal of the- Orient, Vol. 50, Page No. ,2,3,2007, Page no. 239,240

25. Ghulam A. Nadri, Eighteenth- Century Gujrat; The Dynamics of its Political Economy, 1750 – 1800, Leidan, Brill, 2009, Chapter 3

26. R.J.F. Sulliran, one Hundred Years of Bombay; History of the Bombay- Chamber of Commerce, 1836-1936 (Bombay; Bombay Times of India Press; 1937), Page no.10.

27. M.D. Morris, The Growth of large-Scale Industry to 1947 , "In the Cambridge Economic History of India," Vol-2c, 1700-1970 (Cambridge; Combridge University press, 1983), Page no. 552-676

28. S.M. Rutnagar, Bombay Industries The Cotton mills. (Bombay Indian- Textile, Journal, 1927), Page no. 9,10; S.D. Mehta, The cotton mills of India, 1854 to 1954 (Bombay: Textiles Association India 1954) Page no. 13-15, Karaka,Vol. II, Page no. 136-37

29. Tansen Sen, Buddhism, Diplomacy & Trade; The realignment of Sino-Indian Relation 600-1400, University of Hawaii Press, 2003; Sucheta Mazumdar, Sugar & society in China, Peasants, Technology & the World Market, Harvard University Press, 1998.

30. Amalendu Guha , " Parsi seths as Entrepreneurs 1750-1850," Economic & political weekly Vol. No. 35, 1970, 77 M. 107-15; Amalendu Guha," Comprador role of Parsi Seths, 1750-1850." Economic & Political weekly, Vol.no. 48, 1970 Page no. 1933-36

31. Kalpana Desai, "The Tanchoi & the Garo: parsi Textiles & Embroidery A Zoroastrian Tapestry , Art Culture & Religion, etc. Pheroza, Godrej, Punthanakey Mistree, Mapin Publishing, 2002, Page no. 576-603"

32. Jan Van der Putten, "Wayang parsi Bangsawan & Printing: Commercial Exchange Between south Asia & the Malay World," Islamic connections Muslim Societies in south & southeast Asia, eds, Micheal R. Feener & Terenjit sevea, Institute of Southest Asian Studies, Singapore, 2008

33. Michael Windover, Art Deco; A mode of mobility, Presses de I Universite du Quebec, 2012, Page no. 186

34. Madhavi Thampi & Shalini Saksena, China & the making of Bombay, K.R. Cama Oriential Institute, Mumbai, 2009, Page no. 98

35. N.S. Ramasalami, Indian Cricket: A. Complete History, New Delhi, 1976, Page no. 3, James Astill, The Great Tamasha; Cricket, corruption & The turbulent Rise of Modern –India, Bloomburry, 2013, Page no. 24-28

36. Raj Narayan Ghandavarkar, The Origins of Industrial Capitalism in India, Cambridge, cambridge University, press 1994.

37. H.G. Briggs, The Parsis of Modern Zarthustrious , Edin Burgh, Oliver & boyd, 1852

38. Amalendu Guha "Parsi Seths as Entrepreneurs, 1750-1850," Economic & Political weekly, 5 (35) , 1970, Page no. 107-15

39. See Ref. no. 39, 15-16

40. Khoshru Navroji Banaji, Memoirs of the Late Framjee Cowasjee Banaji Bombay , 1892, Page no. 45

42. M. Dossal, Seeds of change, Page no. 35

43. V.D. Divekar,"The Emergence of an indigenous business class in Maharashtra in the eighteenth century," Modern Asian Studies, 16 (1982). Page no. 427-443

44. Arhin Das Gupta Indian Merchants & the Decline of Surat c. 1700-1750

45. http;// googleweblight.com / ? lite- url= http:// www.atimes.com/atimes/600th_Asia/JE14DF_o1.html and ei= 7in Eo = ag/ & lc=en- IN25= 1& m= 89& ts= 1447658418 & sig= aponpefrnokzzh6 c9citqq cgm In.yl8mkd ec-a

46. Godrej Pheroza J and Mistree Firoza Puntheky, A Zoroastrian Tapestry, Art, Religion and Culture, Mapin Publishing, Page No. 459

प्रकरण – ४थे

धार्मिक जीवन

PART ONE

GOD - AHURA MAZDA

ईश्वर – अहूर मझदा

पारशी समाज असे मानतो की, 'अहुर मझदा'ने सर्वांच्या हिताकरिता चांगल्या गोष्टी निर्माण केल्या. त्यामुळे त्याचा आदर करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असून त्याच्या निर्मिती मधून आपल्याला मिळणाऱ्या रोजच्या फायद्याकरिता आपण त्यांचे आभार मानले पाहिजे. तसेच 'अहुर मझदा'ने आधीच ठरविल्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट अगदी बिनचूक घडतेच. पारशी असे मानतात की, अहुर मझदाने प्रत्येक गोष्ट कोणाचीही मदत न घेता बारकाईने व तंतोतंतपणे निर्माण केली आहे आणि हे सर्व एखाद्या सरळ माणसाच्या सहनशक्ती पलिकडचे आहे, त्यामुळे पारशांच्या धर्मग्रंथात 'अहुर मझदा'ला सर्व शक्तिमान म्हटले आहे.

तो सर्वांचा स्वामी असून अनादि, अनंत, सर्वोत्तम, शुध्द तसेच निर्माता, संरक्षक, निराकार, अदृश्य, सर्वव्यापी, सर्वोच्च, अमर्त्य आहे.[१]

वरील उल्लेखित माहितीमुळे आपल्याला काही प्रश्न पडतात जसे –

१) अहुर मझदा कोण आहे?

२) अहुर मझदा कसा दिसतो?

३) जर आपल्याला तो दिसत नाही , तर त्याच्या अस्तित्वावर विश्वास कसा ठेवावा?

४) अहुर मझदा कोठे भेटतील?

अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधताना बरीच आश्चर्यकारक माहिती मिळाली ती पुढीलप्रमाणे –

'यस्न' ह्या धर्मग्रंथाप्रमाणे अहुर मझदाचे वर्णन तेजस्वी आणि गौरवशाली असे केलेले आहे. त्याला 'स्वयंभू' असेही म्हणतात. तसेच तो सर्वांत सुंदर, स्थिर, सर्वांपेक्षा ज्ञानी, अत्यंत

आनंददायक आहे. आपण जे काही ह्या सृष्टीत बघतो त्याची निर्मिती घडण आणि पालन करणारा सर्वात पवित्रवृत्तीचा सन्मार्गासाठी गौरविला गेलेला पौराणिक समज आहे.

झरतृष्टाने 'गाथा' ह्या रचनेत म्हटले आहे की , मझदा हा एकच आदरास पात्र आहे. तो दुष्ट, पापी व्यक्ती आणि मर्त्य माणसांनी केलेल्या सर्व कृत्यांचा न्याय–निवाडा जो मृत्यूनंतर करण्यात येतो ते करणारा स्वामी आहे. त्याची इच्छा हीच आपल्याकरिता योग्य आहे . तसेच आपल्या बाबतीत जे काही घडेल ते त्याच्या इच्छेप्रमाणे घडेल .

गाथाप्रमाणे 'अहुर मझदा' हे अदृश्य असल्याचे म्हटले आहे, म्हणजे ''ज्याला मर्त्य व्यक्ती कधीही बघू शकत नाही.'' ''फरवर –दिन –यश्त'' ह्या पुस्तकात अहुर मझदाच्या आत्म्याला उदारपणे 'मथरास्पेन्टा' ह्या शब्दाने म्हणजे 'पवित्र शब्दा'ने म्हटले गेले आहे. त्याचे शरीर एका मोहक, उपयुक्त अनंतकाळातील पवित्र प्रकाशाचे मिश्रण होते. अहुर मझदाचे वर्णन करताना 'पोरफायरी' याने आपली 'The Life of Pythagoras' ह्या पुस्तकात 'अहुर मझदाचे शरीर हे प्रकाश आणि त्याचा आत्मा' ह्या शब्दांत वर्णन केले आहे.

अहुर मझदाच्या अस्तित्वावर विश्वास करण्याकरिता आपल्याला त्याने निर्माण केलेल्या सृष्टीचे संशोधन करावे लागते. जसे – निसर्गात सूर्य, चंद्र, तारे हे सर्व एका नियमानुसार हालचाल करतात. त्याचप्रमाणे, ज्यावेळी आपण प्राणी, मासे, वनस्पती, मानव तसेच सूक्ष्म किटक यांच्याकउे लक्ष देऊन त्यांची संरचना, कार्य, आकार व कार्यपध्दती इ. सर्व समजून घेण्याचे प्रयत्न करतो, तेव्हा आपल्याला कळते की, हे सर्व किती गुंतागुंतीचे आहे. अशाप्रकारची निर्मिती स्वयंभू असू शकत नाही, तर त्यामागे कल्पक बुध्दिमत्तेचे विचार असावे लागतात. ती कल्पक बुध्दिमत्ता म्हणजे अहुर मझदाने बनविलेली सृष्टी व त्याचे नियम ज्यामुळे ही सृष्टी कार्यरत आहे.

अहुर मझदा हा सर्वव्यापी तसेच सर्वज्ञ असल्यामुळे असे मानले जाते की, तो सर्वत्र उपस्थित असून त्याला आपले 'विचार, उच्चार आणि आचार ह्या सर्वांचे ज्ञान आहे.'[२]

- **OUR DUTY TOWARDS CREATOR AHURA MAZDA :**
  निर्माता अहुर मझदाच्या प्रति आपले कर्तव्य :

अ. अहुर मझदाने केलेल्या निर्मितीतून फायदा घेणे आणि त्याचे कौतुक करणे –

अहुर मझदा सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, पाणी, वनस्पती, हवा, आकाश, प्राणी, मासे, पक्षी आणि मानवजातीचा निर्माता आहे. ह्या सर्व गोष्टी त्यांनी त्याच्या तीव्र ज्ञानाद्वारे निर्माण केल्या असून त्याच्या प्रत्येक निर्मितीत त्यांचा अंश आहे. ज्याद्वारे आपल्याला प्रत्येक ठिकाणी त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होते. कोणतीही गोष्ट निर्माण करण्यापूर्वी 'अहुर मझदा'ला ती कशी तयार करायची, तिचा उपयोग कसा करायचा आणि ती कशी काम करेल याचा आधीच 'आराखडा' तयार करावा लागला असेल. पारशी धर्मात याला 'फ्रवशि' (Fravashi) असे म्हणतात.

याचा शब्दकोशातील अर्थ 'जो आधीच ईश्वराच्या इच्छेशी बांधला गेला आहे', असा होतो. पारशांच्या मते या जगात सर्व काही अहुर मझदाने तयार केलेल्या आराखड्यानुसार तयार करण्यात आलेले आहे आणि याकरिता आपण त्यांचे आभार मानले पाहिजे.

ब. अहुर मझदाच्या निर्मितीतून आपल्याला मिळणाऱ्या फायद्याकरिता त्यांचे आभार मानणे

पारशांच्या मते ईश्वराचे आभार मानणे म्हणजे नुसते तोंड्देखले आभार मानायचे नसून, त्याने आपल्या फायद्याकरिता आपल्यावर वर्षाविलेल्या कृपेकरिता अगदी हृदयापासून त्याचे आभार मानायचे आणि हे सर्व करीत असताना आपण या जगाच्या प्रगतीसाठी सद्विचार, सद्उच्चार आणि सदाचाराच्या सन्मार्गावरून चालले पाहिजे.

क. ईश्वराला आवडणाऱ्या गोष्टींतून स्वतःला ईश्वराच्या इच्छेला समर्पित करणे –

पारशी असे मानतात की, एखादी गोष्ट मिळण्याबाबत आपण जर काळजीत असू आणि जर का ती गोष्ट आपल्याला मिळत नसेल, तर आपण संयम बाळगून ईश्वर आपल्याकरिता सर्वोत्तम करेल, अशी ईश्वरावर पूर्ण श्रध्दा ठेवली पाहिजे. 'असमाधानी असणे' हे ह्या जगातल्या सर्व दुःखांचे कारण आहे. काही असंतुष्ट व्यक्ती दुःखाच्या दबावाखाली आत्महत्या करतात जे पारशी धर्मात सर्वात मोठे पाप मानण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे सुख आणि दुःख हे शाश्वत नसून क्षणभंगुर आहे. एखाद्या व्यक्तीने संकटाच्या काळात जर दुःखाचा सामना शौर्याने केला तर लवकरच त्याच्या जीवनात सुखाची पहाट उगवेल. 'केम्ना मझदा' – (Kemna Mazda) या प्रार्थनेत असे म्हटले आहे की, ''आपल्या संकटाच्या काळात एकटा ईश्वर आपले संरक्षण करत असल्यामुळे आपण मदतीकरिता केवळ त्याच्याकडेच शरण जातो.'' म्हणजेच ''व्यक्तीने ईश्वरी इच्छेला शरण जावे आणि आपले काम आपल्या संपूर्ण शक्तिनिशी प्रामाणिकपणे करावे, ज्यामुळे आपल्या अडचणी हळूहळू कमी होतील.

ड. अहुर मझदाची प्रार्थना करून त्याच्याकडून मदत व मार्गदर्शनाची याचना करणे –

आपल्या अडचणी कमी करण्याकरिता आपण ईश्वराकडून बक्षिसाची अपेक्षा न करता, आपल्या अडचणींवर मात करण्याकरिता ईश्वराजवळ त्याच्या मार्गदर्शनाची आणि मदतीची प्रार्थना करावी, असे पारशी मानतात. ''जे स्वतःला मदत करतात त्यांना देव मदत करतो'' ह्या म्हणीवर त्यांचा विश्वास आहे. आपल्या अंतःकरणापासून करण्यात आलेले प्रयत्न आणि मदतीकरिता करण्यात आलेली ईश्वराची प्रार्थना आपल्या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी उपयोगी पडते.

इ. जाणते वा अजाणतेपणी आपल्याकडून घडलेल्या चुकांसाठी ईश्वराकडे क्षमायाचना करणे –

पारशी असे मानतात की, व्यक्तीने जर जाणतेपणी किंवा अजाणतेपणी एखादी चुकीची गोष्ट केली असेल आणि त्यामुळे व्यक्ती जर संकटात सापडली असेल, तर ईश्वराकडे अगदी अंतःकरणपूर्वक केलेल्या क्षमायाचनेमुळे त्या संकटातून व्यक्ती व्यवस्थित बाहेर पडू शकतो.

- **DEDICATE YOUR LIVES TO AHURA MAZDA -**

तुमचे जीवन अहुर मझदाच्या सेवेत अर्पण करा –

गाथेप्रमाणे झरतुष्ट्राने त्यांचा प्राण, त्याचे प्रिय विचार अहुर मझदाला अर्पण केले असून त्यात त्यांनी शब्द, कर्मे, तसेच त्यांचा आज्ञाधारकपणा व सन्मार्गावर चालण्याकरिता असलेले सर्व बळदेखील अहुर मझदाला अर्पण केले. Zarthustris म्हणजे (झरतुष्ट्रांचे अनुयायी)

असल्यामुळे आपणदेखील या जगात सत्कर्म करण्यासाठी आपले जीवन अहुर मझदाला अर्पण केले पाहिजे. तसेच आपण ह्या जगात आलो तेव्हा त्यावेळच्या परिस्थितीपेक्षाही चांगल्या परिस्थितीत ह्या जगातून निरोप घेतला पाहिजे, ह्या मताने जीवन जगतात.[३]

PART TWO

RELIGION BEFORE THE PROPHET

प्रेषितांपूर्वीचा धर्म –

ग्रिकांनी इराण जिंकल्यानंतर त्यांची काही धार्मिक पुस्तके नष्ट केल्यामुळे काळाच्या आधीचा पारशांचा फारच कमी इतिहास आज उपलब्ध होऊ शकतो. 'यश्त' (Yashts) वरून असे समजते की, 'काई विस्ताप' या राजाने मूर्तिपूजक जमातीच्या मूर्ती नष्ट केल्या गाथांमध्ये लिहिले होते की, ह्यावेळी येथे गरिबांवर अत्याचार होत होते, तसेच जादूटोणा व अंधश्रध्देचे प्रस्थ माजले होते. ह्याच कारणांमुळे ईश्वराने झरतुष्ट्राला जनतेला सद्विचार – सद्उच्चार – आणि सदाचाराच्या मार्गावर आणण्याकरिता पाठविले.

- **NECESSITY OF A PROPSHET -**

प्रेषिताची आवश्यकता –

पारशांच्या मते माणूस जन्मतःच संत म्हणून जन्माला आला असता तर त्याला कोणत्याही प्रेषिताची वा कुठल्याही धर्माची गरज पडली नसती. झरतुष्ट्राच्या शब्दांत सांगायचे तर ''हे मझदांनी अगदी सुरुवातीपासूनच पारशांकरिता भौतिक शरीरे बनविली, विवेकी आत्मे बनविले आणि मार्गदर्शक बुध्दीचे वरदान दिले, तसेच कर्म करण्याची पात्रता दिली व सत्य तत्त्वव्यवस्था मार्गदर्शनाकरिता दिली. ज्यामुळे प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या इच्छेने आपल्या श्रध्दांची निवड करू शकेल.'' (Ha - 31 - 11) याउलट पापाचा मोह जे स्त्री व पुरुष स्वतःच्या फायद्याचे मानतात ते तुम्हाला तुमच्या खऱ्या आत्म्यापासून दूर नेते. [४]

- **LIFE OF PROPHET**

प्रेषिताचे जीवन –

झरतुष्टाच्या मृत्यूनंतर हजारो वर्षांनंतर पारशांनी काही ऐकीव गोष्टींच्या आधारे झरतुष्ट्राची गोष्ट लिहून काढली. परंतु पारशांना त्यांच्या आधी इस़. ६00 ते १000 वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या राजांविषयी काहीच कल्पना नसल्यामुळे ह्या कथा फारशी विश्वासार्ह्य मानता येणार नाही.

झरतुष्ट्र हा राजा विस्तास्पंच्या मृत्यूनंतर जवळपास ३५ हजारांहून अधिक वर्ष जगला आणि त्यांच्या दरबारातील जनतेने त्यांच्या धर्माचा स्वीकार केला. दुरानियन राजा 'अर्जास्प' (Arjasp) विस्ताप ला 'पारशी' धर्माचा स्वीकार करणे मंजूर नव्हते. त्यामुळे त्याने इराणवर हल्ला केला, परंतु ह्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यात आले. असे म्हटले जाते की, नंतरच्या काळात विस्तास्प राजाच्या राजधानीत त्याच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन ' दुरानियनानी पुन्हा हल्ला केला आणि यावेळी दुरानियनांनी विस्ताप राजाच्या वडिलांना लोहरास्प (Lohrasp) राजाला ठार मारले. [५]

- **LIFE OF PROPHET ZARATHRUSTHA**

प्रेषित झरतुष्ट्राचे जीवन –

'अलेक्झांडर द ग्रेट' याने इराणवर विजय मिळविण्यापूर्वी झरतुष्टाच्या जीवनाचा इतिहास ' स्पेन्ड नास्क' (Spend Nask) ह्या पुस्तकात उपलब्ध होता. ह्या पुस्तकाचे दोन संच उपलब्ध होते. त्यातील एक संच हा 'पर्सिपोलिस' (Persipolis) येथील राजवाड्यात होता. ज्याला ग्रिकांनी आग लावल्यामुळे तो नष्ट झाला. यातील दुसरा संच ग्रंथालयात उपलब्ध होता, जो ग्रीक त्यांच्या देशात घेऊन गेले. त्यांना ह्या पुस्तकातील जे रुचले, महत्त्वाचे वाटले ते त्यांनी भाषांतरीत केले आणि उरलेले नष्ट करून टाकले. (Spend Nask) 'स्पेन्ड नास्क' हे त्यांनी नष्ट केलेल्या पुस्तकातील एक पुस्तक होते, कारण त्यांना 'पर्शियाच्या इतिहासात' अजिबातच रस नव्हता.

अरबांकडून ससानियन राजघराण्याची अवनती झाल्यानंतर जवळजवळ ३०० वर्षांनी 'दिनकार्ड' या पहलवी भाषेतल्या पुस्तकात प्रेषितांच्या जीवनाविषयी लिहून ठेवण्यात आले होते, हे पुस्तक त्यावेळच्या प्रचलित पध्दतीनुसार जवळपास ऐकीव माहितीवर आधारलेले रुपकात्मक स्वरुपात लिहिलेले पुस्तक होते. ह्या पुस्तकानुसार अवेस्ता या हस्तलिखितांतून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार पडताळून पाहिले असता असे लक्षात येते की, दरिजी नदीच्या काठावर असलेल्या वडिलांच्या घरात झरतुष्ट्राचा जन्म झाला. असे म्हटले जाते की, जन्माच्या वेळी इतर सामान्य मुले रडतात, त्या वेळी झरतुष्ट्र हसला होता व ह्या गोष्टीला ग्रीक लेखकांनीही दुजोरा दिलेला आहे.

झरतुष्ट्राचा जन्म हा सत्यासाठी आणि सन्मार्गाकरिता झालेला होता. वयाच्या १५व्या वर्षी त्याने ईश्वर आणि त्यांच्या निर्मितीबद्दलच्या चिंतनाला सुरुवात केली. पंधरा वर्षाच्या तपस्येनंतर झरतुष्ट्र 'प्रेषितांच्या' पदापर्यंत पोहोचला. म्हणजेच पंधरा वर्षाची प्रार्थना आणि तपस्येनंतर ते आपले मन ईश्वराच्या वैश्विक मनाशी जोडण्यात सफल झाले.[६]

झरतृष्ट्राचा काळ – The Age of Zarathushtra

ग्रीकांच्या विजयानंतर आणि आपली एकवीस नास्क पुस्तके विशेषतः स्पेंद नास्क ज्यांत झरतृष्ट्राच्या प्रेषिताच्या जीवनाविषयी माहिती होती, ते नष्ट झाल्यामुळे झरतृष्ट्र किती वर्षे जगले, त्या सर्व ज्ञानाला मुकलेलो आहोत. खाली दिलेल्या तक्त्यांत ग्रीक आणि रोमन लेखक ज्यांनी झरतृष्ट्राच्या कार्यकालाचा, तो किती वर्षे जगला त्याचा अंदाज व्यक्त केला, त्यांची नावे दिलेली आहेत. ज्यामुळे आपल्याला तारखांमधल्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या वैविध्याचा अंदाज येईल.

	अधिकारी व्यक्तीचे नाव	ज्या कालखंडात झरतृष्ट्र होते तो कालखंड	त्याच्या मते झरतृष्ट्राचा कालखंड
१	(Hermippus) हर्मिपस	२५० बी.सी. ख्रिस्तपूर्व २५० वर्षे	७००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ७०००
२	(Eudoxus) युडॉक्सस	३६८ बी.सी. ख्रिस्तपूर्व ३६८	६४०० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६४००
३	(Aristotle) ॲरिस्टॉटल	३८४ – ३२२ बी.सी. ख्रिस्तपूर्व ३८४ – ३२२	६००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६०००
४	(Pliny) प्लिनी	२३ – ७९ ए.डि. ख्रिस्तोत्तर २३ – ७९	७००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ७०००
५	(Plutarch) फ्लुटार्क	४६ ते १२५ ए.डि. ख्रिस्तोत्तर ४६ ते १२५	७००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ७०००
६	(Diogenes Laertious) डायोजेनस लॅएर्टिअस	२१० – ए.डि.ख्रिस्तपूर्व २१०	७००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ७०००

७	(Plato) फ्लुटो	४०६ – ३४७ बी.सी. ख्रिस्तपूर्व ४०६ – ३४७	६००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६०००
८	(Xanthus) of Lydia झँक्थास ऑफ लिडिआ	५००–४५०बी.सी. ख्रिस्तपूव ५०० – ४५०	६००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६०००
९	(Suidas) सुइदास	९७० ए.डि. ख्रिस्तोत्तर ९७०	७००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ७०००
१०	(Georgius Syncellus) जॉजिर्अस सिन्सेलस	---	६००० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६०००
११	(Ctesias) तेसिअस	४९० बी.सी. ख्रिस्तपूर्व ४९०	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१२	(Cephalion) सेफालिअन	१२० ए. डि. ख्रिस्तोत्तर १२०	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१३	(Diodorus Siculus) डायोडोरस सिक्युलस	१०० ए. डि. ख्रिस्तपूर्व १००	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१४	(Cephalion) सेफालिअन	१२० ए. डि. ख्रिस्तोत्तर १२०	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१५	(Justin) जस्टीन	१२० ए. डि. ख्रिस्तोत्तर १२०	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१६	(Eusebius) युसेबायस	३००ए.डि.ख्रिस्तोत्तर ३००	२२००बी.सी.ख्रिस्तपूव२२०० २२००
१७	(Theon) थेऑन	----	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१८	(Paulus Orosius) पाऊलस ओरोसिअस	५०० ए. डि. ख्रिस्तोत्तर ५००	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
१९	(Arnobius) अर्नोबाअस	२९७ ए. डि. ख्रिस्तोत्तर २९७	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व २२००
२०	(Scandinarian	८१८ – ८५३ ए. डि.	२२०० बी.सी. ख्रिस्तपूर्व

	Edanan) स्कॅडिनेव्हिअन इदानान	ख्रिस्तोत्तर८१८ – ८५३	२२००
२१	(Aristoxenus) ॲरिस्टोझेनस	----	६०० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६००
२२	(Hypolytus) हायपोलिटस	३०० ए. डि. ख्रिस्तोत्तर ३००	६०० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६००
२३	(Porphyzius) पॉर्फिरिअस	----	६०० बी.सी. ख्रिस्तपूर्व ६००
२४	(Agathias of Myrina) ॲगाथिअस ऑफ मायरिना, मायरिनाचा ॲगाथिअस	५३६ – ५८२ ए. डि. ख्रिस्तोत्तर ५३ – ५८२	५२५ बी.सी. ख्रिस्तपूर्व ५२५

वरील तक्त्यावरून आपल्याला तारखांचे तीन गट मिळतात. पहिल्या गटानुसार कालखंड हा ६००० ते ७००० (ख्रिस्तपूर्व ६००० ते ७०००) हा आहे. या विषयी अधिकारवाणीने बोलणाऱ्यांमध्ये हर्मिपसचा समावेश होतो. ज्याने सर्वच्या सर्व २१ नास्क वाचले असावेत. Euodoxus, Aristotle, Plato आणि xanthus हे अकमिनिअन कालखंडात रहात असावे किंवा तो काळ ज्या काळात अलेक्झांडरने नुकताच इराण जिंकला होता तो असावा.आणि त्यामुळे त्यांना मूळचा इतिहास वाचणे शक्य झाले असावे. (त्यांनी २१ नास्क गान्जे सेपिगन ग्रंथालयातून घेतली असावीत.)

दुसऱ्या गटाने झरतृष्ट्राची तारीख ही २२०० बी.सी. (ख्रिस्तपूर्व २२००) ही मांडलेली आहे. ज्यासाठी त्यांनी या कथेचा आधार घेतलेला आहे. ज्यांत बॅबिलॉनिअन राजा (नायनस) आणि त्याची राणी सेमिरासिम यांनी एका झाऑर्टिस यासारखं काहीतरी नाव असणाऱ्या एका बॅक्टेरिअन राजाचा पराभव केला होता, ज्याचं नाव त्यांनी झरतृष्ट्राच्या नावाशी जोडलं.

तिसरा गट असं मानतो की दारिअस पहिल्याचे पिता अकेमिनिअन हिस्तास्पिस जे कधीही राजा बनले नाहीत. दुसऱ्या गटाच्या मताचा विचार करता, हडप्पा मोहेंजोदाडो सापडलेल्या पुरातत्त्वीय गोष्टींवर पशिर्अन प्रभाव ठळकपणे दिसून येतो आणि इराणमध्ये

सापडलेल्या पुरातत्त्वीय गोष्टींशी त्यांचे बरेच साधर्म्य दिसून येते आणि ही शक्यता नाकारता येत नाही की, झरतृष्ट्र नाव असलेल्या दुसऱ्या एखाद्या माणसाला बॅबिलॉनिअन निनस आणि सेमिनामिसने पराभव केला असावा. हा झरतृष्ट्र म्हणजे झरतृष्ट्राटेमो म्हणजे पारशांचा मुख्य धर्मगुरु किंवा झरतृष्ट्र हे नाव धारण करणारा एक संपूर्णपणे नवीनच माणूस असावा. झरतृष्ट्र ाच्या मृत्युनंतर हा माणूस किती वर्ष जगला ते माहित नाही.

पहिल्या गटांतल्या (Hermippus) हर्मिप्पस (Aristotle) ॲरिस्टॅटल, (Pleny) प्लेनी, (Plato) प्लॅटो आणि (Xanthus) झॅन्थस ही झरतृष्ट्राचा कालखंड सांगणा–यांच्या मते झरतृष्ट्र हा त्यांच्या वेळेआधी फक्त १५० ते ३०० वर्षे आधी होउन गेला. म्हणजे त्यांच्या काळापूर्वी ६००० वर्षे वर दिलेली या विषयावरील ग्रीक अधिकारी व्यक्तींची नावं ही ज्यांना इतिहासाची चांगली समज आहे आणि ज्यांना चांगलं उच्चशिक्षित मानलं जातं अशा व्यक्तींची आहेत. पूर्वेकडच्या पवित्र ग्रंथांचे वेंदिदाद आणि याश्त या ग्रंथांचे भाषांतरकार प्रोफेसर दारमेसटेटर यांनी असं विधान केलेलं आहे की, जवळपास अर्ध्या अधिक सुशिक्षित समाजाने अवेस्ताच्या खरेपणाविषयी शंका घेत जेव्हा त्याला खोटं ठरवलं तेव्हा एका उग्र वाद–विवादाला तोंड फुटलं. दुसऱ्या शब्दांत सांगयचं तर बऱ्याचशा पाश्चात्य विद्वानांनी अवेस्ताच्या खरेपणा विषयी शंका व्यक्त केली. हे १८ व्या शतकच्या अखेरीस घडलं. प्रोफेसर जॅक्सन आणि डॉ. वेस्ट हे झरतृष्ट्राच्या शिकवणुकीचे चहाते होते. त्यांनी झरतृष्ट्र हा एक इतिहासात होऊन गेलेला माणूस असल्याची पूर्ण खात्री होती. त्यांना हीच गोष्ट इतर विद्वानांनी देखील मान्य करण्याकरिता पटवून द्यायची होती. अरबांच्या वार्षिक कालगणनेच्या पद्धतीवर आधारित असलेलं प्रकरण ज्या पहलवी पुस्तकांत होतं असं पूर्वेकडच्या पवित्र ग्रंथांच्या मालिकेतलं एक पुस्तक डॉ. वेस्ट यांनी पूर्वीच भाषांतरीत केलेलं होतं. जरी या प्रकरणावर बरीचशी टीका झाली आणि त्यांत अनेक त्रूटी असल्याचं निदर्शनाला आणून देण्यात आलं असलं तरी त्याचा एक पारंपारिक दस्तऐवज म्हणून स्वीकार करण्यात आला होता. याच पुस्तकांत दुसऱ्या एका ठिकाणी असं म्हटलं आहे की हा धर्म ३०० वर्षे शुद्ध स्वरुपात होता, त्यानंतर या धर्मांत अनेक चुकीच्या गोष्टी घुसडण्यात आल्या. याचा अर्थ त्यांनी असा घेतला की हे ख्रिस्तपूर्व ३३० मधल्या अलेंक्झांडरच्या इराणवरील विजयामुळे घडलं. त्यामुळे त्यांनी झरतृष्ट्राची तारीख ३३० + ३०० आणि त्यांत झरतृष्ट्राला ३० व्या वर्षी धर्माचा साक्षात्कार झाला.

- **RELIGION AFTER THE DEATH OF ZARATHRUSTHA**

झरतुष्ट्राच्या मृत्युनंतर धर्माचा इतिहास–

धर्मप्रसाराविषयी फारसी माहिती उपलब्ध नाही, केवळ राजा 'विस्ताप' (Vistasp)चा मुलगा 'अस्फान्दयार', व 'अस्फान्दयार'चा मुलगा 'बेहमान' यांनी इराण आणि उत्तर भारतात धर्माचा प्रसार केला. 'सेन–अहुम–स्ट्रुदन' याचा जन्म झरतुष्ट्राच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनी झाला, त्याने आपल्या शंभर सहकाऱ्यांच्या मदतीने धर्म प्रसार केला. झरतुष्ट्राच्या मृत्युनंतरही जवळजवळ तीनशे वर्ष हा धर्म शुध्द स्वरुपात राहिला. परंतु 'कयानियन'(Kyanian) राजाच्या पराभवामुळे या धर्माचे मोठे नुकसान झाले. ऐकेमिनिअन्स (Achaemenians)च्या जिंकण्यामुळे हा धर्म अर्मेनिआ, सीरिया, इराक, तुरान, अफगणिस्तान, बलुचिस्तान आणि भारतात इराणची सध्याची सरहद्द ओलांडून पसरला. त्या काळापासून ते 'अकाएमिनिअन' (Achaeminian) राजघराण्यातल्या 'दारिअस' पहिल्याच्या काळापर्यंत धर्माच्या इतिहासाविषयी आज कोणतीही माहिती उपलब्ध नाही. परंतु असे असले तरीही मधली बरीच वर्षे याविषयी कोणालाही काहीही माहिती नाही. काही जणांच्या मते, हा काळ जवळपास १००० ते १५०० वर्षांचा मानला जातो. ह्या काळात दारिअस पहिला याने बिसातून येथील पर्वतांवर 'तो 'अहुर मझदा' च्या कृपेमुळेच राजा बनल्याचे' कोरून ठेवले आहे.

समारंभ साजरे करताना धर्मगुरु जी काही प्रार्थना करायचे तेवढा भाग आज जतन करून ठेवलेला आहे. परंतु आधीचा इतिहास कायदे आणि विज्ञान हे जवळपास पूर्णपणे गमावलेले आहे. त्या काळात जे काही माहीत होते, ते जरी मूळ इराणचे म्हणून आज नष्ट झालेले असले तरी ग्रीक कायद्याच्या आणि विज्ञानाच्या रुपात ते आजही टिकून राहिले आहेत.

ख्रिस्तोत्तर ६५१ मध्ये अरबांच्या विजयानंतर बरीच पुस्तके नष्ट झाली होती. तसेच ख्रिस्तोत्तर ९०० पर्यंत 'पहलवी' भाषा बोलण्यावर निर्बंधही घालण्यात आले होते. या काळानंतर पारशी लोकांनी जे काही उपलब्ध होते ते जमविण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या धार्मिक विषयांवर पुस्तके लिहायला सुरुवात केली. 'दिनकार्ड' (Dinkard) आणि 'बुन्दाहिश्न'

(Bundahishn) ही, ती दोन पुस्तके आहेत जी ख्रिस्तोत्तर ९०० आणि १००० ह्या काळा दरम्यान लिहिण्यात आलेली आहेत.[७]

PART THREE

WHAT IS RELIGION ?

धर्म म्हणजे काय ?

'रिलीजन' हा शब्द' रि' म्हणजे 'बॅक' आणि 'लिगो' म्हणजे 'आय जॉईन' (I Join) म्हणजेच 'मी स्वतःला ईश्वराशी जोडतो' असा याचा अर्थ आहे. पारशी असे मानतात की धर्म आपल्या ईश्वराकरिता, त्याच्या निर्मितीकरिता व आपल्या स्वतःकरिता जी कर्तव्ये आहेत त्याची आठवण करुन देतो.

'बुन्दाहिश्न' (Bundhisn) ह्या पुस्तकात असे म्हटले आहे की, आपले आत्मे पूर्वी ईश्वरासोबत राहत होते. त्या वेळी ईश्वराने आपल्याला विचारले की, ''आपल्याला त्यांच्या संरक्षणाखाली त्यांच्यासोबत राहायला आवडेल की, बाहेरच्या जगात दुष्ट, पापी शक्तींशी संघर्ष करून, प्रगल्भ बनून परत यायला आवडेल'', यावेळी आपल्या आत्म्यांनी अनुभव प्राप्त करण्यासाठी जगात जाणे निवडले. त्यामुळे ते दुबळेपणावर मात करू शकतील आणि पुन्हा ईश्वराकडे पुनर्मिलनासाठी (Joinback) परत जातील. सद्प्रवृत्तीने दुष्ट प्रवृत्तींशी संघर्ष करणे हे आपले कर्तव्य आहे, असे पारशी मानतात.

गाथेमधील शिकवणुकीत हेच शिकविले आहे की, आपल्याला राग, व्देष, सूड, निंदा, कपट आणि आळशीपणा यांसारख्या दुर्गुणांपासून स्वतःला दूर ठेवायचे. यात सर्वप्रथम रागाला दूर ठेवावे कारण क्रोधामुळे अनेक वाईट गोष्टी घडतात. आपण जेव्हा वाईटाबरोबर संघर्ष करण्याच्या गोष्टी बोलतो तेव्हा त्यामागची कल्पना अशी आहे की, आपण आपल्या दुष्ट भावनांचे सद्भावनेत उदात्तीकरण केले पाहिजे. [८]

- **TWO MENTALITIES**

दोन प्रकारच्या मानसिकता

झरतृष्टाने दोन प्रकारच्या मानसिकतेचा पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

१) स्पेन्टा मैन्यू –(Spenta Mainyu)

ही मानसिकता 'सात्विक' प्रकारची आहे. या मानसिकतेप्रमाणे चांगली व योग्य मानसिकता निवडणे, सन्मार्गावर चालणे आणि लोकांच्या नजरेत आपली किंमत वाढविणे अशा शिकवणी यातून मिळतात.

२) अँग्रा मैन्यू –(Angra Mainyu) **–**

ही मानसिकता 'तामसी' प्रकारची आहे. ह्या मानसिकतेतून व्यक्ती चुकीच्या किंवा वाईट मार्गावर वाटचाल करते. त्याची सर्व कर्मे चुकीची असतात. त्याचप्रमाणे भोवतालच्या समाजामध्ये स्वतःची ओळख वाईट करते व इतरांकडून ते तिरस्कारित होते.

वरील दोन्ही मानसिकतेतून झरतुष्ट्राने व्यक्तीला योग्य मानसिकता निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु त्याने असाही उपदेश दिला आहे की, 'सत्याचा योग्य मार्ग निवडून आपली उन्नती साधावी', त्याचप्रमाणे पापाचा मार्ग निवडणे हे पारशी समाज निषिध्द मानतो. [९]

- **AMESHA SPENTAS - The Eternal Holy**

अमेशा स्पेन्टास – पवित्र शाश्वत गोष्टी

अहुर मझदाबरोबर एकूण सहा अमेशास्पेन्टा आहेत. त्यांना 'हाफ्ट अमेशास्पन्डस्' (Haft Ameshaspands) किंवा 'सात पवित्र शाश्वत गोष्टी' असे म्हणतात. त्यात 'अहुर मझदा'चे सहा गुण आहेत ते पुढीलप्रमाणे –

१) वोहुमनः (बहमन) – सद्विचार

२) अशा वहिस्ता (आर्डिबेहश्त) – सर्वोत्तम सन्मार्ग

३) क्षत्र वैर्य (शाहरेवार) – दैवी शक्ती किंवा नैतिक धैर्य

४) स्पेन्टा अर्मेयटी (अस्पन्दरमद) – दैवी शहाणपण

५) हाऊरवटाट (खोरदाड) – प्रावीण्य किंवा आत्मज्ञान

६) अमेरेटाट (अमरदाड) – अमरत्व

पारशांच्या मते अहुर मझदाचे हे सहा गुण 'अहुर मझदाला' जाणून घेण्याकरिता आहेत. ते असे मानतात की, 'चांगले विचार' जर अंगीकारले तर आपण सर्वोत्तम सन्मार्गाचा अवलंब करू शकू. तसेच योग्य सन्मार्गावर चालल्यामुळे आपल्याला दैवी शक्ती प्राप्त होते किंवा आपले नैतिक धैर्य उंचावते. नैतिक धैर्य प्राप्त झाल्यावर आपल्याला दैवीज्ञानही प्राप्त होते व हे दैवीज्ञान आपल्याला आपल्या स्वतःची जाणीव करून देते किंवा आपल्याला परिपक्व बनवते. आपण परिपूर्ण बनलो की अमर्त्य बनतो. म्हणजेच आपण अहुर मझदाच्या अगदी निकट येतो. [10]

- **VOHUMAN - Good Thoughts or Good Mind**

वोहुमन – सद्विचार किंवा चांगले मन

गाथांनुसार मनाच्या तीन अवेस्तांचे वर्णन यात केले आहे, ते पुढीलप्रमाणे –

१) वहिस्तेम मनो – म्हणजे उत्तम, वैश्विक किंवा ईश्वराचे मन

२) वोहुमन – म्हणजे चांगले मन

३) अकोमन – म्हणजे वाईट मन

झरतुष्ट्राने त्याच्या शब्दांत उत्तम मनाची मागणी केली आहे. 'वैश्विक' मन म्हणजे 'सर्वोच्च मन' जे सर्वात प्रथम समजून घेते, तसेच ते सर्व कर्तव्य, कर्म, सन्मार्गाने बाळगले पाहिजे, अशी धारणा करते, '' 'अहुर मझदा' मला ती सर्व काळात सारखीच राहणारी मानसिकता दे'' असे झरतुष्ट्राने म्हटले आहे. (अवेस्ता : Ha 31-7)

याच प्रकरणात ईश्वराला चांगल्या मानसिकतेचा पिता आणि सद्विचार प्रकट करणारा, असे म्हटले आहे. गाथांच्या प्रत्येक कडव्यात झरतुष्ट्राने सन्मार्ग, नैतिक धैर्य आणि दैवी ज्ञानाचे सद्विचार बाळगण्याचा उपदेश केला आहे. संपूर्ण धर्माचा पायाच योग्य सदविचारांवर आधारित आहे.

दोआ – नाम – सतायास्ने (Doa - Nam - Satayasne Prayer) ह्या प्रार्थनेत असे म्हटले आहे की, 'ईश्वराने माणसाला विचारशक्तीची देणगी देऊन, वाईट भावनांना विरोध करून, त्यांच्याशी संघर्ष करून, दूर ठेवण्याचे वरदान देऊन सर्वोच्च स्थानावर ठेवले आहे. तसेच प्रार्थना करणारी व्यक्ती ही तिच्या विचारशक्ती, वाणी, कर्मे, विवेक, तिचे शहाणपण आणि बुध्दी ह्या सहाही वृती ज्या तिला देण्यात आलेल्या आहेत, त्या शुध्द राखण्याचे आश्वासन देते आणि स्वतःला वाईट भावनांपासून दूर ठेवते.[११]

- **ASHA VAHISHTA - Best Righteousness**

अशा वहिस्ता – सर्वोच्च सन्मार्ग, दैवी नियम

झरतुष्ट्राचा भर जरी विचार करण्यावर असला तरी तो सद्विचार करण्यावर, शुध्द विचार करण्यावर आहे. ईश्वराची तसेच ईश्वराच्या प्रेषितांची त्यांच्या सात्त्विक कर्मासाठी स्तुती केली गेली पाहिजे. देव सूडबुध्दीचा नाही, त्याचा कायदा सत्य आणि प्रेमावर आधारित आहे.

ससानियन इराणच्या साहित्यात 'अशा'च्या आपण घेतलेल्या अर्थापेक्षाही अधिक महत्त्वाचा अर्थ आहे 'अशा' म्हणजे – 'आत्मा' किंवा 'मनाची शुध्दता', 'इंद्रियांचा निग्रह, प्रेमळ हृदय आणि इतर आत्मिक सद्गुण होय.

पारशांच्या धर्मग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, 'एकच मार्ग आहे तो मार्ग म्हणजे 'अशा'(Asha) होय. बाकी इतर चुकीचे मार्ग आहेत.

'' ''सात्त्विक कर्म'' म्हणजे काय हे ज्याला समजत नाही. त्याच्यापासून चांगले विचार कोसो मैल दूर असतात.'' (Ha-34-8)

''जोपर्यंत माझ्याकडे शक्ती असेल तोपर्यंत मी सत्कर्माला सर्वोच्च स्थान देईन आणि अंतर्गत ज्योतीला मानवंदना देईन''. (Ha-43-9)

जोपर्यंत आपल्या स्वार्थाला धक्का बसत नाही, तो पर्यंत सत्यवादी राहणे खूपच सोपे असते. परंतु जी व्यक्ती आणीबाणीच्या प्रसंगातही सत्याला धरून राहते ती खरोखरच सत्यनिष्ठ असते. व ह्या सत्याच्या मार्गावर चालायला खूप मानसिक धैर्य लागते. परंतु आणीबाणीच्या

प्रसंगी द्विधा मनःस्थितीत जेव्हा आपण सत्यावर आणि सत्कर्मावर दृढ राहतो तेव्हा आपण ती लढाई जिंकतो आणि भविष्यकाळात येणाऱ्या प्रसंगातही आपण असत्याचा किंवा असात्त्विक मार्गाचा अंगीकार करत नाही. [१२]

- **क्षत्रवैर्या –**

"क्षत्रवैर्या म्हणजे दैवीशक्ती, नैतिक धैर्य किंवा आत्मसंयम होय."

यथा – अहु – वैरयो (Yatha-Aha-Vairyo) ह्या प्रार्थनेत आपण पाहिले आहे की, दैवी सामर्थ्याचा आशीर्वाद त्यांनाच प्राप्त होतो जे निःस्वार्थीपणे आपल्या बांधवांची सेवा करतात. गाथा (Ha-45-9) मध्ये झरतुष्ट्राने म्हटले आहे की, ''ईश्वराने आपण इतर मानवी बांधवांची त्यांच्या उत्कर्षाकरिता सेवा करावी, असा आदेश दिलेला आहे. त्यामुळे 'क्षत्रवैर्या' म्हणजे मानवाची निःस्वार्थ सेवा होय.''

गाथेमधील ह्याविरुध्द शब्द म्हणजे 'दुश–क्षत्रोम' (Dush-Khshthrom) म्हणजे अनैतिक धैर्य किंवा दुष्ट शक्ती, इतरांना त्रास देण्याची शक्ती होय आणि झरतुष्ट्र स्वतःमध्ये अनैतिक धैर्य उत्पन्न होऊ नये म्हणून (Ha-48-5) मध्ये प्रार्थना करतात.

नेपोलियन – हिल त्याच्या 'लॉ ऑफ सक्सेस' ह्या पुस्तकात लिहितो की, ''जो मनुष्य शक्तिमान असतो तो ईश्वराला सुध्दा घाबरत नाही. म्हणजेच शक्तिवान व्यक्ती ईश्वरावर प्रेम करतो, परंतु त्याला कधीही घाबरत नाही. तसेच जी शक्ती भयावर आधारित असते ती लवकरच नष्ट होते. [१३]

- **SPENTA ARMAITI - Divine Wisdom**

स्पेन्टा अरमैती – दैवी शहाणपण, दूरदर्शीपणा

याचा अर्थ सावध मन किंवा दैवी क्रियाशीलता होय. 'स्पेन्टा अरमैती' ह्या शब्दाचा गाथेतील विरोधी शब्द म्हणजे 'तरोमैती' (Taromaiti) म्हणजेच निष्क्रियता होय. 'निष्क्रियता' म्हणजे 'मृत्यु' किंवा सर्व 'चांगल्या' गोष्टींची समाप्ती.

तसेच दैवी शहाणपण म्हणजे जो कोणी शंकाकुल होऊन गोंधळलेला आहे. त्याला विचारपूर्वक मार्गदर्शन करणे होय. (Ha-31-12)

त्याचप्रमाणे 'स्पेन्टा अमैरती' म्हणजे 'प्रेम' किंवा 'भक्ती भावनेद्वारे प्रत्येकाच्या कल्याणाकरिता करण्यात येणारी दैवीक्रिया' जी व्यक्तीला 'चूक किंवा बरोबर काय' हे ठरविण्यात मदत करते आणि व्यक्तीला योग्य सल्ला, धैर्य, निवड करण्यासाठी सद्‌विचार देते. [१४]

- **HAURVATAT - Self Realisation**

हऊरवटाट – आत्मज्ञान, परिपूर्णता किंवा आत्मिक आरोग्य

जेव्हा एखादी व्यक्ती स्वतः

१) सद्‌विचार

२) सद्‌वर्तन

३) नैतिक धैर्य

४) दैवी क्रियाशीलता, या सारख्या वृत्ती धारण करते, त्या वेळी ती ईश्वराला तसेच स्वतःला जाणून घेण्याच्या योग्यतेची होते.

असे मानले जाते की, व्यक्ती जेव्हा स्वतःला ओळखते तेव्हा तिला नवीन जीवन बहाल करण्यात येते. आत्मज्ञानामुळे त्या व्यक्तीला समजते की, त्याचे अंतर्गत स्वरुप हे ईश्वराशी एकरुपतेचे आहे. आणि त्यांच्या जीवनावर अधिराज्य गाजविणाऱ्या नियमांची त्याला जाणीव होते. जीवनाच्या नियमांच्या जाणिवेच्या समजुतीतून त्याना स्वतः कसे सुखी व्हावे अणि इतरांना कसे सुखी करावे, हे समजत. [१५]

- **AMERETAT - Immortality**

अमेरेटाट – अमर्त्यता–

"'अमेरेटाट' म्हणजे "अमरतत्त्व". ''ईश्वराशी ऐक्य'' होय." हा सर्व निर्मितीमागील अंतिम हेतू आहे. 'गाथा'मध्ये झरतुष्ट्रीने प्रार्थना केली आहे की, ''तू सर्वोत्तम आहेस, मी चांगला आहे, मला सर्वोत्तम सन्मार्गाचे आचरण करून तुझ्याशी एकरुप होऊ दे.'' तसेच 'होशबाम' ह्या प्रार्थनेप्रमाणे (Hoshbam Prayer) "सर्वोच्च सदाचरणाने, उच्च आचरणाने आम्ही

एखाद्या वेळेस तुला पाहू शकू, आम्ही कदाचित तुझ्याजवळही येऊ शकू, तसेच तुझे मित्रही बनू शकू.''

जेव्हा एखादी व्यक्ती Ameretat ह्या आत्मनिर्भरतेच्या अवस्थेपर्यंत पोहोचते, तेव्हा ती परिणामांची पर्वा न करता स्वतःचे कर्तव्य तिच्या सर्व शक्तीनिशी करीत असते. [१६]

- **SPENTA MAINYU AND ANGRA MAINYU**

स्पेन्टा माइन्यू आणि अन्ग्रा माइन्यू

अहुनावाद गाथा (Ha-30) मध्ये दोन प्रकारच्या मानसिकतेचा उल्लेख केला आहे.

१) चांगली मानसिकता

२) वाईट मानसिकता.

'स्पेन्टा माइन्यू' चा अर्थ 'स्वच्छ मानसिकता' होय आणि 'अन्ग्रा माइन्यू' चा अर्थ 'दुष्ट मानसिकता' होय. 'स्पेन्टा माइन्यू' म्हणजेच 'दैवी मानसिकता' ही सद्विचारांना जन्म देते, तर 'अन्ग्रा माइन्यू' किंवा 'दुष्ट मानसिकता' ही वाईट विचारांना, वाईट शब्दांना आणि वाईट कर्मांना जन्म देते. पारशांच्या मते, शहाणे, हुशार लोक, 'स्पेन्टा माइन्यू'चे पालन करतात, तर दुष्ट लोक 'अन्ग्रा माइन्यू' चे पालन करतात.

ईश्वराने चांगले आणि वाईट यामध्ये भेद ओळखण्याची क्षमता माणसाला दिली आहे. ह्या व्यक्तीच्या आतील जाणिवेला झरतुष्ट्राने 'स्रोशा' म्हणजे 'दैवी आज्ञा' किंवा 'जाणीव' असे म्हटले आहे. जर प्रत्येक व्यक्ती कोणतेही चुकीचे कारण पुढे न करता, आपल्या ह्या आतील आवाजाची आज्ञा पाळेल तर ती कधीही चुकीची ठरणार नाही.

पारशी असे मानतात की, प्रत्येक व्यक्तीला तिचे मत चांगल्या किंवा वाईट मार्गाने वापरण्याचे स्वातंत्र्य असल्यामुळे तसेच पापाच्या आकर्षणातून त्याने योग्य मार्ग निवडावा ह्यासाठी ईश्वराने त्याच्या 'प्रेषिताला' पाठविले.

गाथांमध्ये झरतुष्ट्राने प्रत्येक व्यक्तीला 'स्पेन्टा माइन्यू' म्हणजे चांगल्या मनासाठी कसे झगडावे आणि 'अॅन्ग्रा माइन्यू' म्हणजेच 'पापी मनाचे आकर्षण' टाळण्यासाठी ज्याचे मुख्य लक्षण राग, लोभ, हिंसा आणि मत्सर आहे हे झुगारून व्यक्तीने चांगल्या विचाराने, सदाचरणाने,

नैतिकधैर्याने आणि दैवी शहाणपणाने वाईट किंवा दुष्ट गोष्टींच्या जागी वरील हे चांगले विचार स्वतःवर ताबा ठेवून मिळवावे. [१७]

PART FOUR

WHAT DOES ZOROASTRIAN RELIGION TEACH US ?

पारशी धर्म आपल्याला काय शिकवण देतो ?

पारशी धर्म आपल्याला हे ऐहिक जग सोडून ईश्वराच्या राज्यात परत जाण्यापूर्वी आपले जीवन इतरांना उपयोगी पडण्याकरिता आपण कशा पध्दतीचे आचरण केले पहिजे, याची शिकवण देतो.

पारशी धर्म तीन मुख्य कर्तव्यांविषयी शिकवण देतो.

१) सर्व सृष्टीचा निर्माता 'अहुर मझदा' विषयीचे आपले कर्तव्य.

२) आपल्या सभोवतालच्या लोकांविषयी आपले कर्तव्य.

३) आपल्या स्वतःविषयी आपले कर्तव्य.[१८]

- **OUR DUTY TOWARDS THOSE AROUND US**

आपल्या सभोवतालच्या व्यक्तींविषयी आपले कर्तव्य

पारशी व्यक्तीचे प्रेषित म्हणजे झरतुष्ट्रानी सर्वांना 'याथा–अहु–वाइऱ्यो (Yatha-Ahu-Yatha-Ahu Vairyo) मध्ये अगदी थोडक्यात शिकवण दिली आहे. ती म्हणजे –

१) सन्मार्गावर चाला.

२) आपले काम निःस्वार्थीपणे करा.

३) नैतिक धैर्य उंचवा.

याद्वारे आपण आपल्या सभोवतालच्या व्यक्तिंना मदत करू शकतो. त्यामुळे आपल्या पालकांचे, शिक्षकांचे व आपल्या निरीक्षकांचे आज्ञापालन करणे आणि सहवासात जे कोणी येतील त्यांच्याशी मैत्रीच्या नात्याने व प्रेमळपणाने वागणे हे व्यक्तीचे कर्तव्य आहे, मग ते आपले वरिष्ठ, किंवा समवयस्क, कनिष्ठ असोत. याबदल्यात आपल्याला प्रेम आणि आदराची प्राप्ती होईल.

असे म्हटले जाते की, ''आपण नम्रतेचा स्वीकार केला तर येणाऱ्या काळात आपण यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकतो.'' म्हणजेच, नम्रता धारण केल्याने आणि आपल्या

सभोवतालच्या लोकांवर प्रेम केल्याने इतरांकडून सहकार्य व मदत आपल्याला मिळून काम सोपे होईल.

आपल्या सभोवतालच्या माणसांविषयी कर्तव्याच्या जोडीलाच, आपली जमीन, पाणी आणि हवा शुध्द राखणे हे देखील आपले कर्तव्य आहे. कारण ते जिवंत प्राण्यांच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे. पारशी असे मानतात की, आपण प्राण्यांची काळजी घ्यायला, त्यांना योग्य अन्न पुरविण्याकरिता व त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरिता वचनबध्द आहोत.

- **OUR DUTY TO OURSELVES**

आपल्या स्वतःविषयीचे कर्तव्य –

सर्वप्रथम आपले शरीर निरोगी आणि मन शुध्द राखणे हे प्रत्येक व्यक्तीचे सर्वोच्च कर्तव्य आहे. स्वत:विषयीच्या आपल्या कर्तव्यंबाबतचे काही महत्त्वाचे नियम पुढीलप्रमाणे:

१) सकाळी लवकर उठणे.

२) कार्यक्षम राहणे.

३) आहाराच्या सवर्यींबाबत जागरुक असणे.

४) आपले शरीर व कपडे स्वच्छ ठेवणे.

५) आठ तास झोप घेणे.

६) आपल्या मनात नेहमी चांगले विचार बाळगणे आणि वाईट विचारांपासून दूर राहणे.

समाधानातून प्रत्येकाला सुखाची प्राप्ती होते. परंतु, समाधानाचा अर्थ असा नाही की, ''आपल्याला जे मिळाले त्यालाच 'खूप' समजून स्वतःला सुधारण्याकरिता प्रयत्नच करू नये.'' उलट, कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपण आपली स्थिती आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने सुधारण्यासाठी प्रयत्न करणे. चांगली फळे तेव्हाच मिळतात, जेव्हा आपण त्यांची कमीत कमी अपेक्षा करतो. त्याचप्रमाणे द्वेष आणि मत्सर हे वाईट विचारांची दोन भयंकर कारणे आहेत जी माणसाच्या प्रगतीचा नाश करतात. म्हणून अशा कृत्यांपासून नेहमीच लांब राहिले पाहिजे.

उत्साही आणि मदतीसाठी तत्पर असा जर एखाद्याचा दृष्टिकोन असेल तर तो आपल्याला आपले काम तत्परतेने तसेच समाधानकारकरीत्या पार पाडण्यासाठी उपयोगी ठरते.

७) ज्ञान संपादन करणे –

पारशी धर्मानुसार ज्ञानाचे दोन प्रकार आहेत –

अ) जन्मजात ज्ञान

ब) प्राप्त केलेले ज्ञान अथवा संपादन केलेले ज्ञान

जन्मजात ज्ञान हे जर संपादित ज्ञानाने केलेल्या कृतीच्या संपर्कात नाही आले तर ते सुप्तावस्थेतच राहते. त्यामुळे जितके अधिक ज्ञान संपादित केले जाते तितके ते अत्यावश्यक असते.

८) पारशी समाज ज्या देशात राहतो तो त्या देशाशी प्रामाणिक असतो. ते आपल्या ईश्वराशी व राज्यकर्त्यांशी तसेच देशाशी प्रामाणिक म्हणून ओळखले जातात.

९) कुठलाही पारशी स्वतःचे वचन पाळणे हे महत्त्वाचे कर्तव्य मानतात.

१०) पारशींनी स्वतः आणखी काही गुण निर्माण केले ते म्हणजे –

अ. क्रियाशीलता

ब. साधे राहणीमान आणि काटकसर

क. बोलणे व खाण्या–पिण्यातील संयम

ड. आत्मसंयम

इ. धीर

ई. आत्मसन्मान

उ. सत्य बोलणे

ऊ. आळशीपणाचा त्याग

ए. चांगल्या सवयी आत्मसात करणे.

ऐ. नैतिक धैर्य

ओ. शूरत्व

औ. चांगली वर्तणूक

अं. वडीलधाऱ्यांचा मान राखणे.

अः. शत्रूशी सद्‌वर्तन

क. मित्रता

ख. नम्रता

ग. परस्परांचा आदर करणे.

घ. ज्यांनी आपल्याकरिता थोडे जरी केले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे.

पारशी असे मानतात की, वरील सद्‌वर्तणुकीची तत्त्वे माहीत असले तरी कोणीही व्यक्ती चांगली व्यक्ती बनत नाही, तर त्यांच्या मते, तीच व्यक्ती यशस्वी व चांगली असते जी ह्या धर्माज्ञांचे त्यांच्या रोजच्या जीवनात पालन करते. [१९]

PART FIVE

WHAT IS THE BENEFIT OF PRAYERS ?

प्रार्थनेतून कोणता लाभ होतो ?

पारशी असे मानतात की, ईश्वराला आपल्या प्रार्थनेमधून तो किती शक्तीशाली आणि महान आहे असे वदवून घेऊन स्वतःची स्तुती करून घ्यायची नसते. सरोश–याश्त–हदोख्त (Sarosh-Yashat-Hadokht) च्या पहिल्या कडव्यात म्हटल्याप्रमाणे,''ह्या जगातल्या लोकांकरिता प्रार्थना करणे सर्वोत्तम आहे''. याचे कारण म्हणजे अगदी अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना ही माणसाचे मन कणखर बनविते. ज्यामुळे त्याचे सर्व वाईट विचारांपासून संरक्षण होते. तसेच प्रार्थनेमुळे ते सर्व प्रकारच्या अडचणींवर मात देखील करू शकतात.

अगदी अंतःकरणपूर्वक दिवसांतून काही वेळा का होईना स्वतःला ईश्वराच्या जवळ असल्याच्या कल्पनेने देखील मनःशांती मिळते. तसेच विचारांमध्ये स्पष्टता निर्माण होते. तासन्तास उगाच तोंडतल्या तोंडात पुटपुटत अर्थही समजून न घेता केलेल्या प्रार्थनेने ही गोष्ट साध्य होत नाही. सर्व प्रार्थना ह्या आपल्या स्व–उन्नतीकरिता केलेल्या उपदेशांच्या अणि समजून–उमजून केलेली प्रार्थना ही मनःशांतीकरिता अधिक परिणामकारक असते.

प्रार्थना करण्याची दुसरी साधी पध्दत म्हणजे हलक्या आवाजात प्रार्थना करणे होय. असे करीत असताना ही प्रार्थना तुम्ही तुमच्या मनात ऐकत असल्याचा अनुभव घ्यायचा असतो. अशाप्रकारे पाच मिनिटे प्रार्थना करून त्याचे भाषांतर वाचून ते मनात रुजविण्याचा प्रयत्न करा. आपण कोणती प्रार्थना केली यावर विचार करा. पारशी असे मानतात की, रोज अशा प्रकारे केलेल्या अभ्यासात्मक प्रार्थनेतून मनःशांती आणि ईश्वराशी ऐक्याचा लाभ होतो.

तसेच काही व्यक्ती प्रार्थनेद्वारे ईश्वराकडे आरोग्य आणि भरपूर पैशांचीही मागणी करतात. त्याचप्रमाणे, जर व्यक्ती आरोग्याचे सामान्य नियम धुडकावून प्रार्थना करायला लागले तर ईश्वर त्यांना कशी मदत करेल? झरतुष्ट्राने पारशांना कार्यक्षम होण्याची शिकवण गाथांमध्ये दिली आहे व अकार्यक्षमतेचा त्यागही करायला सांगितले आहे.

पारशी असे मानतात की, आपली प्रार्थना ईश्वराने आपल्याला योग्य मार्गदर्शन करावे म्हणून असली पाहिजे. तसेच जेव्हा आपण एखादे काम करीत असतो, त्या वेळी ईश्वराने आपल्या प्रयत्नांमध्ये आपल्याला साहाय्य करावे याकरिता केलेली असावी. आपण सच्चे असू तर ईश्वर आपल्याला जाणिवेमार्फत म्हणजे (साराओशा –Saraosha) मार्फत आपले काम योग्यरीतीने करण्याकरिता मार्गदर्शन करतो.

- **WHY SHOULD WE PRAY IN - Avesta and Pazend**

अवेस्ता आणि पाझांद भाषांमध्ये प्रार्थना का केली पाहिजे ?

संस्कृत प्रमाणेच अवेस्ता भाषेत मूळ धातूचे दहा गण कल्पिले असून ते धातू आत्माने व परत्मै पदांत चालतात. संस्कृतप्रमाणेच स्वरान्त व व्यंजनान्त नामे व सर्वनामे सर्व विभक्तींत, तिन्ही वचनांत व तिन्ही लिंगात चालवली जातात. अवेस्ता ग्रंथाच्या लिपीस अवेस्ता लिपी असेच म्हणतात व ही लिपी सेमिटिकप्रमाणे उवजीकडून डावीकडे लिहिली जाते. समान राजघराण्याच्या अमगानीत प्रचलित असलेल्या पेहलवी भाषेच्या लिपीतून अवेस्ता लिपीचा विकास झाला असून ॲरेमाइक लिपी ह्या दोन्ही लिप्यांच्या उगमस्थानी आहे, असे तज्ञ समजतात.

अवेस्ता लिपीत ध्वनिचिन्हे पुष्कळ आहेत, पण एकंदर ध्वनिपद्धती पुष्कळ आहेत, पण एकंदर ध्वनिपद्धती स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेः

स्वरः अ, आ, इ, उ, ए, ओ (ऱ्हस्व)

अः, आः, इः, उः, एः, ओः (दीर्घ)

व्यंजनेः क, ख, घ, ङ (कंठ्या)

च, ज, ञ (तालव्य)

त, थ़, द, ध़, न (दंत्य)

प, फ़, ब, व़, म (ओष्ठ्य)

य, व (अर्धस्वर)

र (कंपक)

स, झ (दंत्य ऊष्म)

श, भ्फ (तालव्य – ऊष्म)

ह. (महाप्राण)

खुलासाः (१) त्रन, लृ नाहीत. त्रन्च्या जागी अर, अर्अ असे लेखन आढळते. वरील तक्त्या स्वरापुढे दिलेले विसर्गचिन्ह दीर्घत्व दाखवते. याशिवाय आःइ, आःउ,आएः, आओ, ओः इत्यादी. संयुक्त स्वरही आहेत. (२) मूर्धन्य व्यंजनांच वर्ग नाही. (३) घर्षक व्यंजने नुक्ता देऊन दाखविली आहेत. (४) झ व भ्फ हे स व श यांचे मिळते सघोष आहेत. (५) ल नाही. (६) विसर्ग नाही (७) या भाषेत गुण व वृद्धी होऊन केवळ स्वरांपासून संयुक्त स्वर मिळतात.

बारीकसारीक फरक दृष्टीआड करुन नाम, आख्यात, उपसर्ग व निपात या व्याकरणाच्या चतुर्विध अंगांकडे व तदनुषंतील विलक्षण साम्य दिदून तेते आणि या दिन भाषांचे मूळे एकच असले पाहिजे हे पडते.

अवेस्तामधील खालील मंत्रावरुन हे साम्य दिसून येईल.:

यस्नः यस्न म्हणजे यज्ञ, यजन किंवा पूजा.

गेल्या शंभर वर्षांमध्ये पारशी धर्मातील भाषांचा योग्य प्रकारे अभ्यास करायला आणि त्या व्यवस्थित समजून घ्यायला सुरुवात झालेली आहे. जेवढे अधिकाधिक लोक ह्या भाषेचे संशोधन आणि अभ्यास करत आहेत तेवढे त्या भाषेच्या ज्ञानात भर पडत आहे. आणखी काही वर्षांनंतर पारशी धर्मग्रंथाच्या केलेल्या भाषांतरामध्ये सुधारणा करण्याची गरज निर्माण होणार आहे व त्यानतर आणखी काही वर्षांनी पुन्हा त्याची पुनरावृत्ती करण्याची गरज निर्माण होणार आहे. पारशी धर्मग्रंथाच्या भाषांतराचे पुनर्मुद्रण करण्याची ही परंपरा चालू ठेवायची असेल तर, आपल्या प्रार्थनेमधून ह्या भाषा जिवंत ठेवणे अतिशय गरजेचे आहे.

पारशी असे मानतात की, आपण जर ह्या प्रथेचा भंग केला तर 'अवेस्ता' आणि 'पाझांद' मधील प्रार्थना लवकरच पुढच्या पिढीकरिता लुप्त होतील. ग्रिकांनी आणि अरबांनी

इराणवर राज्य केल्यामुळे पारशांकडे फारच कमी धार्मिक पुस्तके व धर्मग्रंथ शिल्लक राहिले आहेत. पारशी मानतात की, आपल्याजवळ जे काही शिल्लक आहे ते सांभाळून ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. [२०]

- **FIRE IN OUR PRAYERS**

पारशांच्या प्रार्थनेमधील अग्नी

पारशांच्या 'केम–ना–माझदा' प्रार्थनेमध्ये 'अग्नी' चे सद्विचारांच्या स्वरुपात वर्णन करण्यात आलेले आहे. काही ठिकाणी त्याला 'अहुर मझदाचा अग्नी' असेही म्हटलेले आहे. Ha-47-6 मध्ये अहुर मझदाला प्रार्थना करताना त्याचा भक्त त्याला त्याच्या दैवी मानसिकतेद्वारे सन्मार्गाचा आणि दैवी शहाणपणाचा प्रकाश पोहोचविण्याची विनंती करतो.

मेहेर याश्त मध्ये अग्नीला शहाणपणाचे प्रतीक म्हटलेले आहे. आणि त्याची तुलना 'कायानिअन' राजघराण्याच्या गौरवशाली परंपरेशी केलेली आहे. जेथे 'आताराश पुथरा अहुराहे माझदा' हे शब्द प्रार्थनेत आढळतात. तेथे त्याचा अर्थ 'अहुर मझदाचे शुध्दीकरण करणारा अग्नी' असा असतो.

अताश नियाएश (Atash Niyaesh) मध्ये अग्नीची तुलना आपल्या शरीरातील प्रकाश देणाऱ्या अग्नीशी केलेली आहे, जो आपल्याला बुध्दीची देणगी देतो, तसेच आपल्या आयुष्याचे रक्षण करतो, असे सांगितले आहे.

पारशी प्रार्थना करताना देवाकडे आपण तोंड करीत आहोत असे मानून प्रकाशाकडे तोंड करून प्रार्थना करतात. ते दिवसाच्या वेळी सूर्याकडे तोंड करतात आणि रात्रीच्या वेळी चंद्र, ताऱ्यांकउे किंवा घरातील दिव्यांकडे तोंड करतात. तसेच त्यांच्या 'अताश बेहराम्स' आणि 'अताश अदारान्सं' (Adarans) मध्ये अग्नी सतत पेटता ठेवला जातो, या अग्नीकडून येणारा प्रकाश ईश्वरी अस्तित्वाची आठवण करून देतो. पारशी लोक ह्या अग्नी समोर व अहुर मझदाच्या अग्नी समोर आपल्या शुध्दीकरणासाठी प्रार्थना करतात. 'अताश नियाएश' (Atash Niyaesh) च्या शेवटच्या कडव्यात म्हटल्याप्रमाणे 'अहुर मझदाचा अग्नी' हा सद्विचार, सद्उच्चार, आणि सद्आचाराच्या इंधनाने प्रज्वलित करण्यात आलेला असतो.

- **AMESHASPANDS AND YAZATAS**

अमेशाशपान्डस् आणि याझ्तास

अवेस्ता, अमेशा स्पेन्टाच्याप्रमाणे 'अमेशाशपान्डस्चा अर्थ 'शाश्वत पवित्र' किंवा 'शाश्वत दैवी कायदे' असा आहे.

'फरवरदिन याश्त' च्या ८१व्या कडव्यात असे म्हटले आहे की, 'अहुर मझदा' चे सुंदर, शुभ, पांढऱ्या शुभ्र प्रकाशातलं सुंदर, तेजस्वी आणि शाश्वत दैवी कायद्याच्या तेजाने बनलेले आहे. 'होरमाझद याश्त' च्या तिसऱ्या कडव्यात, अहुर मझदा म्हणतात की, ''माझे नाव 'स्पिटामा झरतुष्ट्र' जे पवित्र दैवी कायदे आहेत हे साक्षात्काराने प्रकट झालेले कायदे आहेत. हे कायदे सर्वात अजिंक्य, सर्वात तेजस्वी, सर्वात परिणामकारक कायदे आहेत.' व त्यांचे सर्वश्रेष्ठ देवदूतांमध्ये दैवीकरण करण्यात आलेले आहे.

याझाता (Yazata) ह्या शब्दाचा अर्थ अत्यंत पूजनीय, प्रशंसनीय किंवा आदरणीय आहे. पारशांच्या महिन्यांच्या दिवसाला ईश्वरनिर्मित, पूजनीय अशा नैतिक आणि ऐहिक गोष्टींची नावे देण्यात आलेली आहेत. [२१]

- **THE GATHAS**

गाथा

अवेस्ता या धर्मग्रंथात झरथुष्ट्राने प्रवर्तित केलेल्या धर्माची तत्त्वे व तदनुषंगिक विषय यांचे निरूपण आहे. झरथुष्ट्राच्या काळाविषयी मतभिन्नता असली, तरी इराणी परंपरेनुसार अवेस्ताची रचना इ.स.पू. ५५८ ते ३०० या आकमेनियन काळात आली असावी. झंद किंवा झेंद म्हणजे मूळ ग्रंथावरील पेहलवी भाषेतील विवरण किंवा भाष्य. १७व्या शतकाच्या शेवटी झेंद अवेस्ता ही संज्ञा पाश्चात्य अभ्यासकांनी रूढ केली. जरथुश्त्राच्या वचनांना गाथा म्हणतात. अवेस्तातील गाथा प्राचीनतम् व महत्त्वाच्या असल्याने गाथा ही संज्ञाही पुष्कळदा त्यास दिली जाते.

(१) **यस्न :** यस्न म्हणजे यज्ञ, यजन किंव पूजा. हा विभाग सर्वांत प्राचीन असून त्यात ७२ अध्याय म्हणजे हा आहेत. त्यात यज्ञ विधी, उपसनापद्धती व गूह्य संस्कार यांविषयी मंत्र व निरूपण असून देवतांची स्तोत्रे ही आहेत. जरथुश्त्राच्या ५ ही गाथांचा त्यात समावेश होतो. त्या गाथांची ओजस्वी शैली उल्लेखनीय आहे.

(२) **विस्परत :** विस्परत म्हणजे विभूती किंवा थोर पुरुष. या विभागात २३ अध्याय म्हणजे कर्त आहेत. यातील स्तोत्रे यस्नातील मंत्रांबरोबर पठण केली जातात. काही उच्च नीतितत्त्वांचे निरूपणही या विभागात आढळते.

(३) **यश्त :** बावीस सूक्तांच्या या विभागातील मिथ्र किंवा मेहेर व जलदेवता (आवाँ किंवा अरदीसूर अनाहित) यासंबंधीची सूक्ते प्रदीर्घ आहेत. फरवर्दिन यश्त हा विभूतींच्या स्मृतिचिंतनाला वाहिलेला आहे. जमियाद यश्तात प्राचीन इराणमधील पर्वतांची व राजेलोकांची वर्णने आहेत. पुराणकथांच्या दृष्टीने या विभागाला महत्त्व आहे. अवेस्ताधर्मियांचा नीतिविषयक दृष्टीकोनही त्यावरून समजतो. छंदोबद्ध स्वरूपातील सूक्तरचनेत बरेच काव्य गुणही आढळतात.

(४) **वेंदिदाद :** वेंदिदाद हे अवेस्ता भाषेतील वी – दएवोदात या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. संपूर्ण स्वरूपात उपलब्ध असलेला हा एकमेव विभाग होय. यात २२ अध्याय म्हणजे प्रकर्त आहेत. असुरी शक्तीचे दमन, कृषिकर्म, प्रेतसंस्कार, रजस्वला स्त्रियांचा आचार व अन्य विषयांसंबंधीचे विधिनिषेध यांसंबंधी या विभागात निरूपण आहे. पहिल्या अध्यायात हिंदुस्थानसह १६ देशांचे भौगोलिक वर्णन आढळते. जरथुश्त्र व अहुर मज्द यांतील प्रश्नोत्तररूपी गद्य संवाद ही यात आहे.

(५) **खोर्दाह अवेस्ता :** प्राचीन अवेस्ता धर्मसाहित्यातून कुटुंबीय लोकांसाठी संकलित केलेल्या वेच्यांचा हा लघुसंग्रह आहे. सूर्य, चंद्र, जल, अग्नी, मिथ्र इ. देवतांची स्तोत्रे या संग्रहात आढळतात. त्यांस न्याइश (निघाइश्त) म्हणतात. पारशी लोक या स्तोत्रांचे नित्य किंवा नैमित्तिक पठण करतात. उपयुक्त साहित्याखेरीज अन्य स्फुट प्रकरणे ही उपलब्ध आहेत. पेहलवी भाषेतही अवेस्ता धर्मग्रंथ आढळतात. या सर्व धार्मिक साहित्यावरून प्राचीन इराणमधील संस्कृतीचा बोध होऊ शकतो, या साहित्याने प्राचीन आर्यपरंपरांचे जतन केल्याचे दिसून येते. सनातन व शाश्वत वस्तूचा निर्देश करणाऱ्या वैदिक ऋत कल्पनेत जो व्यापक अर्थ आहे, तो अवेस्तातील अष कल्पनेत आहे. ऋत–अॅरॅत–अर्त–अर्ष–अष अशा प्रकारे ऋत

शब्दापासून अष शब्द व्युत्पादित येतो. अष कल्पनेवरच अवेस्तातील आध्यात्मिक, उपासनात्मक, नैतिक व सामाजिक विचार अधिष्ठित आहे. अहुन–वर्श्य मंत्रात अष जीवनाची शिकवण आहे. अहुर मज्दाने ऋग्वेदातील अप् देवतेच्या व अवेस्तातील अरद्वीसूर अनाहितेच्या सूक्तांत साम्य आढळते.

गाथा ह्या जुन्या अवेस्तांच्या भाषेत असून त्यात प्रत्यक्ष झरतुष्ट्राच्या शिकवणी दिलेल्या आहेत. सध्या उपलब्ध असलेल्या भागात यजाशना (Yajashna) समारंभाच्या एका भागाचा अंतर्भाग आहे. 'यजाशना' किंवा 'यास्ना' ही प्रार्थना ७२ व्या प्रकरणांमध्ये गुंफण्यात आलेली आहे. यात, प्रकरण २८ ते ३४, ४३ ते ५१ आणि ५३ हे सर्व मिळून गाथेची एकूण १७ प्रकरणे आहेत. त्या प्रार्थनेचा हा भाग उत्तम भाग असून आपण जर आपल्या प्रेषितांच्या शिकवणुकीचे अनुसरण केले तर या जगातून अतिशय आत्मविश्वासाने आपण मार्गक्रमण करू शकतो व ईश्वराचा आपल्या निर्मितीमागचा हेतू सफल होऊ शकतो.

गाथेंच्या १७ व्या प्रकरणांमध्ये २३३ परिच्छेद असून, संपूर्ण भाषांतर हे एकदा किंवा दोनदा वाचण्याविषयी सुचविण्यात आलेले आहे व त्यानंतर प्रत्येक प्रकरणाच्या एकेका परिच्छेदाचा अभ्यास करण्यात यावा, असे दिले आहे. असे म्हटले जाते की, प्रत्येक परिच्छेदाच्या पुनर्वाचनाच्यावेळी व्यक्तीला नवनवीन कल्पना सुचतील आणि त्या विषयीचा समज अधिक स्पष्ट होत जाईल. गाथा ह्या नुसत्या वाचण्यासाठी आणि अभ्यासण्याकरिता नसून जो कोणी त्यांच्या शिकवणुकीनुसार जीवन व्यतित करेल त्यांचे जीवन सफलतापूर्वक व्यतित करता येईल.

गाथेच्या शिकवणुकीचे सार पुढीलप्रमाणे –

''जीवनात नैतिक आणि ऐहिक ह्या दोन्ही दृष्टीने यशस्वी होण्याकरिता व्यक्तीने स्वतःला 'वाहिशतेम मनो' म्हणजेच (Vahishtem Mano) किंवा वैश्विक मनाशी, ईश्वराच्या मनाशी जोडून घ्यावे. झरतुष्ट्र हे सर्व साध्य करण्याकरिता चांगले विचार, सदाचार, नैतिक धैर्य आणि दैवी शहाणपणा स्वतःच्या अंगी बाणून घ्यावा अशी शिकवण देतो. त्यांच्या मते ज्या वेळी व्यक्तीमध्ये वरील सद्गुणांचा विकास होईल, त्या वेळी त्याचा ईश्वराशी मेळ होईल व त्याला ईश्वराकडून संपूर्ण मार्गदर्शन मिळेल. (28-3, 31-7 & 17)

तसेच ''एखाद्या व्यक्तीने केवळ ईश्वराशी मेळ साधण्याची नुसती आकांक्षाच बाळगू नये तर स्वतःचा ईश्वराशी मेळ साधल्याचे कल्पनाचित्र उभे करावे. कारण ईश्वरी शक्तींचा हा प्रवाह नेहमीच वरून प्राप्त होत असतो.'' (34-3) तसेच जेव्हा एखादी व्यक्ती संशयग्रस्त असते त्यावेळी त्याला दैवी मार्गदर्शन मदत करते. (31-12)

दुसरी मुख्य शिकवण म्हणजे व्यक्तीने 'आन्ग्रे माइन्यु' म्हणजे दुष्ट प्रवृत्ती व स्पेन्टा माइन्यु म्हणजे चांगल्या प्रवृत्तींशी आपल्या चांगल्या भावनांद्वारे लढत द्यावी. तसेच खोटेपणा हा नेहमी टाळावा, नरकाला–खोटेपणाचे घर म्हणण्यात आले आहे. जी माणसे खोटे बोलतात ती एका अर्थाने आभासात्मकरित्या नरकातच जगतात (30-11) ज्यांना स्वतःची उन्नती साधायची आहे त्यांनी हिंसेपासून स्वतःला दूर ठेवावे (48-7). राग आणि द्वेष करणे हा पापाचा मार्ग आहे.(49-4)

गाथांच्या शिकवणी विषयी, काहीजण असे मत व्यक्त करतात की, ही पवित्र शिकवण ह्या काळाकरिता उपयोगी नाही, कारण ह्या काळात भ्रष्टाचारी व्यक्तींचा उत्कर्ष होताना दिसतो. हा भ्रष्टाचारी उत्कर्ष काही कळापुरताच असतो.[२२]

PART SIX

CHARACTER BUILDING

चारित्र्याची घडण

नेपोलिअन हिलने त्याच्या 'लॉ ऑफ सक्सेस' ह्या पुस्तकात चारित्र्य निर्माणाच्या पुढीलप्रमाणे पायऱ्या दिलेल्या आहेत –

१. चारित्र्यनिर्मितीची पहिली पायरी, कठोर स्वयंशिस्तीचे पालन ही आहे. ह्यात 'अशेम वोहू' ची प्रार्थना (Ashem Vohu) व ह्या प्रार्थनेचे 'कर्तव्याकरिता कर्तव्यपालन' हे ठळकपणे मांडले.

२. दुसरी पायरी, ही स्वतःच्या विचारांवर नियंत्रण आणि स्वतःच्या मनात सकारात्मक विचारांनी चैतन्यशील बनविणे हे आहे. ह्यात ''यथा–अहु–वाइऱ्योच्या'' प्रार्थनेतले 'नि:स्पृह व्यक्तींमध्येच चांगल्या मनाचा वास असतो.' हे तत्त्व ठळकपणे अधोरेखित केले आहे.

३. तिसरी पायरी म्हणजे, प्रत्येक दिवशी कमीत कमी एखादी किंवा त्याहून अधिक व्यक्ती शोधून त्यांच्यातील सद्‌गुणांची पारख करून, त्याकरिता त्यांची स्तुती करणे, तसेच 'येन्गे हातनम' प्रार्थनेचे (Yenge Hatnam Prayer) ''आम्ही जिवंत असलेल्या सर्व स्त्री–पुरुषांची स्तुती करतो, ज्यांनी चांगली कर्मे केली आणि ज्यांच्या चांगलेपणाचा निवाडा हा सन्मार्गाकडून म्हणजेच 'अहुर मझदा' कडून करण्यात आलेला आहे,'' हे तत्त्व ठळकपणे मांडले आहे.

''चांगल्या चारित्र्याची जोपासना व ज्ञान हे सुखी जीवन जगण्यासाठी तसेच रोजचे जीवन जगताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरिता उपयोगी ठरते.''

शहापूर दुसरा ह्या ससानियन राजाच्या काळात 'अदारबाद मारेस्पांद' (Adarbad Marespand) ह्या सर्वोच्च धर्मगुरुने जो उपदेश केला होता, तो पहलवी पुस्तकात जतन करून ठेवण्यात आलेला आहे. त्यातील काही भाग खालील प्रमाणे देण्यात आलेला असून तो आचरण करण्यायोग्य आहे. –

१. कठोर होऊ नका.

२. कोणत्याही अनुचित प्रसंगाची खिल्ली उडवू नका.

३. दुसऱ्यांचा उपहास करू नका.

४. सभांमध्ये आपल्याला उच्चासन मिळावे म्हणून इतरांशी भांडू नका.

५. गरीब व्यक्तींकडे अनादराने पाहू नका.

६. कठोर शब्दांची उधळण करू नका. काही प्रसंगी कठोर शब्द वापरणे योग्य असते आणि काही प्रसंगी त्याचा वापर शक्यतो न करणे हे त्याचा वापर करण्यापेक्षा केव्हाही चांगले.

७. शिक्षा करण्याच्या उद्देशाने सूडबुध्दीचे होऊ नका.

८. दुसऱ्यांना दुखवू नका.

९. नम्रपणे बोला.

१०. स्वतःचीच स्तुती करू नका.

११. कृतज्ञ रहा, त्यामुळे तुमच्या मोठेपणाची कदर केली जाईल.

१२. बोलताना वाकून, नम्रपणे बोला. ह्यामुळे तुमची मान मोडणार नाही, तसेच नम्रपणे,बोललेल्या चांगल्या शब्दांमुळे तोंडाला दुर्गंधी येणार नाही.

१३. अशोभनीय पध्दतीने संभाषणाला सुरुवात करू नका.

१४. तुमच्या स्वतःकरिता जे योग्य नाही ते दुसऱ्यांकरिता करू नका.

१५. वरिष्ठांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवा.

- **पाप किंवा अधर्म**

पाप दोन प्रकारचे आहेत, एक सहेतुक व दुसरे निर्हेतुक होय. म्हणजेच (Sin of Commission and Sin of Ommission)

१) **यातील सहेतुक पापकर्मामध्ये –** हेतुपुर्वक दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता केलेल्या कर्माचा समावेश होतो. यात दुसऱ्यांवर खुन्नस ठेवून केलेले अनिष्ट कर्मे, जी कायद्याच्या चौकटी पलीकडची किंवा बेकायदेशीर कर्माने युक्त असतात.

२) **निर्हेतुक म्हणजेच Sin of Ommission -**

ह्या पापाच्या प्रकारात, एखाद्याचे भले करण्याची संधी गमविणे, दुसऱ्यांना मदत करण्याकरिता चांगली कर्मे न करणे, देशाच्या कायद्याप्रमाणे आचरण न करणे, तसेच स्वतःच्या कर्तव्याचे पालन प्रामाणिकपणे न करणे ह्या गोष्टींचा समावेश आहे.

पारशांच्या मते, धर्म आपल्याला क्रियाशील आणि सद्‌गुणी बनविण्याची शिकवण देतो. त्याचप्रमाणे एखाद्या कामाची चालढकल करणे म्हणजे आजचे काम उद्यावर ढकलणे, ह्या गोष्टींचा अनेक प्रार्थनांमधून धिक्कार करण्यात आलेला आहे. क्रियाशून्य, आळशी व्यक्ती ही तिच्या कुटुंबाच्या किंवा देशाच्या प्रगतीला कोणताही हातभार लावत नाही. उलट, ती प्रगतीत अडथळे निर्माण करते. म्हणून या गोष्टींचा निषेध करण्यात आलेला आहे. तसेच पापकर्म करणाऱ्या व्यक्तींप्रमाणेच जो सहेतुक पापकर्मे करतो तो ही तितकाच धोकादायक मानण्यात आला आहे. कारण तो सत्‌कर्मे करण्याचे सोडून कळतनकळत अनेक पापकर्मे करीत असतो. व पारशी धर्मानुसार हे दोघेही पापीच आहेत.

त्याचप्रमाणे 'मेहेर याश्त' (Meher Yasht) च्या ७१व्या कडव्यात असे म्हटले आहे की, ''जोपर्यंत कोणी प्रत्यक्ष स्वतः पापी बनत नाही, तोपर्यंत नुसत्या पापाच्या विचारांनी अथवा पापी बनण्याच्या इच्छेने पापी बनत नाही.'' याचाच अर्थ असा की, आपल्या विचारांतून, उच्चारांतून, आचारांतून वाईट गोष्टी दूर करण्याचा सजगतेने, प्रयत्न केला पाहिजे.

- **ACTS OF RIGHTEOUSNESS -**

सत्कर्मे करणे –

सत्कर्म करणे हे पाप करण्याच्या पूर्णपणे विरोधी आहे. सत्कर्मे करण्याचे आणखी दोन उपविभाग होऊ शकतात. ते म्हणजे –

१) कौटुंबिक किंवा वैयक्तिक सद्‌गुण.

२) सामाजिक सद्‌गुण

१) कौटुंबिक किंवा वैयक्तिक सद्‌गुण –

कौटुंबिक किंवा वैयक्तिक सद्‌गुणांमध्ये पहिला नंबर लागतो तो सुखी गृहस्थ जीवनाचा. ''वेंदीदाद फारगाद'' ४–४७ नुसार, अविवाहित जीवनापेक्षा गृहस्थ जीवन हे अधिक चांगले मानण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुले असणे हे मुले नसण्या पेक्षा चांगले मानले आहे विवाहित पुरुषाला किंवा स्त्रीला आपल्या जोडीदाराविषयी प्रेम, आदर आणि मुलांविषयी प्रेम असते. त्यांच्यातून प्रेमाचे उत्सर्जन होत असल्यामुळे ते त्यांच्या भोवतीच्या व्यक्तींना सुखी करतात. झरतुष्ट्राने 'गाथा Ha-53-5' मध्ये विवाहित जोडप्याला सल्ला दिला आहे, ते म्हणतात की, ''दोघांनी सदाचाराच्या बाबतीत एक दुसऱ्यांना कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ज्याचा परिणाम तुम्हाला भरीव बक्षिसांच्या रुपात मिळेल.'' म्हणजेच जेव्हा दोघांमधला एकजण दुसऱ्यावर प्रेमाचा वर्षाव करतो आणि वैवाहिक जोडीदाराशी सदाचाराने वागतो, तेव्हा साहजिकच दुसरा जोडीदारदेखील नैसर्गिकरीत्या प्रेमानेच वागतो आणि त्यामुळे वैवाहिक जीवन यशस्वीरीत्या व्यतीत होते.

दुसरा कौटुंबिक किंवा वैयक्तिक सद्‌गुण म्हणजे उद्योगीपणा. प्रत्येक पारशी व्यक्तीने उद्योगी असणे आणि त्यांचा स्वतःचा चरितार्थ चालविणे आवश्यक मानण्यात आलेले आहे. तसेच भीक मागणे, हे सुध्दा ह्या धर्मात हीन दर्जाचे मानण्यात आले आहे. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती जर संकटात असेल तर त्याच्या समान धर्मियांचे त्याला त्याच्या चरितार्थाचे साधन मिळवून देण्याकरिता मदत करणे हे कर्तव्य मानण्यात आले आहे. काही पाश्चात्य विद्वानांनी असे लिहून ठेवले आहे की, ''स्वतःचे कर्तव्य, कर्म करण्यात व्यग्र असलेल्या सामान्य जीवनापेक्षा जास्त चांगले व पवित्र जीवन दुसरे असू शकत नाही.''

'पारशांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची 'श्रमप्रतिष्ठा'. कौटुंबिक आणि वैयक्तिक सद्‌गुणांतील पुढची पायरी म्हणजे चांगली सवय लावून घेणे, एकदा का चांगली सवय अंगवळणी पडली की, तो आपला स्वभावच बनून जातो आणि मग कुठल्याही प्रकारच्या विशेष

प्रयत्नाशिवाय आपण त्याचे पालन करतो. सुखी जीवनाकरिता काही मूलभूत चांगल्या सवयी आहेत, त्या पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

१. व्यवस्थित झोपेनंतर सकाळी लवकर उठणे.

२. खर्चात काटकसर.

३. साधी राहणी.

४. खाण्या–पिण्यात, मौजमजा करण्यात व कपडे परिधान करण्यात संयम बाळगणे.

५. आपल्या हातात नसणाऱ्या परिस्थितींशी आपले जीवन जुळवून घेणे.

६. राग, लोभ आणि असमाधानासारख्या वाईट भावनांवर आत्मनियंत्रण ठेवणे.

७. धीर

८. आत्मसंन्मान

९. स्वतःच्या अंतरात्म्याच्या आज्ञेचे पालन करणे.

१०. प्रगती करण्याकरिता व्यक्तीने सर्वोत्तम करण्याचा नेहमीच प्रयत्न करणे.

२) सामाजिक सद्गुण –

सामाजिक गुण म्हणजे शौर्य, शिस्त, वडिलधाऱ्यांचा आदर, आपल्या प्रतिस्पर्ध्याशी चांगली वागणूक, तसेच आपल्या भोवतीच्या माणसांशी मैत्रीपूर्ण व्यवहार, नम्रता आणि ज्यांनी आपल्याकरिता चांगले काम केले असेल मग ते कितीही खोटे असेना, सर्वांना त्याबद्दल धन्यवाद देणे.

सदाचारण हे धार्मिक कृत्य म्हणून आपण करणे अपेक्षित आहे. जर आपण सदाचाराने वागलो तर आपण आपल्या चांगल्या धर्माचे पालन केले आहे, असे म्हणता येईल. पारशी असे मानतात की, सर्व धर्माचा हेतू हा ह्या जगाला राहण्यायोग्य स्वर्ग बनविणे हा आहे. आणि त्यामुळे जेवढे आपल्याला ह्या जगात करता येणे शक्य आहे,तेवढे चांगले करावे. आणि पापी विचारांवर मात करावी. जेणेकरून या जगात शांतता नांदेल व जगाची परिपूर्णतेच्या दिशेने प्रगती होईल. [२३]

- **BEHAVIOR TOWARDS OPPONENTS -**

प्रतिस्पर्धाबाबतची आपली वागणूक –

झरतुष्ट्राने आपल्या शत्रूंचा तिरस्कार न करण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यांच्या प्रतिस्पध्यर्ींना तो चुकीचा कसा आहे याची सतत जाणीव करून देण्याची त्यांची पध्दत नाकारली आहे.

गाथांमध्ये झरतुष्ट्राने चुकीच्या मार्गाने अनुसरण करणाऱ्यांसाठी देखील त्यांच्या मुखातून आशीर्वादच येतात, अशी नोंद केली आहे. त्याचप्रमाणे तिरस्काराने तिरस्कार वाढतो, तर प्रेमाने प्रेम वाढते. झरतुष्ट्राने प्रतिस्पध्यर्ांविषयी प्रेम बाळगण्याचे समर्थन केले आहे. [२४]

- **LIVE A HEALTHY LIFE -**

आरोग्यपूर्ण जीवन जगा –

पारशी असे मानतात की, आरोग्यपूर्ण शरीरातच एक आरोग्यपूर्ण मन नांदते.

पारशी धर्मपरंपरेत शरीर, मन आणि आत्म्याची शुध्दता पाळण्याचा आपल्याला आपले आरोग्य टिकविण्याकरिता आणि स्वतःला रोगमुक्त ठेवण्याकरिता उपयोग होतो, असे सांगितले आहे. पारशी धर्मग्रंथांमध्ये मृत्यूपर्यंत स्वतःला आरोग्यपूर्ण राखण्याचा उपदेश केला आहे. 'आर्दीबाहेश्त याश्त'मध्ये आजार बरे करण्याच्या पाच पध्दतींचा उल्लेख केलेला आहे, तो पुढीलप्रमाणे –

१. शुध्दीकरणाद्वारे रोगमुक्ती – स्वच्छता
२. न्यायाद्वारे रोगमुक्ती
३. शस्त्रक्रियेद्वारे रोगमुती
४. औषधी वनस्पतींद्वारे रोगमुक्ती
५. प्रार्थनेद्वारे रोगमुक्ती

वरील पध्दतींमध्ये शेवटची पध्दत ही सर्वोत्तम मानण्यात आलेली आहे, ज्यामुळे अंतरात्म्याद्वारे आरोग्याची प्राप्ती केली जाते. वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञ तसेच मानसोपचार तज्ज्ञही सांगतात की बरेचसे विकार हे भावनिक असमतोलाद्वारे निर्माण होतात, ज्यामुळे काही विशिष्ट ग्रंथींमधून अतिरिक्त स्त्राव स्त्रवले जातात. अशा प्रकारचे रोग हे औषधांनी बरे होणे कठीण

असते. परंतु, प्रार्थनेद्वारे आणि योग्य विचारांद्वारे मात्र ते सहजरीत्या बरे करता येतात, असे पारशी मानतात.

- **LIFE IS FOR ENJOYMENT-**
  जीवन हे आनंदाने जगण्यासाठी आहे –

गाथा Ha 47-3 आणि 50-2 मध्ये, झरतुष्ट्राने आनंददायी पृथ्वीविषयी सांगितले आहे. त्यांच्या मते, ह्या पृथ्वीवरील जीवनाचा फक्त त्यांनीच आनंद घेतला पाहिजे जे योग्य प्रकारे विचार करतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आनंदाला सात्त्विक दर्जा असला पाहिजे, तसेच तो खालच्या प्रकारचा इंद्रियजन्य नसावा. कारण खालच्या दर्जाच्या कामुक आनंदात पडणे बरेच सोपे आहे, परंतु ईश्वराने ही पृथ्वी ह्याकरिता बनविलेली नाही. पृथ्वीवरील जीवन तिच्यावर सन्मार्गाने स्वतःची समृध्दी करून घेण्याकरिता आहे.

- **NO CASTE SYSTEM -**
  जातीव्यवस्था नाही–

झरतुष्ट्र राजा विस्तास्पला (Vistasp) आशीर्वाद देताना म्हणतात की, ''तुला दहा पुत्र होवोत,'' ज्यांपैकी तीन धर्मगुरुंप्रमाणे, उरलेल्यांपैकी तीन योध्द्याप्रमाणे, पुढील तीन शेतकऱ्याप्रमाणे आणि उरलेला एक हा तुझ्याप्रमाणे राजा होवो. यातूनच त्याकाळच्या इराण्यांमध्ये जातिव्यवस्था नसल्याचे दिसून येते.[२५]

PART SEVEN "A"

MARRIAGE AMONGST THE ZOROASTRIANS

पारशी समाजातील विवाहसोहळा

पारशी समाजात आज मुलगा व मुलगी ह्या दोघांच्याही संमतीने विवाह जमविली जातात. बरीचसे विवाह हे दोघांच्या पसंतीने, त्यांच्या स्वतःच्या निवडीतून, मैत्रीतून जमविले जातात. परंतु, असे असले तरीही ६०–७० वर्षांपूर्वी पालकच त्यांच्या विवाहासाठी वर–वधू पसंत करीत व मुलेसुध्दा पालकांच्या इच्छेनुसार विवाहास संमती दर्शवित असत.

इराणमधील मूळ प्रथेनुसार, विवाहावेळी मुलाचे पालक नियोजित वधूला कपडे, पैसे आणि दागिन्यांच्या स्वरुपात भेटवस्तू देत असत. परंतु पुढे साधारण ६०–८० वर्षांपूर्वी वराच्या पालकांना वराच्या शिक्षणाकरिता जो खर्च उचलावा लागतो, त्याकरिता ते वधुच्या पालकांकडून हुंड्याची अपेक्षा करू लागले. परंतु, सुदैवाने ही प्रथा नष्ट होत गेली व आज दोन्हीकडील पालक आपआपल्या ऐपतीप्रमाणे वर–वधूस सर्व देतात.

• विवाह समारंभातील काही विधी –

१) वाङ्‌निश्चय सोहळा

Betrothal Ceremony –

ज्या वेळी पालकांना आपली मुले योग्य वयाची झाली आहेत, आणि पुढील काळात त्यांच्या विवाहाची तयारी केली जाईल हे समाधान मिळते व याचवेळी ते लवकरात लवकर एक शुभ दिवस निवडून त्या दिवशी वाङ्‌निश्चय सोहळा पार पाडतात. अमावस्येच्या म्हणजेच The New Moon Day च्या दिवशी किंवा पारशी दिनदर्शिकेप्रमाणे पहिल्या व विसाव्या दिवसांना तसेच त्यांच्या पालकांच्या वाढदिवसांना ह्या समारंभाकरिता चांगले दिवस मानण्यात येतात. ह्या दिवशी वराच्या कुटुंबातील स्त्रिया वधूच्या घरी जाऊन तिला चांदीची नाणी उपहार म्हणून देतात, व त्यानंतर वधूच्या कुटुंबातील स्त्रियाही वराच्या घरी जाऊन त्याला सुध्दा चांदीची नाणी उपहार म्हणून देतात. परस्परांना देण्यात आलेली ही चांदीच्या नाण्यांची भेट हा ह्या समारंभाचा सर्वात महत्त्वाचा भाग असतो.

बेट्रोथाल म्हणजे वाडनिश्चय समारंभ हा जर घाईघाईत उरकून घेतला तर त्याबरोबर आणखी एक दिवे पेटविण्याचा समारंभ साजरा करण्यात येतो. यात वर–वधू दोघांच्याही घरात

एक तेलाचा दिवा पेटविण्यात येऊन दोन्ही कुटुंबातील स्त्रिया परस्परांच्या घरी जाऊन तेथील दिव्यात चांदीचे नाणे ठेवतात आणि नवीन कपडे व अंगठ्यासारख्या वस्तू भेट म्हणून देतात.

२) **अदर्नी –**

ज्या वेळी वधुपिता हा वराकडील कुटुंबियांना काही विशिष्ट रक्कम (हुंडा) देतो, त्या प्रसंगाला 'अदर्नी'(Adarni) म्हणतात. आज हा समारंभ साधारणतः विवाह समारंभाच्या चार दिवस आधी 'वृक्षारोपण समारंभा' बरोबर साजरा केला जातो.

३) **मादव सारा (Madav-Saro) –**

या दिवशी साधारणतः लग्नापूर्वी चार दिवस आधी पुनरुत्पादनाचे प्रतीक म्हणून घराच्या दरवाज्याजवळ एका भांड्यात आंब्याच्या झाडाची डहाळी रोवली जाते. ह्या विधीनंतरच्या पुढील दोन दिवसांना 'वाराध–पात्रा' (Varadh-Patra) दिवस म्हणतात. ह्यावेळी मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ धार्मिक समारंभ साजरे केले जातात. ह्या समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे आनंदाच्या प्रसंगी आपल्या जवळच्या मृत नातेवाइकांच्या आत्म्यांचे स्मरण करणे आणि विवाहित जोडप्याला आशीर्वाद देण्याकरिता आवाहन करणे.

पारशांमधील विवाह समारंभ हा दोन धर्मगुरुंद्वारे साजरा केला जातो. यातील एक धर्मगुरु वरासमोर तर दुसरा धर्मगुरु वधुसमोर उभा राहतो. जेथे हा समारंभाचा सर्व धार्मिक विधी पार पाडला जाणार असतो, त्या विवाह वेदीवर चढण्यापूर्वी वरवधुने शुध्दीकरण स्नान करणे आवश्यक असते. मुख्य समारंभ हा सूर्यास्तानंतर दोघांकडील नातेवाइकांच्या उपस्थितीतच पार पाडला जातो.

पारशी समाजात ब्रह्मचर्याबद्दल विशेष आस्था दाखविलेली नाही. त्यांनी वैवाहिक जीवनाला नेहमीच महत्त्व दिले. त्याचप्रमाणे विधवा विवाहाला मान्यता देऊन, घटस्फोट देखील कायदेशीररीत्या देण्यात येतो.

अर्धशतकापूर्वी पारशी समाजातील बरेचसे विवाह पालकांमार्फत जुळविली जात असत. फार क्वचितच अशा विवाहातील जोडपे भांडत असत. अशावेळी कुटुंबातील वरिष्ठ मंडळी जोडप्यांचे भांडण सोडवून त्यांना पुन्हा एकत्रित आणण्यात यशस्वी होत. त्या वेळी असे मानले जात असे की, घटस्फोट हा केवळ विवाहित जोडप्यांसाठी नाही, तर संपूर्ण कुटुंबासाठी एक कलंक आहे.

आज जोडपी स्वतःचा जोडीदार स्वेच्छेने निवडतात. पण आजही समाजात घटस्फोट होताना आढळतात.

पारशांच्या 'याथा–अहु–वाइऱ्यो' ह्या प्रार्थनेत पुढीलप्रमाणे शिकवण दिली आहे.

१. सन्मार्गाने वागा.

२. मन चांगले करण्यासाठी निःस्वार्थी व्हा.

३. आपल्या सभोवतालच्या लोकांकडे आदराने बघा.

त्याचप्रमाणे गाथा Ha-53-5 मध्ये झरतुष्ट्राने विवाहित जोडप्यांना खालीलप्रमाणे उपदेश केला आहे : –

१. विवाहामुळे एक जोडपं धार्मिकदृष्ट्या एकत्र येतं.

२. यशस्वी विवाहामुळे निर्माण झालेली संतती ही सुखी, समाधानी असते. याउलट, जेथे वैवाहिक जोडप्यांमध्ये सततची भांडणे व वाद असतात किंवा घटस्फोट होतात, त्या घरातील मुलेही सुखी नसतात.

३. त्याचप्रमाणे भिन्न धर्मिय पालकांची मुलेदेखील सहसा सुखी नसतात. अशा मुलांना वडिलांचा धर्म पाळावा की आईचा धर्म पाळावा येथून गोंधळ उडतो. तसेच पालकांच्या धर्मातील धर्ममार्तंड शक्यतो स्वीकारले जात नसल्यामुळे त्यांना अर्ध्या जातीचे मानले जाते. [२६]

- **THE POSITION OF WOMEN IN THE ZOROASTRIAN RELIGION-**

झरतुष्ट्री धर्मात स्त्रियांचे स्थान –

पारशांच्या सर्व प्रार्थनांमध्ये नेहमीच पुरुष व स्त्रियांचा एकत्र उल्लेख येतो. क्वचित प्रसंगीच असे घडते की, केवळ पुरुषांचाच उल्लेख आला आहे. प्राचीन काळापासून नेहमीच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले आहे.

'मि. रॉबर्ट डोवन्स' ने त्यांच्या 'वुमन हर चार्म ॲन्ड पॉवर' या पुस्तकात पारशी स्त्रियांविषयी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. –''भारताच्या पूर्व भागात, तीन हजार वर्षांपूर्वीपासून राहणाऱ्या पारशांचे त्यांच्या स्त्रियांविषयीचे विचार उदात्त असल्याचा कोणताही पुरावा मागण्याची गरज नाही. जुन्या इराणमध्ये पत्नीचे स्थान हे पतीपेक्षा कुठल्याही बाबतीत कमी नव्हते, तर आई आणि मुलीला पूजले आणि जपले जात असे. झरतुष्ट्राच्या शिष्यांसाठी अत्यंत पवित्र

असलेल्या 'अवेस्ता' ह्या धर्मग्रंथात मुलींच्या जन्माबद्दल कोणत्याही प्रकारची निराशा व्यक्त करण्यात आलेली नाही. उलट, तिला कोमलतेने वागविण्यात आलेले आहे. तसेच पारशी धर्माला सुसंगत अशी मूल्ये आणि शुध्द विचार, शुध्द उच्चार व शुध्द कर्माची तिला शिकवण देण्यात येत असे.

पूर्वीच्या काळातील इराणमधील विवाह संबंध हा कुठल्याही प्रकारची जोरजबरदस्ती किंवा खरेदी व्यवहार नव्हता. विवाह ही सर्वांच्या दृष्टीने अतिशय आदरणीय गोष्ट होती. विवाहानंतर ज्याप्रमाणे पती हा घराचा मालक किंवा प्रमुख मानण्यात येतो, त्याप्रमाणे पत्नीही मालकीण किंवा प्रमुख मानली जाते. पत्नी, पतीसोबत सर्व धार्मिक समारंभात भाग घेत व पती बरोबरच सर्व दैवी कायद्याचे पालन करण्यात सहभागीही होत असे व एका विशिष्ट प्रार्थनेद्वारे त्याच्याशी एकरुप होऊन पूजेच्या इतर क्रियांमध्ये त्याच्यासोबत सहभागी होत असे. [२७]

PART SEVEN "B"

BIRTH OF A CHILD IN A ZOROASTRIAN HOUSE

पारशांच्या घरात मुलाचा जन्म

एखाद्या कुटुंबात मुलाचा जन्म ही नेहमीच आनंदाची गोष्ट मानली जाते. इराणमधील पारशी राजे हे जास्त मुलगे जन्माला घालणाऱ्या मातांना बक्षिसे देत. कारण, हीच मुले पुढे मोठी होऊन देशाचे संरक्षण करीत.

मुलाचा पहिला वाढदिवस हा त्यांच्या पालकांकडून, जवळच्या नातलगांकडून, मित्रपरिवाराकडून अत्यंत आनंदाने साजरा केला जातो. मूल जेव्हा तीन–चार वर्षाचे होते, तेव्हा त्याला किंवा तिला 'अशेम वोहु' (Ashem Vohu) तसेच 'याथा अहु–वाइऱ्यो' (Yatha Ahu Vairyo) मधील छोट्या छोट्या प्रार्थना म्हणायला शिकविले जाते, जोपर्यंत हे मूल सात वर्षांचे होत नाही तोपर्यंत हे सुरू असते. हे मूल पुढे पौगंडावस्थेत येण्यापूर्वीच नवजोत किंवा नवीन भक्त बनण्याच्या धार्मिक समारंभाची तयारी करण्यात येते.[२८]

- **नवजोत तयारी –**

अ. सुदरेह आणि कश्ती – (Sudra & Kashti)

नवजोत समारंभापूर्वी मुलाकडून काही प्रार्थना मुखोद्‌गत करण्याची अपेक्षा केली जाते. 'कश्ती' हा पवित्र धागा असून तो सुदराह ह्या सफेद कपड्यावर बांधला जातो. असे करणे गरजेचे असते. 'सुदराह' ह्या शब्दाचा अर्थ पर्शिअन भाषेत 'सन्मार्ग' असा आहे. आणि जुन्या पर्शिअन भाषेत त्याला 'सद्‌विचारांचे वस्त्र' असे म्हटले जात असे.

सुदराह हे वस्त्र शुभ्र पांढऱ्या रंगाचे सुती वस्त्र असून पांढरा रंग हा 'माझ्दायास्नी' (Mazdayasni) धर्माचा निदर्शक आहे. त्याला नऊ शिवणी (टाके) असून, त्यातील दोन टाके पुढची बाजू जोडण्याकरिता तसेच शर्टच्या मागच्या बाजूला दोन हाताचा वरील भाग झाकणाऱ्या दोन बाह्यांकरिता, तसेच एक गिरेह–बान (Gireh-ban) करिता ज्याला 'किस्सा–इ–केर्फे (Kisseh-e-Kerfh) म्हणजेच 'सन्मार्गाची बॅग' असे म्हणतात. जे, 'व्ही' आकारात मानेजवळ उघडणारी आणि सदरा घातल्यानंतर हृदयाच्या बरीच जवळ येणारी असते. त्याचप्रमाणे त्याची एक शिवण ही मागच्या बाजूने मानेच्या वरच्या भागात जेथे शर्ट ओढल्यावर फाटू नये म्हणून त्याला एक अतिरिक्त कपड्याचा शिवण केलेला तुकडा जोडण्यात येतो, यातील एक शिवण ही सर्व तळाशी गोलाकार आणि दोन लहान शिवणी ह्या मुख्य शिवणीच्या जवळ दोन्ही बाजूला असतात.

उपलब्ध असणाऱ्या 'अवेस्ता' ह्या ग्रंथामध्ये कुठेही ह्या नऊ शिवणीचे महत्त्व सांगण्यात आलेले नाही. परंतु नंतर 'पहलवी' आणि 'पर्शिअन' ग्रंथांमधून थोड्या फार फरकाने ते उपलब्ध आहे. ह्या प्रत्येक शिवणीचा पुढीलप्रमाणे अर्थ आहे –

दोन्ही बाजूंचे पुढची आणि मागची बाजू जोडणाऱ्या दोन शिवणी आपल्याला आपण आपल्यापेक्षा मोठ्यांचा सन्मान करावा आणि आपल्यापेक्षा खालच्या लोकांना मदत करावी, याची आठवण करून देतात. तसेच मानेच्या वरचा व मागच्या बाजूचा जोड आपल्याला चुकीच्या, पापी गोष्टींना विरोध करून त्यावर मात करण्याची आठवण करून देतो. त्याचप्रमाणे गिरेह–बान किंवा सन्मार्गाची बॅग ही धर्माविषयीच्या एकनिष्ठेचे किंवा श्रध्देचे प्रतीक आहे. दोन्ही बाह्यांवरील शिवणी आपण उद्योगी राहून जगाच्या उन्नतीकरिता काम करण्याची आठवण करून देतात आणि दोन मुख्य शिवणीच्या दोन्ही बाजूच्या लहान शिवणी आपल्याला आपण

ईशवराच्या इतर निर्मितीशी दयाळूपणे वागले पाहिजे, याची आठवण करून देतात. तळाची गोलाकार शिवण ही आपण ह्या जगात ईश्वराकडून आलो याचे निदर्शक आहे, तसेच पुन्हा आपल्याला ईश्वराकडेच परत जायचे आहे, म्हणजेच 'सुदराह'चे एक वर्तुळ पूर्ण होणे होय.

त्याचप्रमाणे कश्तीचेही महत्त्व आहे. कश्ती ही कोकराच्या लोकरापासून बनविली जाते. कोकरू हा भाबडा व निष्पाप प्राणी असून तो आपल्याला कपटीपणाची नाही – तर निष्पापपणाची ग्वाही देतो. 'कश्ती' ही पारशी धर्मियांमध्ये ऐक्य निर्माण करून त्यांना परस्परांशी बांधून ठेवते आणि सन्मार्गावर चालण्याचे मार्गदर्शन करते.

कोकराच्या लोकराचे ७२ पेड असतात. दोन तलम धागे एकमेकांत गुंफून त्याचा एक दोरा बनवितात आणि हातमागावर जेवढी गरज आहे तेवढाच गुंडाळतात, तो नंतर एका पोकळ लेसमध्ये गुंफला जातो. हे ७२ पेड 'अहुर मझदाच्या' ७२ नावांचे प्रतिनिधित्व करतात, असे होर्माझ्द याश्त' (Hormazd Yasht) मध्ये दिले आहे. ही कश्ती धर्मगुरुंच्या वर्गातील स्त्रिया बहुदा गुंडाळतात. जेव्हा हातमागावर न विणलेला एक फुट दोरा उरतो त्या वेळी कश्ती हातमागावरून काढून धर्मगुरुला दिली जाते. प्रार्थना केल्यानंतर ही गोलाकार कश्ती न विणलेल्या भागाच्या मध्यावर कापून त्याद्वारे एक लांब लेस तयार केली जाते. ज्या स्त्रीने ही कश्ती गुंफलेली असते ती त्या कश्तीची आतील बाजू बाहेर दिसेल, अशारीतीने वळवून घेऊन उरलेल्या दोऱ्याच्या भागाला हाताने गाठ मारते, अशा प्रकारे २४ दोऱ्यांतून बनविलेले तीन गोंडे प्रत्येक टोकाशी बनविले जातात, जे पुढे प्रत्येकी ८ दोऱ्यांच्या तीन गोंड्यांमध्ये विभागण्यात येते.

वरीलप्रमाणे कश्तीचे ७२ धागे हे 'होर्माझ्द याशत' मध्ये देण्यात आलेल्या ईश्वराच्या ७२ नावांचे निदर्शेन करतात किंवा यास्नाच्या ७२ प्रकरणांचे निर्देशन करतात. ह्या १२ धाग्यांपासून बनविलेले सहा पेड ज्यात कश्तीचे ७२ धागे विभागलेले असतात हे धागे विणण्याच्या वेळी पारशी व्यक्तींच्या सहा धार्मिक कर्तव्यांचे प्रतीक असतात. ही सहा धार्मिक कर्तव्ये पुढीलप्रमाणे –

१. प्रत्येक व्यक्तीने धर्माची तीन मूलभूत तत्त्वे नियमितपणे पाळलीच पाहिजेत. आणि ती तत्त्वे म्हणजे सद्विचार, सद्उच्चार व सदाचार.

२. दिवसांतून पाच वेळा प्रार्थना केलीच पाहिजे.

३. वासंतिक मेजवानी दिली पाहिजे.

४. सहा गहंमर्बस (Gahambars) मधल्या एका दिवशी गहाहमबार पाळला पाहिजे.

५. वार्षिक जश्न साजरे केले पाहिजेत.

६. त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या १९व्या दिवशी समारंभ साजरे केले पाहिजे आणि प्रत्येक वर्षाच्या शेवटच्या १० दिवसात मृत पूर्वजांच्या आणि नातेवाइकांच्या आत्म्याच्या उन्नतीकरिता जे समारंभ साजरे करण्यात येतात ते अवश्य केलेच पाहिजेत.

प्रत्येक सहा पेडांमधील बारा धागे हे वर्षाच्या बारा महिन्यांचे प्रतिनिधीत्व करतात. त्यावरील सहा गोंडे सहा 'गहामबरांचे'म्हणजे (ऋतुंच्या उत्सवांचे) प्रतिनिधित्व करतात. त्याचप्रमाणे कश्तीमधील पोकळी हे जग आणि पुढचे जग यांमधील जागेचे प्रतिनिधित्व करते.

तसेच धाग्याच्या सुरुवातीचे दुहेरी असणे हे 'ऐहिक' आणि 'आत्मिक' जगाच्या संबंधाचे प्रतीक आहे. ह्या कश्तीतील सर्व धाग्यांची सर्वात शेवटी बांधण्यात आलेली गाठ ही वैश्विक विश्वबंधुत्वाची निर्देशक आहे.

पारशी व्यक्तीने नेहमी 'सदराह' ज्यावर 'कश्ती' गुंडाळलेली आहे, ही कायम परिधान केली पाहिजे.

'कश्ती' खालील प्रसंगी मंत्रोच्चार करून जोडली जाते –

१. झोपून उठल्यावर ताबडतोब बिछाना सोडण्याच्या वेळी.

२. नैसर्गिक विधीच्या वेळी.

३. स्नान झाल्यानंतर.

४. प्रार्थना करण्यापूर्वी.

५. जेवणापूर्वी.

६. झोपायला जाण्यापूर्वी.

पारशी असे मानतात की, ''कंबरेला 'कश्ती' गुंडाळण्याचे कर्म तुम्ही ईश्वरीसेवेसाठी तत्पर आहात,'' याचे प्रतीक आहे. त्याचप्रमाणे, कश्तीचे तीन वेढे धारण करण्याने ईश्वराची सद्विचारांनी, सद्उच्चारांनी, आणि सत्कर्माने सेवा करावी, ह्याचे प्रतीक आहे.

'कश्ती' घालताना पहिली गाठ मारण्याच्यावेळी ती व्यक्ती 'याथा अहु वाइऱ्यो' मधील दुसरे वाक्य उच्चारते. ते वाक्य पुढीलप्रमाणे – ''जे माझदाच्या नावाने कार्य करतात, त्यांच्या करिता चांगल्या मनाचा उपयोग होतो.''

दुसरी गाठ ही हीच प्रार्थना म्हणत मारली जाते. 'अशेम वोहू' ही प्रार्थना म्हणत असताना 'तिसरी गाठ' मारली जाते. तसेच 'चौथी गाठ' मारण्याच्या वेळी 'माझदायास्नो अहमी' (Mazdayasno Ahmi) ह्या प्रार्थनेतील शब्दांचा उच्चार केला जातो. ह्या शब्दाचा अर्थ म्हणजे मी माझदाचा पुजारी आहे असा होतो.

- **PRAYERS TO BE MEMORISED -**
  लक्षात ठेवण्याची प्रार्थना –

नवजोत समारंभाकरिता तयार असणाऱ्या मुलाने खालीलप्रमाणे छोट्या प्रार्थना पाठ करणे आवश्यक असते. कारण, 'कश्ती' बांधण्याच्यावेळी त्याला त्या सर्व प्रार्थना म्हणणे गरजेचे व बंधनकारक मानण्यात आलेले आहे.

१. अशेम वोहु (Ashem Vohu)

२. याथा अहु वाइऱ्यो (Yatha Ahu Vairyo)

३. केम्ना माझदा (Kemna Mazda)

४. निरंग–इ–कश्ती किंवा होरमाझदा खोदाई (Nirang-I-Kasti or Hormazd-Khodai)

५. जसा मे अव्हान्हो माझदा, माझदायास्नो अहमी (Jasa me Avanghe Mazda0, Mazdayasno Ahmi)

६. सारोश बाज (Sarosh Baj)

७. Confession of faith din no kalmo in Pazand

८. पाझंदमधील तन दारोस्टी (Tan Darosti in Pazand)

९. नमस्कार चेराग्नो (Namaskar Cheragno)

अशा प्रकारे योग्य व शुध्द मंत्रोच्चारानुसार 'नवजोत समांरभ' पार पाडला जातो.[२९]

- **NAVJOTE CEREMONY -**

नवजोत समारंभ –

'नवजोत' समारंभ सुरू होण्यापूर्वी पारशी मुलाला 'नहान' ह्या नावाने ओळखले जाणारे शुध्द स्नान घालण्यात येते व जेथे प्रत्यक्ष समारंभ होणार आहे, त्या जागी आणण्यात येते. यावेळी मुलाला फक्त पॅन्ट, चपलांचा जोड आणि टोपी परिधान करण्यात येते, जेथे मुलाला सदरा घालण्यात येणार असतो, तेथे त्याला सहज काढता येणाऱ्या शालीमध्ये लपेटलेले असते, नंतर मुलाला एका पांढऱ्या कपड्याने झाकलेल्या एका स्टूलवर पूर्वेकडे तोंड करून बसविण्यात येते आणि त्याच्या उजव्या हातात 'सुदराह' धरायला दिला जातो. यावेळी मुलाजवळ वेगवेगळ्या तबकांमध्ये समारंभ संपल्यानंतर घालण्याकरिता कपडे ठेवलेले असतात. तसेच फुलांचे तबक, शुध्द तुपाचा दिवा, मेणबत्त्या, चंदन घालून प्रज्वलित केलेला धुपारतीचा अग्नी, तसेच तांदूळ (अक्षता), डाळींबीचे दाणे, मनुके, बदाम, आणि काही नारळाचे तुकड्यांचे मिश्रण असलेले तबक ठेवलेले असते. ह्या सर्व मिश्रणाने धर्मगुरु त्या मुलावर अभिषेक करतात. ह्याचा उद्देश मुलाला शुभाशीर्वाद मिळविणे हा असतो.

ह्या नवजोत समारंभासाठी आमंत्रित करण्यात आलेले धर्मगुरु मुलाभोवती एका गालिच्यावर बसून 'पातेत पाशेमानी' ही पश्चात्तापाची आणि पुन्हा 'अहुर मझदा'च्या म्हणजेच ईश्वराच्या मार्गावर वळण्याची प्रार्थना म्हटली जाते. यावेळी जो धर्मगुरु मुलाच्या अंगावर सदरा घालणार असतो तो मुलाकडे तोंड करून बसतो, यावेळी मुलगा 'याथा अहु वेइऱ्यो' ही प्रार्थना म्हणत असतो. अशाप्रकारे ह्या धर्मगुरुंच्या प्रार्थना पूर्ण म्हणून झाल्यावर समारंभात भाग घेणारे धर्मगुरु व मुलगा हे उठून उभे राहतात. जर वेळ सकाळची असेल तर सर्व जण पूर्वेकडे तोंड करून उभे राहतात, आणि जर वेळ संध्याकाळची असेल तर त्यांचे तोंड पश्चिमेकडे असते. नंतर धर्मगुरु मुलाच्या अंगावर लपेटलेली शाल बाजूला करतो व मुलाला सदरा हातात पकडायला सांगतो आणि आपले दोन्ही हात त्या मुलाच्या हातावर ठेवून मुलाला 'दीन–नो–कलमो' म्हणजे (श्रध्देची ग्वाही) म्हणायला सांगतो. यानंतर धर्मगुरु व मुलगा दोघेही ''याथा अहु वाइऱ्यो' म्हणतात व त्याचवेळी धर्मगुरु सदऱ्याच्या उजव्या बाहीतून मुलाचा उजवा हात घालतो व 'याथा अहु वाइऱ्यो' पुन्हा म्हणत असताना डावा हात बाहीतून घातला जातो. नंतर 'गरेबान' किंवा 'सत्कर्माचा खिसा' हा हृदयाच्या जवळ पुढच्या बाजूला येईल याची काळजी

घेत सदरा गळ्यातून घालण्यात येतो. त्यानंतर दिक्षा देणारा धर्मगुरु मुलाच्या मागच्या बाजूला त्याच्या हातात 'कश्ती' धरून उभा राहतो. त्याचवेळी मुलगा कोटाच्या बाह्या पकडून उभा राहतो. याचवेळी मुलगा आणि धर्मगुरु दोघेही 'कश्ती' बांधण्याकरिता प्रार्थना म्हणतात. व मुलाच्या अंगाभोवती कश्ती बांधतात. अशाप्रकारे कश्ती बांधून झाल्यावर धर्मगुरु व मुलगा आपआपल्या जागेवर जाऊन बसतात.

दीक्षा देणारा धर्मगुरु आता शुध्दता, सत्य, प्रामाणिकपणा आणि इतर सद्‌गुणांची स्तुती ज्यामध्ये करण्यात आलेली आहे ती 'होशबाम' (HoshBam) ही प्रार्थना म्हणतात. ही प्रार्थना म्हणत असताना नवजोत समारंभ जर मुलीचा असेल तर तिच्या कपाळावर गोलाकार आणि मूल जर मुलगा असेल तर त्याच्या कपाळावर उभा कुंकवाचा टिळा लावून, मुलाच्या गळ्यात फुलांचा हार, हातात नारळ व फुले देतो. नंतर दीक्षाविधी करणारा धर्मगुरु उभा राहून मुलाच्या आरोग्याकरिता, समृध्दीकरिता आशीर्वादाचे मंत्रोच्चारण करतो आणि हे करीत असताना मुलाच्या डोक्यावर तांदूळ (अक्षता), बदाम आणि डाळींबाचे दाणे टाकतो. हा विधी संपन्न झाल्यावर दिक्षा देणारा धर्मगुरु त्याच्या आसनावर येऊन बसतो, यावेळी दुसरे सर्व धर्मगुरु मुलाच्या पालकांना आशीर्वाद देण्याकरिता एकत्र जमतात. यावेळी मुलाची आई दीक्षा देणाऱ्या धर्मगुरुंच्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावून हार घालते व मुलाचे वडील दीक्षा देणाऱ्या आणि समारंभाला उपस्थित असलेल्या इतर धर्मगुरुंना पैशाच्या स्वरुपात बक्षिसाच्या रकमेचे वाटप करतात.[३०]

PART SEVEN "C"

DEATH CEREMONY

अंत्यविधी सोहळा

पारशी समाजात अंत्यविधी म्हणजेच (Death Ceremony) अतिशय महत्त्वाचा असून हा विधी संपूर्णपणे पारंपरिक पध्दतीने पार पाडला जातो.

जेव्हा मृत व्यक्ती शेवटचा श्वास घेत असते, तेव्हा तिच्या जवळच्या नातेवाइकाने अथवा त्या वेळी तिच्या मित्रपरिवारातील जो कोणी उपस्थित असेल तिने त्या मृत व्यक्तीच्या कानात 'अशेम वोहु' ही प्रार्थना म्हटलीच पाहिजे, असा नियम आहे.

ज्या वेळी एखाद्या व्यक्तीला मृत घोषित केले जाते तेव्हा त्याच्या शरीराला स्नान घालून, जुन्या पांढऱ्या कपड्यात गुंडाळून एका दगडावर ठेवतात. त्यानंतर प्रेतवहनाच्या कामासाठी खास नियुक्त केलेल्या प्रेतवाहकांची प्रतिक्षा करण्यात येते. यावेळी प्रेत कुजण्याची क्रिया सुरु झाल्यामुळे त्याद्वारे जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते म्हणून त्या प्रेताला कोणालाही हात लावू दिला जात नाही. त्यानंतर त्या प्रेताचे दर्शन घेण्याकरिता एका कुत्र्याला प्रेताजवळ नेण्यात येते. पूर्वीच्या काळी गावांमध्ये जेव्हा कुत्रा उपलब्ध नसायचा तेव्हा मृत शरीर शेतावर उघड्यावर ठेवले जात असे. असे केल्याने एखादा मांसभक्षक पक्षी, कावळा किंवा प्राणी ह्या मृत शरीराजवळ येत असे, तेव्हा ती व्यक्ती खरोखरीच मृत पावली असल्याची ती खूण मानण्यात येते. परंतु, जर व्यक्ती मृत पावलेली नसेल तर कुत्रा त्या व्यक्तीला बघण्याची जराही तसदी घेत नाही. त्याचप्रमाणे मांसभक्षक पक्षी किंवा कावळा सुध्दा त्या मृत व्यक्तीला ढुंकूनही पाहत नाही. अशाप्रकारे मृत व्यक्तीला नेण्यापूर्वी करण्यात येणाऱ्या प्रार्थनांच्या दरम्यान पुन्हा कुत्र्याला तीन वेळा त्या प्रेताजवळ ती व्यक्ती खरोखरीच मृत पावली आहे की नाही, याची खात्री पटविण्याकरिता नेण्यात येते.

गाथा 'अहुनावाद' मध्ये २८ ते ३४ श्लोकात झरतुष्ट्राने अंत्ययात्रेच्या वेळी प्रेतासमोर म्हटलेल्या प्रार्थनेचे पहिले सुक्त आहे. जे मृत व्यक्तीच्या आत्म्याची आठवण करून देण्यासाठी आहे. 'हाडोख्त नास्क'च्या मते (Hadokht-Nask) मृत व्यक्तीच्या डोक्याजवळ आणि मृताला झरतुष्ट्राच्या शिकवणुकीची आदरांजली वाहण्याकरिता जमलेल्या सर्व लोकांजवळ राहतो.

त्यानंतर मृत शरीर अंतिम विधीकरिता 'टॉवर ऑफ सायलेन्स' म्हणजे 'दोख्मा' कडे नेण्यात येते. पारशी असे मानतात की, जोपर्यंत शरीरात आपले मन आणि आत्मा असतो तो पर्यंत आपले शरीर हे उपयोगी असते. परंतु जेव्हा मन आणि आत्मा शरीर सोडून निघून जातात, त्यावेळी शरीर मरून ते विघटित व्हायला आणि कुजायला सुरुवात होते. जर अशा मृत शरीराची ताबडतोब विल्हेवाट लावण्यात आली नाही तर ते जिवंत व्यक्तीकरिता धोकादायक ठरू शकते.

पारशी समाजात मृत व्यक्तींकरिता शोक करीत बसणे हे निषिध्द मानण्यात आले असून या गोष्टीला प्रोत्साहन देण्यात येत नाही.

- **पारशी नसलेल्या व्यक्ती मृत शरीराची विल्हेवाट लावण्याचे काम पुढीलप्रमाणे करतात–**

१) **दफन –**

मृत शरीर स्वच्छ कपड्यात गुंडाळून जमिनीच्या खाली पाच फुट खड्डा खणून त्यात दफन केले जाते व तो खड्डा नंतर मातीने भरला जातो. परंतु काही पारशी मृत शरीर लाकडी शवपेटीत ठेवतात. आणि त्यानंतर त्या शवपेटीसकट ते मृत शरीर पुरले जाते, हे शरीर हळूहळू कुजायला लागून किड्यांकडून खाल्ले जाते. कधीकधी मृत शरीरावरील संपूर्ण मांस नष्ट व्हायला पन्नास वर्षांपेक्षाही जास्त काळ लागतो.

जेव्हा स्मशानात पाऊस पडून जमिनीत झिरपलेले पाणी हे जवळच्या विहिरीत आपला मार्ग काढत जमा होते त्या वेळी त्या विहिरींचे पाणी रोगजंतूंनी दूषित होते आणि जिवंत व्यक्तींकरिता अशा विहिरींचे पाणी पिणे धोकादायक ठरू शकते.

२) **मृत शरीराचे पाण्यात विसर्जन –**

मृत शरीर जेव्हा पाण्यामध्ये विघटित व्हायला लागते तेव्हा ते त्याला दूषित करते. आणि जो कोणी अशा झऱ्याचे, तलावाचे किंवा विहिरीचे पाणी वापरतो तेव्हा त्याला जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते.

३) **मृत शरीराला अग्नी देणे (दहन करणे) –**

मृत शरीराचे दहन केल्यामुळे परिसरातील हवा दूषित होते. अशी हवा सर्वसामान्यांकरिता हानिकारक ठरू शकते.

पारशी धर्मात जेथे प्रकाश आणि अग्नी हे शुध्दतेचे प्रतीक मानले असून ईश्वराच्या अस्तित्वाची दृश्य चिन्हे मानण्यात आल्यामुळे त्यांच्यात मृत शरीराचे दहन करणे किंवा अग्नी देण्यावर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

४) पारशी धर्मातील मृत शरीराची विल्हेवाट लावण्याची पध्दत –

मृत शरीर सूर्यप्रकाशात ठेवून त्या शरीरावरील सर्व मांसल भाग हा मांसभक्षक पक्षांना खाण्याकरिता ठेवणे. वरील सर्व चार व्यवस्थांमध्ये ही व्यवस्था जिवंत व्यक्तीकरिता सर्वात कमी धोकादायक व्यवस्था आहे. कारण, सूर्याच्या प्रखर उष्णतेत जंतूंना मारण्याची क्षमता असते आणि एकदा का पक्ष्यांकडून शरीरावरील मांस कुरतडून झालं की, उरलेली हाडे ही निरुपद्रवी ठरतात. कारण, त्यांच्यात जंतूंची संख्या वाढविण्यासाठीचे अन्न नसते.

परंतु काही अशा घटना आहेत, ज्यात इजिप्तमधील लोकांनी नुसत्या सूर्यप्रकाशात मृत शरीर सुकवून त्याला कपड्यात गुंडाळून, दमटपणापासून शरीराचे रक्षण करण्यासाठी त्यावर रंग व इतर तत्सम पदार्थ लावून हजारो वर्षे जतन करून ठेवले आहे. अशा मृत शरीरांना 'ममीज्' म्हणून ओळखण्यात येते.

'गेह सरना' समारंभानंतर आणि 'दाखमा' मध्ये शरीर ठेवल्यानंतर मृत्यूच्या सलग तीन रात्री सूर्यास्तानंतर 'अ सारोश' ची प्रत्येक दिवशी प्रार्थना केली जाते. काही लोक दुपारच्या वेळी तिसऱ्या दिवसाच्या जात. दुपारी 'उथामना' (Uthamna Ceremony) साजरा करतात. परंतु हा विधी बंधनकारक मानला नाही. तिसऱ्या रात्री आणि चौथा दिवस सुरू होण्यापूर्वी 'उथामना' समारंभ साजरा केला जातो. ज्या वेळी 'धुप निरान्ग'चे (Dhup Nirang) पठण केले जाते. काही काळ विश्रांती घेतल्यानंतर आणि दिवस उजाडल्यानंतर धर्मगुरु 'अफ्रिन्गन दाहमान (Afringan Dahman) आणि 'फरोक्सी' (Faroxi) ची प्रार्थना म्हणतो. हा समारंभ मृतात्मा बहुधा स्वर्गात गेल्याचे मानण्यात येत असल्यामुळे आवश्यक मानण्यात आला आहे.

तिसऱ्या दिवशी, दहाव्या दिवशी, पहिल्या वर्षाच्या त्या–त्या महिन्यांच्या तारखांना मृतात्म्यांकरिता 'पुण्यतिथी' स्वरुपातील समारंभ साजरे करण्यात येतात आणि त्यानंतर दरवर्षी 'वार्षिक पुण्यतिथी' समारंभ साजरे केले जातात. दिनदर्शिकेच्या वर्षाचे शेवटचे दहा दिवस हे मृतात्म्यांच्या आठवणीकरिता वेगळे काढण्यात आले आहेत आणि त्यांना 'फरवरदेगान' (Farvardegan) दिवस असे म्हटले जाते.

पारशी असे मानतात की, अशा समारंभांमुळे आपल्या मनात मृतात्म्यांविषयी आदर निर्माण होऊन ते जिवंत असताना त्यांनी दाखविलेल्या प्रेमळपणाची आपल्याला आठवण राहते. तसेच आपण जर आपल्या मोठ्यांचा आदर केला तर पुढील व मागील पिढी आपलाही आदर करेल.

पूर्वजांच्या पूजनामुळे चारित्र्यसंवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर मदत होऊ शकते आणि जर समारंभाचा हेतू नीटपणे समजून घेऊ शकलो, तर त्यातून बरेच काही साधू शकतो.

सर्व प्रार्थनांचे सार हेच आहे की, योग्य 'फ्रावाशिश' (ईश्वराचे सार) हे मृतात्म्यांकरिता जात किंवा वंशाचा विचार न करता, जो कोणी जगात कुठेही मृत्यू पावला असेल त्याकरिता त्यांची आदरपूर्वक आठवण करावी, आणि आज जे जिवंत आहेत, त्यांना दीर्घायुष्य आणि सुखाची प्राप्ती व्हावी. [३१]

- **THE FLOWER CEREMONY IN AFRINGAN CEREMONY -**
  आफ्रिन्गान समारंभाच्या वेळी फुलांचा समारंभ –

प्रत्येक आफ्रिन्गानच्या शेवटी खालीलप्रमाणे फुलांचा समारंभ केला जातो. पारशांचा मुख्य धर्मगुरु (जोति) खाली दाखविल्याप्रमाणे फुलांची रचना करतात.

F (फ) _____ _____ E (इ)

G (ग) _____ _____ D (ड)

H (ह) _____ _____ C (क)

B (ब) **A (अ)**

मुख्य धर्मगुरु म्हणजे (जोति) हा त्याच्या सहकाऱ्याला म्हणजेच (रास्पि) 'अ' हे फूल देतो, हा धर्मगुरु उभा राहून त्याच्या उजव्या हातात हे फूल पकडतो. तसेच मुख्य धर्मगुरु 'ब' हे फूल त्याच्या उजव्या हातात पकडतो. त्यानंतर हे दोघेही 'अहुर मझदा हा चतुर आणि वैभवशाली' असल्याची प्रार्थना करतात. त्यातून त्यांना ते ज्याला पवित्र मानतात तो 'अहुर मझदा' एकच असल्याचे सुचवायचे असते. त्यानंतर देशावर राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांसाठी आशीर्वादपर प्रार्थना करतात. तसेच वाईट विचारांच्या लोकांवर मात करण्यासाठी विचार, उच्चार आणि कृत्यांद्वारे विजय आणि धैर्याची मनोकामना करतात व दीर्घायुष्याची, सात्त्विक व्यक्तींना संरक्षण देण्याकरिता आरोग्यपूर्ण आयुष्याची प्रार्थना करतात.

प्रार्थना करताना धर्मगुरु क, ड, इ ही फुले उचलून प्रार्थना करतात की, सद्विचार, सद्उच्चार आणि सदाचार'ने परिपूर्ण असावे, तसेच दुसऱ्यावेळी फ, ग, ह ही फुले उचलून प्रार्थना करतात व ती फूले आपल्या सहकाऱ्याला देतात. हातात फुले धरणारा साहाय्यक धूप पात्राच्या उजव्या बाजूला उभा राहतो आणि दुसऱ्या वेळी प्रार्थना उच्चारताना डाव्या बाजूला उभा राहतो, त्याची उभे राहण्याची जागा बदलणे हे पहिल्यांदा तो सद्विचार, सद्उच्चार आणि सदाचारांना गौरव प्राप्त करून देत असल्याचे आणि दुसऱ्यांदा जागा बदलणे हे तो सद्विचार, सद्उच्चार आणि सदाचारांवर चिंतन करीत असल्याचे निर्देशक आहे.

त्यानंतर धर्मगुरु फर्वशिशची स्तुतीपर प्रार्थना करतात. ह्या प्रार्थनेत 'चांगल्या माझदायास्ती धर्मातील तत्त्वांचा, ज्ञानाचा, धर्मविस्तार आणि कीर्तीचा प्रसार होवो, जो उच्चाराने, सन्मार्गाच्या आग्रहाबाबत चांगली राजसत्ता व न्यायाची ग्वाही देतो' असा उल्लेख आहे.

ह्या प्रार्थनेनंतर धर्मगुरुंचा सहाय्यक 'पळी'ची मूठ हातात धरून उभा राहतो आणि वरिष्ठ धर्मगुरु त्या पळीची पुढची बाजू धरतो आणि तबकाभोवती पूर्व,पश्चिम,दक्षिण, उत्तरेला 'याथा अहू वाईऱ्यो' चे मंत्र म्हणत फिरवितो. हे मंत्र म्हणत असताना धर्मगुरु ही पळी उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर ह्या चारही दिशेने फिरवितो.

थोडक्यात, मुख्य धर्मगुरु सर्व मुख्य दिशांना निर्देश करण्यामागे हा संकेत आहे की, 'याथा अहु वाइऱ्यो', 'अशेम वोहू' आणि माझ्दायास्नी धर्माचा चारही दिशांना प्रसार व्हावा. धर्मगुरुंचा साहाय्यक सर्व सातही फुले मुख्य धर्मगुरुंजवळ सुपूर्द करतो, त्यानंतर ते अहुर माझदाची स्तुती स्तोत्र म्हणतात आणि शांत राहून प्रार्थना करतात, ही प्रार्थना व स्तोत्रपर आशीर्वाद देऊन झाल्यावर हा समारंभ पूर्ण होतो.[३२]

- **LIFE AFTER DEATH -**

मृत्युनंतरचे जीवन –

आपण ह्या जगात स्वइच्छेने वाईट आणि दुष्ट गोष्टींचा विरोध करून ज्ञानी होऊन पुन्हा ईश्वराकडे परतण्याकरिता आलो. झरतुष्ट्राच्या शिकवणुकीनुसार आपण एक यशस्वी जीवन जगत आहोत का? हे पारखण्याची शिकवण मिळते.

स्वर्ग आणि नरक ह्या दोन मनाच्या अवस्था असून ज्यातून एखादी व्यक्ती तिच्या कर्मावर आधारित स्वर्गाकडे किंवा नरकाकडे वळते. ह्या जगात तसेच मृत्यूनंतरच्या जीवनात

सुखी राहण्याकरिता प्रत्येकाने सन्मार्गाने चालणे आवश्यक आहे. जेव्हा एखादी व्यक्ती मृत्यू पावते तेव्हा फक्त भौतिक शरीराचा मृत्यू होतो. आणि आत्मा हा अमर्त्य असतो. पारशी धर्मानुसार शरीर नऊ भागांचे बनलेले असते. त्यातील तीन भाग म्हणजे हाड, मास व शारीरिक रस, जो मृत्यूनंतर कुजू लागतो. आणखी तीन भाग म्हणजे भावना, सूक्ष्म शरीर आणि प्राण हे सुध्दा मृत्यूनंतर नष्ट होतात. उरलेले तीन भाग म्हणजे Conscience म्हणजे जाणीव, Soul म्हणजे आत्मा आणि Fravash म्हणजे फ्रवशी हे अमर्त्य आहेत.

पारशी धार्मिक समजुतीनुसार जाणीव व फर्वशी हे आत्म्याच्या, कर्माला जबाबदार नसल्यामुळे नेहमीच मुक्त राहतात. जगात असताना 'आत्मा' एखाद्या वेळेस जाणतेअजाणतेपणी काही चुकीची कर्मे करतात आणि ती चुकीची कर्मे सुधारण्यासाठी या आत्म्याच्या शरीराने जेवढी चांगली कर्मे करता येतील तितकी करावी. परिणामतः चांगली आणि वाईट कर्मांची तुलना केली जाईल, त्या वेळी वाईट कर्माच्या तुलनेत सत्कर्माचे वजन जास्त भरेल.

'हाडोख्त नास्क' (Hadokht Nask) हे ग्रिकांनी जाळलेल्या २१ पुस्तकांपैकी एका पुस्तकाचा एक भाग आहे. ह्या पुस्तकानुसार, मृत व्यक्तीचा आत्मा ह्या जगात तीन दिवसांकरिता राहतो व चौथ्या दिवसाच्या सूर्योदयापूर्वी तो आपल्या मार्गावर वळतो. ह्या मार्गतील आत्म्याला Chinvatopereto म्हणजे न्यायाचा पूल ओलांडणे गरजेचे असते. हा पुल व्यक्तीच्या ह्या जगातील कर्मे जर चांगली असतील तर विस्तार पावतो त्यामुळे त्याला तो पार करणे सोपे जाते. परंतु, जर त्याची कर्मे अगदीच वाईट असतील तर हा पूल तलवारीच्या पात्याइतका निमुळता होऊ शकतो. म्हणून जर माणसाची कर्मे चांगली असतील किंवा अर्धवट चांगली व वाईट असतील तर तो हा पूल पार करू शकतो, आणि त्याला 'मेहेर' व 'राश्न' हे दोन देवदूत स्वर्गाच्या दाराजवळ त्याच्या कर्माचे मोजमाप घेऊन आत जाण्याची परवानगी देतात.

स्वर्गात 'मेहेर' हा देवदूत प्रकाशाचे प्रतिनिधित्व करतो आणि 'राश्न' हा देशदूत सत्याचे प्रतिनिधित्व करतो. स्वर्गात प्रकाश व सत्य असते, याविषयी पॉरपेरी (Porphyry) यांनी 'द लाईफ ऑफ पायथागोरस (The Life of Phythagoras) मध्ये लिहिले आहे की, ''अहुर मझदाचे शरीर प्रकाशाचे असून त्याचा आत्मा सत्याचा आहे. हे 'फरर्वदिन याश्त'च्या ८१व्या अवतरणावर आधारित आहे. 'स्रोशा' हा देवदूत दुसरे काही नसून त्या मृत माणसाची

जाणीव आहे जी त्याच्या पापांकरिता अर्ज करीत असते. ज्यामुळे त्याच्या पापांच्या तुलनेत त्याची सत्कर्मे जास्त भरतात.

गाथांच्या भाषांतरात जेथे जेथे स्वर्ग किंवा नरकाचा उल्लेख आलेला आहे, तेथे तेथे असे निर्देश केले आहे की, स्वर्ग व नरक हे आपल्याला ह्याच जन्मी अनुभवायला लागतात. प्रत्येकाला अग्नीदिव्यातून जावेच लागते. त्या म्हणजे ती त्याच्या जीवनातील कठीण परीक्षा होय, जीवनात नेहमीच चढउतार असतात आणि जी व्यक्ती ह्या अग्नीदिव्यातून यशस्वीरीत्या जाते ती जीवनातही यशस्वी होते. झरतुष्ट्राच्या मते, यशस्वी जीवनाचा खरा अर्थ हाच आहे.[३३]

- **CONSECRATION OF TOWER OF SILENCE - DAKHMA -**
  'दाखमा', टॉवर ऑफ सायलेन्सचे अभिसिंचन (शुध्दीकरण) –

मृत व्यक्तीच्या शेवटच्या शुध्दीकरणाआधी किंवा अभिसिंचनाआधी तीन महत्त्वाचे समारंभ करण्यात येतात आणि नंतर 'टॉवर ऑफ सायलेन्स' म्हणजेच 'दोख्मा' वापरण्यात येतो. 'टॉवर ऑफ सायलेन्स' हा नेहमी लोकवस्तीपासून दूर, उंचावर बहुधा एखाद्या टेकडीवर बांधण्यात येतो. 'टॉवर ऑफ सायलेन्स' वापरण्याआधीचे तीन समारंभ पुढीलप्रमाणे–

१. कोदारी मारवि (Kodari Marvi) किंवा धर्मगुरुंद्वारे सुरुवातीची जमीन कुदळीने खणणे.

२. 'ताना' (Tana) समारंभ आणि,

३. अभिसिंचन म्हणजे शुध्दीकरण समारंभ.,

'टॉवर ऑफ सायलेन्स' म्हणजे 'दाख्मा'च्या पायाभरणी समारंभाच्या काही दिवस आधी, शुध्दीकरण समारंभ करणारा धर्मगुरु हा ज्या भागावर इमारत बांधण्यात येणार आहे त्या भागावरील जमिनीत एक खाच मारतो आणि संपूर्ण कर्मकांडासहित 'यास्ना' समारंभ करतो, तसेच स्रोशा, अमेशास्पन्द, अहुरा मझदा, स्पेन्टा, अरमैटी, अर्दा फ्रावाशाच्या सन्मानार्थ 'बाज'च्या प्रार्थनेचे स्तवन करतो. ह्या विधीनंतर धर्मगुरु स्वतःच्या हातात फावडे धरून स्रओश बाजची प्रार्थना म्हणतो व जमीन खणत असताना २१ 'याथा–अहु–वाइऱ्यो'च्या सुध्दा प्रार्थना म्हणतो.

काही दिवसांनंतर मजुरांकडून आवश्यक तेवढ्या पायाचे उत्खनन पूर्ण होते. त्या वेळीचे शुध्दीकरणाची जबाबदारी घेतलेले दोन धर्मगुरु खणलेल्या पायाच्या ठिकाणी जाऊन 'यास्ना' समारंभ करतात व नंतर जमिनीत ३०१ खिळे ठोकतात. यावेळी एक मोठा खिळा संपूर्ण

बांधकामाच्या मध्यावर ठोकण्यात येतो आणि ३०० लहान–मोठे खिळे हे मुख्यतः ज्या ठिक़ाणी पुरुषांची मृत शरीरे ठेवण्यात येणार असतात त्या भागात ठोकण्यात येतात, तसेच पावसाचे पाणी भूमिगत विहिरींमध्ये वाहून नेण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या चार गटारींच्या जागेवर ठोकण्यात येतात. नंतर १०१ बारीक धागे (अहुर मझदाच्या १०१ नावांच्या किंवा गुणांच्या संख्येनुसार) एका दोऱ्यात वळून गुंफले जातात, ह्या दोरीची लांबी ही आवश्यकतेपेक्षा जास्त परिघाला त्याचे तीन फेरे घालता येतील इतकी आणि चार गटारींच्या दोन बाजूंना पुरेल इतकी असते. त्यानंतर हा दोर तीन वेळा खिळ्यांभोवती गुंडाळण्यात येतो. याचा प्रतीकात्मक अर्थ असा आहे की, जमिनीची दूषितता ही जेवढी आखणी करण्यात आलेली आहे, यातच सीमित राहील. नंतर दोरा आणि खिळे हे तसेच ठेवण्यात येऊन, इमारतीच्या पायामध्ये पुरले जातात. त्यानंतर गवंडी दाख्माचे बांधकाम पूर्ण करतात. एकदा का बांधकाम पूर्ण झाले की ती वास्तू धुवून स्वच्छ केली जाते.

त्यानंतर दोन धर्मगुरु ५० फुट व्यासाच्या विहिरीत खाली जातात. ज्याला 'भांडार' (Bhandar) असे म्हणतात. त्या वेळी सतत तीन दिवस तेथे दिवसा 'यास्ना' समारंभ तसेच रात्री 'वैन्दीदाद' समारंभ केला जातो. त्याचप्रमाणे चौथ्या दिवशी म्हणजेच 'टॉवर ऑफ सायलेन्स'च्या उद्घाटनाच्या दिवशी 'यास्ना', 'बाज' आणि 'आफ्रिन्गान' हे समारंभ साजरे केले जातात आणि 'दाख्मा' सर्वांसाठी खुला करण्यात येतो. यावेळी पारशी समाजातील लोक हा समारंभ आणि 'दाख्मा'चे बांधकाम पाहण्यासाठी जातात, त्या वेळी तेथे पैसे आणि काही छोटे–छोटे दागिने समर्पित करतात. हे पैसे व दागिने त्या भागाचा मुख्य धर्मगुरु घेतो. परंतु तो ह्या वस्तु दाख्माच्या इमारतीच्या देखभालीकरिता असलेल्या फंडात जमा करतो.[३४]

PART EIGHT

NAMES WITH MEANING OF DAYS AFTER GOD'S MORAL AND MATERIAL CREATION

ईश्वराच्या नैतिक व भौतिक निर्मितीनुसार दिवसांची नावे व अर्थ

१.	अहुर मझदा	–	निर्मिती आणि शहाणपणाचा ईश्वर
२.	बेहमन	–	चांगले मन
३.	अर्डिबेहश्त	–	सर्वोत्तम चांगुलपणा
४.	शेहरेवार	–	नैतिक धैर्य
५.	अस्फन्दरमद	–	दैवी शहाणपणा
६.	खोरदाद	–	स्वतःची पूर्तता
७.	अमरदाद	–	अनैतिक
८.	दय–प–अदार	–	ईश्वराचा दिवसा आधी अदार
९.	अदार	–	अग्नी
१०.	अवन	–	जल
११.	खोरशेद	–	सूर्य
१२.	मोहर	–	चंद्र
१३.	तीर	–	तारा
१४.	गोश	–	प्राण्यांचे राज्य
१५.	दय–प–मेहेर	–	ईश्वराचा दिवसापूर्वी मेहेर
१६.	मेहेर	–	सूर्यप्रकाश
१७.	सरोश	–	विवेक
१८.	रश्ने	–	सत्य
१९.	फरवरदीन	–	फरोहर, एका व्यक्तीमधील पालकत्व
२०.	बेहराम	–	विजय
२१.	राम	–	शांतता, आनंद
२२.	गु–वद	–	चांगला वारा

२३. दय–प–दीन – ईश्वराच्या दिवसापूर्वी दीन

२४. दीन – धर्म

२५. अशीशांग – आशिर्वाद, शुध्द चांगुलपणा

२६. अस्तद – उद्योग, न्याय

२७. आसमान – आकाश

२८. जमयद – पृथ्वी

२९. मारेस्पन्द – मंत्र, म्हणजेच प्रार्थना

३०. अनेरान – स्वर्गातील तल्लख प्रकाश

यातील पहिला, आठवा, पंधरावा आणि तेविसावा दिवस हा ईश्वराला समर्पित आहे. आणि 'शब्बाथ दिवस' समान मानले जातात. दुसरा ते सातवा दिवस हा 'अमेशा स्पेन्टा' (अनंतकाळचे पवित्र कायदे) यांना समर्पित आहे आणि उर्वरित सर्व दिवस 'यझ्द' (उत्तम विषयावर म्हणजेच जे ईश्वराच्या नैतिक व भौतिक निर्मितीनुसार प्रशंसनीय आहे) ह्यांना समर्पित आहे.[३५]

- **NAMES OF TWELVE MONTHS -**
  वर्षातील बारा मासांची (महिन्यांची) नावे –

१. फर्रोख फर्वदीन

२. अर्दिबेहश्त अमेशास्पन्द

३. खोरदाद अमेशास्पन्द

४. तेशतार तीर यझ्द

५. अमरदाद अमेशास्पन्द

६. शेहरेवार अमेशास्पन्द

७. मेहेर यझ्द

८. अव यझ्द

९. अदर यझ्द

१०. दय–ददार

११. बेहमन अमेशास्पन्द

१२. अस्फन्दरमाद अमेशास्पन्द [३६]

- **NAME OF FIVE GATHAS -**
  पाच गाथांची नावे –

१. अहुनावाद

२. उश्तवाद

३. स्पेन्तोमाद

४. वहुक्षत्र

५. वहीश्तोईश्त [३७]

- **THE NAMES OF SIX GHAHAMBARS IN A YEAR -**
  वर्षातील सहा घहंबरांची नावे –

१. माएदीयोजारेम

२. माएदीयोशाहेम

३. पाएतेशाहेम

४. अयथरेम

५. माएदीयारेम

६. हमस्पथमएदिम [३८]

- **THE DAY OF JASHANS IN A YEAR -**
  वर्षातील 'जश्न' (समारंभा) चे दिवस –

महिना	**दिवस**	**महत्त्व**
फर्वदीन	१) होरमाझ्द	नवीन वर्ष
	२) अर्दिबेहश्त	रपिथ विन गेह
	३) खोरदाद	प्रेषिताचा जन्मदिन
	४) फर्वदीन	मृतांच्या स्मृतीचे दिवस
अर्दिबेहश्त	१) अर्दिबेहश्त	समान महिना व दिवस
	२) खोरशेद	

	३) मोहोर	
	४) तीर	मएदियोजारेम घहंबार
	५) गोश	
	६) दय–प–मेहेर	
खोरदाद	१) खोरदाद	समान महिना व दिवस
तीर	१) खोरशेद	मएदियोशाहेम् घहंबर
	२) मोहर	
	३) तीर	
	४) गोश	
	५) दय–प–मेहेर	
अमरदाद	१) अमरदाद	समान महिना व दिवस
ऐहरेवार	१) शहरेवार	समान महिना व दिवस
	२) अस्तद	
	३) आसमान	
	४) जमयद	पएतेशाहेम घहंबार
	५) मारेस्पान्द	
	६) अनेरान	
मेहेर	१) मेहेर	समान महिना व दिवस
	२) अस्तद	
	३) आसमान	
	४) जमयद	अयथरेम घहंबर
	५) मारेस्पान्द	
	६) अनेरान	
अव	१) अव	समान महिना व दिवस
अदर	१) अदर	समान महिना व दिवस

	२) फर्वदिन	मृतांच्या स्मृतीचे दिवस
दय	१) होरमाझ	समान महिना व दिवस
	२) दय–प–अदार	समान महिना व दिवस
	३) खोरशेद	प्रेषिताचा मृत्यु दिन
	४) दय–प–महेर	समान महिना व दिवस
	५) महेर	मएदीयामेम घहंबार
	६) सरोश	
	७) रश्ने	
	८) फरर्वदीन	
	९) बेहराम	
	१० दय–प–दीन	समान महिना व दिवस
बेहमन	१) बेहमन	समान महिना व दिवस
	२) अवा	जश्न–ए–सद्देह
अस्फन्दरमाद	१) अस्फन्दरमाद	समान महिना व दिवस
	२) खोरदाद	
	३) अशताद	
	४) आसमान	फरवशीशचा स्मृतीदिन
	५) जमयाद	
	६) मरेस्माद	
	७) अनेरान	
	८) अहुनावाद	
	९) उश्तवाद	
	१०) स्पेन्टोमाद	
	११) वहूक्षत्र	हमस्पथमएदिन घहंबर
	१२) वहिश्तोइश्त[३१]	

- **THE SEVEN HAMKARS -**
  सात हमकार्स –

१. होरमझ्द, दय–प–अदार, दय–प–मेहेर, दय–प–दीन

२. बहमन, मोहर, गोश, राम

३. अर्दिबेहश्त, अदार, सरोश, बेहराम

४. शेहरेवार, खुर (खोरशेद), महेर, आसमान, अनेरान

५. असफन्दरमाद, अवा दिन, अर्द, म्हणजेच (आशिशवाघ), मरेस्पान्द

६. खोरदाद, तीर, अर्द–फ्रवशि, म्हणजेच (फर्वदिन), गोवड

७. अमरदाद, रश्न, अश्ताद, जमयाद [४०]

- **ONE HUNDRED AND ONE NAMES OF AHURAMAZDA-**
  अहुर मझदाची १०१ नावे –

१.	यझ्द	पूजनीय किंवा गौरवास्पद
२.	हवेस्प–तवन	सर्वशक्तीशाली
३.	हरवेस्प–अगह	सर्व जाणणारा
४.	हरवेस्प–खुदा	प्रावीण्य असणारा (Master of all)
५.	अबदाह	सुरुवात न करता
६.	अबी–अंजाम	शेवट न करता
७.	बुने–स्तीह	निर्मितीचे मूळ कारण
८.	फ्रोखतान–तेह	अंतिम शेवट
९.	जमगा	उत्तम कारण
१०.	छरजातरह	सर्वोत्तम
११.	तुम –अफीफ	शुध्दतेतील शुध्द
१२.	अबारवंद	सर्वात वरा
१३.	परवंद	सर्वांशी जोडलेला
१४.	अन–ऐयफाह	अथांग, अनाकलनीय
१५.	हम–ऐयफाह	सर्व समजणारा

१६.	अदारो	सर्वात चांगला
१७.	गीरा	सर्व नियंत्रित करणारा
१८.	ए–शेम	कारण नसताना
१९.	चमना	सर्व कारणाचे कारण
२०.	सफना	दाता
२१.	अफजा	मदतनीस
२२.	नशा	न्याय (Difence of equitable justice)
२३.	छरवारा	आधार देणारा
२४.	इयानाह	निर्मिती, रक्षणकर्ता
२५.	ऐन–ऐनाह	कधीही न बदलणारा
२६.	अन–ऐनाह	निराकार
२७.	ख्रोशीदतुम	टणकामधील टणक
२८.	मीनोतुम	अदृश्य
२९.	ऊस्ना	सर्वव्यापी
३०.	हरवस्तुम	सर्वात सर्वोच्च
३१.	हु–सेपास	सर्वोच्च स्तुतीयोग्य
३२.	हर–हमठु	सर्वांना मदत करणारा
३३.	हर–नेक–फरेह	सर्वोत्तम शुभ खोरेह
३४.	बेशा–तारना	दयाळू
३५.	तरोनीश	वाईट, नाश करणारा
३६.	अन–औशक	अमर
३७.	फरसाक	इच्छापूर्ती करणारा
३८.	पजोह–दहाद	चांगला निसर्गनिर्माता
३९.	ख्वाफर	परोपकार
४०.	अवक्षीए	उदार
४१.	अबरजा	सर्व करून देणारा

४२.	अ–सतोह	कधीही न जिंकणारा
४३.	रखोह	सर्व उत्साहपूर्ण
४४.	वरून	रक्षणकर्ता
४५.	अ–फरेफह	कधीही न फसविणारा
४६.	ब–फरेफह	कधीही न फसणारा
४७.	अ–दुइ	उतवाद न करणारा
४८.	कमे–राद	स्वतःच्या इच्छेप्रमाणे करणारा
४९.	फरमन–कम	इच्छा नियम असणारा
५०.	ऐख–तन	अद्वितीय
५१.	अ–फरेमोश	सर्व लक्षात ठेवणारा
५२.	हमरना	हिशेब
५३.	सनेआ	सर्वज्ञ
५४.	अ–तरश	निर्भय
५५.	अ–बिश	दुःखावर
५६.	अफ्राजदुम	सर्वात वैभवशाली
५७.	हाम–शुम	सारखे
५८.	मीनो–स्तीह–गर	ताऱ्यांच्या जगातील निर्माता
५९.	अ–मीनो–गर	उच्च अध्यात्मिक निर्माता
६०.	मीनो–नहाब	अध्यात्मात लपलेला
६१.	अदर–बाद–गर	अग्नीतून धूर निर्माण करणारा
६२.	अदर–नाम गर	अग्नीतून वाफ निर्माण करणारा
६३.	बाद–अदर–गर	वायूतून अग्नी निर्माण करणारा
६४.	बाद–नाम–गर	वाफेतून पाणी निर्माण करणारा
६५.	बाद–गेल–गर	वायूतून राख निर्माण करणारा
६६.	बाद–गेराद–तुम	हवा आणि पृथ्वीचा निर्माता
६७.	अदर–कीबारीत–तुम	दगडातून अग्नी निर्माण करणारा

६८.	बद–गेरद–तुम	वायुनिर्माता
६९.	अब–तुम	न्यायाचा निर्माता
७०.	गेल–अदर–गर	पृथ्वीतून अग्नी निर्माण करणारा
७१.	गेल–अदर–गर	पृथ्वीतून वायू निर्माण करणारा
७२.	गेल–नाम–गर	पृथ्वीतून पाणी निर्माण करणारा
७३.	गर–गर	महान कारागीर
७४.	गर–ओ–गर	इच्छापूर्ती करणारा
७५.	गर–अ–गर	पुरुष निर्माता
७६.	गर–अ–गर–गर	सर्वसृष्टी निर्माता
७७.	अगरा–गर	निसर्गातील चार घटकांचा निर्माता
७८.	अगरागर–गर	ग्रह–ताऱ्यांचा निर्माता
७९.	अ–गुमान	वरील शंका
८०.	अ–जमन	शाश्वत
८१.	अ–खुअन	निद्रारहित
८२.	अमश्त	कुशार
८३.	फशुताना	काळजीपूर्वक प्रगती करणारा
८४.	पद्मनी	अगदी
८५.	फिरोजगर	विजयी
८६.	खुदावंद	निर्मिती मालक
८७.	अहुरामझ्द	निर्मिती आणि ज्ञानाचा ईश्वर
८८.	अबरीन–कोहुन–तवन	अज्ञान वेळापासून निर्मिती मालक
८९.	अबरीन–नो–तवन	सर्वात मोठा, आमूलाग्र बदल करणारा
९०.	वस्पन	विश्वाचा मालक
९१.	वस्पर	सर्व देणारा
९२.	खावर	सर्वात प्रेमी
९३.	अहु	जीवनाचा ईश्वर

९४.	अवक्षीदर	क्षमा करणारा
९५.	ददार	न्यायाचा निर्माता
९६.	रयोमन्द	तेजस्वी
९७.	खोरेहोमन्द	तल्लख
९८.	दवर	न्याय करणारा
९९.	क़ेरफेगर	चांगुलपणाचा निर्माता
१००.	बोखतर	वाचविणारा
१०१.	फ्रशागर	पुन्हा जिवंत करणारा[४१]

संदर्भग्रंथ सूची

1. G. M. Bongard Levin, "Studies in Ancient India and Central Asia" - Soviet Indology Series 7, Calcutta 1971, Pg. 52-66
   - Gathas, in R. Schimidt and P.O.S.K., Jaevuo, eds, Studia Grammatica Iranica, Festchrift H. Humbach, Munich, 1986
   - Name of Zoroaster in Armenian Studies 2, Los-Angeles, 1985-86.
2. Sethana Tehmurasp Rustamji, "Book of Instructions on Zoroastrian Religion", Published by Informal Religion Meetings Trust Fund, Karachi, 1980, Pg. 17, 18
3. Bruce Lincoln, "The Indo-European Myth of Creation", History of Religious, 1975, pg. 1929-2185
   - Karl F. Geldner, ed, Avesta, "The Sacred Books of the Parsis, Vol. 3, Stuttgart, 1886 - 1895, rpt.Delhi 1982
4. Ehsan yarshater, "Iranian National History", in the Cambridge History of Iran, Vol. 3, Pt. 1, ed. E, Yarshater Cambridge 1983, P. 371-372, 384, 385, 422-426
   - Yarashater, "Iranian National History"
5. Kingsley P., "The Greek Origin of the Sixth Century dating of Zoroaster", BSOAS 53, 1990, P. 245 - 265
   - J. Edward Keal, "Iranian - Civilization and Culture", ed. Charles Adams, Montreal, 1972, Pg. 16, 17
6. Louis H. Gray, "The Foundation of the Iranian Religion, Bombay 1929, P.52-62
7. "A History of Zoroastrianism", Vol. I, IInd ed. Leiden 1989, Pg. 92-97
   - J. Darmesteter Tr. "Sacred Book of the East ", Vol. IV, Oxford, 1895, Vendidad VIII 81
8. Robert C. Zaehner, "The Dawn and Twilight of Zoroastrianism", London, 1961, Pg. 131-137
9. Robert C. Zaehmer, "The Teachings of the Magi : A Compendium of Zoroastrian Beliefs, New York - 1956, Rpt 1976, Pg. 42-44
10. See Ref. 2, Pg. 12
11. See Ref. 2, Pg. 23
12. See Ref. 2, Pg. 25

13. See Ref. 2, Pg. 26
14. See Ref. 2, Pg. 26
15. See Ref. 2, Pg. 27
16. See Ref. 2, Pg. 27
17. See Ref. 2, Pg. 28
18. See Ref. 9
19. See Ref. Part, I, III, IInd.
20. Lincoln, "The Indo-European Myth",
    - Jackson, A.V. Williams, " An Avesta Grammar in Comparison with Sanskrit" Part-1 Stuttgart, 1892.
21. Schwartz Martin, "The Religion of Achaenian Iran". The Cambridge History of Iran, Vol. II, ed Ilya Gershevitch, Cambridge 1985, P. 670, 671, 693, 694
22. Louis H. Gray, "The Foundation of the Iranian Religions" - Bombay 1929 Pg.52-62
    - Yasna 28-3, 31-7, and 17 since the Gathas are Part of the Liturgy of the Yasna, They are cited as yasna 28-34, 43-5 and 53
    - Yasna, 34-3
    - Yasna, 31-2
    - Yasna, 30-11
    - Yasna, 34-3
    - Yasna, 48-7
    - Yasna, 49-4

    Chatterji Jatindra Mohan, " The Hymns of Atharvan Zarthushtra" Calcutta 1967.
23. See. Ref. 2, Pg. 51-56
24. See Ref., Part I, III, 2nd
25. Martin Schwartz, "The old Eastern Iranian World, View According to the Avesta, The Cambridge History of Iran, Vol. II, ed. Ilya, Gershevitch, Cambridge 1985, P 647
26. The Parsis', Vol. III, Translated from the French, By Anthony D. Mango, Publishing in 1996, By Danai, Mangalsmruti, 14th Road, Khar Danda Road, Khar, Bombay 400 052, Pg. 31-45
27. Choksy Jamsheed K., "Woman in the Zoroastrian Book of Primal Creation", The mankind Quarterly 29, 1988, Pg. 75-81

28. Gazetteer of India, Maharashtra State, Thane Dist. Pg. 292-294
29. See Ref. 2 - Pg. 31-34
30. See Ref. 28 - Pg. 294
31. See Ref. 28 - Pg. 297-299
- See Ref. 2 - Pg. 81-83
32. See Ref. 2 - Pg. 84
33. See Ref. 26 - Pg. 64-70
34. See Ref. 2 - Pg. 88-90
35. See Ref. 2 - Part IV, Pg. 30
36. See Ref. 2 - Part IV, Pg. 31
37. See Ref. 2 - Part IV, Pg. 31
38. See Ref. 2 - Part IV, Pg. 32
39. See Ref. 2 - Part IV, Pg. 32-34
40. See Ref. 2 - Part IV, Pg. 34
41. See Ref. 2 - Part IV, Pg. 35

प्रकरण – ५ वे

राजकीय जीवन

पारशी समाजाचा इतिहास हा ३००० वर्षांपेक्षा जुना आहे. ह्या समाजात अनेक उच्चपदस्थ लोक असून पारशांच्या इतिहासात त्यांचे नाव अमर आहे. पारशांची वैशिट्यपूर्ण परोपकारी पध्दती ही त्यांच्या पंचायत प्रणालीमुळे व एका उल्लेख्नीय सामाजिक सुरक्षेमुळे तयार झाली आहे. त्यांचे सदस्य स्थानिक 'अंजुमन फंड' किंवा 'सामुदायिक खजिन्यात' आपले योगदान देऊन ह्या प्रणालीचा पाया तयार करतात.

मुंबईतील पारशी पंचायत ही वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत आणि गरिबांना गरिबीतून सुटका मिळण्याच्या तरतुदीत सर्वोच्च आहे. ह्या समाजात अनेक नामांकित व विश्वस्त संस्था आहेत ज्या पारशांबरोबर इतर समाजाचाही फायदा करतात.

पारशांनी स्वत:करिता कधीही कोणत्याही प्रांताचा किंवा विशेष अधिकाराचा दावा केला नाही. त्यांचे योग्य पध्दतीने राहणे, जीवन जगणे आणि इतरांनांही जगू देणे या मतामुळे त्यांनी आपल्यात मनुष्यधर्म उज्ज्वल केला आहे.

पारशांचा राष्ट्रीय, राज्य आणि शहर पातळीवरील राजकारणाबरोबरच पारंपरिक इतिहासही कळतो. पारशी हे प्रामुख्याने कॉंग्रेस पक्षाचे अनुयायी आहेत. यात दादाभाई नौरोजी हे एकोणिसाव्या शतकाच्या 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस'च्या संस्थापक सहयोगातील (Founder Member) सदस्य असून ते ब्रिटिश संसदेतील भारतीय खासदारांपैकी एक होते.

ह्या यादीतील एक महत्त्वपूर्ण नाव 'सर फिरोजशहा मेहता' हे होय. यांचे योगदान मुंबई महानगर पालिकेंच्या इतिहासात इतके महत्वपूर्ण आहे की त्यांना महानगरपालिकेचे पितामह (Father of the Muncipal Corporaion) म्हणून ओळखले जाते.[१]

आज पारशांचा राजकारणाशी काही संबंध नसला तरीही त्यावेळेच्या निवडून आलेल्या स्पर्धकांमध्ये त्यांच्या नावाची यादी काढली तर मिनु मसानी आणि पिलू मोदी या दोन नावातून यादीची सुरुवात होताना दिसते.

पारशी समाजाचा महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचे जिवंतपण (Liveliness) व बदलत्या परिस्थितीत जुळवून घेण्याची वृती तसेच त्यांचे उदयोग आणि समाजातील व्यक्तींना ओळखण्याची त्यांची प्रवृती होय.[२]

❖ PROMINENT PARSIS

Participation Of Parsis In Indian Independence Movement

क) भारतीय स्वातंत्र चळवळीतील पारशांचा सहभाग

- **दादाभाई नौरोजी –**

भारतीय स्वतंत्रता संग्रमाचा पाया रचणारे दादाभाई नौरोजींचा जन्म मुंबईच्या एका गरीब पारशी कुटूंबात ४ सप्टेंबर रोजी झाला. दादाभाई केवळ ४ वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला या वेळी त्यांचे पालनपोषण आईने केले अशिक्षित असूनही त्यांनी शिक्षणावर विशेष लक्ष दिले. एलफीन्स्टन इन्स्टिट्युट, मुंबई येथून शिक्षण पूर्ण केल्यानंतर २७व्या वर्षी ते गणित, भौतिकशास्त्राचे प्राध्यापक झाले .

सन १८५१ मध्ये गुजराती भाषेत मरास्त गफ्तारफ नावाचे साप्ताहिक सुरु केले व १८६७ मध्ये 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची स्थापना केली. सन १८८५ मध्ये ते 'मुंबई विधान परिषदे'चे सदस्य बनले तसेच फिन्सबरी क्षेत्रातून पार्लमेंन्टकरता ते निवडून आले. लंडनमध्ये विश्वविदयालयात ते गुजराती भाषेचे प्रोफेसर बनले आणि १८६९ मध्ये भारतात आल्यानंतर १८८६ ते १९०६ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष झाले. दादाभाईंनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या स्थापनेत आपले महत्वपूर्ण योगदान दिले.

१९०६ मध्ये दोनवेळा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. परंतु पार्टीची परिस्थिती बघून वरिष्ठ सदस्यांनी नौरोजींना पुन्हा एकदा त्यांनी काँग्रेसच्या हितासाठी अध्यक्षपद स्वीकारावे असे सुचविले अशा प्रकारे ७१ व्या वर्षी ते काँग्रेसचे तिसऱ्यांदा अध्यक्ष बनले.

दादाभाई नौरोजींना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल 'ग्रॅन्ड ओल्ड मॅन ऑफ इंडिया' या नावाने ओळखले जाते. त्यांनी 'Poverty of An Unbritish Rule In India' या पुस्तकात भारतातील संपत्ती ब्रिटनमध्ये कशा स्वरुपात जाते यावर लक्ष केंद्रित केले. १८९२–९५ मध्ये

'युनायटेड किंगडम हाऊस ऑफ कॉमर्स' मध्ये पार्लमेंटचे सदस्य बनले. संपूर्ण आशियातील ते पहिले व्यक्ती होते ज्यांची निवड 'ब्रिटीश मेंबर ऑफ पार्लमेंट' मध्ये झाली.

दादाभाई नौरोजींनी १९०६ मध्ये एका अध्यक्षीय भाषणात सार्वजनिकपणे ब्रिटिशांसमोर स्व–शासनाची मागणी व्यक्त केली, तसेच देशाला 'स्वराज्याचा' नारा दिला.[३]

❖ दादाभाईंच्या व्यक्तित्वाची जडणघडण

• दादाभाई : नीतिमान राजनैतिक कर्तृत्व

आपल्या व्यक्तिगत गरजा मर्यादित ठेवत, एखाद्या कार्याचा ध्यास घेऊन प्रयत्नांचे पर्वत उभे करणे हे अगदी बोटावर मोजता येणाऱ्याच पुरुषोत्तमांना शक्य झाले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दादाभाई नौरोजी. त्यांना देश अत्यंत प्रिय होता, स्वातंत्र्य हवे होते. पण फक्त भावनेच्या लाटेवर स्वार होऊन फारशी प्रगती साधता येणार नाही, हे त्यांना ठाऊक होते. पाश्चिमात्य शिक्षण आणि प्रवास यांनी येणारे शहाणपण दादाभाईंना लहानपणीच लाभले. लोकांनी दुराग्रह सोडून कर्मठपणाचा त्याग करावा, हा विचार लोकमानसावर बिंबवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राज्यकर्ते इंग्लंडमध्येच राहून कायदे करीत होते. राज्य कायद्याचे होते, पण राज्यकारभारात जनतेचा सहभाग नव्हता.अशा स्थितीत ब्रिटीश पार्लमेंटचे सभासद होण्यासाठी निवडणूक लढविण्याचा विचार दादाभाईंच्या मनात आला. हे कर्तुत्वाचे पहिले स्फुरण होते. इंग्लंडमधील सेंट्रल फिन्सबरी मतदारसंघातून खासदार म्हणून ते निवडून आले. प्रश्न दहशतीने सुटत नाहीत, समजुतीने सुटतात. सनदशीर मार्गाने चळवळ करून इंग्लिश प्रजाजनांचे प्रबोधन करून, पार्लमेंटमध्ये ठराव आणून प्रश्न सुटतात. प्रशासनातील त्रुटींवर बोट ठेवून सामाजिक अन्यायाचे परिमार्जन करीत, नवभारताची उभारणी करावी, हेच दादाभाईंचे स्वप्न होते. इंग्लिश व भारतीय प्रजाजनांनी एका समान भूमिकेवरुन हिंदुस्थानविषयी अनौपचारिक चर्चा करावी, परस्परांचे हित कशात आहे हे जाणून घ्यावे, राजकीय सत्यशोधन करावे, विदेशी वस्तू टाळाव्यात , पण राष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी परदेशी यंत्रे मागवावीत असे त्यांचे मत होते. परदेशी भांडवलाचा स्वीकार करुन देशभर उद्योगांचे जाळे विणावे अशी त्यांची कल्पना होती. विलायतेतील दीर्घकाळ वास्तव्य, देशबांधवांना निःस्पृहतेने मार्गदर्शन करण्यासाठी सामाजिक

संस्थांची केलेली उभारणी ही सारी गुणसंपदा पाहून इतिहासाने नतमस्तक व्हावे, असे त्यांचे विलक्षण जीवनशिल्प होते.

- **ब्रिटीश पार्लमेंटमध्ये प्रभाव**

१८७१ मध्ये असोसिएशनची सभासद संख्या हजारापेक्षाही जास्त झाली. त्यामुळे त्याचा प्रभाव पार्लमेंटमध्येही दिसू लागला. हेन्री फॉसेट दादाभाईंचा उल्लेख भारताचा प्रतिनिधी असा करीत.

मुंबई महापालिकेतील प्रशासकीय यंत्रणा सुधारण्यासाठी लोकांनी शहराला हादरा देणारी शक्तिशाली चळवळ सुरू केली होती. दादाभाईंनी स्वतःला त्या चळवळीत झोकून दिले. घरपट्टी भरणाऱ्यांच्या सभेचे अध्यक्षपदही स्वीकारले. या सभेत पास झालेला ठराव मुंबईच्या गव्हर्नरकडे दाखल करण्यासाठी जाणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्वही दादाभाईंनी केले.

- **ईस्ट इंडिया असोसिएशनसाठी अथक प्रयत्न**

ईस्ट इंडिया असोसिएशनला दादाभाईंनी अतिशय अडचणींच्या वेळी नेहमीच केलेल्या सहकार्याची गंभीर जाणीव होती. असोसिएशनच्या एका ठरावात असे म्हटले होते की, दादाभाईंच्या मदतीशिवाय असोसिएशनचे कार्य चालू ठेवणे अशक्य होते.असोसिएशनच्या समितीने नमूद केले आहे की, असोसिएशन सभासदांच्या यादित दादाभाईंचे नाव अग्रभागी आहे. असोसिएशनचे सभासद व्हावे यासाठी प्रचंड कष्ट करुन लोकांपर्यंत जाणारा दादाभाईंशिवाय दुसरा कोणीही सेक्रेटरी लोकांना माहीत असलेला नव्हता. दादाभाईंना स्वतःलाच प्रचंड पत्रव्यवहार करणे, ठराव लिहिणे आणि ते वृत्तपत्रांकडे पाठविणे हे सर्व काम करावे लागे, त्याचप्रमाणे त्यांनी अनेक मित्रांना, प्रमुख नागरिकांना आणि संस्थानिकांना आवाहन केले की, असोसिएशनच्या कामाला सढळ हाताने मदत करावी.

❖ **मुंबई महानगर पालिकेतील कार्य – रिपनचे नवे युग**

- **मुंबईच्या आर्थिक नियोजन मंडळाचे सभासदत्व**

१८७५ मधे महापलिकेतील नगरसेवक म्हणून दादाभाई निवडून आले. तेथे त्यांनी आपल्या कल्पक सेवाकार्याचा प्रभाव दाखविला. सार्वजनिक पैशाचे नियोजन, गणितातील कौशल्य, आकडेशास्त्रावरील प्रभुत्व आणि वर्गीकरण करण्याची तल्लख बुद्धी, कामाचे अवधान या गुणांमुळे दादाभाई आपल्या सहकाऱ्यांना काम करण्यास उत्तेजन देणारे ठरले. तीन

महिन्यांतच त्यांना मुंबई महापालिकेच्या आर्थिक नियोजन मंडळाचे सभासद म्हणून निवडून दिले. महापालिकेने विहीरी आणि पाणी योजनेसाठी, बांधकामासाठी जो पैसा उभा केला होता ते कर्ज आणि व्याज देण्यासाठी अकांउंटस् जनरलने ५० लाख रुपयांची मागणी महापालिकेकडून केली.

नियोजन मंडळाच्या सभेचा वृत्तांत लिहून व्हॉईसराय आणि भारतमंत्र्यांकडे पाठविण्यात आला. दरम्यान, दादाभाईंचे बुद्धिसामर्थ्य आणि अथक प्रयत्न यामुळे महानगरपालिकेने पाणी प्रश्न सोडविण्यासाटी जे कर्ज काढले होते त्याचा विनियोग करण्यासंबंधी त्यांनी टाचण लिहून ठेवले होते ते त्यांच्या सहकाऱ्यांना इतके उपयुक्त ठरले की, त्यांची देशभक्ती आणि जनकल्याणाची भावना याबद्दल त्यांना आदरच वाटत राहिला. पाणीपुरवठा खात्यामार्फत अधिक पाणीपुरवठा करण्यासाठी शहरातील लोकांना रोज १४ गॅलन पाणी कसे पुरविता येईल याची संपूर्ण आकडेवारीसह माहिती त्यांनी संग्रहित करून ठेवली होती. त्याचबरोबर महापालिकेची पाणीवितरण पद्धत कशी चुकीची आहे व ती कशी सुधारता येईल, तेही त्यांनी दाखवून दिले होते.

- **शिक्षण कमिशनची नेमणूक**

१८८१ च्या अखेरीस दादाभाईंची इंग्लंडमधील व्यापार पेढी बंद झाली होती. ते भारतात परत आले त्यावेळी व्हॉइसराय लॉर्ड रिपन यांची कारकीर्द सुरू झाली होती. लॉर्ड रिपनने हिंदुस्थानातील प्रशासनव्यवस्थेत अधिक चांगले बदल केले होते, ते लोकांच्या दृष्टीने फार हिताचे होते. व्हॉइसरायने एक कायदा केला त्याप्रमाणे १८८२ साली शिक्षण कमिशन नेमले. श्री. डब्ल्यू. हंटर हे ऑक्सफर्ड विद्यापीठातून शिकलेले शिक्षणतज्ञ असून त्यांना भारतीयांबद्दल सहानुभूती होती. भारतीयांच्या अनेक दु:खाचे कारण त्यांचे अज्ञान होते, हिंदी मुला–मुलींना प्रशिक्षण देण्याची ब्रिटीश शासनाची जबाबदारी आहे, असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांच्याकडे शिक्षण कमिशनचे नेतृत्व व्हॉइसराय रिपनने दिले. श्री. डब्ल्यू. हंटर कमिशन इंडियन एज्युकेशन कमिशन भारताच्या इतिहासात प्रथम ब्रिटीश सरकारने शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी भारतात पाठविले. शिक्षणाच्या सर्व शाखांना एकसारखे महत्व प्राप्त व्हावे व एकाच दिशेने काम करावे त्याकरीता हे कमिशन आले. पायाभूत प्राथमिक शिक्षण सर्वांकरिता कसे देता येईल याबद्दल या कमिशनने सूचना करायच्या होत्या.

त्यावेळच्या हिंदुस्थानातील सर्व प्रांतांना भेटी देऊन या कमिशनने अनेक सुधारणा सुचविल्या. मौलिक शिक्षणाकडे सरकारने खास लक्ष देणे आवश्यक आहे असे मत सुचविण्यात आले. हे शिक्षण सर्व जनतेकरिता असल्याने ते स्थानिक भाषांतून द्यावे असे येथे सुचविले गेले. खाजगीरित्या प्राथमिक शिक्षण देणे जरी स्वागतार्ह असले तरी कमिशनने सुचविले की, ही जबाबदारी नगरपालिका किंवा जिल्हास्तरीय शासकीय संस्थांकडे सोपविली जावी व स्थानिक शासकीय संस्थांनी त्याकरिता कर द्यावा तसेच माध्यमिक शिक्षणसंस्थांना अनुदान देऊन त्यांच्याकरवी शिक्षणप्रसार करण्याचीही शिफारस या कमिशनने केली. अशा संस्थांतील शिक्षण व सरकारी शाळांतील शिक्षण, सरकारी शाळांमधील शिक्षण एकाच पातळीचे व धर्तीचे असले पाहिजे असेही म्हटले. अशा कॉलेजातील शिक्षण खाजगी संस्थकडे सोपवावे. स्त्रिया व मुर्लीच्या शिक्षणाची सोय मोठी शहरे सोडता इतरत्र फारच जुजबी होती. कमिशनने त्यात सुधारणा सुचविल्या.

- **व्हॉइस ऑफ इंडिया :**

पुढील २० वर्षांत भारतातील शिक्षणक्षेत्रात अभूतपूर्व अशी शैक्षणिक प्रगती झाली. असंख्य छोट्या–मोठ्या शैक्षणिक संस्था हे कार्य करण्यास उद्युक्त झाल्या. पंजाब आणि अलाहाबाद विद्यापिठासारख्या दर्जेदार संस्था निघाल्या. दादाभाईंनी आकडेवारीच्या भरपूर माहितीसह, भौतिकदृष्ट्या हिंदुस्थान खोल गर्तेत गेला होता, त्याहीपेक्षा शैक्षणिकदृष्ट्या अधिक वाईट स्थितीत होता, हे खेदजनक परिस्थितीचे निदर्शन करणारे आपले मत स्पष्ट केले. त्यावर उपाय म्हणजे लॉर्ड रिपनच्या सरकारने दोन कायदे पास केले होते. त्यांचे दादाभाईंनी स्वागत केले. त्यातील एका कायद्याप्रमाणे असे ठरवण्यात आले की, शिक्षण अशाप्रकारचे द्यायचे की पुढे लोक आपले सरकार स्वतःच चालवू शकतील. कारण घटनात्मक प्रगती हाच खरा स्थानिक स्वराज्याचा पाया होय. स्थानिक समस्यांचे व्यवस्थापन समर्थपणे चालवू शकतील. दुसरा कायदा असा होता की, शिक्षण मिळाल्यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर शासनव्यवस्था समर्थपणे चालवू शकतील, स्वदेशीच्या दृष्टीने पाऊल उचलले पाहिजे. बंद पडलेली दुकाने सुरू करणे त्याचप्रमाणे चालू असलेल्या दुकानांनी देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये तयार होणार मालच खरेदी केला पाहिजे. १८८२ मध्ये दादाभाईंनी आपले 'व्हॉइस ऑफ इंडिया' हे वृत्तपत्र सुरू केले. त्याचा उद्देश असा होता की, हिंदी लोकांचे म्हणणे राज्यकर्त्यांनी ऐकून घ्यावे.

हिंदुस्थानला न्याय मिळावा. दादाभाईं स्वतःच हिंदुस्थानचा आवाज होते, पण त्यांच्या आवाजाला इतरांचा पाठिंबा हवा होता. हिंदी लोकांच्या भावना आणि आशा–आकांक्षांची कल्पना ब्रिटीश लोकांना द्यावी यासाठी दादाभाईंनी मुंबईत एक मासिक काढावयाचे ठरविले. त्यामुळे इंग्लंडमधील लोकमतालाही वळविता आले असते. त्याकाळातल्या सर्व महत्त्वाच्या विषयांवरील वृत्तपत्रातील लेखांचा सारांश या मासिकांत संकलित केलेला असे. केवळ स्वतःच्या मतांचा प्रचार करण्याचा त्यांचा हेतू नसून हिंदुस्थानातील वृत्तपत्रांचा दृष्टीकोन समजावून देणे आणि राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यात सुसंवाद साधावा असा हेतू होता. दादाभाईं इंग्लंडला गेल्यानंतर त्यांच्या गैरहजेरीत बी. एम. मलबारी यांनी ते मासिक पुढे चालू ठेवले. आपल्या ध्येयाच्या दृष्टीकोनासमोर ठेवणारा, स्वार्थत्यागाचा तो उत्कृष्ठ प्रयत्न होता. नंतर ते मलबारीचे प्रसिद्ध साप्ताहिक 'इंडियन स्पेक्टेटर' मध्ये विलीन केले गेले. दादाभाईंच्या प्रयत्नांना लॉर्ड रिपन यांनी उत्तेजन दिले. त्याचप्रमाणे 'पीस ऑफ जस्टिस' या बहुमानाने सन्मानित केले.

- **बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनची स्थापना**

जानेवारी १८८५ मध्ये जाहीर सभेत 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची औपचारिक स्थापना झाली. 'इल्बर्टबिल'च्या चळवळीमुळे जी जागृती झाली त्याचे ते फळ होय. दादाभाईं उपाध्यक्षांपैकी एक उपाध्यक्ष म्हणून निवडून आले.

- **राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना**

दादाभाईंच्या सांगण्यावरून असोसिएशनने इंग्लंडमधील सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी वजनदार, माहितगार हिंदी लोकांचे शिष्टमंडळ इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी ज्या उमेदवारांनी हिंदी लोकांना मदत केली त्यांना पाठिंबा देण्यासाठी पाठविले. त्यांनी पाठिंबा दिलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार निवडून आला नाही. तथापि निवडणूक प्रचारातून हजारो लोकांपर्यंत हिंदुस्थानच्या सर्व परिस्थितीची जाणीव करुन देता आली. नव्या युगाची सर्वांत महत्त्वाची मार्गदर्शक घटना म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. ते हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देणारे होते. १८८५ च्या डिसेंबरमध्ये काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबईला भरले. त्यात दादाभाईंनी आय. सी. एस. ची परीक्षा इंग्लंडमध्ये हिंदुस्थानमध्येही एकाच वेळी घेण्यात यावी, अशी विनंती करणारा ठराव मांडला अधिवेशनात पास झालेल्या सर्व ठरावांचे लेखन दादाभाईंनी केले होते.

कॉंग्रेसच्या सर्व कामकाजाची लेखी नोंद इंग्रजीतून होत असे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा आणि राज्यघटना पन्नास वर्षांनंतर लिहिली गेली. ती ही इंग्रजीतूनच. या सर्व यशाची पायाभरणी दादाभाईंनी केली. त्यात त्यांना लॉर्ड रिपनचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला होता.

❖ हिंदुस्थानचे दारिद्र्य आणि ब्रिटीशांचा गैरराज्यकारभार

- **माहिती संकलन व निष्कर्ष**

दादाभाईंना राजकीय पुढारी म्हणून जी लोकप्रियता मिळाली ती त्यांच्या देशभक्तीच्या प्रयत्नांमुळे. त्यांनी दारिद्र्याने भरडल्या जाणाऱ्या लोकांचे आर्थिक शोषण कशामुळे होते हे प्रयत्न करून शोधून त्यांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी जे प्रयत्न केले त्यामुळे ते अधिक लोकप्रिय झाले. दादाभाईंनी राजकर्त्यांच्या ते स्पष्टपणे लक्षात आणून दिले की, हिंदुस्थानातील शासनव्यवस्था सर्वाधिक चैनीची व खूप खर्चिक स्वरूपाची अहे. त्याचा परिणाम म्हणजे परकीयांची सत्ता असल्यामुळे गरीब जनतेची सर्व संपत्ती राज्यकर्त्यांच्या देशात वाहून नेली जाते. उत्पन्नाची साधने हिंदुस्थानातून राज्यकर्त्यांनी वेगाने वाहून नेली याची कल्पना ब्रिटीश जनतेला काहीच नव्हती. म्हणून दादाभाईंनी ठरविले की हिंदुस्थानाल्या शासनातील उधळपट्टी संघर्ष करून जगाला दाखवून द्यायचे.

सरकारी आकडेवारी विस्कळीत आणि चुकीचे निष्कर्ष काढणारी होती. सरकारी कागदपत्र या विषयावर चुकीची माहिती दाखवित होते. तसेच वेगवेगळ्या पिकांचे दर, एकरी उत्पादन किती याचीही माहिती उपलब्ध नव्हती. उत्पादनाच्या किंमतीची आकडेवारी अपुरी आणि तंतोतंत मिळाली नव्हती. तथापि दादाभाईंनी आपली सर्व शक्ती पणाला लावून मिळेल तशी माहिती संकलित करून असा निष्कर्ष काढला की, हिंदुस्थानात दरवर्षी दरडोई वीस रुपये उत्पन्न मिळते. त्या माहितीवर आधारित 'हिंदुस्थानच्या गरजा आणि साधने' हा प्रबंध ईस्ट इंडिया असोसिएशनच्या सभेत त्यांनी जुलै १८७० मध्ये वाचला.

पार्लमेंटरी कमिटी / भारताचे पहिले अर्थतज्ञ :

भारतमंत्र्यांना विनंतीपूर्वक अर्ज पाठविण्यात आला की, हिंदुस्थानची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवावी. पार्लमेंटरी सभागृहाकडेही स्मरणपत्र पाठविण्यात आले की, दोन्ही सभागृहातील निवडक सभासदांची एक कमिटी नेमावी आणि त्या कमिटीने हिंदुस्थानातील सर्व

प्रदेशांची सर्वसाधारण प्रशासनाची चौकशी करावी. त्याप्रमाणे पार्लमेंटरी कमिटी नेमण्यात आली. त्या कमिटीच्या विचारार्थ दादाभाईंनी आपले काही निष्कर्ष थोडक्यात सादर केले. दादाभाईंना अजून अनेक ठराव लिहायचे होते. अनेक प्रबंध प्रकाशित करून हिंदुस्थानचे दारिद्र्य आणि ब्रिटिशांचा हिंदुस्थानातील गैरकारभार यावर पुस्तक प्रसिद्ध करावयाचे होते. अनेक चर्चा घडवून आणायच्या होत्या, त्याकरिता अनेक प्रकारच्या चौकशा करावयाच्या होत्या. त्याचप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या आणि हाउस ऑफ कॉमन्समधी मित्रांच्या मागणीप्रमाणे हिंदुस्थानचा प्रशासकीय खर्च याच्या चौकशीकरिता 'रॉयल कमिशन' नेमायचे आणि हिंदुस्थान व ब्रिटन या दोन्ही देशातील योग्य आर्थिक संबंध कसे असावेत यासाठी सूचना कराव्यात, अशी दादाभाईंची योजना होती. ईस्ट इंडिया असोसिएशन मुंबई शाखेच्या वतीने आयोजित केलेल्या सभेत दादाभाईंनी हिंदुस्थानचे दारिद्र्य या विषयावर प्रबंध वाचला. दोन वर्षांनी त्या प्रबंधाची एक पुस्तिका लंडनमध्ये प्रसिद्ध करण्यात आली. याबाबात त्यांचा हेतू असा होता की, हिंदुस्थानच्या दारिद्र्याला ब्रिटीश प्रशासन मोठ्या प्रमाणात जबाबदार असून तो देश दारिद्र्यात खोल बुडत चालला आहे. तसेच हिंदुस्थानच्या जनतेचे दरडोई उत्पन्न २० रुपये हा निष्कर्ष त्याकाळाला अनुसरून आहे. लॉर्ड क्रोमर आणि सर डेव्हीड बार्बर यांनी दादाभाईंच्या निष्कर्षाचे १८८२ मध्ये समर्थन केले व हिंदुस्थानातील लोकांचे दरवर्षी दरडोई उत्पन्न २७ रुपये असल्याचे मान्य केले. पुढील काही वर्षात शेतीचे व उद्योगधंद्याचे उत्पादन थोड्या प्रमाणात वाढत असले तरी १९०१ मध्ये लॉर्ड कर्झनने काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे दरवर्षी दरडोई उत्पन्न ३० रुपये होते.

दादाभाईंनी १८३५ ते १८७२ या कालावधीतील हिंदुस्थानच्या आयात व निर्यात मालाची आकडेवारी देऊन असे दाखवून दिले की, हिंदुस्थानच्या निर्यात मालाची किंमत आयात मालाच्या किंमतीपेक्षा ५० कोटी पौडांनी जास्त आहे. याहीपेक्षा कितीतरी अधिक रक्कम इंग्लंडकडे जात होती. काही अभ्यासू ब्रिटीश अधिकाऱ्यांनी आकडेवारी देऊन सिद्ध केले की, हिंदुस्थानच्या अनेक दुःख आणि यातनांना कारण खंडणी म्हणून फार मोठी रक्कम खंडणी द्यावी लागते हे आहे. याचा उल्लेख दादाभाईंनी आपल्या सिद्धांताला बळकटी आणण्यासाठी दिला.

हिंदुस्थानचे मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण होणे गरजेचे होते. भांडवल कमी असल्यामुळे कारखानदारीला मर्यादा होती. हिंदुस्थानची संपत्ती इंग्लंडकडे वाहून नेली जात

होती. म्हणून काही सुलभ अटींवर इंग्लंडकडून भांडवल घेऊन हिंदुस्थानचा व्यापार व कारखानदारीचा विकास करण्याचा हिंदुस्थानला हक्क होता. मुक्त व्यापाराच्या नावाखाली ब्रिटीश राज्यकर्त्यांनी बाल्यावस्थेत असलेली कारखानदारी गुदमरून टाकली होती. जर संपत्ती इंग्लंडकडे वाहून नेण्यास विशिष्ट मर्यादा घातली तर हिंदुस्थान मुक्तव्यापाराचे तत्त्व स्वीकारण्यास तयार होईल. त्यांच्या या धोरणामुळेच व सडेतोड भुमिकेमुळे यशस्वी अर्थतज्ञानाचा मान मिळाला.

`ईस्ट इंडिया असोसिएशन' चे काम करू लागल्यापासून दादाभाईंचे स्वतःच्या व्यवसायातील लक्ष कमी झाले होते. बडोद्याची दिवाणगिरी आणि हिंदुस्थानच्या दारिद्र्याची आणि दुःखाची कारणमिंमासा राज्यकर्त्यांना दाखवून देण्याचे महान कार्य करण्यात दादाभाईंचा बराच काळ गेल्यामुळे स्वतःच्या व्यवसायाकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नाही. ते आपल्या व्यवसायापासून पूर्णपणे निवृत्त झाले. पण स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी दुसरे साधन नसल्यामुळे व्यावसायिक संस्थेशी संबंध ठेवणे आवश्यक होते.

❖ दादाभाईंचे भारतीय देशभक्त सहकारी

दादाभाईं नौरोजी यांच्या राजकीय व सामाजिक कार्यावर तीन पिढ्यांचा परिणाम दिसून येतो. त्यांच्या पूर्वीच्या पिढीच्या आचारविचारांचा दादाभाईंच्या विचारसरणीवर प्रभाव होता. त्यांच्या समकालीन पिढीचे राजकारण व सामाजिक चळवळ यावर दादाभाईंचा प्रभाव दिसतो व त्यांच्यानंतरच्या पिढीने त्यांच्याच विचारांप्रमाणे राजकारण व समाजकारण केले. त्यांचे अनुयायी त्यात यशस्वी ठरले. त्याचा मागोवा थोडक्यात घेऊ.:–

- **राजा राम मोहन रॉय**

पती निधनानंतर पत्नीने सती जाण्याची अमानुष रूढी हिंदुस्थानात प्रचलित होती. आपल्या भावाच्या निधनानंतर वहिनी सती गेली, तो माणुसकीला काळीमा फासणारा हृदयद्रावक प्रसंग पाहून राजा राममोहन रॉय कळवळले.

ज्ञान, विज्ञान, धर्म आणि संस्कृती यांच्या तौलनिक अभ्यासाचा पाया राजा राममोहन रॉयांनी घातला. ऐन तारुण्यातच त्यांनी स्त्रियांच्या वैवाहिक जीवनातले अडसर दूर केले, बालविवाहाला विरोध केला, विधवा विवाहाचा पुरस्कार केला, सतिप्रथेचे कायद्याने निर्मूलन करण्याचा आग्रह धरला, आंतरजातीय विवाह वैध मानला, भारताचा भागोदय घडावा आणि

आधुनिक राष्ट्रांच्या बरोबरीने भारत प्रगत व्हावा असा त्यांनी आग्रह धरला. अवघी मानव जात एक आहे. भावनिक एकात्मता हाच एक धर्म ठरेल असे सांगून भारतातील असंख्य हिंदू – मुसलमान बांधवांना राजा राममोहन रॉय यांनी विवेकाची वाट दर्शविली. 'राजा राममोहन रॉय' हे नवभारताचे आद्य प्रबोधनकार होते. त्यांच्याकडून दादाभाईंना नौरोजीना नवे विचार मिळाले.

- **बाळशास्त्री जांभेकर (१८१२–१८४६) :**

मराठी वृत्तपत्र व्यवसायाचे जनक आणि इंग्रजी येणाऱ्या पहिल्या पिढीतील अग्रगण्य विद्वान. मुंबईला येऊन इंग्रजी, संस्कृत, शास्त्र आणि गणित या विषयांचा अभ्यास केला. त्यांना अनेक भारतीय तसेच विदेशी भाषा अवगत होत्या. शिक्षणक्षेत्रात प्राध्यापकीसह अनेक उच्च पदस्थ कामे केली. व्याकरण, गणित, इतिहास तसेच ज्ञानश्वरीचे संपादन अशा विषयांमध्ये त्यांनी ग्रंथरचना केली. रॉयल एशियॅटिक सोसायटीच्या कार्यात भाग घेणारे ते पहिले एतद्देशीय विद्वान होते. दादाभाईं जांभेकरांना गुरुस्थानी मानत. जांभेकरांच्या विचारांचा दादाभाईं नौरोजींवर खूप प्रभाव होता.

- **भाऊदाजी लाड (१८२२–१८७४) :**

पूर्ण नाव रामकृष्ण विठ्ठल लाड. संस्कृत कॉलेजात अध्यापक म्हणून नियुक्ती झाली. शिक्षकांची नोकरी सोडून त्यांनी वैद्यकशास्त्रात पदवी घेतली. डॉक्टरीमध्ये त्यांना लोकप्रियता व पैसे मिळाले. कुष्ठरोगावर चौलमुग्रा वनस्पतीचे औषध त्यांनी शोधले. पुढे दादाभाईं नौरोजी यांनी इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशन नावाची संस्था काढली. तिच्या मुंबई शाखेचे भाऊ अध्यक्ष झाले. सामाजिक सुधारणांबरोबर त्यांनी औद्योगिक सुधारणांकडेही लक्ष दिले. मुंबईत कागद व कापूस गिरण्या काढण्यात त्यांनी पुढाकार घेतला. स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अनेक वर्षे आर्थिक झीज सोसली. मुलींच्या तीन शाळा त्यांच्या संस्थेतर्फे चालविल्या जात. विधवा विवाह चळवळीस त्यांनी मोठा पाठिंबा दिला. अंधश्रद्धा निर्मूलन कार्य त्यांनी मोठ्या प्रमाणावर केले. वनस्पती व प्राचीन इतिहास यांच्या संशोधनात त्यांना विशेष रस होता. प्राणीसंग्रहालयात (राणीचा बाग), वस्तुसंग्रहालय, वाचनालय अशा अनेक संस्था त्यांनी स्थापन केल्या. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे ते प्रमुख सदस्य होते. त्यांच्या संशोधकवृत्तीचे आणि कष्ट करून सामाजिक सुधारणा करण्याचे दादाभाईंना आकर्षण होते.

- **गोपाळ हरी देशमुख (१८६६-१९१५) :**

अव्वल इंग्रजीतील पहिल्या पिढीवर नव्या शिक्षणाचा प्रभाव पडलेल्यांपैकी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख होत. लोकहितवादी कर्मकांडाच्या विरोधात होते शतपत्रातून समाजसुधारणांचे आणि राजकीय विचार त्यांनी मांडले. आपल्या जुन्या विद्येला पाश्चिमात्य विज्ञान आणि साहित्याची जोड दिली पाहिजे, असा त्यांनी प्रसार केला. त्यांना काळानुरूप बदल अपेक्षित होता. सामाजिक विषमता कमी करणे त्यांना आवश्यक वाटत होते. लोकास सुख लाभण्यासाठी पुष्कळ संपत्ती तयार केली पाहिजे आणि लोकांमध्ये तिची वाटणी बरोबर केली पाहिजे. केवळ शेती करून कच्चा माल तयार करण्यावर भर न ठेवता पक्का माल तयार करण्याचे कौशल्य आणि साधनसामग्री मिळविली पाहिजे. असे त्यांनी सातत्याने सांगितले. ते लोकांना ज्ञानप्रकाश या दैनिकातून ब्रिटिश राजवटीशी जुळवून घेण्याचे सांगत. पूर्वीच्या राजवटी म्हणजे अस्मानी सुलतानी गाजविणाऱ्या सरंजामशाह्या होत्या. त्यांच्या जोखडातून ब्रिटीशांनी रयतेची सुटका केली. त्यांनी सार्वजनिक जीवन आणि राज्यकारभार या क्षेत्रांमध्ये नीतिमत्तेचे व प्रशासनाचे उच्चतर मानदंड प्रस्थापित केले होते. आधीच्या स्थितीपेक्षा ब्रिटिशांचे राज्य कितीतरी श्रेष्ठ होते, असे गोपाळ हरी देशमुखांचे मत होते आणि ब्रिटिशांनी सर्व व्यक्तींना धर्म, जाती वा कुलनिरपेक्ष समान दर्जा दिला. राज्य हे सर्वांच्या कल्याणासाठी व भरभराटीसाठी असते. हे नवे तत्त्व भारतीय राजनीतीमध्ये ब्रिटिशांनी प्रविष्ट केले. अंधश्रद्धा व धर्माच्या नावाखाली माजलेले कर्मकांड, जातिभेद व उच्चनीचता आणि स्त्रियांची गुलामगिरि या गोष्टींना मूठमाती दिल्याखेरीज राजसत्तेचे नवे लोकाधिष्ठित रूप येथे अवतरणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. ही उदार विचारसरणी दादाभाईंना पटत होती.

- **महात्मा फुले (१८२८-१८९०) :**

जोतिबांनी दलितांसाठी आणि मुलींसाठी पुण्यात शाळा सुरू केली. जातीयतेचे ग्रहण सुटत नाही, तोपर्यंत समतेचा प्रकाश पडणार नाही हे त्यांनी जाणले होते. त्यांनी विद्येकडे दीनदलितांच्या व्यथा वेदनांच्या निराकरणाचा मार्ग म्हणून पाहिले. विद्येचा प्रकाश प्राप्त झाल्याशिवाय जनसामान्यांचा उद्धार होणार नाही. अविद्येने समाजाचे फार नुकसान झाले आहे हे त्यांनी अनुभवलेले होते. म्हणून जोतिबांनी सावकारशाही, भिक्षुकशाही आणि नोकरशाही या मानवता विरोधी शक्तीच्या विरोधात जीवाच्या आकांताने संघर्ष केला. जोतिबांनी हरितक्रांतीचे

स्वप्न पाहिले होते. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा, नद्यांवर धरणे बांधा, पाणी अडवा, पाणी वळवा, गरीब शेतकऱ्यांना बी–बियाणे, अवजारे पुरवा, उत्तम शेती करणाऱ्यांना बक्षिसे द्या, असा प्रचार त्यांनी केला. जोतिबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व मानव धर्माला चालना दिली. नवस–सायास, पोथ्या–पुराणे यासारखे सामाजिक आरोग्याची हानी करणारे विधी आणि विचार झुगारून दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान या आधुनिक जीवनमूल्यांची रुजवण जोतिबांनी केली. माणुसकीची ही शिकवण दादाभाईंना जोतिबांच्या महान कार्यातून मिळाली.

- **जमशेटजी टाटा : (१९३९–१९०४) :**

कापड उद्योग आणि लोखंड व पोलाद कारखानदारीशी त्यांचे विशेष नाते आहे. अकुशल कामगारांना कौशल्य शिकवून त्यांनी अनेक नवीन पायंडे उद्योगधंद्यांमध्ये तयार केले. कामगार कल्याणाकडे त्यांचे विशेष लक्ष असे.

मुंबई शहराच्या सुधारणेशी टाटांचा संबंध १८८३ पासून होता. १८९० मध्ये त्यांनी जमीनजुमला खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यांनी अनेक नामांकित इमारती बांधल्या. टाटांच्या दानशूरत्वाचे प्रतीक असलेल्या मुंबईत अनेक भव्य इमारती आहेत. पारशी जिमखाना, ताजमहाल हॉटेल, जे. जे. स्कूल ऑफ आर्टस, जे. जे. हॉस्पिटल अशा सर्वज्ञात ठिकाणांशी त्यांचा घनिष्ट संबंध आहे. इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स शैक्षणिक विचारातून निर्माण झाली आहे. त्यांनी अनेक संशोधन संस्था स्थापन केल्या. पुढे देशाच्या आर्थिक प्रगतीमधील लोखंड व पोलाद उद्योगाचे महत्त्व ओळखून सिंगापूर, बंगलोर येथे टाटा आयर्न ॲण्ड स्टील हा महाप्रचंड प्रकल्प उभारला. मुंबईला वीज मिळावी म्हणून भिवपुरी, भिरा येथे वीजनिर्मिती केंद्र काढली. टाटा लाईन ही जहाज कंपनी उभारली. भारताची औद्योगिक प्रगती हीच सर्वात महत्त्वाची बाब आहे, अशी टाटांची श्रद्धा होती. त्याकरिता त्यांनी अपरिमित कष्ट सोसले. या पार्श्वभूमीवर त्यांचे औदार्य आणि दानशूरता, त्यांची व्यापक दृष्टी आणि देशभक्ती दिसून येते. ज्ञान हेच उद्योगधंद्यांचे अधिष्ठान असते हे त्यांनी हेरले. म्हणून प्रगत शिक्षणावर त्यांचा भर अधिक होता.

या घराण्याचा दादाभाईं नौरोजी यांच्याशी कायमच फार निकटचा संबंध होता.

- **डॉ. रा. गो. भांडारकर (१८३७–१९२५) :**

प्राच्यविद्यावंत, बुद्धिमान व्यासंगी, इतिहासाचे गाढे अभ्यासक, अस्खलित वक्तृत्व असलेले डॉ. भांडारकर आचाराने आणि विचाराने समाजसुधारक होते. स्त्रीशिक्षण, प्रौढ विवाह आणि विधवा विवाह यांचे ते निर्भय पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या घरातील स्त्रियांना विद्याविभूषित केले होते. भांडारकर अस्पृश्यता मानीत नव्हते. न्याय, नीती आणि मानवहितवाद यांच्याशी विसंगत असणारी प्रत्येक गोष्ट भांडारकर यांनी नाकारली. धोडों केशव कर्वे यांच्या विधवा आश्रम, अनाथ बालिकाश्रम, महिला विद्यापीठ या संस्थांना डॉ. भांडारकरांचा फार मोठा आधार होता. समाजपरिवर्तनाची ती प्रयोगशाळा होती. अभ्यासाला कृतीची जोड हा त्यांचा विचार दादाभाईंच्या विचारांशी मिळता–जुळता होता. दादाभाईंच्या आधुनिक विचारांचा भांडारकरांवर पगडा होता.

- **महादेव गोविंद रानडे (१८४१–१९०१) :**

हिंदुस्थानी लोकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधन विषयक उदासीनता, साहसी व शोधक वृत्तीची उणीव, अडचणी व समस्या यांच्यातून मार्ग काढण्याच्या निर्धाराचा अभाव हे अवगुण रानड्यांना आढळून येत होते. याचवेळी सामाजिक, आर्थिक व राजकिय पुनर्रचनेची प्रक्रिया गतिमान झाली होती. देशाच्या सर्वांगीण प्रगतीच्या प्रक्रियेला चालना देणारा हा संबंध होता. या अर्थाने रानड्यांना ब्रिटीशांचे राज्य हे ईश्वरी वरदान वाटत होते.

पुण्यातील वास्तव्यात त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या. अनेक चळवळींना प्रेरणा दिली, साहाय्य केले व मार्गदर्शन केले. मुलींची शाळा, ग्रंथालय, व्याख्यानमाला, बँक, कागद गिरणी, रेशमाची गिरणी आणि साहित्य परिषद अशा विविध गोष्टींचा यात समावेश होता. पुण्याच्या सार्वजनिक सभेला त्यांचेच मार्गदर्शन होते. मुंबई विद्यापीठ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि औद्योगिक परिषद या संस्थांच्या कामकाजात त्यांचा सहभाग होता. त्यांच्या सहवासाने दादाभाईंच्या जीवनालाही अनपेक्षित साथ मिळणार होती. ते दादाभाईंचे उत्तम सहकारी होते.

- **उमेशचंद्र बॅनर्जी (१८४४–१९०६) :**

कायदेपंडित असून बंगाल विधानसभेचे सभासद होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे ते कायदेविषयक सल्लागार होते. त्यांना राजकारणात रस असून लंडन इंडिया सोसायटी

स्थापण्यात दादाभाईंबरोबर त्यांनी भाग घेतला होता. मुंबई येथील पहिल्या राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते अध्यक्ष होते १८८५ ते १८९२ मध्ये पुन्हा अलाहाबाद येथील कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. ज्युरी पद्धतीला त्यांचा विरोध होता. मिठावरील कर त्यांना अन्यायकारक वाटे. दादाभाईंच्या इंडिया नियतकालिकाला ते नेहमी अर्थसाहाय्य करीत.

स्वदेशी आणि औद्योगिकीकरणाला त्यांचा पाठिंबा होता. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याबद्दल ते आग्रही होते. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कार्यात प्रथमपासून ते दादाभाईंचे सहकारी होते.

- **दिनशा एडलजी वाच्छा (१८४४–१९३६) :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक अग्रगण्य कार्यकर्ते आणि अखिल भारतीय कॉंग्रेसचे संस्थापक, सदस्य, समाजसुधारणा, शिक्षण आणि राजकारण या क्षेत्रात दादाभाईं नौरोजी, फिरोजशहा मेहता यांच्याबरोबर काम केले. अनेक प्रतिष्ठित, सामाजिक संस्था आणि संघटनांशी त्यांचा पदाधिकारी म्हणून संबंध आला. ४० वर्षे मुंबई नगर पालिकेचे ते सक्रिय सभासद होते. त्यांनी भारताच्या आर्थिक प्रश्नांवर विशेषतः करविषयक धोरणावर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहले. दादाभाईंच्या आर्थिक विधानांचे त्यांनी समर्थन केले आहे. वेलबी कमिशनपुढे दादाभाईं आणि गोखले यांच्याबरोबर वाच्छांनीही साथ दिली. दादाभाईंचे ते निकटचे सहकारी होते.

❖ **वेल्बी कमिशन :**

- **असहनीय दुष्काळ**

१८९६ साली मुंबई प्रांतात मोठा दुष्काळ पडला. दुष्काळाचे वृत्तांत इंग्लंडमध्ये जात होते आणि पार्लमेंटमध्ये चर्चा होत होती. हाउस ऑफ कॉमन्समध्ये खासदार दादाभाई मुंबई प्रांतातील दुष्काळाचे भयंकर स्वरूप आकडेवारीसह तपशीलवार माहिती देऊन ब्रिटीश सरकारला त्यावर उपाय सुचवित होते. दुष्काळाचे संकट पुन्हा–पुन्हा येऊ नये याची काळजी घेण्यास सांगत होते. व्हिक्टोरिया राणीनेही दुष्काळ संबंधात चिंता व्यक्त केली. व्हॉइसरॉय लॅन्सडाउन मात्र गंभीरपणे उपाय योजना करीत नव्हते. लंडनमध्ये सभा होऊन महापौरांनी दुष्काळ निधीला मदत देण्याचे आवाहन केले. वीस कोटी लोकसंख्येपैकी सुमारे दीड कोटी सत्तर लाख लोक दुष्काळग्रस्त झाले आणि साठ लाख लोक मृत्युमुखी पडले व असंख्य जनावरे चारा–पाण्याविना मरून पडली. अशा संकटाच्या काळात सावकार, जमीनदार आणि

व्यापारी यांनी दुष्काळग्रस्तांच्या जमिनी नाममात्र मोबदल्यात हडप केल्या व गरिबांना कर्जाच्या खाईत कायमचे बुडवले.

- **इंग्रजांककडून अतोनात लूट**

आयरिश जहाल पुढारी हेन्री हिंडमन याने टाइम्समध्ये म्हटले होते, महापौरांनी जमा केलेला दुष्काळनिधी हा तात्पुरता उपाय झाला. हिंदुस्थान इतका गरीब का राहिला, याचे उत्तर शोधले पाहिजे, तसे केले तर असे दिसले की, हिंदुस्थानची लूट ब्रिटीश सरकार करत असून जनतेकडून खंडणी वसूल केली जाते. ती थांबवली तर देश इतका गरीब राहणार नाही. गझनीच्या महंमदाने हिंदुस्थानवर अठरा स्वाऱ्या केल्या व क्रूर कत्तली करून जेवढी संपत्ती लुटून नेली, त्यापेक्षा अधिक संपत्ती ब्रिटीश राज्यकर्ते दरवर्षी अक्कल हुशारीने रक्ताचा एक थेंबही न सांडता नेतात.

काँग्रेसच्या अधिवेशनात दुष्काळाची चर्चा झाली आणि ठराव करण्यात आले. सरकारचा निष्कारण होणारा खर्च, हिंदुस्थान इंग्लंडला देत असलेली खंडणी, वाढता व डोईजड सारा, सरकारी कारभाराची खर्चिक पद्धती, हिंदुस्थानच्या एका भागात पिकलेले धान्य, रस्ते आणि रेल्वेने दुष्काळी भागात वाहून नेण्यास सरकारने केलेले दुर्लक्ष इ. मुळे दुष्काळाची तीव्रता वाढली.

- **डॉल्बी कमिशनची नेमणूक**

हिंदुस्थान सरकारला अर्ज, विनंत्या करणे व सरकारकडे निषेधार्थ ठराव पाठविणे हा व्यर्थ आहे. म्हणूनच दादाभाईं नौरोजी १८९२ साली ब्रिटीश पार्लमेंटवर निवडून गेल्यावर सर वेडरबर्न व दादाभाई यांनी इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापन केली होती. या कमिटीतील बहुतेक सभासद लिबरल पक्षाचे होते. राष्ट्र सभेच्या वतीने दबाव गट लॉबी म्हणून कमिटीचे चाले आणि या गटाला चांगले यशही मिळू लागले.

दादाभाईंची कारकीर्द नवयुगाची पहाट होती.

- **इंग्लंडमधील प्रचार :**

मुंबईत प्लेग व दुष्काळ

१८९६ मध्ये मुंबईत गाठीच्या प्लेगची लागण सुरू झाली आणि पुढील वर्षभरात ती साथ देशभर पसरली. गरिबांचे जुनाट रोग आणि अधून मधून येणाऱ्या दुष्काळाच्या भयानक संकटाने त्यात भरच घातली. या दुर्दैवी संकटांच्या विचारांनी दुःखी झालेले दादाभाई अशा निर्णयाला आले की, हिंदुस्थानची साधन–संपत्ती इंग्लंडमध्ये वाहून नेली जाते म्हणून ही संकटे येतात. १८९७ हे वर्ष महाराणी व्हिक्टोरियाच्या कारकिर्दीचे हिरक महोत्सवी वर्ष होते. या शुभप्रसंगी महाराणीला लिहिलेल्या पत्रात दादाभाई म्हणतात, ही धक्कादायक गोष्ट तुम्हांला सांगितल्याशिवाय राहवत नाही की, महाराणींनी दिलेल्या जाहिरनाम्यातील वचनांचा इंग्रज प्रशासकांनी भंग केल्याचे हे परिणाम आहेत. अनेक कायदे आणि घोषणांत त्यांचे रूपांतर झाले; पण क्लेशकारक गोष्ट अशी की, त्यामुळेच लोक भिकेला लागले व युद्ध, साथीचे रोग आणि दुष्काळ अशी अरिष्टे आलीत.

दादाभाईंच्या जीवनाचा आढावा घेतला आणि त्यांचे उदाहरण समोर ठेवले तर मी पूर्ण न्यायबुद्धीने आणि सत्याला स्मरून असे म्हणू शकतो की, त्यांच्या जीवनकार्यात त्यांनी जे सोसले, जे शिकवलं यावरून दादाभाईं झोराष्ट्रीय धर्म प्रेषितांचे मूर्तिमंत स्वरूप होते. ते स्वच्छ विचारांचे, चांगले बोलणारे आणि सत्कृत्य करणारेही होते.

दादाभाईंना त्यांच्या लक्षावधी देशबांधवांच्या अंतःकरणात इतके उच्च व अढळ स्थान प्राप्त आहे की, राजे महाराजांनी त्यांचा हेवाच करावा. त्या स्थानाची योग्यता इतकी श्रेष्ठ आहे की,त्यांची तुलना साधू संतांशी करता येईल. कोणत्याही देशात आढळणाऱ्या सर्वोच्च

राष्ट्राभिमानाचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून दादाभाईंचा निर्देश करता येईल.[४]

- **भिकाजी कामा –**

१८५७ च्या पहिल्या भारतीय लढ्यात झाशीच्या राणीचे जेवढे महत्वपूर्ण योगदान आहे. तेवढेच 'मदाम भिकाजी रुस्तम कामा' यांचे आहे. या आदय क्रांतिकारी चळवळीच्या पहिल्या स्त्री जनक महिला होत. जेव्हा भारतीय स्त्री चूल आणि मूल सांभाळण्यातच आपले कर्तव्य मानत होती त्याकाळात सामाजिक कार्यक्रमात स्त्रियांना उघडपणे सहभागी होता येत नव्हते त्या वेळी मदाम कामा यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून दिले.

यावेळी दादाभाई नौरोजींनी ब्रिटिश सत्तेने हिंदुस्थानात साधे व व्यावहारिक होमरुल मान्य करावी अशी मागणी केली होती. मदाम कामा यांनी यावेळी जो नवीन राजकीय ठराव मांडला होता त्यामध्ये ब्रिटिशांना बजाविण्यात आले होते की 'ब्रिटीशांनी आपली सत्ता भारतीयांच्या हाती सोपवून निघून जावे' हा ठराव तांत्रिक कारणाने नामंजूर झाला तरी त्यात व्यक्त केलेली भावना तत्वत: मान्य झाली.

यावेळी मदाम कामांनी अत्यंत प्रेरणादायी भाषण केले 'हिंदुस्थानाला लुटून दरवर्षी अब्जावधी पौंड इंग्लंडमध्ये येत आहेत' यावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या स्फुर्तीदायी कामगिरीचा प्रभाव पडून पुढे १९२९ साली लाहोर येथे भरलेल्या 'राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात' काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याची मागणी करताना तिरंगी ध्वजही फडकविला होता. मदाम कामांनी हेच १९०७ साली केले. कामांनी हिंदुस्थानच्या मुक्तीसाठी भाषण केले यावेळी 'व्हाईट व्हॉल' चे लक्ष कामाबाईंकडे गेले व अशाप्रकारे त्यांना तेथून हद्दपार करण्याचा कट शिजत गेला. परंतु त्यापूर्वीच मदाम कामा पॅरिस येथे पोहोचल्या होत्या.

मादाम कामा यांनी शंभर वर्षापूर्वी स्वतंत्र भारताचा ध्वज एका आंतरराष्ट्रीय मेळाव्यात फडकवला. त्यामुळे त्याकाळातील वृत्तपत्रातून ही खळबळजनक बातमी जगभर पसरली. या साहसी कामगिरीसाठी त्यांचे नाव भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या इतिहासात ठळक अक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांनी आपले पूर्ण आयुष्य देशसेवेला वाहून घेतले होते. कदाचित या गोष्टीला योग्य तितकी प्रसिद्धी मिळाली नसेल. त्यांनी जी इतर कामे केली त्यातली बरीचशी त्याकाळात लपून गुप्तपणे केलेली होती. त्यातली काही अखेरपर्यंत गुलदस्त्यातच राहिली असण्याचीही शक्यता आहे. अशी कोणकोणती कामे त्यांनी केली ते थोडक्यात पाहू. :

त्यांचा जन्म मुंबईतल्या एका प्रतिष्ठित आणि श्रीमंत पारशी कुटूंबात झाला. त्यांचे मूळ नाव भिकाजी सोराबजी पटेल असे होते. भिकाजी हे मुलीचे नाव आपल्याला ऐकायला विचित्र वाटेल, पण त्या काळात म्हणजे १८६१ साली त्यांना ते नाव ठेवले गेले होते. त्यांच्या आयुष्यात कधीही भीक मागण्याचा प्रसंग त्यांच्यावर येण्याचा प्रश्नच नव्हता. गडगंज संपत्ती घरात असेलल्या इतर तत्कालीन मुलींप्रमाणे दागदागीने पोषाख, बंगले, बगीचे, कुत्री, मांजरे वगैरे शौक करून ऐषोआरामात लोळत राहणे त्यांनाही शक्य होते. पण या अत्यंत बुद्धीमान व

संवेदनशील मुलीवर तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा खोलवर प्रभाव पडत होता आणि तिला देशभक्तीची ओढ आकर्षित करीत होती. इंग्रजांच्या राज्यात त्यांची अवकृपा ओढवून घेण्याचा धोका पत्करणे तिच्या वडिलांना शक्य नव्हते. तो टाळण्याच्या् दृष्टीने त्यांनी रुस्तम कामा या उमद्या, देखण्या आणि श्रीमंत वकीलाबरोबर आपल्या मुलीचे लग्न लावून दिले. संसाराला लागल्यावर भिकाजीचे लक्ष घरात गुंतून जाईल आणि त्या देशसेवेच्या धोकादायक कार्यापासून दूर राहतील. अशी सर्वांची अपेक्षा होती., पण तसे झाले नाही. त्यात रुस्तम हा इंग्रजांचा कट्टर भोक्ता असल्यामुळे त्या पतिपत्नीमध्ये वारंवार खटके उडू लागले. त्यांचा चारचौघासारखा सुखी संसार होऊ शकला नाही. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. हे वाक्य लोकमान्य टिळकांनी अजून उच्चारलेले नव्हते. स्वातंत्र्याचा लढा सुरू व्हायचा होता. त्या काळात देशासाठी जी काही सौम्य आंदोलने होत होती, भिकाजी यांनी त्या आंदोलनामध्ये आणि समाजसेवेच्या कार्यात भाग घेणे त्यांच्या पतीच्या विरोधाला न जुमानता सुरूच ठेवले. त्यात प्लेगच्या साथीने मुंबईला पछाडले. तेंव्हा आपल्या जिवाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घेतले. रोग्यांची शुश्रुषा करणे, त्यांना धीर देणे वगैरे करतानाच त्यांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न त्या करत होत्या. पण अखेर ज्याची भीती होती तेच झाले आणि भिकाजीलाच प्लेगचा संसर्ग झाला. त्या आजारातून त्या जेमतेम बचावल्या खऱ्या, पण त्या रोगाने त्यांची प्रकृती अत्यंत खालावली. इथेच राहिल्या तर तब्येतीला न जुमानता त्या पुन्हा कामाला लागतील या भीतीने त्यांच्या परिवारातील लोकांनी त्यांना हवापालटासाठी युरोपमध्ये पाठवुन दिले. तिथल्या हवेत त्यांची तब्येत सुधारली. त्या अवधीमध्ये त्यावेळी इंग्लंडमध्ये रहात असलेल्या दादाभाई नौरोजी यांच्या संपर्कात त्या आल्या. भारतीयांचे पितामह (ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया) समजले जाणारे दादाभाई त्या काळात इंग्लंडमध्येच राहून भारतवासीयांच्या हक्कासाठी सनदशीर मार्गाने लढा देत होते. भिकाजी त्यांचे सचिव म्हणून काम करू लागल्या. भिकाजी आता मॅडम कामा झाल्या होत्या. त्या काळात उच्च शिक्षण घेण्यासाठी किंवा ते निमित्य सांगून भारतीय युवक इंग्लंडला जात असत. मॅडम कामा सतत त्यांच्या संपर्कात राहून त्यांना लागेल ती मदत करीत. स्टुटगार्ट येथील संमेलनात भाग घेऊन भारताचा धेंडा फडकवल्यानंतर त्या अमेरिकेच्या दौऱ्यावर गेल्या. एक उत्कृष्ट वक्त्या म्हणून त्यांची ख्याती झाली होती. अमेरिकेत ठिकठिकाणी भाषणे देऊन त्यांनी आपले स्वतंत्र

विचार परखडपणे मांडले आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे या बाजूला तेथील जनमत वळवण्याचा प्रयत्न केला. तेथून त्या इंग्लंडला परत आल्या, पण आता ब्रिटिश सरकारची नजर त्यांच्याकडे वळलेली होती. इंग्लंडमध्ये राहून काम करणे दिवसेंदिवस कठीण होत गेल्यानंतर त्यांनी फ्रान्समधून पॅरिसला स्थलांतर केले. तेथून त्या इतर क्रांतिकारकांच्याबरोबर संपर्कात राहिल्या. फक्त भारतीयच नव्हे तर आयर्लंडसारख्या इतर देशातील क्रांतिकारकांनासुद्धा त्या मदतीचा हात देत होत्या. रशियात ज्यांनी राज्यक्रांती घडवून आणली ते लेनिन त्यांना भेटायला आले होते.

युरोपमधल्या वास्तव्यात त्यांनी वंदे मातरम् नावाचे देशभक्तीपर नियतकालिक काढायला सुरुवात केली आणि काहीकाळ ते चालवले. इंग्रजांनी त्यांच्यावर बंदी घातलीच होती. त्यामुळे पॅरिसमधूनसुद्धा ते उघडपणे प्रकाशित करता येत नव्हते. मादाम कामा यांनी कधी बर्लिन, कधी जिनीव्हा कधी हॉलंड अशा वेगवेगळ्या जागा बदलून ते गुप्तपणे छापुन घेणे सुरू ठेवले. या छापलेल्या मॅगझिनच्या प्रती भारतात चोरट्या मार्गाने पाठवणे आणि तिथे पोचल्यावर त्यांचे देशभर वितरण करणे हे त्याहून जास्त कठिण होते. तरीही तत्कालीन क्रांतीकारक त्यादृष्टीने चिकाटीने प्रयत्न करीत राहिले. मादाम कामा त्यात आघाडीवर होत्या. हे सगळे काम छुप्या रीतीने होत असल्यामुळे प्रत्यक्षात किती प्रती योग्य जागी पोचल्या, किती मध्येच जप्त झाल्या. त्या वाचून किती युवकांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली, त्यातून काही जणांनी सशस्त्र लढ्यात उडी घेतली आणि काही हिंसक कृती करून दाखवली. वगैरेचे संख्यात्मक मूल्यमापन करणे शक्य नाही., कारण हजारोंच्या संख्येने भारतीय लोकच त्यांची नोकरी करण्यासाठी स्वखुषीने पुढे येत होते. आणि मुठभर गोऱ्यांच्या सहाय्याने ते आपला इथला अंमल व्यवस्थितपणे हाकत होते. क्रांतिकारकांनी टाकलेल्या ठिगण्या पडून देशात जागोजागी असंतोषाची विस्फोट होतील आणि स्थानिक लोक ब्रिटिशांना मारून टाकतील किंवा पळवून लावतील अशी आशा प्रत्यक्षात फलद्रुप झाली नाही.

मादाम कामा यांच्या कार्याला लगेच अपेक्षेइतके यश त्या काळात मिळाले नसले तरी त्यामुळे त्यांनी घेतलेल्या कष्टांचे मोल कमी झाले नाही. शंभर वर्षापूर्वीच्या काळात एक भारतीय स्त्री आपले सुखवस्तू कुटूंब व आपला देश सोडून परदेशात, किंबहुना शत्रूपक्षाच्या देशात

जाऊन राहते. अत्यंत प्रतिकूल वातावरणात निर्भयपणे आपण ठरवलेले जीवितकार्य अखेरपर्यंत करत राहते.

- **मादाम कामा आणि त्यांचा राष्ट्रध्वज :**

बरोबर शंभर वर्षापूर्वी ऑगस्ट १९०७ मध्ये जर्मनीमधील स्टुटगार्ट या शहरात समाजवादी लोकांचे आंतरराष्ट्रीय संमेलन भरले होते. त्या काळात युरोपात रहात असलेल्या मादाम कामा या भारतीय विदुषीने त्या संमेलनात भाग घेतला व भर सभेत हिंदुस्थानचा झेंडा फडकावून सर्व उपस्थितांनी त्याच्या स्वातंत्रलढ्याला पाठिंबा द्यावा असे आवाहन केले. मादाम कामा यांच्याविषयी माहिती मिळविण्याच्या प्रयत्न केले. त्यात बरीच उद्बोधक माहिती मिळाली आणि त्या ऐतिहासिक ध्वजाची दोन वेगवेगळी चित्रे सापडली. दोन्ही चित्रे तिरंगी असून त्यात तीन आडवे पट्टे आहेत. एका चित्रात सर्वात वर भगव्या रंगाच्या पट्टयात पिवळसर छटेमध्ये आठ कमळांच्या आकृती आहेत. मधला पट्टा पिवळ्या रंगाचा असून त्यावर वंदेमातरम् असे लिहिलेले आहे. खालच्या हिरव्या रंगाच्या पट्टयावर पांढऱ्या रंगात सूर्य व चंद्रकोर रेखाटल्या आहेत. दुसऱ्या चित्रात सर्वात वरच्या बाजूला हिरवा पट्टा व खालच्या बाजूला लालभडक पट्टा आहे. हिरव्या पट्टयावर कमळांची आणि लाल पट्टयावर चंद्रसूर्यांची चित्रे असली तरी त्यांचे आकार वेगवेगळे आहेत. मधल्या पिवळ्या रंगाच्या पट्टयावर छापील अक्षरात वंदेमातरम् असे लिहिले आहे. मादाम कामा यांनी हा ध्वज स्व. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मदतीने बनवला. एका आंतरराष्ट्रीय मंचावर तो फडकवण्यात मादाम कामा यांनी औचित्य, चातुर्य आणि अतुलनीय धैर्य या सर्वांचा सुरेख संगम साधला होता. भारतात सुरू असलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाला त्यातून एकदम जगभर प्रसिद्धी मिळाली होती. त्यामुळे त्या झेंड्यावर कोणत्या रंगात कोणती चित्रे काढलेली होती यापेक्षा असा झेंडा तयार करून तो फडकवला गेला हे महत्वाचे आहे. २६ जानेवारी १९६२ रोजी भारताच्या ११ व्या प्रजासत्ताक दिवशी भारतीय डाक आणि दूरचित्र विभागाने त्यांच्या सन्मानार्थ एक स्मारक मुदत जारी केले. १९९७मध्ये इंडियन कोस्ट गार्डने आयसीजीएस भिकाजी कामा नावाच्या प्रियदर्शिनी श्रेणीच्या वाहिनीची स्थापना केली.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सत्ताधीशांमधील असंबंद्ध नाव, मादाम भिकाजी कामाचे दृढनिश्चय, धैर्य आणि अखंडतेने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा संदेश, जगासमोर एक बल आणि स्पष्टपणाचा संदेश घेऊन घेतला होता जो पूर्वी कधीही नव्हता.

मायभूमीच्या स्वातंत्र्याची आस लागलेल्या मदाम कामांचे कार्य अखंडपणे चालू होते. पहिल्या महायुध्दात इंग्लंड आणि फ्रान्स हे मित्रराष्ट्र झाल्याने बिंटिशांनी फ्रान्सवर दबाव आणला आणि कामांना युध्द समाप्ती पासून डावलण्यात आले. फ्रान्समधील त्यांचा लढा तीस वर्षांहून अधिक काळ चालू होता. त्यासाठी त्यांनी 'वंदेमातरम' नावाची पत्रिका सुरु केली. या पत्रिकेतून त्यांनी भारतवासियांना क्रांतिकारक संदेश दिला, क्रांतीची प्रेरणा दिली. सन १९३५ मध्ये त्या हिंदुस्थानात परत आल्या त्यावेळी उर्वरित काळ त्यांनी पारशी जनरल हॉस्पिटलमध्ये काढला.[४]

१३ ऑगस्ट, १९३६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. सन १९६२ मध्ये मंत्रालयाकडे जाणाऱ्या रस्त्याला महाराष्ट्र शासनाने 'मदाम कामा रोड' नाव देऊन त्यांचा गौरव केला.[५]

- **फिल्ड मार्शल सॅम होर्मूसजी फ्रामजी जमशेदजी माणेकशॉ –**

माणेकशॉ यांचा जन्म पंजाब मधील अमृतसर येथे पारशी कुटुंबात झाला. माणेकशॉ कुटुंब हे मुळचे वलसाड गुजरात येथील होते. त्यांच्या वडिलांना त्यांना स्वत:प्रमाणे डॉक्टर बनवायचे होते परंतु वडिलांच्या विरोधात जाऊन त्यांनी देहरादून येथे असलेल्या 'भारतीय मिलिटरी अॅकॅडमी' मध्ये प्रवेश घेतला. सॅम माणेकशॉ हे भारतीय मिलिटरी अॅकॅडमीमधून बाहेर पडणा–या पहिल्या तुकडीचे विदयार्थी होते व भारताचे आठवे सैन्यप्रमुख होते. सन१९३४ मध्ये पदवीधर झाल्यानंतर त्यांची 'सेकंड लेफ्टनंट' पदी नियुक्ती झाली. माणेकशॉनी ब्रिटिश लष्करात व भारतीय लष्करात जवळजवळ चाळीस वर्षांची कारकीर्द घडविली.

उदा. दुसरे महायुध्द तसेच १९४८ ,१९६५ व १९७१ या तिन्ही, त्याचप्रमाणे भारत, पाक आणि १९६२ च्या चीन युध्दात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. यावेळी माणेकशॉ यांना या युध्दात केलेल्या शौर्यासाठी त्यांना पदक मिळाले.[६]

माणेकशॉ यांच्या लष्करी कारकीर्दीतील दोन महत्वपूर्ण युध्दे पुढीलप्रमाणे.:–

- **ब्रिटीश भारतीय लष्कर व दुसरे महायुध्द**

माणेकशॉ हे भारतीय सैन्यात जवळजवळ चाळीस वर्षे होते. दुस–या महायुध्दापासून ते भारताच्या तीन चीन व पाकिस्तान विरुध्दाच्या युध्दापर्यंत होते. पाठिंबा असूनही भारतीय सेनेने पाकिस्तानला पराभवाचे खडे चारले. याच घटनेने माणेकशॉ आज स्वतंत्र भारताचे सर्वोत्तम सेनानी मानले जातात.

- **निवृत्तीनंतरचा प्रवास**

माणेकशॉ यांच्या प्रभावी कामगिरीमूळे तत्कालीन भारताचे राष्ट्रपती वराहवेंकट गिरी यांनी माणेकशॉ यांना सन १९७२ मध्ये 'पद्मभूषण' या सन्मानाने सन्मानित केले. १ जानेवारी, १९७३ रोजी माणेकशॉ यांना अत्यंत महत्त्वाचे असे फिल्ड मार्शलचे पद मिळाले. स्वतंत्र भारतात केवळ दोनच व्यक्तींना हे पद मिळाले आहे. १५ जानेवारी १९७३ रोजी माणेकशॉ यांनी कार्यालयीन निवृत्ती घेतली. निवृत्तीनंतर ते तमिळनाडूतील वेलिंग्टन या सेनिकी कॅन्टॉन्मेंट जवळील कन्नूर या शहरात राहत असताना 'डिफेन्स सर्विसेस स्टाफ कॉलेज' चे प्रमुख म्हणून काम केले. तसेच काही खाजगी कंपन्यामध्ये 'बोर्ड ऑफ डायरेक्टर' म्हणूनही पद भूषविले.

दुस–या महायुध्दात कॅप्टन या हुद्द्यावर असताना माणेकशॉ बर्मा येथील सिटांग नदीच्या मोहिमेवर असताना येथे झालेल्या लढाईत ब्रिटिश लष्कराने मोहीम यशस्वीरीत्या फत्ते केली. यावेळी येथे असलेल्या पॅगोडा हिल्सवर ब्रिटिश सेनेने ताबा मिळविताना माणेकशॉ यांना एल.एम.जी.च्या गोळ्या लागल्या व ते गंभीर जखमी झाले. यावेळी मेजर जनरल डेव्हिड कोवान यांनी माणेकशॉ यांना वाचविले. सैनिकी सूत्रानुसार माणेकशॉ यांच्या नेतृत्वाने ती मोहीम यशस्वी होण्यास मदत झाली.[७]

- **स्वातंत्र्यानंतर :**

१९४७ मध्ये भारताच्या विभाजनानंतर मानेकशाँ यांचे युनिट चौथे बटालियन १२ व्या फ्रेंटियर फोर्स रेजिमेंट हे पाकिस्तानी सैन्याचा भाग बनले. परिणामी मानेकशाँ यांना पंजाब रेजिमेंट मध्ये पुन्हा पाठविण्यात आले. त्यांनी विभाजनासंबंधी मुद्दे हाताळतांना आपले

प्रशासकीय कौशल्य व क्षमता यांची उत्तमरित्या सांगड घातली. १९४७ च्या शेवटी मानेकशाँ यांना तिसरे बटालियन, ५ गोरखा रायफल्स (फ्रंटियर फोर्स) चे कमांडींग अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. याचवेळी पाकिस्तानी सैन्याने काश्मीर काबीज केले त्यावेळी तेथील महाराजा हरि सिंह, मानेकशाँ व श्रीनगर राज्यातील सचिव व्ही. पी. मेनन यांनी काश्मीर मधील परिस्थितीचे हवाई सर्वेक्षण केले आणि त्याचवेळी मानेकशाँ यांच्या म्हणण्यानुसार महाराजांनी प्रवेशाच्या इन्स्ट्रुमेंटवर स्वाक्षरी केली. २७ ऑक्टोबर रोजी मानेकशाँ यांना काश्मीरला पाठविण्यात आले आणि त्यांनी श्रीनगर ताब्यात घेतले, याचवेळी पाकिस्तानी सैन्याने शहराच्या बाहेरिल भागात प्रवेश केला. काश्मीर वादविवाद आणि हैद्राबादचा जो परिणाम झाला त्यातून मानेकशाँ यांनी 'ऑपरेशन पोलो' नावाचा प्लॅन तयार केला. पुढील काळात त्यांना ब्रिगेडियर म्हणून पदोन्नत्ती दिली तेव्हा संचालनाचे पहिले भारतीय निदेशक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ह्या नियुक्ती नंतर मुख्य जनरल आणि नंतर लेफ्टनंट जनरलकडे अपग्रेड करण्यात आली. आता त्याला महासंचालक मिलिटरी ऑपरेशन्स(डीजीएमओ) म्हटले जाते.

४ फेब्रुवारी १९५२ रोजी मानेकशाँ यांना कर्नल या पदासाठी पदोन्नत्ती मिळाली आणि त्याचवेळी एप्रिल मध्ये फिरोजपुर येथे मुख्यालयाच्या १६७ व्या इन्फंट्री ब्रिगेडचे कमांडर म्हणून नियुक्ती आणि ८ गोरखा रायफल्स आणि ६१ वा कैवेलरीचे कर्नलही बनले. तसेच १२ व्या फ्रंटियर फोर्स रेजिमेंट व नवीन पाकिस्तानी सैन्याचा भाग बनले. याचकाळात त्यांनी भारतीय सैन्याने नेमलेल्या तंत्राशी सुसंगत राहण्यासाठी पुनरुज्जीवित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी मानेकशाँ यांनी कर्नलच्या पदवी मध्ये चार वर्षाचा विस्तार केला आणि ४ फेब्रुवारी १९५७ रोजी ब्रिगेडियरच्या मूळ पदावर त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पुन्हा पदोन्नत्ती झाली. याचवेळी त्यांना एका वर्षासाठी उच्च न्यायालयात प्रवेश घेण्यासाठी लंडनच्या इंपीरियल डिफेन्स कॉलेज येथे पाठविण्यात आले, त्या बदल्यात त्यांना २० डिसेंबर १९५७ रोजी २६ व्या इन्फंट्री विभागात जनरल ऑफिसिंग कमांडिंगसह जनरल ऑफिसर कमांडिंग (जीओसी) म्हणून नियुक्त करण्यात आले. यावेळी मेजर जनरल ब्रज मोहन कौल यांना संरक्षण मंत्री मेनन यांनी पदोन्नत्ती दिली, त्यांची (सीजीएस) म्हणून नियुक्ती झाली. पुढील काळात कौल यांनी मानेकशाँवर जासूसी करण्यासाठी माहिती पाठविली. ज्यात गोळा केलेल्या

माहितीतून त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप झाला. याचवेळी अनेक राजकिय घडामोडी होऊन चीन – भारत युद्धाला पोषक वातावरण निर्मिती झाली.

पुढील काळात ५ डिसेंबर १९६३ रोजी मानेकशाँ यांना लष्कर कमांडर म्हणून नियुक्त करण्यात येऊन पश्चिम कमांडला जीओसी–इन–सी म्हणून नेमणूक करण्यात आली. सीओएएसच्या क्षमतेनुसार मानेकशाँ यांनी गोरखा युनिटला भेट दिली. आपल्या केलेल्या अप्रतिम कार्यामुळे 'सॅम बहादूर' असे मानेकशाँचे टोपणनाव बनले.

- **१९७१ चे ऐतिहासिक भारत – पाक युध्द**

७ जून १९६९ रोजी माणेकशॉ यांनी जनरल कुमार मंगलम यांच्याकडून सैन्यप्रमुख पदाची सूत्रे हाती घेतली. १९७१ च्या पूर्व पाकिस्तानातील घडामोडीनंतर भारतात मोठ्या प्रमाणावर निर्वासितांचा लोंढा येऊ लागल्याने माणेकशॉ यांचे सेनापती पद कसाला लागले. या घडामोडीची परिणीती १९७१ च्या भारत पाक युध्दात झाली. या युध्दात भारताने माणेकशॉ यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानचा जबरदस्त पराभव केला व बांगलादेशाची निर्मीती केली.

या युध्दात माणेकशॉ यांच्या प्रभावी नेतृत्वाने तसेच अमेरिकेचा पाठिंबा असूनही भारतीय सेनेने पाकिस्तानचा पराभव केला परिणामी माणेकशॉ आज स्वतंत्र भारताचे सर्वोत्तम सेनानी मानले जातात.[८]

- **मानेकशाँ यांना मिळालेले पुरस्कार :**

	पद्म विभूषण	**पद्मभूषण**		**मिलिटरी क्रॉस (एमसी)**
१)	जनरल सर्व्हिस पदक १९४७	पूरवी स्टार		पासमीमी स्टार
२)	रक्षा पदक	संग्राम पदक	सायन सेवा पदक	इंडियन इंडिपेंनडन्स

३)	२५ व्या स्वातंत्र्य वर्धापन दिन पदक	२० वर्ष लांबलचक सेवा पदक	९वर्षाचे दीर्घ पदक	पराक्रम पदक

- **श्रेणीची तारीखः**

रँक	**घटक**	**रँकची तारीख**
सेकंद लेफ्टनंट	ब्रिटीश भारतीय सेना	४ फेब्रुवारी १९३४
लेफ्टनंट	ब्रिटीश भारतीय सेना	४ मे १९३६
कॅप्टन	ब्रिटीश भारतीय सेना	जुलै १९४० (अभिनय) १ ऑगस्ट १९४० (तात्पुरती) २० फेब्रुवारी १९४१ (युद्ध – मूलभूत) ४ फेब्रुवारी १९४२ (मूलभूत)
लेफ्टनंट कर्नल	ब्रिटीश भारतीय सेना	३० ऑक्टोबर १९४४ (स्थानिक) ५ मे १९४६ (अभिनय)
मुख्य	भारतीय सेना	१५ ऑगस्ट १९४७
कर्नल	भारतीय सेना	१९४८ (अभिनय)
लेफ्टनंट कर्नल	भारतीय सेना	२६ जानेवारी १९५०

		(मूलभूत : चिन्हांकित करण्याची शिफारस आणि बदल)
कर्नल	भारतीय सेना	४ फेब्रुवारी १९५२
ब्रिगेडियर	भारतीय सेना	२६ फेब्रुवारी १९५० (अभिनय) ४ फेब्रुवारी १९५७ (वास्तविक)
मेजर जनरल	भारतीय सेना	२० डिसेंबर १९५७ (अभिनय) १ मार्च १९५९ (मूलभूत)
लेफ्टनंट जनरल	भारतीय सेना	२ डिसेंबर १९६२ (अभिनय) २० जुलै १९६३ (मूलभूत)
सामान्य (सी ओ ए एस)	भारतीय सेना	८ जून १९६९
फिल्ड मार्शल	भारतीय सेना	३ जानेवारी १९७३

ख) खुरशेद फ्रामजी नरिमन –

हे 'वीर नरिमन' ह्या नावानेसुध्दा ओळखले जात होते. 'भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस' मध्ये त्यांनी नवीन क्रांती घडवून आणली. सन १९३५ मध्ये ते मुंबई विभागाचे मेयर बनले. परंतु पुढील काळात एका क्षुल्लक कारणावरुन त्यांचे मतभेद झाले. पुढील काळात अखिल भारतीय

फॉरवर्ड ब्लॉकच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

मुंबई येथील 'नरिमन पॉईंट' हया जागेचे नाव त्यांच्याच नावावरुन ठेवले गेले त्यावेळी ते 'हॉरनिमन सर्कल' त्यावेळेचे (एलफिन्स्टनला सर्कल) येथील रेडिमनी मॅशन्समध्ये वास्तव्यास होते. आज या रस्त्याला 'वीर नरिमन' रोड हे नाव दिलेले आहे. [९]

ग) फिरोझशहा मेहता

सर फिरोज शाह मेहरवेन्जी मेहता यांचा जन्म बॉम्बेच्या श्रीमंत पारसी कुटूंबात झाला. त्यांनी बी.ए. व एम.ए.ची परिक्षा पास केली. त्यांची विलक्षण बुद्धीमत्ता पाहून त्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्यात आले. न्यायाधिशांच्या उच्चतम परिक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर ते मायदेशी आले. परंतु इंग्लड येथील आपल्या वास्तव काळात ते इंडियन हाऊस ऑफ असेंबली आणि `ईस्ट इंडिया असोसिएशन'च्या संपर्कात आले व येथून त्यांनी आपले राजकिय, सामाजिक आणि साहित्यिक जिवन सुरु केले.

- **स्वातंत्र्यता आंदोलनामधील फिरोज शहा यांचे योगदान :**

न्यायाधिशांच्या कामकाजात त्यांनी अतुलनीय कामगिरी केली. त्यांनी कधीही स्वत:च्या हितसंबंधाने न्यायाच्या प्रतिष्ठेवर अतिक्रमण केले नाही. पुढील काळात ते तीन वेळा मुंबई कॉरपोरशनचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यावेळी कॉरपोरेशनची स्थिती धक्कादायक होती. मेहता यांनी कॉरपोरेशनच्या प्रगतीसाठी हितकारक प्रयत्न केले. बॉम्बे सरकारने कॉरपोरेशनला हानी पोहचविण्यासाठी एक बिल सादर केले. परंतु मुंबईच्या जनतेने त्याचा विरोध केला. यावर उपाय म्हणून त्यावेळी मुंबईच्या राज्यपालाने तेलंग आणि फिरोज शाह मेहता यांना ही कामगिरी सोपविली अशाप्रकारे सरकार आणि जनतेच्या हितचिंतकावर लक्ष ठेवून या जोडीने मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणला.

फिरोज शाह मेहता यांनी स्वतंत्र कल्पना प्रकट करण्यासाठी बॉम्बे क्रॉनिकल नावाचे एक दैनिक पेपर प्रकाशित केला आणि हळूहळू त्यांची कार्यक्षेत्र विस्तारीत झाली आणि मेहता मुंबई प्रांतीय असेंबलीचे सदस्य बनले. त्यांनी आपल्या कर्तबगारीने पुढील काळात बॉम्बे

प्रेसीडेंसीचे अध्यक्षपद भुषविले. त्यांनी अनेक महत्वपूर्ण प्रश्नांवर भारत सरकार आणि प्रांतीय सरकाराशी चर्चा करून समस्यांचे निराकरण केले. १८८६ मध्ये फिरोज शहा मेहता यांना `बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल' चे सदस्य म्हणून नियुक्त केले.

१९०१ मध्ये मराठी आणि गुजराती भाषांमधून बी.ए व एम.ए चे अभ्यासक्रम मुंबई विद्यापिठातून यशस्वीरित्या सुरू केले. आपल्या असामान्य कामगिरी व बुद्धीमत्तेमुळे मेहता यांना मुंबई विद्यापिठाची `डॉक्टर ऑफ लॉ' ची पदवी प्रदान करण्यात आली आणि पुढील काळात मुंबई विद्यापिठाचे कुलगुरू म्हणून नियुक्त करण्यात आले. नॅशनल असेंब्लीशी त्यांचा संबंध सुरुवातीपासुन होता आणि त्याद्वारे त्यांचे कामही उल्लेखनीय होते. फिरोजशाह मेहता एक उच्च दर्जाचे केवळ देशभक्त नव्हते तर सर्वोत्तम भारतीय होते.

मुंबई महानगरपालिकेचे सन १८७३ मध्ये महापालिका आयुक्त म्हणून ते कार्यरत झाले. १८८४, १८८५, १९०५ आणि १९११ या चार वर्षात ते महानगरपालिका आयुक्त अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळू लागले. तसेच सन १८९० मध्ये ते 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'चे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. त्यांनी कलकत्ता येथून 'भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस' ची सुरुवात केली. सन १८९३ मध्ये मेहता भव्य विधान परिषदेचे 'Imperial Legislative Council'चे सदस्य बनले सन १९०४ मध्ये त्यांना ब्रिटिश सरकारने (Knight Commander) म्हणून नियुक्त केले.

- **सर फिरोज शाह मेहता यांच्या कारकिर्दिचे काही महत्वाचे पैलू :**
    १. मुंबईचा सिंह म्हणून ओळख.
    २. भारतातील सर्वोत्तम वादपटू
    ३. मुंबईचे चारवेळा महापौर म्हणून नियुक्ती.
    ४. १८६९ साली मुंबईत ईस्ट इंडिया असोसिएशन संस्थेच्या एका शाखेचे सचिव.
    ५. १८६९ ते १८७६ या कालावधीत मुंबई हायकोर्टात वकिली.
    ६. १८८२ ते १८८३ या काळात इलबर्ट बिलाविरुद्ध मोठे आंदोलन.
    ७. १८८४ ते १८८५ मध्ये त्यांची मुंबई महानगर पालिकेमध्ये नियूक्ती.
    ८. १९०४ मध्ये त्यांनी लॉर्ड कर्झनच्या विद्यापीठ कायद्यावर तीव्र टिका केली.
    ९. १९०९ साली काँग्रेसच्या कोलकत्ता येथील अधिवेशनचे ते अध्यक्ष होते. [10]

घ) फिरोझ गांधी –

फिरोझ गांधी हे हिंदुस्थान मधील एक राजकीय नेते व पत्रकार होते फिरोझ यांनी त्यांचे आडनाव 'घांदी' (Ghandy) तून 'गांधी' (Gandhi) असे बदलले.

सन१९३२ मध्ये त्यांनी संयुक्त प्रांतांत (आताचे उत्तर प्रदेश) 'जमीन भाडे मुक्त' हया मोहिमेत सहभाग घेतला. १९३२–१९३३ च्या दरम्यान नेहरुंबरोबर काम करीत असताना दोन वेळा त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. मार्च १९४२ मध्ये इंग्लंड येथे हिंदु पध्दतीने जवाहरलाल नेहरुंच्या कन्येशी इंदिरा नेहरुशी विवाह केला. विवाहानंतर सहा महिन्यांच्या आत ऑगस्ट १९४२ मध्ये 'भारत छोडो आंदोलन' (Quit India Movement) च्या वेळी या जोडप्याला तुरुंगवासाची शिक्षा झाली.

स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरु हे भारताचे पहिले प्रधानमंत्री बनले त्या वेळी फिरोझ गांधी हे नेहरुंनी सुरु केलेल्या राष्ट्रीय हेराल्ड (The National Hearld) हया वृत्तपत्रांचे व्यवस्थापकीय संचालक बनले.

सन १९५०–१९५२ पर्यंत प्रांतीय संसदेत सदस्य बनल्यावर गांधी स्वतंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत सन १९५२ मध्ये उत्तर प्रदेशतील रायबरेली या मतदार संघातून विजयी झाले. १९५७ रोजी याच संघातून ते पुन्हा निवडून आले. [११]

ङ) अर्देशिर गोदरेज (१८६८ – १९३६) :

कायद्याचा अभ्यास करुन अर्देशिर गोदरेज यांनी वकिली करण्यास सुरुवात केली. पण त्यात त्यांना यश मिळाले नाही. पुढे ते मुंबईला गेले व तेथे काही काळ केमिस्टचा सहायक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. त्यांची उपकरणे चांगली दर्जेदार स्वरुपाची होती. परंतु त्यावर मेड इन इंडिया हे लेबल असल्यामुळे एका नामांकित कंपनीने ह्या उपकरणाची गुणवत्ता चांगली असूनही ते नाकारले. परंतु अर्देशिर डगमगले नाही व एका सकाळी वृत्तपत्र वाचत असता त्यांना बॉम्बे मध्ये चोऱ्यांचे प्रचंड प्रमाण वाढले आहे. आणि एकही कुलुप (लॉक) काम करीत नाही ही बातमी दिसली. आणि एक व्यवसाय संधी म्हणून त्यांनी कुलुप बनविण्याचे

संशोधन सुरु केले. त्यांचा हा व्यवसाय इतका यशस्वी झाला की त्यांना भारताचे लॉक मास्टर म्हटले जाते.

च) जहाँगीर रतनजी दादाभाई टाटा :

जे. आर. डी. टाटांचा जन्म २९ जुलै १९०४ रोजी पॅरिस येथे झाला. त्यांचे पिता रतनजी दादाभाई टाटा व माता सुझैन ब्रियरे ज्या फ्रांन्स येथील होत्या म्हणून जे. आर. डी. टाटांचे बालपण प्रामुख्याने फ्रांन्स मध्ये गेले आणि म्हणून फेंच त्यांची पहिली भाषा बनली. त्यांचे पिता अग्रणी उद्योगपती जमशेदजी टाटांचे चुलत भाऊ होते. जे. आर. डी. यांनी कैथेंडरल आणि जॉन कोनोन शाळा, मुंबई येथून शिक्षणाला सुरुवात केली.ड पुढे इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम त्यांनी केंब्रिज विद्यापिठातून केला. त्यांची इच्छा सैन्यदलात काम करण्याची होती पण वडिलांच्या इच्छेकरिता त्यांनी फ्रांन्स मधील एक वर्षाचे सैन्या प्रशिक्षण सोडले व ते मायदेशी परतले. जे. आर. डी. नी वयाच्या १४ व्या वर्षापासून जरी व्यवसायात लक्ष देण्यास सुरुवात केली असली तरी १८५८ मध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांनी व्यवसाय शिखरावर नेण्यास सुरुवात केली. पुढिलकाळात औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा ह्या हेतूने ते हाँगकाँग येथे गेले असतां तेथेच टाटा ग्रुप ऑफ कंपनीचे कार्यालय सुरु करण्याचा विचार करु लागले. अशा प्रकारे हाँगकाँग येथे टाटा कंपनीच्या ऑफिस स्थापनेनंतर टाटा साम्राज्याचा विस्तार आशियातही व्हावा यासाठी त्यांनी जपान व चीन मध्येही टाटा ॲण्ड सन्स ची स्थापना केली.

- **व्यावसायिक जीवन :**

१९२५ मध्ये खऱ्या अर्थाने टाटा ॲण्ड सन्स नावारुपास आले. पुढे १९३८ मध्ये जे. आर. डी. ना भारतातील सर्वांत मोठया औद्योगिक समूहाचे अध्यक्ष म्हणून निवडले आणि अशा प्रकारे जे. आर. डी. टाटांनी हळूहळू स्टील, इंजिनिअरिंग, ऊर्जा, रसायन व हॉटेल्स इ. क्षेत्रात आपले स्थान भक्कम केले. १९६८ मध्ये टाटा कंम्प्युटर सेंटर (आताचे टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस) आणि १९७९ मध्ये टाटा स्टीलची स्थापना केली. तसेच १९४५ मध्ये टाटा मोटर्स व १९४८ मध्ये भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय एअर लाईन्सच्या स्वरुपात एअर इंडिया इंटरनॅशनलचा शुभारंभ केला. १९५३ मध्ये भारत सरकाने जे. आर. डी. टाटांना एअर इंडियाचे

अध्यक्ष आणि इंडयिन एअर लाईन्स बोर्डाचे निर्देशक म्हणून नियुक्त केले. आपल्या पंचवीस वर्षांच्या कारकिर्दित जे. आर. डी. टाटांनी आपल्या कर्मचाऱ्यांकरिता व कंपनीच्या हिताकरिता अनेक नविन योजना अंमलात आणल्या. कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी कर्मचारी असोसिएशन कार्यक्रमांतर्गत कर्मचाऱ्यांकरिता कामाचे आठ तास, त्यांना निःशुल्क चिकित्सा सहायता, कामगार दुर्घटना योजना इ. अनेक कार्यक्रम यशस्वी केले.

- **पुरस्कार :**

जे. आर. डी. टाटांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल अनेक पुरस्कारांनी, सत्कार्यांनी, पदव्यांनी त्यांना सन्मांनित केले. जसे –– अलाहाबाद विश्वविद्यालय आणि बनारस हिंदू विश्वविद्यालयाने त्यांना १९४७ मध्ये डी. एस. सी. आणि मुंबई विद्यापीठाने १९८१ मध्ये एल. एल. डी. देऊन सन्मांनित केले. तसेच १९७४ मध्ये त्यांना इंडियन एअर फोर्स द्वारे एअर वाइस मार्शल ह्या पदवीने सन्मांनित केले. १९९२ मध्ये त्यांना देशाचा सर्वोच्च सन्मान भारत रत्न प्रदान केला. हा पुरस्कार कला,साहित्य आणि विज्ञानातील अप्रतिम कामगिरी व विशिष्ट सेवेकरिता आणि जनसेवेतील उत्कृष्ट योगदानाकरिता प्रदान केला गेला. देशातील औद्योगिकिकरण, व्यापार, व्यवसाय, उद्योग यातील योगदानाकरिता त्यांना भारतीय उद्योगाचे पितामह म्हटले जाते.

औद्योगिकरणाबरोबरच त्यांनी सैनिक सेवा व निस्सीम देशभक्तीच्या भावनेने भारत सरकारची सढळ हस्ते मदतही केली. जे. आर. डी. टाटा जितके मोठे उद्योगपती होते तितकेच सरळ व साध्या स्वभावाचे होते. देशाच्या अनेक विकासात्मक योजनेकरिता त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे.

POLITICIANS , ACTIVISTS AND BUREAUCRATS

च) प्रशासकीय अधिकारी व राजकारणी कार्यकर्ते

- **बहमन पेस्तनजी वाडिया / बोमनजी पेस्तनजी वाडिया** (B.P. Wadia) –

पेस्तनजी वाडिया हे भारतीय Theosophist आणि कामगार कार्यकर्ते (Union Leader) होते. प्रथम ते टी.एस अड्डयार येथे सदस्य होते. व त्यानंतर Theosophist युनायटेड लॉजचे ही ते सदस्य बनले. १३ एप्रिल, १९१८ रोजी व्ही. कल्याणसुंदरम् मुदलीयार यांच्या बरोबर वाडियांनी 'मद्रास कामगार युनियन' ची स्थापना केली ही युनियन भारतातील पहिली आयोजित कामगार संघटना होती.

इ.स. १९०३ मध्ये वाडिया मुंबई टी.एस. मध्ये सामील झाले व नंतर ते अड्डयार येथे स्थायिक झाले. त्यांनी 'द थिऑसॉफिस्ट' ह्या वर्तमान पत्रासाठी काम केले. तसेच मद्रासमध्ये 'वस्त्रोद्योग कामगार युनियन'चे ते अध्यक्षही बनले. पेस्तनजी कामगार अधिकारांच्या कार्यातही कार्यरत होते. सन १९१९ मध्ये वाडियांनी लॉसऐजलेंस यु.एल.टी (युनायटेड लॉज ऑफ थिऑसाफिस्ट)ला भेट देऊन ते अतिशय प्रभावित झाले. सन १९१९ मध्ये ते पुन्हा अड्ड्यार येथे परतले तेव्हा त्यांनी टी. एस. अड्ड्यारच्या U.L.T.च्या आधारे काम करुन दिशा बदलण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही शेवटी निराश होऊन त्यांनी टी.एस. अड्ड्यार सोडले आणि लॉसऐंजलेस यु.एल.टी. साठी काम करु लागले सन १९२३ मध्ये त्यांनी 'स्टेट ईस्ट कोस्ट' येथे अनेक विश्रामगृहांची स्थापना केली. सन १९२५ मध्ये U.K. १९२८ मध्ये फ्रान्स व १९२९ मध्ये मुंबईतही त्यांनी विश्रामगृहांची स्थापना केली. सन १९३० मध्ये त्यांनी 'आर्यनपाथ' हे जरनल प्रकाशित केले. १९४५ मध्ये बंगलोर येथे (Indian Institute of World Culture) (I I W C) म्हणजेच 'भारतीय जागतिक सांस्कृतिक संघटने'ची स्थापना केली. यु.एल.टी. चे इतर विश्रामगहाची स्टेटस, युरोप व भारतामध्येही स्थापना केली. [१२]

- **कावसजी जहाँगिर रेडिमनी –**

ब्रिटिश सरकारने रेडिमनींचा 'Justice of The Peace' ह्या पदवीने मुंबईत गौरव केला. तसेच ते "Board of Conservancy" चे सदस्य ही बनले सन १८७१ मध्ये त्यांना "Order of

the Star of India" (C S I) बरोबर सहभागी केले. १८७२ मध्ये त्यांना मुंबईत तसेच लंडन येथील भारतीय विदयापीठात धर्मदाय कारणांकरिता खर्चलेले £ (पौंड) २००,००० मुळे "Knight Bachelor of The United Kingdom" या पदवीने सन्मानित केले. सन १८६६ मध्ये रेडिमनी यांनी मुंबईचे 'कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स' म्हणजे आयकर आयुक्त म्हणून पद भूषविले त्यांच्या उपस्थितीमुळे मुंबईत आयकर विभागाने अनपेक्षितपणे आर्थिक यश मिळविले.

- **शापुरजी दोराबजी सकलातवाला –**

शापुरजी हे भारतातील पारशी राजकारणी होते. १९२२ मध्ये सकलातवाला हे युनायटेड किंगडमच्या संसदेत दादाभाई नौरोजी आणि मंचोरजी भावनगरी नंतर तिसरे भारतीय होते ज्यांची येथे निवड झाली. पुढील काळात ते ग्रेट ब्रिटनचे कम्युनिस्ट पक्षाचे खासदार म्हणून सेवेत होते.

- **जेरबानु गीफ्फोर्ड –**

१९८० मध्ये गीफ्फोर्ड हया उदारमतवादी पक्षातील पहिली आशियायी महिला म्हणून कार्यरत होत्या जिची निवड 'हॅरो' च्या नगरसेवक ह्या पदावर झाली. त्या संसदेत तीन वेळा उभ्या राहिल्या. सन १९८६ मध्ये उदारमतवादी पक्षात पारंपरिक अल्पसंख्याकांच्या समावेशाबाबत एक चौकशी आयोगाची त्यांनी स्थापना केली. जेरबानू ह्या १९९८ मध्ये स्थापन झालेल्या रेस रिलेशन फोरम हया संस्थेच्या सदस्य बनल्या .

- **मिनु मसानी –**

मिनोचर रुस्तम मसानी या भारतीय राजकारणात सक्रिय होत्या. फार पूर्वी त्या 'स्वतंत्र पक्षातील अग्रगण्य सदस्या' होत्या. मसानी या दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या लोकसभेत गुजरात, राजकोट या मतदारसंघातून संसदेत तीन वेळा सदस्य बनल्या. लंडन येथे बॅरिस्टरची पदवी घेतल्यानंतर १९३० मधील कायदेभंगाच्या चळवळीदरम्यान त्या स्वतंत्र चळवळीत सामिल झाल्या. सन १९३० मध्ये त्या नाशिक येथील तुरुंगात असताना जयप्रकाश नारायणांच्या संपर्कात आल्या आणि त्यांनी एकत्र येऊन सन १९३४ मध्ये 'काँग्रेस समाजवादी पार्टी'ची स्थापना केली. त्या 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' या पक्षातून भारताच्या संविधान विधानसभेच्या

प्रतिनिधी होत्या. त्यांनी १९४७ मध्ये 'समान नागरी कायदा' भारतीय संविधानात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु तो नाकारण्यात आला. १९४३ मध्ये त्या बृहन्मुंबई महानगर पालिकेकरिता 'महापौर' म्हणून निवडून आल्या. तसेच भारतीय विधान सभेच्याही त्या सदस्या बनल्या.

त्यांनी ऑगस्ट १९६० मध्ये आंतरराष्ट्रीय साम्यवाद शिखरावर असताना सी. राजगोपालचारी आणि एन.जी. रंगा बरोबर स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा विरोध करणाऱ्या राजकारणांमधील त्या एक होत्या.

त्याचप्रमाणे स्वतंत्र भारताच्या संसदेच्या एकमेव सर्वात मोठया विरोधी पक्षात असताना मसानींनी अनेकदा वित्त बिलावर वादविवाद सुरु करुन काँग्रेस सरकारला जलद गतीने कामांच्या जडणघडणीकरिता भाग पाडले.

- **पिलु मोदी –**

पिलू मोदी हे भारतीय आर्किटेक्ट राजकारणी तसेच स्वतंत्र पक्षाचे संस्थापक सदस्य होते. चौथ्या व पाचव्या लोकसभेत त्यांची निवड झाली. १९७८ पासूने त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी राज्यसभेत सेवा केली. आपल्या राजकीय जीवनात मोदी हे उदारमतवादी आणि स्वतंत्र मताचे वकील म्हणून ओळखले जात. १९६७ मध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी ते गुजराजमधील गोध्रा मतदार संघातून चौथ्या लोकसभेतून निवडून आले होते. सन १९७१ मध्ये त्यांची पुन्हा पाचव्या लोकसभेत निवड झाली. यावेळी १९७१ ते मार्च १९७७ पर्यंत त्यांनी लोकसभेचे कामकाज पाहिले. तसेच १९७२ रोजी आर्किटेक्ट कायदा प्रसार करण्यात त्यांचा सहभाग उपयोगी ठरला पुढील काळात संसदेपासून एक वर्ष दूर राहिल्यानंतर १० एप्रिल, १९७८ मध्ये मोदी राज्यसभेत सामील झाले. [१३]

'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राच्या लेखानुसार 'पारसीस आर नॉट इंटरेस्टेड इन पॉलिटिक्स एनीमोर' (Parsis Are Not Interested In Politics Anymore)म्हणजेच पारशांना आता राजकारणात स्वारस्य नाही. या विषयात नवसेर भरुचा यांनी असे म्हटले की पारशी

समाज हा निवडणुकीच्या लढाईत त्यांच्या अल्पसंख्येमुळे तसेच औदासिन्यामुळे राजकारणात लक्ष केंद्रित करु शकत नाही. परंतु शेवटच्या शतकातील इतिहासातून असे दिसून येते की पारशी राज्य व राष्ट्रीय राजकारणात आघाडीवर होते. तसेच त्यांच्यापैकी काहींनी स्वातंत्र्य चळवळीत हिरिरीने भाग घेतला.

पारशी समाजातील 'नोशिर मेहता' हे काँग्रेसचे नगरसेवक असून पारशी समाजातील निवडून आलेले एकमेव राजकारणी होते. त्यांच्या पूर्वी २००८ मध्ये 'रुस्तम तिरंदाज' हे काँग्रेसचे आमदार होते आणि १९९९ मध्ये 'मर्झबान पत्रावाला' हे राज्यमंत्री होते. पत्रावालांच्या मत्यूनंतर त्यांच्या पत्नी 'दिनाझ' यांनी कुलाबा विभागातून तिकिटावर मतदानात भाग घेतला परंतु त्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्या पुन्हा कधीही राजकारणात दिसल्या नाहीत.

इतिहासात पाहिले असता पारशी समाजातील लोक लोकसभेत, राज्यसभेत, विधानसभेत, परिषदेत आणि महापालिकेतील सदस्य होते. कुवरजी भाभा हे सुरुवातीच्या म्हणजे १९५० च्या काळात मंत्रिमंडळातील सर्वात प्रथम अर्थमंत्री होते. त्याचप्रमाणे 'आर एन सिधवा' हे विधानसभेचे सदस्य असून ते भारतीय संविधान रचणाऱ्या संघाचे सदस्य होते.

स्वर्गीय 'होमी मोदी' हे उत्तरप्रदेशचे गव्हर्नर होते त्यांचा मुलगा 'पिलु मोदी' आणि त्यांच्या सोबत 'मिनु मसानी' हे गुजरात येथील स्वतंत्रता संघाचे खासदार होते.

सन १९६० मध्ये मध्यप्रदेशातील 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया ट्रेड युनियन' चे नेते होते. तसेच १९५० च्या काळात मुंबई विधानसभेत 'बोमन बेहराम' हे महापौर होते. 'नौशिर भरुचा' हे आमदार व सदस्य होते त्याचप्रमाणे 'खुर्शेद नरिमन' सन१९३५ मध्ये मुंबईचे महापौर म्हणून निवडून आले.

महानगरपालिकेत पारशी समाजातून अर्देशिर साबावाला, मांचेरजी मिनोचेर बिलपोडीवाला, दारा दिनाशाँ वाडिया आणि रुसी मेहता हे सदस्य होते. सर धूनजी शहा 'बोमनाजी कुपर' हे साताऱ्याच्या मराठा वर्चस्वाला आपला राजकीय पाया बनवून सन १९३७ मध्ये ते मुंबईचे पहिले मुख्यमंत्री बनले या सुप्रसिध्द पारसी राजकारण्यामध्ये 'होमी तलेरखान' ही सुध्दा महत्त्वाची व्यक्ती असून अनेक महत्त्वाची पदे त्यांच्या ताब्यात होती.

अशा प्रकारे पारशी समाजाने 'बॉम्बे' चे 'मुंबई' त परिवर्तन होईपर्यंतच्या इतिहासात राजकीय क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारे भाग घेऊन, समाजाची सेवा करुन अविस्मरणीय योगदान दिले. [१४]

संदर्भग्रंथ सूची

1. Gazetter of the Bombay Presidency Vol. XIII, Part I
2. Kulke Eeckhard, "The Parsis in India", Delhi 1974, Pg. No. 107-116
3. Pasricha Ashu, "The Political Thoughts of Dadabhai Naoroji" - (Encyclopaedia of Eminent Thinkers Series), Vol. 11, Concept Publishing Company, Jan. 2008
4. Dhatawkar Bhaskar Daji, "शोध निबंध संग्रह" Publishing Chetan Dhatawkar, Flat No. 18, Nalanda Vihar Kokansta Co-op. Hsg. Soc., 13/18 Road, Khar, Mumbai 400 052.
5. Sahukar Nimeran, "Great Women of India : Bhikaji Rustom Cama, Sterling Publishers Pvt. Ltd., July 2012
6. Singh Depinder (2002), Field Marshal Sam Maneckshaw M. C., Soldiering with Dignity, Natraj Publishers, ISBN978-81-85019-02-4
7. Blog, Sir, Sam Maneck Shaw, Wikipedia, Edited 17th Dec. 2016
8. Singh Vijay Kumar (2005) Leaership In the Indian Army; Biographies of Twelve Soldiers, SAGE, ISBN 978-0-7619-3322-9
9. Nariman Fali S., "Before Memory Fades : An Authobiography", Publisher Hay House, July 2012)
10. Blog, Sir, Ferozeshah Mehta Wikipedia
11. Akhtar Saud, "Feroze Gandhi : Life and Leadership", Mittal Publications, 1st Jan. 2013
12. Blog, Wadia Family, Wikipedia,
13. “Source Material for a History of the Freedom Movement in India” Govt. of Bombay VOL – I & II, 1959. Also, referred - List of Parsis, Wikipedia, Politicians activists and bureaucrats, Edited 23 June 2009
14. http://m.timesofindia.com/city/mumbai/parsis-are-not-interested-in-politics-anymore/articleshow/44237625.cms

प्रकरण – ६ वे

समारोप

'पारशी' हे 'पर्शिया' म्हणजे 'इराण' ह्या देशातून हिंदुस्थानात आले. 'इराण' हा शब्द 'पर्शिया' शब्दापेक्षा जास्त व्यापक असून त्यात कुर्दिस्तानपासून अफगणिस्तानपर्यंतचा प्रदेश येतो. हे लोक स्वतःला आर्य, अरिय, अर्ह्य असे म्हणत आणि त्यावरूनच 'इराण' हा शब्द रुढ झाला असावा. सहाव्या शतकात अरबांनी 'पर्शियन' म्हणजे 'इराणी' साम्राज्याचा पाडाव केला. तेव्हा काही इराणी निर्वासित गुजरातमध्ये आले. आजचे पारशी ह्याच इराणी निर्वासितांचे वंशज आहेत. 'ससानी' घराण्याच्या कारकिर्दीत भारत आणि इराण यांच्यामध्ये व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध होते.

पारशी समाज हा हिंदुस्थानातील अतिशय महत्त्वाचा घटक असून ब्रिटिश कालखंडामध्ये ह्या समाजाचे आर्थिक योगदान मोठ्या प्रमाणावर दिसून येते. निर्वासित असूनही ह्या समाजाने जिद्द, चिकाटी व मेहनतीने व्यापार–उद्योगांचा पाया घातला व अपार परिश्रम करून अलोट संपत्ती मिळविली आणि भरपूर दानधर्मही केले.

'दीव' मार्गे हिंदुस्थानात आल्यावर संजान व आसपासच्या गावात पारशी कमीत कमी तीनशे वर्षे राहत असावेत. ते मुख्यतः शेतीवरच आपला उदरनिर्वाह करीत होते. परंतु, त्यानंतर निरनिराळ्या शहरात जाऊन व्यापार करु लागले. सुरत येथे गेल्यावर त्यांची खऱ्या अर्थाने भरभराट सुरू झाली. मातीकाम, विणकाम, सुतारकाम इ. व्यवसायात पारशांचे उल्लेखनीय कौशल्य होते. पुढील काळात डच, पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी संबंध आल्यामुळे पारशांच्या व्यापारात भरभराट झाली. उदा. ब्रह्मदेश, चीन, मलाया, मक्का, मॉरिशिअस इ. त्याचप्रमाणे काही पारशी जहाजबांधण्याचा प्रचंड व्यवसायही करीत. तसेच इंग्रजांना सागवानी लाकूड, कपडे, गाड्या–घोडे, मेणे, बैल, दारू. इ. कंत्राट पध्दतीने पुरवित.

पारशी हिंदुस्थानातील आपल्या दत्तक भूमीशी चांगलेच समरस झाले. त्यांनी शेतकरी, शेतीतज्ज्ञ, फळबागायतदार आणि ताडीचे उत्पादक म्हणूनही आपला जम बसविला. पारशी सुबक विणकरही होते. त्यांनी भारताला तीन प्राचीन कलाकुसरींची देणगी दिली, ती म्हणजे

'सुरतीधार', 'गारो' आणि 'तानचोई' हस्तव्यवसायाची प्रमुख केंद्र हैदराबाद हे होते. त्याचप्रमाणे छोट्या प्रमाणावर पतपेढ्या सुरू करणे, दुकाने चालविणे हे व्यवसायही सर्वप्रथम त्यांनी सुरू केले.

एकोणिसाव्या शतकात, ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतर कित्येक पारशी घराणी उद्योग, शिक्षण, राजकारण इ. क्षेत्रात उदयास येऊन श्रेष्ठपदावर चढली. याचकाळात भारताचा औद्योगिक विकासही सुरू झाला व त्याचे श्रेयही पारशी उद्योगपतींना दिले जाते. त्यांनी अपार परिश्रम करून अलोट संपत्ती मिळविली व भरपूर दानधर्महीही केले. उदा. ससून, कामा, जहाँगीर, टाटा, वाडिया, पेटीट ही महत्त्वाची घराणी होय.

भारतीय शिक्षण पध्दतीत इंग्रजीचा समावेश झाला, त्यामुळेच पारशी समाजात कायद्याचा प्रसार लवकर झाला. पाश्चात्त्य शिक्षण पध्दतीचा भारतीय मनावर जबरदस्त प्रभाव पडला व यातूनच 'राजाराम मोहन रॉय' यांसारखे समाजसुधारक बंगालमध्ये निर्माण झाले. सन १८४८ मध्ये दादाभाई नौरोजींच्या पुढाकाराने आणि एलफिन्स्टन कॉलेजमधील इंग्रजी अध्यापकाच्या सहकार्याने तरुण पारशी व हिंदू सुधारकांच्या गटाने 'द स्टुडन्टस् लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी'ची स्थापना केली. पारशांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून शैक्षणिक क्षेत्रात स्त्री–शिक्षणाला प्रोत्साहन देताना 'अलेक्झांड्रा गर्ल नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिट्युट' सुरू करून सर्वप्रथम इंग्रजी भाषेचा वापर शिक्षणाचे माध्यम म्हणून करण्यात प्रोत्साहन दीले.

वैदिक धर्माप्रमाणे झरतुष्ट्री धर्मातही विवाहास प्राधान्य आहे. विवाह करून योग्य प्रकारे संसार करणे, हे मनुष्याचे मुख्य जीवन कर्तव्य होय, असे पारशी मानतात. त्यामुळे संन्यास व ब्रह्मचर्य यांचा ह्या धर्माने निषेध केला. पारशी जवळच्याच नात्यातील विवाह प्रशस्त मानतात. स्त्री–पुरुष दोघांचाही पुनर्विवाह समाजमान्य आहे. विवाह अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. ह्या सोहळ्यात वेगवेगळे पदार्थ अतिशय चवीने खाण्यात येतात. या वेळी दारूचे सेवन महत्त्वाचे असते. ह्या धर्मात वेगवेगळ्या प्रसंगी जेवणातील पदार्थांमध्ये विविधता आढळते. समारंभात अंड्याचे पदार्थ, मांस, मासे हे पदार्थ महत्त्वपूर्ण आहेत. पारशी समाजात उपवास निःषिध्द मानले आहे, कारण त्यांच्या मते, ईश्वराकरिता एखाद्या भक्ताने उपाशी राहावे, असे

मानले जात नाही. तसेच कुटुंबात जर कोणाचे निधन झाले असेल तर पहिल्या तीन दिवसाच्या काळात मित्र व नातेवाईक जेवणाची काळजी घेतात.

पारशी समाजाने उद्योगपती, राजकीय व्यक्ती, खेळाडू, चित्रपट कलाकार, संगीतकार इ. क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करून सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहून यश मिळविले. त्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट धर्माच्या कोणत्याही सीमा पार न करता व धर्माचा आदर करून समाजाला उंच शिखरावर पोहोचविले. स्वतःबरोबरच त्यांनी संपूर्ण जगात व्यापार–उद्योगाला एका नवीन पातळीवर नेऊन दिशा दिली.

पारशांच्या प्रगतीची सुरुवात सुरत,गुजरात येथून झाली. परंतु त्यांची भरभराट मात्र मुंबई महानगरात झाली. पारशांकरिता मुंबई हे एक व्यापारी केंद्र म्हणून उदयास आले. सुरत येथून मुंबईत स्थायिक झाल्यानंतर त्यांची आर्थिक भरभराट झाली. ह्या भरभराटीची विभागणी त्यांनी धार्मिक कामांकरिता केली. जसे, मुंबईतील पहिला दाख्मा, पहिली अग्यारी व पहिले आतश बेहराम इ. सर्व पारशी व्यापाऱ्यांनी आणि धनिकांनी दिलेल्या देणगीतूनच बांधण्यात आले. पारशी समाजात दानधर्म करणे ही पूर्वीपासून चालत आलेली परंपरा आहे. त्यांच्या दानधर्मात धार्मिक, सामाजिक संस्थांची संरचना, समाजातील लोकांना राहण्याची व्यवस्था आणि आपत्तीच्या काळात आर्थिक मदतीचा समावेश दिसतो.

चीनबरोबर व्यापार करून पारशींना बरेच फायदे झाले व त्यातून त्यांच्या समाजाचाही फायदा झाला. त्याचप्रमाणे ब्रिटिशांबरोबर आर्थिक व सामाजिक राजकारणात सहकार्य करण्याचे त्यांना प्रोत्साहन मिळाले. ज्याचा परिणाम भारताच्या आर्थिक विकासात झाला.

एकोणिसाव्या शतकातील मुंबईतील पारशी समाजातील महत्त्वाचे व मान्यताप्राप्त व्यापारी ही पुढील काळात पारशी समाजातील नामांकित व्यापाऱ्यांची ओळख झाली होती. पर्यटन, समुद्री व्यापार तसेच परकीय व्यक्ती व त्यांच्या संस्कृतीबरोबर संबंध प्रस्थापित करण्याच्या विचाराने पारशी भारावले. परकीयांच्या ह्या देवाणघेवाणीतून विज्ञान, साहित्य व नागरी प्रगतीबाबत ते अधिक सजग बनले.

नागरी अस्मिता व मानव प्रेम हे पारशी समाजाचे मुख्य सूत्र आहे. ज्यांचा मुंबईच्या सांस्कृतिक, बौध्दिक आणि वैज्ञानिक सुधारणेच्या घडणीत महत्त्वाचा वाटा आहे.

पारशी समाजातील नामवंत व्यक्तींची यादी अत्यंत मोठी असून या यादीतील नामवंत व्यक्तींनी एवढी मोठी कामगिरी कशी केली ? तर त्यांचे धार्मिक तत्त्वज्ञान, त्यांची उद्योगातील विविधता व कठीण श्रम. ह्यात ह्या प्रश्नांची उत्तरे मिळते.

भारतीय शिक्षण पध्दतीत इंग्रजी भाषेचा समावेश करण्यात पारशी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. परंतु, तेव्हा मुलींना शिक्षणाची परवानगी नव्हती. पुढील काळात पारशी समाजाने दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा इत्यादींनी आपली शैक्षणिक कारकीर्द समृध्द केली.

पारशांनी समाजातील सर्व धार्मिक गोष्टींचा आदर करून आपल्या सुधारणा केल्या. ज्याप्रमाणे त्यांचे इतर रीतिरिवाज महत्त्वाचे आहेत, त्याचप्रमाणे व्यक्तीच्या मृत्युनंतरचेही रीतिरिवाज महत्त्वाचे मानले जातात. हे अग्नी, जल व पृथ्वी यांना पवित्र मानतात आणि मृतदेहाला अपवित्र. म्हणूनच ते मृतदेहाचे दहन करीत नाहीत किंवा तो जमिनीतही दफन करीत नाहीत व पाण्यातसुध्दा बुडवित नाहीत. कारण, त्यामुळे अग्नी, जल, पृथवी अपवित्र होऊ नये, अशी त्यांची इच्छा असते.

पारशी, आपल्या समाजाचा एक अविभाज्य घटक असला तरी संख्येने अत्यल्प आहे. व येत्या काही वर्षात ते भूमीवरून नाहीसे होण्याची शक्यता आहे. याचे कारण म्हणजे, त्यांच्या मृत्युदराच्या तुलनेत असलेला अल्प जन्मदर.

पारशी समाजातील बहुसंख्य जनसमुदाय हा मुंबईत स्थायिक आहे. त्यांनी एकाच ठिकाणी एकत्र राहण्यासाठी 'पारशी बाग' बांधली. परंतु अशाप्रकारे एकत्र राहण्याचा काहीही उपयोग झाला नाही. कारण असे राहूनही विवाहास योग्य परिस्थिती निर्माण झाली नाही. याचे महत्त्वाचे कारण असेही मानले जाते की त्यांचे पालक मुलांना संपत्ती आणि ऐहिक सुख तसेच सर्वतोपरी समृध्द जीवन मिळावे, म्हणून त्यांना उशिरा विवाह करण्याविषयी सुचवितात. परंतु, असे केल्यामुळे त्यांच्या सामाजिक व शारीरिक पैलूंवर दुर्लक्ष होऊन पारशी मुलींना त्यांच्याच

समाजातील मुलगे मिळणे कधी–कधी कठीण होते. परिणामी, ह्या मुली पारशी नसलेल्या व्यक्तींशी विवाह करतात. आणि त्यामुळे त्यांचे झालेले अपत्य हे अधिकृतरीत्या पारशी जमातीचे नसल्यामुळे हे ही एक महत्त्वाचे कारण आहे की, त्यांची लोकसंख्या झपाट्याने घटत आहे.

म्हणूनच पारशी समाज हा आपल्या समाजाचा एक अविभाज्य भाग असल्यामुळे त्यांच्या घटणाऱ्या लोकसंख्येवर भर देणे आवश्यक आहे. या गोष्टींवरच लक्ष केंद्रित करून सरकारने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत.

निष्कर्ष –

१. पारशी समाजाने व्यापार–उद्योगात खऱ्या अर्थाने पाया घातला व अपार परिश्रम करून अमाप संपत्ती मिळवली. तसेच माणुसकीच्या फायद्यासाठी भरपूर दानधर्मही केले. व्यापारी समाज असल्यामुळे समाजाचा एक गट समुद्री व्यापार, जहाज बांधणी तसेच अफू, तानचोइ–गारो साडी, गालिचे, जडजवाहिरे, इ. व्यापारात अग्रेसर होता.

२. त्यांच्या कमी होत चाललेल्या लोकसंख्येमुळे सरकारने 'जिओ पारशी' ही योजना कार्यान्वित केली.

३. भारतीय शिक्षण पध्दतीत इंग्रजी भाषेचा समावेश करण्यात पारशी समाजाचे योगदान महत्वपूर्ण ठरते. गुजरातच्या खेड्यापाड्यात राहणाऱ्या अनेक तरू णांच्या शिक्षणाची जबाबदारी मुंबईतील अनेक पारशांनी घेतली. त्यांनी गुजरात भागातील अनेक शाळांना आर्थिक साहाय्य देऊन गुजराती भाषेच्या अभ्यासाला चालना ही दिली.

४. पारशी समाजाच्या धार्मिक स्थानात पारशी व्यतिरिक्त इतर धर्मातील लोकांना प्रवेश नाही. हिंदू, बौध्द, ख्रिस्ती आणि इस्लाम या मुख्य प्रवाहात पारशी संस्कृती ही वेगळी असली तरीही त्यांनी कधीही दुसऱ्या धर्मासाठी अडचण निर्माण केली नाही. पारशी समाजाने त्यांचे रिती–रिवाज व धार्मिक बाबी सांभाळून दुसऱ्या धर्माचा आदर राखून आपली सर्व कर्तेव्ये व जबाबदाऱ्या यांची उत्तम सांगड घालून त्या यशस्वीपणे पार पाडल्या.

५. झोराष्ट्रियन धर्माचे पालन करणारे लोक इराणवर जेव्हा अरबांनी पाडाव केला त्यावेळी निर्वासित म्हणून हिंदुस्थानातील गुजरात या प्रदेशात आले. आजचे पारशी हे त्या निर्वासितांचे वंशज आहेत.

६. ब्रिटीश कालखंडात पारशी समाजाचे बॉम्बे बंदरावर मजबूत वर्चस्व असून ते ब्रिटीशांच्या हाताखाली मध्यस्त म्हणून कार्यरत होते.

७. पारशी धर्म व वैदिक धर्म यांची सार्धम्य साधण्याचा प्रयत्न केला आहे. आज इराण जेथे आहे त्याचठिकाणी सुमारे आठ हजार वर्षापूर्वी पारशी धर्माची स्थापना झाली असावी. कारण हा काळ वेदांच्या निर्मितीचा काळ मानला जातो. प्राचीन वैदिक हिंदू व पारसी समाजाचा परस्परसंबंध आणि त्यातील एकसारखेपणा हा पूढील बाबीवरुन स्पष्ट होतो.:– वैदिक धर्म हा निसर्गपूजक आहे. ते निसर्गातील अग्नी, जल, वायू ,आकाश, पृथ्वी, तारका इ. चे उपासक आहे. याचप्रमाणे पारशी समाजात सुध्दा अग्नी, जल, तारका, वायू इ. गोष्टींना पवित्र मानण्यात येऊन त्यांच्या कर्मकांडाचा तो एक महत्वाचा भाग आहे. वेदांची भाषा आणि पारशी गाथा यात अगदी देवतांमधील साम्यापासून अनेक दुवे सापडतात.

उदा. – देव – दैव, असुर – अहूर, मित्र – मिथ्र, वरुण – वरेण, विवस्वान – विवहवंत, यम – र्यिम, सोहम – होम, मास – माह इ.

References

Primary Sources :

Gazeteer :`

1) Gazeteer of The Bombay Presidency Volume XIII Part I
2) Gazetteer of India , Maharashtra State, Thane District vol-I
3) Maharashtra State Gazeteer Volume 1

Holy Book :

1) Anquetil Duperron Zend Avesta Vol I,
2) Geldner Karl F., Ed., Avesta, "The Sacred Books of The Parsis." Vol 3, Stugartt, 1886 - 1895, Rpt. Delhi 1982
3) Holy Book "Yasna"
4) Mills L.H. "Vendidad Sacred Books of The East" Vol. IV.
5) Vendidad VIII

Letter :

1) Letter Written By John Fryer on 16th January, In R. B. Paymaster, "Early History of The Parsees In India" (Bombay 1954)
2) Taraporewala Sooni , The Zoroastrians of India , "Parsis - A Photographic Journey", Good Books, 19 Kala Niketan, 47 Cb. Desai Road, Mumbai-26. Letter Processed And Printed by Dai Nippon In Hong-Kong

Article :

1) Kocher R.K., 'Shipbuilding At Bombay' Current Since 1994
2) Wardwell Anne E. And C. Y. Watt James, "When Silk Was Gold, Central Asian And Chinese Textiles", New York, 1997.

Report :

1) A Report to the Trustees of Sir Ratan Tata Trust on Problems Affecting the Parsi Community, S. F. Markham, Dec. 1932

Journal :

2) Journal of The Anthrop Society of Bombay Vol. 2 No. 7
3) Lord Harris, A Former Governor of Bombay Says In The Journal of The Society of Arts (1901)
4) Nadri Ghulam A., "Maritime Merchants of Surat ; A Long Term Perspective" Journal of The Orient, Vol. 50
5) Rutnagur S.M., "Bombay Industries the Cotton Mills" (Bombay Indian Textile Journal, 1927)
6) Trivedi A.B.,The Silk Weaving Industry of Surat" Journal of The University of Bombay", Vol X, 1942.

Weekly :

1) Guha Amalendu, ' Parsi Seths As Entrepreneurs", 1750-1850, Economic and Political weekly Vol. 35 1970-77
2) Guha Amalendu, "Comprador Role Of Parsi Seths" 1750-1850 Economic And Political Weekly, Vol. 48, 1970

Magazine :

1) Patell Parsi Prakash Vol. - I Economic and political weekly Vol. - 48 - 1970, Vol. - 35, 1970-77

Interview :

1) Mehernosh Phirozshah Billimoria (Akashwani Mumbai)
2) Zarir Sorabji Kasad (Colaba Mumbai)
3) Farhad Framji Elaviya (Nepeansea Road, Mumbai)
4) Khurshed Jehangir (Syndicate, Kalyan.W)

Published Paper :

1) Mazumdaar Sucheta, "Sugar And Society In China, Peasants, Technology And The World Market", Harvard University Press, 1998
2) Morris M.D., "The Growth of Large Scale Industry To 1947 In The Cambridge Economic History of India" Vol. 2, 1700-1970 (Cambridge : Cambridge University Press, 1983)

3) Sen Tansen , Buddhism, Diplomacy and Trade, The Realignment of Sino-Indian Relations 600-1400, University of Hawaii Press 2003
4) Vakil K. B. "The Nature of Poverty Among Parsis", 1935
5) Wadia R.A., The Scious of Lowjee Wadia" (Bombay : Krishnamurthy At The Godrej Memorial Printing Press, 1964)
6) Westermarch E, The History At Human-Marriage, London 1901
7) Windower Michael ,"Art Deco; A Mode of Mobility", Presses De Universite Du Quebec, 2012.

Secondary Sources :

Unpublished Paper :

1) Douglas James Bombay And Western India ; "A Series of Stray Papers" (Delhi K.K. Book Distributors, 1975)

Encyclopedia :

2) Pasricha Ashu, "The Political Thought of Dadabhai Naoroji" (Encyclopaedia Of Eminent Thinkers Series) Vol XI, Concept Publishing Company, January 2008

External :

1) Name of Zoroaster In American Studies
2) Name of Zoroaster In Armenian Studies 2, Los-Angeles, 1985

Website :

1) Http://Googleweblight.Com/?Lite_Url=Http://Www.Atimes.Com/Atimes/South.Asia/Je4Df01.Htmlandei=7ineo=Aq&S=1&M=89&Ts=1447658418&Sig=Aponpfrn0kzhsc9citqqgymin.Y/8mkdec-A
2) Http://M.Timesofindia.Com/City/Mumbai/Parsis-Are-Not-Interested-In Politicsanymore/Articleshow/44237625.Cms
3) Http://Www.Avesta.Org/Zcal.Html
4) Site ; Dailypioneer.Com/Article The Parsis Way Of Life ; Reporter and Explorer-Reanshi Vikram,Date-Sunday,16th August,2015.
5) www.Ceasonsindia.Com/Marriage/Care_Parsi_Sea.Htm#Top

Library -

1) Mumbai Marathi Granth Sangrahalaya, Dadar.
2) Nehru Library Santacruz, Kalina.
3) Asiatic Library, Mumbai.
4) Fort Library, Mumbai.
5) Library at Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.
6) Directorate of Archives Mumbai.
7) J. N. Petit Institute of Mumbai.
8) Asiatic Library, Mumbai.
9) K. R. Kama Oriental Institute, Mumbai.

Books :

1) A Society of Greater Britain Vol VII, 1846
2) Akhtar Saud "Feroze Gandhi : Life And Leadership", Mittal Publications, 1 January 2013
3) Alain Le Pichon, China Trade and Empire ; Jordine, Matheson and Co. and The Origins of The British Rule In Hong-Kong, 1827-1843 (Oxford : Oxford University Press, 2006)
4) Anquetil Duperron Book, "The Description Of Mussalmaan And Hindus of The 18th Century" Zend Avesta, Desc, Prel, Pg CCLX Et.Seq
5) Apte, B.V. Aids To Hindu Law, Poona 1928
6) Ashby H.T., Infant Mortality, Cambridge Public Health Series, Cambridge University Cambridge 1951
7) Bailey, H.W.Ed. Arberry J. “The Legacy of Persia”, Oxford, 1956.
8) Bombay : University of Bombay 1973
9) Boyce Mary, "A History of Zoroastrianism" Vol I, IInd. Ed., Leiden 1975.
10) Boyce Mary, "Zoroastrians, Their Religions Beliefs And Practices" London 1979
11) Briggs H.G.. "The Parsis of Modern Zerdusthians", Edinburgh, Oliver and Boyd, 1852 Briggs Parsis or Modern Zardustians
12) Browne E.G., "A Year Among The Persians"
13) Browne, “ Literary History of Persia”, London, 1904

14) Chatterji Jatindra Mohan, “The Hymns Of Atharvan Zarthushtra”, Calcutta 1967.

15) Chinoy E., "Society : An Introduction to Sociology." (Published By Random House, New York, Toronto, Copyright 1967)

16) Choksy Jamsheed K. "Woman in the Zoroastrian Book of Primal Creation." The Mankind Quarterly, 29,1988

17) Coates W.H., "The Old Country Trade of the East Indies." (London : Imrag,1911)

18) Correia John Afonso Intrepid Itinerant Bombay 1940

19) Darmesteter J .Tr. "Sacred Book of The East Vol IV", Oxford, 1895.

20) David History of Bombay 1661-1708

21) Dellavalle Pietro , Voyages Etc. French Translation Vol II.

22) Desai "History of the Bombay Parsi Panchayat"

23) Dhamija Jasleen, "Regional Views of India, And Handwoven Fabrics of India", Edited By Jasleen Dhamija And Jyotindra Jain, Ahmedabad, Mapin Publishing Pvt. Ltd., 1989

24) Dhatawkar Bhaskar Daji "Shodh Nibandh Sangrah" Publishing : Chetan Dhatawkar, Flat N.18, Nalanda Vihar, Kokansta Co-Op Soc., 13/18 Road Khar, Mumbai-52

25) Divekar "Regional Economy '

26) Divekar V.D., "Emergence of An Indigenous Business Class In Maharashtra In The Eighteenth Century", Modern Asian Studies, 16(1982)

27) Dossal M., "Seeds of Change"

28) Dubois J. A., Hindu Manners Customs And Ceremonies, Oxford 1897

29) Earon David, on The Relation of Fertility In Man To Social Status, Research - Mamoire No. 1 1906

30) Eduljee H.E. Kissa I Sanjan, K. R. Cama Oriental Institute, 136 Bombay Samachar Marg, Fort, Bombay-23,1991

31) Edward J. Keal, "Iranian Civilization And Culture "Ed. Charles Adams, Montreal, 1972.

32) Ehsan Yarshater "Iranian National History", In the Cambridge History of Iran, Vol.3, Part1, Ed. E. Yarshater, Cambridge,1983.
33) Elliot, History of India.
34) Enthoven R.E., Tribes and Caste of Bombay, Bombay Vol. III
35) Farbes James, "Oriental Memories-II Ed."
36) Firby European Travellers
37) G.M.Bongard Levin "Studies In Ancient India and Central Asia" Soviet Indology Series 7, Calcutta, 1971
38) Gathas In R.Schmidt And P.O.S.K. Jaevuo, Eds. Studia Grammatica Iranica, Festchrift H. Humbach, Munich,1986
39) Ghandavarkar Raj Narayan, "The Origins of Industrial Capitalism In India", (Cambridge : Cambridge University Press, 1994)
40) Giara M. J., "Global Directory of Zoroastrian Fire Temples" (Bombay: Jenaz Printers, 2002)
41) Gide Charlee Riat Charlee, History of Economic Dootrine's Translated By Nortality.
42) Godrej Pheroza J And Mistree Pheroza Punthaky "A Zoroastrian Tapestry, Art, Religion And Culture, Mapin Publishing.
43) Greenberg Michael, "British Trade And The Opening of China", 1800-42, (Cambridge : Cambridge University Press)
44) Gupta Ashin Das, "Indian Merchants And The Decline of Surat",1700-50
45) Guy John, "Woven Cargoes; Indian Textiles In The East",(London; Thames And Hudson, 1938)
46) H. Lord "Discovery of the Banians And The Persees", Etc.
47) Inter Alia: Friar Jordanus, "The Wonders of The East", Trans. From The Latin Original As Published In Paris In 1889, In The "Recueil De Voyages Et Memoires" Etc. By Col. Henry Yale.
48) Jackson, A.V.Williams, “An Avesta Grammar in Comparison with Sanskrit” Part – 1 Stuttgat, 1892.
49) Jahangir C.J., "Life of Sir Cowasjee Jahangir",(London : London Stereoscopic and Photographic Co. 1690)

50) Jahangir R. P. Mody, "Jamsetjee Jeejeebhoy , The First Indian Knight And Baronet" (1783-1859) Bombay 1959.
51) Jan Van Der Putten "Wayang Parsi Bangsawan and Printing : Commercial Exchange
52) Between South Asia and The Malay World", Institute of Southeast Asian Studies, Singapore, 2008
53) Karaka Dosabhai Framjee , "History of The Paresis" Vol. I London 1884.
54) Karaka Vol II,
55) Khosru Navrosji Banaji ,"Memoirs Of The Late Framjee Cowasjee Banaji", Bombay, 1982
56) Kingsley P., "The Greek Origin of the 16th Century Dating Of Zoroaster" BSOS 53,1990
57) Kulke Eckhard "The Paresis In India", Delhi 1974, Pg 107-116
58) Lincoln "The Indo European Myth"
59) Lincoln Bruce,. "The Indo-European Myth of Creation" History of Religions, 1975.
60) Lotikavaradarajan, "Of Silks And Embroidery";Indo-Portuguese Textiles ; Vol. XXXV (3)
61) Lowie R. H., Culture of Sthnology, Boni And Livaeright, New York 1917
62) Mandelslo Voyages Etc, Trans. Wicquefort
63) Mehta S.D., "The Cotton Mills of India", 1854-1954(Bombay Textiles Association, India, 1954)
64) Mintra R. The Paresis at Bombay.
65) Modi Rustom Maneck And The Persian Qisseh.
66) Nadri Ghulam A. "18th Century Gujarat The Dynamics of Its Political Economy", 1750-1800, Leidan, Brill, 2009.
67) Nariman Fali S., " Before Memory Fades : An Autobiography" Publisher Hay House, July 2012
68) Odoric De Pordenone, Voyages Etc., Published and Annotated By Mr. H. Cordier
69) Ovington, Voyage To Surat, 1689

70) Palsetia Jesse S., "The Paris and The Opium Trade In China, Contemporary Drug Problems", 35 (Winter, 2008)
71) Palsetia Jesse S., "The Paresis of India, Preservation of Identity in Bombay City", Brill, Leiden, 2001.
72) Pandurang S.S. Pissurlencar Agents Parses Du Diploma Arnica Portuguesa
73) Parcival Spear , "The Nobles ; A Study Of The Social Life of English In 18th Century"
74) Bombay English and Gujarati Job Printing Press, 1876
75) Petermann H. Reisen Im Orient Vol II
76) Pissurlencar, "Portuguese Records on Rustamji Manochji, The Paris Broker At Surat, Nova Goa", 1933
77) Ramaswami N. S.," Indian Cricket A Complete History", New Delhi, 1976
78) Ross E. A. Foundation of Sociology, Chp V, Crowell 1928
79) Rustamji Sethna Tehmurasp "Book of Instructions on Zoroastrian Religion"., Published By, Informal Religion Meetings Trust Fund, Karachi 1980.
80) Sahukar Nimeran, "Great Women Of India : Bhikaji Ruston Kama" Sterling Publishers Pvt. Ltd. July 2012
81) Schwartz Martin "The Old Eastern Iranian World, View According To The Avesta.". The Cambridge History of Iran, Vol II, Ed. Ilya Gershevitch, Cambridge 1985
82) Schwartz Martin "The Religion of the Achaenian Iran.", the Cambridge History of Iran. Vol II, Ed. Ilya Gershevitch, Cambridge, 1985.
83) Seervai and Patel, Gujarat Paresis, Bombay.
84) Singh Depinder (2002), Field Marshall Sam Maneckshaw, M.C.: Soldiering with Dignity, Natraj Publishers ISBN. 978-81-85019
85) Singh Vijay Kumar (2005)- "Leadership in The Indian Army : Biographies of Twelve Soldiers", Sage, Isbn. 978-0-7619-3322-9
86) “Source Material For a History of The Freedom Movement In India”, Govt. of Bombay VOL- I & II, 1959.
87) Stephen M. Edwards, "The Rise Of Bombay", A Retrospect, Bombay 1902

88) Still James A., "The Great Tamasha; Cricket, Corruption and Turbulent Rise of Modern India", Bloomsbury, 2013

89) Sullivan R.J.F., "One Hundred Years of Bombay", History of The Bombay Chamber of Commerce 1886-1936, (Bombay : Bombay Times Of India Press, 1937)

90) Terry Edward, "A Voyage To East India" 336-38, Quoted In Paymaster, "Early History of The Parsees In India."

91) Terry In Purchas, "A Relation of A Voyage To Eastern India"

92) Thampi Madhvi And Saksena Shalini,"China And the Making of Bombay", K.R.Cama Oriental Institute, Mumbai, 2009

93) The Indian Economic and Social History Review Vol. 24, No. II,1987

94) The Parsis Vol III ,Translated From The French., By-Anthony D. Mango., Publishing In 1996, By Panai, Mangalsmruti, 14th Road, Khar Danda Road., Khar-Bombay-52

95) The Paresis Vol II

96) Vacha D., "Recollection And Reminiscences, Shells From the Sand of Bombay", Bombay 1920

97) Vaid K.N. "The Overseas Indian Community In Hong Kong", (Hong-Kong : Centre Of Asian Studies, University of Hong-Kong, 1972)

98) West E.W., The Dadaistic I Deink Sacred Books of the East Vol. XVIII 1882 XXXI14

99) White David L. "Paresis in the Commercial World of Western India" ,1700-1750


100) Yarshater Iranian National History

101) Zaehner Rebert C. "The Dawn and Twilight of Zoroastrianism", London, 1961.


102) Zaehner Rebert C. The Teachings of the Magi.

प्रकरण – ७ वे

परिशिष्ठ 'अ'




A map of Old Yezdi Persian Empire



A map of India depicting history of Parsi's in India

Census Year	Parsis in Mumbai	Parsis in India (including Mumbai)	Total Population of India	Parsis as a % of India's Population
1881	48,597	85,397	253,891,821	0.034
1891	47,458	89,887	287,314,671	0.031
1901	46,231	93,952	294,361,056	0.032
1911	50,931	100,096	315,156,396	0.032
1921	52,234	101,778	318,942,480	0.032
1931	57,765	111,853	352,837,778	0.032
1941	59,813	114,890	388,997,955	0.030
1951	68,660	111,791*	361,088,090*	0.031
1961	70,065	100,772	439,234,771	0.023
1971	64,667	91,266	548,159,652	0.017
1981	50,053	71,630	683,329,097	0.010
1991	53,794	76,382	846,302,688	0.009
2001	46,557	69,601	1,028,737,436	0.007

A Comparative population chart based on census reports from 1881-2001
(Source - मुंबई पुराभिलेखागार)


પા ર સી પ્ર કા શ

PARSEE PRAKASH

BEING
A RECORD OF IMPORTANT EVENTS IN THE GROWTH
OF THE PARSEE COMMUNITY
CHRONOLOGICALLY ARRANGED.

VOL. X—PART I—1961 & 1962 A. D.

BOMBAY.

(Source - K. R. Kama Oriental Institute, Mumbai)



સ્થાપના: ૧લી જુલાઈ ૧૮૨૨

મુંબઈ સમાચાર

THE BOMBAY SAMACHAR

ન્યૂઝ ૨૧મી ડીસેમ્બર ૧૯૨૮ : 21st December 1928

હૃદય કંપાવનારો બનાવ

અલીભાઈ સર આદમજી પીરભાઈના બઈરો લેડી અમ્તુલ્લાહ ભાઈની લાશ નગ્ન હાલતમાં ચરની રોડના ફુટપાથ પર

મા મયાળુ હોરા કોમમાં હિદય કંપાવનારો એક બનાવ ગઈ કાલે ૨૦ ડીસેમ્બરના રોજે બન્યો છે. મુંબઈના માજી શરીફ અને સખી-સોદાગર સર આદમજીની વહુ અને તેમના દિકરા અલીભાઈ સર આદમજી પીરભાઈના બઈરો લેડી અમ્તુલ્લાહ ભાઈની લાશ નગ્ન હાલતમાં ચરની રોડના ફુટપાથ પર પડેલી જોવામાં આવી હતી.

સર આદમજીના દિકરાઓએ વોહરા કોમના વડા મુલ્લાજી સામે મુંબઈની હાઈ કોર્ટમાં એક કેસ કર્યો હતો જેનો ચુકાદો હાલ ૧૯૨૮માં આવી ચુકો છે. આ કેસમાં પરાજય પછી વડા મુલ્લાજીએ તેમના બાળપણના મિત્ર સર આદમજીના પરીવારને જમાતબાહિર કર્યા છે.

તેમ છતાં ૨૦મી ડીસેમ્બરે જ્યારે તેમના પુત્ર અલીભાઈના બઈરો ગુજરી ગયા તો તેની લાશને ઘઉંદી વોહરા કબ્રસ્તાનમાં દફન કરવા વડા મુલ્લાજીને અરજ કરવામાં આવી પણ વડા મુલ્લાજી રાજી ન થયા. સર આદમજીના ચરની રોડ પર સેની ટોરીયમની પાછળ સર સાહેબનો એક ખાંગી પલોટ છે તેમાં લાશને દફન કરવામાં આવી.

નગ્ન હાલતમાં પટપાથ પર કેવી રીતે આવી હતી. કબર ખોદી લાશ કારનાર ૪ વોહરાઓમાંથી બે ઈસ્મો, ઈસ્માઈલ બાયદ વાલા અને નુરો લુંગી વાલાની શનાખ્ત પોલીસે કરી છે અને તેઓની તલાશ સેનીટોરિયમમાં રહતા એક મુસલિમ યુવાનની મડદથી કરી રહી છે. પોસ્ટ મોર્ટમ પછી લાશ ફરી દફન કરી દેવામાં આવી છે. જે ઉપર પોલીસનો ૨૪ કલાકનો પેહરો બેસાડવામાં આવ્યો છે.

આ કાવત્રામાં વડા મુલ્લાજીનું નામ આવાથી તેમને ચારો તરફથી ધિતકાર મલી રહી છે.તેમજ વોહરા કોમમાં ઉહાસતનો વાતાવરણ ફેલાયો છે.

મોરારજી ભાઈ દેસાઈ મુંબઈમાં તેમના દિકરા કાંતીભાઈના મરીન લાઈન્સ વાલા ફલેટમાં મુકામ રાખે છે અને દર રોજ અહારે મરીન લાઈન્સ

લેડી અમ્તુલ્લાહ અલીભાઈ સર આદમજી પીરભાઈ

ચરની રોડના ફુટ પાઠ પર જોગિંગ કરવા નિકલે છે. ગઈ કાલે તેઓએ આ લાશ જોઈ અને પોલીસને ખબર કરી હતી. આ બાબતે મુંબઈમાં ઘણી ચર્ચા થઈ રહી છે. વડા મુલ્લાજી આ બનાવ બને તે પહેલા જ છેલ્લી બતમીના બહાને સુરતના ધુમસ મુકામે રવાના થઈ ગયા હતા. જમાતના અમુક મોટેરાઓ આ શરમજનક ઘટનાને દબાવી દેવા પ્રયતનો કરી રહ્યા છે. ધર્મની આવી ચકમી-સત્તાને લોકો વખોડી રહ્યા છે.

A Weekly News Paper ' Bombay Samachar' of year 1833

(Source - Asiatic Library, Fort, Mumbai)



મુંબઈ સમાચાર

સ્થાપના : ૧લી જુલાઇ ૧૮૨૨

સાપ્તાહિક

E BOMBAY SAMACHAR WEEKLY

Bombay, Sunday 31st December 1978

A Weekly News Paper ' Bombay Samachar' of year 1833

(Source - Asiatic Library, Fort, Mumbai)



THE TATA IRON & STEEL COMPANY

LIMITED

CAPITAL RUPEES 2,31,75,000

DIVIDED INTO

2,00,000 ORDINARY SHARES OF RS. 75 EACH,

50,000 PREFERENCE SHARES OF RS.150 EACH AND 2,250 DEFERRED SHARES OF RS.30 EACH.


THIS IS TO CERTIFY that

BOMBAY

CANCELLED

Share Certificate of Tata Iron & Steel Company

(Source - K. R. Kama Oriental Institute, Mumbai)



CUMBALLA HILL,
BOMBAY.


Dear Sir

I have great pleasure
in sending you the signatures
of the members of the Parsee Section

J. M. Framjee Patel
M. C. Pavri
Rustomjee Dorabji Cooper
Dinshaw Dorabji Kanga
R. E. Mody
D. E. Mody

Nov 9th 1892

(Source - K. R. Kama Oriental Institute, Mumbai)



મહારા વહાલા બાપાજી

આશા છે જે તમે સારી કાની હશો જી, હમે બધાં સારી કાની છઈએજી. આ એ મહીનામા બઉજ વરસાદ પડાએ છેજી. આવ તો મહીનામા આપણુ નવુ વરસ આવશેજી. તમારી સાલગરી ગઈને અમારે તી કાગલ લખ્યુ નહી તેથી માફ કરજોજી.

લી૦ બિટો

સરોસ અલ નવરોજી

નાજે કલમ

બોધ તમોને વહોલી સુખડી સદા સુખમાં તનદરોસ્તી તથા જીવાકુંબેજ આરી કુવા આમીન થાઓજી.

Letter to Dadabhai Naoroji by his Grand Son Sarosh Naoroji

(Source - K. R. Kama Oriental Institute, Mumbai)